नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका



युगवाणी

जुलै '९१


अनुक्रमणिका



विदर्भ साहित्य संघाला सतत आठ वर्षे
प्रागतिक वाङ्मयीन नेतृत्व प्रदान करून विदर्भ साहित्य
संघाचे कार्य विदर्भभर विस्तारणारे महाराष्ट्राचे लाडके वक्ते
प्रा. श्री. राम शेवाळकर यांनी प्रकृती अस्वास्थामुळे
विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाची धुरा इतर
समर्थ व्यक्तींनी सांभाळण्याकरिता
विदर्भ साहित्य संघाच्या स्वाधीन केली.
त्यांच्या समर्थ कार्यकाळात विदर्भ साहित्य संघ
शाखा, सदस्य व कार्य, दर्जा, गुणवत्ता या साऱ्याच
अंगांनी समृध्दी पावला.
विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीने
त्यांच्या कार्याचा, कार्यकाळाचा कृतज्ञतापूर्वक व
गौरवपूर्वक उल्लेख करून त्यांना निरोप दिला.

'युगवाणी' हा मराठी वाङ्मयीन संस्कृती, विदर्भ व
विदर्भ साहित्य संघ यांचा मानबिंदू इथील इतिहास
व वाङ्मयीन दस्तऐवज असल्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे
वाङ्मयीन नियतकालिकांच्या दुरवस्थेच्या
या कालखंडातही 'युगवाणी' अद्यापही आपली
प्रकाशन परंपरा सांभाळून आहे.

●●



विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीने
प्रा. राम शेवाळकर यांच्या जागी विदर्भ साहित्य संघाचे
अध्यक्ष म्हणून चंद्रपूरचे प्रा. सुरेश द्वादशीवार यांची
नियुक्ती केली. गेली आठ वर्षे यवतमाळ
जिल्ह्याकडे असणारे वि.सा. संघाचे अध्यक्षपद
त्यांच्या निमित्ताने चंद्रपूर जिल्ह्यास प्रथमच लाभत आहे.
त्यांचे अभिनंदन!
त्यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ साहित्य संघ [illegible]कडे
वाटचाल करील या अपेक्षेसह

●●

अनुक्रमणिका

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

आवरण पृष्ठ / रेखाटन व अंकातील रेखाटने : कै. भाऊ समर्थ / मुखपृष्ठ संकल्पन : संजय धोतरकर
मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उवगडे / श्यामकांत कुळकर्णी / विलास देशपांडे
भाऊ समर्थांच्या छायाचित्राच्या ब्लॉककरता छायाचित्र : नानू नेवरे व समर्थ कुटुंबियांच्या सौजन्याने.

जाहिरातविषयक संपर्क : आमंत्रक, प्रकल्प विभाग, वि. सा. संघ, नागपूर

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, / झाशी राणी चौक / नागपूर-१२

[वि. सू. : कै. वा. ना. देशपांडे वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेतील दिवसभराच्या कामकाजाच्या संपूर्ण ध्वनीमुद्रणाची संहिता प्रकाशनार्थ तयार करवून घेऊनही पृष्ठ संख्येची मर्यादा लक्षात घेता या परिषदेतील ज्या सहभागींनी आपली लेखी टिपणे दिली तेवढीच प्रकाशित करता आलेली आहेत.]

क्षमस्व !

एमेजू/९० च्या अंकानंतर गेले वर्षभर युगवाणीच्या वर्गणीदारांना आणि वि. सा. संघाच्या सभासदांना युगवाणीचे अंक प्राप्त होऊ शकले नाहीत.

एमेजू/९० चा अंक देखील पोस्ट खात्याने केलेल्या नव्या नियमांच्या अंमलबजावणीमुळे प्राप्त सवलतीच्या दरात रवाना करता आलेला नव्हता. त्या स्थितीत पोस्टाने अंक रवाना करतो म्हटले असते तर पोस्टाच्या तिकिटावरच सुमारे ४० हजार रुपये खर्च आला असता. वि. सा. संघाच्या शाखांमार्फत तसेच स्थानिक सदस्यांना वर्तमानपत्रातून आवाहन करून व शक्य त्या उपायांनी तो पोहचता करावा लागला होता.

गेल्या सात आठ वर्षातील वि. सा. संघाचा कार्यविस्तार व वाढलेली सदस्यसंख्या, लक्षात घेता 'युगवाणी' ज्या मोठ्या संख्येने प्रकाशित करावी लागते व सदस्यांना विनामूल्य प्राप्त होते, त्याकरता येणारा खर्च, त्याकरता लागणाऱ्या साधनसामुग्रीतील होणाऱ्या भीषण भाववाढीमुळे, सतत वेगाने वाढतोच आहे. विदर्भ साहित्य संघाच्या उत्पन्नांच्या साधनात त्या तुलनेत वाढ होत नसते हेही येथे नमूद करावे लागेल.

अशा अनेक समस्यांची जाहीर वाच्यता करून उपाययोजनेच्या स्वरूपात प्रत्यक्ष कृती करणारी काही योजना असावी म्हणून काही पावले उचलणारी केवळ युगवाणीच्याच नव्हे तर युगवाणीसारख्या इतर सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांच्या समस्यांवर विचार करणारी पहिली-वहिली "वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद" विदर्भ साहित्य संघाने २७ मार्च १९९० रोजी प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती आणि दुर्दैवाने त्याच परिषदेसंबंधा-तील युगवाणीचा त्यानंतरचा अंक हा 'परिषद विशेष अंक' म्हणून प्रकाशित करण्याचे जाहीर केल्यापासून 'युगवाणी' प्रकाशितच होऊ शकली नव्हती.

या नियतकालिक विकास परिषदेने सुचविलेले विविध उपाय व केलेल्या मागण्या पूर्ण होण्याचे दृष्टीने संबंधितांकडे पाठविण्यात आल्या असून त्यांच्या पूर्ततेच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र संबंधित यंत्रणांकडून अद्याप त्यास उचित प्रतिसाद प्राप्त व्हावयाचा आहे.

लेखकांच्या पत्रांना दरम्यानच्या काळात समाधानकारक उत्तरे देखील पाठविता आलेली नव्हती. युगवाणीविषयक विचारणा करणाऱ्यांना ठराविक साच्याचेच तेवढे उत्तर द्यावे लागलेले होते.

या तीन वर्षाच्या कार्यकाळात युगवाणीचे कल्पिलेले स्वरूप, आशय, दर्जा, नव्या संपादकांचे नवे योजन, संकल्पन, या संबंधातील त्यांच्या साऱ्याच योजना व संकल्प त्यामुळे पूर्णत्वाकडे नेता येण्याचे वातावरणच या व अशा विविध कारणांमुळे पुरेसे निर्माण होऊ शकले नाही. युगवाणीसारख्या संशोधन, साहित्य, कला इ. विषयक वाङ्मयीन नियतकालिकांच्या संबंधाने जी भीषण-भयावह अनास्था या संबंधातले समकालीन वास्तव म्हणून संपादकांना या कार्यकालाच्या सुरुवातीलाच जाणवले होते; ते त्यांनी संबंधित विश्वासमोर या कार्यकालाच्या सुरुवातीपासूनच अतिशय गांभीर्याने आपल्या संपादकीयातून सतत मांडलेले होतेच.

मात्र मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या विश्वात 'युगवाणी' हेच आजवर गेली ४६ वर्षे अव्याहतपणे एवढ्या मोठ्या संख्येने व सातत्याने खंड न पडता प्रकाशित होणारे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे भूषणावह नियतकालिक आहे. ही सार्थ परंपरा अखंड सुरू राहावी याकरिता या कालखंडात युगवाणीचे संपादक, संपादक मंडळ, विदर्भ साहित्य संघाची कार्यकारिणी व माजी तसेच नवनियुक्त अध्यक्ष यांनी चालविलेल्या प्रयत्नांना यश येऊन युगवाणीचा हा अंक पुनःश्च आपणापर्यंत पोहचू शकला आहे. मात्र त्यातूनही सर्वच संबंधितांचे आशीर्वाद, प्रयत्न व सहकार्य यामुळे युगवाणीस आपले अस्तित्व व सातत्य टिकवण्यास पुनः नवी उमेद प्राप्त झाली आहे. ती अशाच सहकार्याने कायम टिकेलच. मधल्या वर्षभराचा कालखंड युगवाणीच्या जीवनातला आपल्या अस्तित्वाच्या संघर्षाचा कालखंड ठरला आहे. हा अस्तित्वाच्या संघर्षाचा कालखंड अद्याप संपलेला नाही.

युगवाणी प्राप्त होऊ न शकल्याच्या कालखंडात संस्थेच्या अडचणी जाणून घेऊन उदारपणे सहकार्य केलेल्या युगवाणीचे सर्वच लेखक, वर्गणीदार व विदर्भ साहित्य संघाचे सभासद यांचे आम्ही ऋणी आहोत. म. रा. साहित्य संस्कृती मंडळात युगवाणीसारख्या नियतकालिकास प्राप्त होणारे अनुदान कायम राहावे याकरिता मराठीच्या अस्मितेचा लढा सातत्याने लढणारे म. रा. सा. सं. मंडळातील ज्येष्ठ, सदस्य वि. सा. संघाचे माजी अध्यक्ष, युगवाणीचे एकेकाळचे संपादक, थोर संशोधक, आदरणीय डॉ. भाऊसाहेब कोलते यांच्या ज्येष्ठ मार्गदर्शनाखाली साहाय्यभूत झालेल्या म. रा. सा. सं. मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. रतनलाल सोनाग्रा तसेच डॉ. वा. ह. कल्याणकर, श्री. वामन निंबाळकर, व इतर सदस्यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

अशा संस्थांच्या जीवनात अशा अडचणी उद्भवतच असतात हे जाणून घेऊन त्यांचा सामना करण्यास सदस्यांनी यावेळी जे बळ दिले तसेच ते यापुढेही प्राप्त होत राहील असा विश्वास वाटतो. युगवाणीचे लेखक, वर्गणीदार व वि. सा. संघाचे सदस्य यांना गेले वर्षभर युगवाणीचे अंक प्राप्त होऊ न शकल्यामुळे झालेल्या गैरसोयीबद्दल दिलगीर आहोत. ■

सरचिटणीस

विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

कलावंताचे, त्याला करावा लागणारा संघर्ष प्रत्यक्ष भोगणारे, त्या संघर्षाची मुळीच जाणीव नसणारे किंवा संघर्षविहीनतेशिवायच कलावंत असू शकणारे व संघर्षाची उपस्थिती आपल्याही जीवनात असावी असे वाटणारे परंतु प्रत्यक्षात ज्यांना संघर्षाची जाणीवही स्पर्शून देखील जात नाही असे, प्रकार संभवतात.

संघर्ष प्रत्यक्ष भोगणाऱ्या कलावंतांची व त्याच्या संघर्षाची दुरुनच, ऐकून – वाचून, एखाद वेळेस बघूनही, माहिती असणारेच अधिक. संघर्ष प्रत्यक्ष भोगणाऱ्या कलावंताचे संख्यात्मक अस्तित्व हे तसे अत्यल्पच असते. काही वेगवेगळ्या कारणांनी त्याच्या प्रत्यक्ष संपर्क–परिघातील काही व्यक्तींच्या पलीकडे त्या कलावंताच्या ह्यातीत त्यांच्या संघर्षभोगाची दखल घेण्याचे देखील फारसे प्रयोजन कुणाला उरत नाही. त्याच्या संघर्षभोगाच्या कथा, दंतकथा, लोककथा, आणि उपहासकथाच तेवढ्या चघळणाऱ्यांचीच संख्या अधिक.

या संपर्क–परिघात असणाऱ्यांना देखील त्या कलावंतांच्या वर्तनाचे, जीवनाचे, विचारांचे, आचारांचे कोडे क्वचीच फारसे उलगडत नसते ते उलगडावे याची तशी गरजही त्यांना तशी नसतेच. इच्छा तर नसतेच नसते. या संपर्क परिघातील व्यक्तींपैकी उलट अनेकांच्या वाट्याला त्या कलावंताच्या व्यावहारिक पातळीवरील त्यांच्या संबंधातील असणाऱ्या भूमिका अपेक्षाकृत पार पाडण्यात येणाऱ्या अपयशामुळे त्याचा हा संपर्क–परिघ त्याला जाणून घेण्याऐवजी याच्यावर तसा वैतागलेलाच अधिक.

खुद्द या कलावंताला देखील आपल्या संघर्षाचे स्वरूप, गरज, प्रकार, त्याच्या पातळ्या, दर्जा, गुणवत्ता, तीव्रता यांचे पुरेसे आकलन वा जाणीव असतेच वा होतेच असेही नाही. त्याचे आकलन हा देखील त्याचा एक स्वतंत्र संघर्षच होऊन बसतो. या संघर्षातील जे व जेवढे; ज्या प्रमाणात गवसत जाते बहुधा त्या व तेवढ्या प्रमाणात त्याचे जीवन हे पीडामय होत जाते व बहुधा त्याचे कलावंत म्हणून असणारे 'सच्चेपण' देखील त्याच प्रमाणात ठरत जाते, उरत जाते अथवा वाढत जाते.

सच्च्या कलावंताला, हा संघर्ष, अभिव्यक्तीचा संघर्ष, आत्मसंघर्ष व तत्त्वप्राप्ती करता संघर्ष असा तीन प्रकारे करावा लागतो असे गजानन माधव मुक्तिबोधांनी म्हटले आहे. सच्च्या कलावंताच्या जीवनात हे सारे संघर्ष अत्यंत स्वाभाविकपणे एकत्रच असतात असे त्यांचे म्हणणे आहे. एकाच समग्र संघर्षाच्या जणू या वेगवेगळ्या बाजू.

कलावंताचे जीवन हे त्यामुळेच सततच पीडाग्रस्त असेच जीवन असते. केवळ सृजन–वेणाच तेवढ्या कलावंताची पीडा नव्हे तर या संघर्षातून उत्पन्न इतर सर्वच प्रकारच्या पीडेपासून त्याला मुक्ती नाही असा मुक्तिबोधांच्या या बाबतच्या कथनाचा आशय आहे.

अभिव्यक्तीचा संघर्ष, आत्मसंघर्ष व तत्त्व–प्राप्ती करताचा संघर्ष, त्यातून उत्पन्न पीडनासोबत, करू जाणारा कलावंत हा सच्चा कलावंत असा त्याचा सरळच अर्थ.

थोडक्यात म्हणजे सारा संघर्ष हा केवळ अभिव्यक्तीच्या पातळीवर मर्यादित करून आत्म–संघर्ष व तत्वप्राप्तीकरताच्या संघर्षापासून कलावंताला सूट देऊ पहाणारी अभिव्यक्ती, तत्त्वज्ञान व समीक्षा हे त्यामुळे कलेची सच्ची अभिव्यक्ती. सच्चे तत्त्वज्ञान व कलेची सच्ची समीक्षाच ठरत नाही.

अशा अभिव्यक्तीचा प्रांत, अशी कलासमीक्षा व कलेचे असे तत्त्वज्ञान हे त्यामुळे सच्च्या कलावंतास कधीच पुरेसा न्याय देऊ शकत नाही. त्या कलावंताची कला व त्याचा संघर्षही असा न्याय द्यावा वा दिला जावा याकरता असत नाही.

अशा तीनही प्रकारचा संघर्ष एकसाथ भोगणाऱ्या सच्च्या कलावंताचे सृजन, अस्तित्व व व्यक्तित्व हेच तेवढे खऱ्या अर्थाने स्वायत्त, स्वयंभू व स्वतंत्र. भाऊ समर्थ हे आपल्यातले असे एक अस्तित्व. विदर्भाच्या मातीने असे जे थोडेफार कलावंत प्रसवले त्यातील चित्रकार भाऊ समर्थ हे समकालीन कलाव्यक्तित्व आपल्यातून वजा झालेले आहे. (त्यांच्याबद्दलचा स्वतंत्र लेख याच अंकात वेगळा दिलेला आहे)

गजानन माधव मुक्तिबोधांनी म्हटल्याप्रमाणेच, त्यांचा सहवास लाभलेल्या भाऊचे जीवन हे पीडाग्रस्त जीवन होते. केवळ सृजन–पीडेनेच तेवढे ग्रस्त नव्हे तर इतरही पीडांनी ते ग्रस्त होते. मात्र त्याची कारणे देखील मुक्तिबोधांनी कलावंताला कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे जे प्रकार वर्णिले आहेत ते सारे संघर्ष भाऊ एकत्र भोगीत होता यातच आहेत. अभिव्यक्तीचा संघर्ष, आत्मसंघर्ष, तत्त्वप्राप्तीचा संघर्ष. भाऊच्या वाट्याला आलेली पीडा ही या संघर्षाच्या पोटी होणारी स्वाभाविक उत्पत्ती होती.

भाषा, साहित्य, कला, संशोधन, वाङ्मय व जीवनाच्या इतर क्षेत्रातीलही काही मोजक्याच मान्यवर व्यक्तींना विदर्भ साहित्य संघाचे सन्माननीय सदस्यत्व प्रदान केले जाते. भाऊ समर्थ हे विदर्भ साहित्य संघाचे असे सन्माननीय सदस्य होते. त्यांच्या निधनाने विदर्भाच्या वाङ्मय–कला–संस्कृतीच्या प्रांतातील एक पर्व संपले आहे.

नवता, आधुनिकता, प्रागतिकता, विश्वनागरिकत्व, मानवता इ. ची एकत्रित सौहार्दपूर्ण जाग बाळगणारे व ती अभिव्यक्त करणारे संघर्षरत कलंदर चित्रव्रती, कलायात्री भाऊ समर्थ हे स्वायत्त, स्वयंभू व स्वतंत्र कलाव्यक्तित्व विदर्भाच्या कलासंस्कृतीचा अभिमानबिंदू म्हणूनच स्मृतीत राहील.

विदर्भ साहित्य संघाने आपले कला-दालन भाऊ समर्थ यांच्या स्मृतीस अर्पण करून त्याचे 'भाऊ समर्थ कला – दालन' असे नामकरण करण्याचा घेतलेला निर्णय या संघर्षरत कलंदर कलावंताच्या कलायात्रेचे सतत स्मरण करून देत राहील.

श्रीपाद भालचंद्र जोशी

श्रद्धांजली

१९९०-९१ या वर्षात साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील खालील व्यक्तींना त्यांच्या निधनामुळे आपण मुकलो आहोत. 'युगवाणी'ची त्यांना विनम्र श्रद्धांजली :

माजी आमदार एफ. एम पिंटो, मैत्रेयी देवी, वा. रा. मोडक, अमृतलाल नागर, वा. ह. देशपांडे, धर्मेश सोनटक्के, दि. व. देवधर, श्री. कुऱ्हाडे, वि. स. पागे, पं. गणेशदत्त शर्मा, जवाहरलालजी मुणोत, मणिबेन पटेल, आर. एन. पराडकर साम्यवादी विचार व चळवळीचे एक प्रमुख प्रवर्तक, बी. टी. रणदिवे, पद्मभूषण एस. बालचंदर, दिनकर केळकर, वसंत शिरवाडकर, हरींद्रनाथ चट्टोपाध्याय, भालचंद्र खांडेकर, बॉबी तल्यारखान, वसंतराव लुले, बापूसाहेब कारंजकर, र. ग. विद्वांस, बापुरावजी देशमुख, ज्ञानेश्वर मुनघाटे, भि. ह. भुरे, मनोहर इंदापवार, शि. द. उर्फ मामासाहेब देशपांडे, कवि अनंत फंदी, हंसराज गजभिये, माजी मंत्री मदन गोपालजी अग्रवाल, सरन्यायाधीश सव्यसाची मुखर्जी, पी. सी. सेन, प्रसिद्ध लेखक मधुकर त्र्यंबक देव, नट व रंगभूमीवरील कार्यकर्ते केशवराव साळुंके, अरुण जोगळेकर, अ. भा. विद्यार्थी परिषदेचे प्रवर्तक दत्ताजी डिडोळकर, माणिकराव वैतुले, डॉ. अ. ना. देशपांडे, शंकर नाग, पंडित कमलापती त्रिपाठी, बाळासाहेब मराठे, व्ही. शांताराम, ओम शिवपुरी, श्री. कोना प्रभाकर राव, विनोद मेहरा, मनमोहन कृष्ण, कृ. द. पुराणिक, आबासाहेब गरवारे, शशधर मुखर्जी, गजाननराव व्यवहारे, डॉ. रमेश ललगुणकर, डॉ. द. ह. अग्निहोत्री, श्रीमती विजयालक्ष्मी पंडित, वि. गो. दिघे, सुदाम सावरकर, अपर्णा देशपांडे, डॉ. भा. मो. पुरंदरे, ॲड. विवेक देवपुजारी, संगीतकार चित्रगुप्त, नटवर्य मामा पेंडसे, प्रा. या. मु. पाठक, डॉ. रु. पां. पाजणकर, प्रा. मो. दा. देशमुख, श्री. भाऊ समर्थ, प्रा. वि. प्र. मोहगावकर, डॉ. विष्णुपंत नारळीकर, स्वातंत्र्य सैनिक गुलाबराव वाघ, संगीततज्ज्ञ श्री. वामनराव सडोलीकर, अभिनेत्री नूतन समर्थ, दलित मित्र श्री. परांजपे, गुजराती नाटककार श्री. प्रबोध जोशी, पत्रकार ज्ञानेश्वर वाघमारे, श्यामकांत बनहट्टी, साम्यवादी विचार व चळवळीचे एक मुख्य प्रवर्तक श्रीपाद अमृत डांगे, लोककवी ममनोहन, भारताचे माजी पंतप्रधान श्री. राजीव गांधी, प्रख्यात आसामी साहित्यिक डॉ. कालीचंद पाणीग्रही, मराठी लेखक, पत्रकार, कॉ. प्रभाकर वैद्य, श्री. प्रभाकर माचवे.

ज्ञानमहर्षी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार

वि. भि. कोलते

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे आधुनिक महाराष्ट्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते. त्या व्यक्तिमत्वातील विरोधाभासाने मला नेहमीच आकृष्ट केलेले आहे. जुन्या ऐतिहासिक काळात रममाण होणारा हा ज्ञानमहर्षी आपल्या अद्ययावत् विचारांनी आधुनिकांनाही आदरणीय वाटत असे. मुंबई विद्यापीठाची केवळ बी. ए. परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रथम शिक्षक व मराठी शाळेचे मुख्याध्यापक म्हणून जीवनाला सुरवात करणारे दत्तो वामन यांना त्यांच्या उत्तरायुष्यात पुणे विद्यापीठ आणि वाराणसेय (काशी) विद्यापीठ यांनी आपल्या डी. लिट्. (डॉक्टर ऑफ लिटरेचर) ह्या सर्वोच्च पदव्या सन्मानाने समर्पण केल्या. इतकेच नाही तर पुणे विद्यापीठाचे, एकवेळ नव्हे–दोन वेळ कुलगुरुपद त्यांनी भूषविले. पोतदार यांचे संस्कृत भाषेचे व साहित्याचे अध्ययन कितपत झाले होते, हे सांगता येत नाही. तथापि त्यांच्या या भाषेतील विद्याव्यासंगाबद्दल १९४६ सालीच त्यांना भारत सरकारने महामहोपाध्याय ही पदवी देऊन गौरविले. हिंदी साहित्य निर्मिती त्यांनी काहीही केलेली नाही. तरीही हिंदी भाषेच्या त्यांच्या सेवेबद्दल प्रयागच्या हिंदी साहित्य संमेलनानेही 'साहित्य वाचस्पति' ही पदवी त्यांना अर्पण केली. मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, काव्य, चरित्र–आत्मचरित्र, निबंध, साहित्य समालोचन, टीका इत्यादी अनेक क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रात त्यांनी भरीव कामगिरी केलेली आहे असे कुणीही म्हणणार नाही, तथापि, मराठी साहित्यिकांनी महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी १९३९ मध्ये त्यांची योजना केली. पोतदार हे महाराष्ट्रातच नव्हे तर अन्यत्रही 'इतिहासपुरुष' म्हणून संबोधले जातात. 'दत्तो वामन' या त्यांच्या पेशवाई छाप नावावरूनही तसे वाटते. पण त्यांनी 'इतिहास' विषयक लेखन फारसे केलेले नाही. मराठ्यांच्या इतिहासातील एखादा विशिष्ट विषय घेऊन, त्याचा खोल अभ्यास करून त्यांनी लिहिलेला असा एकही ग्रंथ नाही. आणि तरीही १९३७ मध्ये अलाहाबाद येथे भरलेल्या भारतीय इतिहास परिषदेत मराठा इतिहास विभागाचे ते अध्यक्ष होते, इतकेच नाही तर १९४८ साली दिल्ली येथे भरलेल्या भारतीय इतिहास परिषदेच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते !

या दृष्टीने विचार केला तर दत्तो वामनांची ग्रंथसंपदाही फारशी डोळ्यात भरण्यासारखी नाही. संख्येने ती अल्प आहे. आणि तीही वरीवर्शी वेळोवेळी केलेल्या भाषणांची गाथा आहे. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार–अथवा इंग्रजी अमलातील मराठी गद्य वाङ्मयाचा निबंधमालेपूर्वीचा इतिहास.' (इ. स. १८१०–१८७४.) हा त्यांचा इ. स. १९२२ साली प्रसिद्ध झालेला पहिला ग्रंथ. त्या काळातील शालेय व इतर वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीने उपयुक्त असला तरी तो बराचसा जंत्रीवजा व उताऱ्यांनी भरलेला आहे. 'महाराष्ट्र साहित्य परिषद इतिहास'– हा साहित्याचा नव्हे तर एका संस्थेचा इतिहास आहे. 'सुमन सप्तक' (सात व्यक्तिरेखा); 'ओळख' (तेरा शब्दचित्रे); 'श्रोते हो' (गाजलेली भाषणे;) 'भारताची भाषा समस्या' (व्याख्याने व लेख); 'लो. टिळकांचे सांगाती' (१११ व्यक्तींचा धावता परिचय); 'श्री शिवचरित्राचे पैलू' (व्याख्याने, लेख, मुलाखत यांचा संग्रह) ही सर्व प्रासंगिक लेखांची संकलने आहेत; त्यांना ग्रंथ कसे म्हणायचे ? यातील 'सुमन सप्तका'वरील डॉ. अ. ना. देशपांडे यांचा अभिप्राय पाहा " राजवाडे, केतकर, माधवराव पटवर्धन, केळकर, गांधी, खाडिलकर व माधव गोविंद उर्फ बाबूराव भिडे यांच्यावरील 'सुमन सप्तक' (१९५०) द. वा. पोतदारांनी गुंफलेले आहे." नेमक्या या सात व्यक्तींना एकत्र आणण्यातील औचित्य कळणे कठीण आहे. 'वाचकांनो, चला जरा आपण

पुन्हा मागे वळू आणि ती उत्तुंग शिखरांची रांग पाहू. ओ हो ! किती उंच ही शिखरे, किती नामी, किती थोर ! या साती शिखरांची भव्यता काही औरच वाटते !' इत्यादि शब्दांत जी भूमिका लेखकाने मांडलेली आहे आणि थोर ऋषींचे उदात्त दर्शन घडविण्याचा जो मोठा आव आणलेला आहे तो सार्थकी लागला, असे निःशंकपणे म्हणणारे या पुस्तकातील परिचयलेखांचे वाचक दुर्मिळच राहणार आहेत.' (आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास. भाग दुसरा. पृ. ५४८)

पोतदारांच्या इतर ग्रंथांचे स्वरूप काहीसे असेच आहे. 'मराठी इतिहास व इतिहास संशोधन' हा ग्रंथ म्हणजे 'अर्वाचीन मराठी साहित्य' या वि. पां. नेने यांनी संपादन केलेल्या, आधुनिक मराठी वाङमयाचा आढावा घेणाऱ्या निरनिराळ्या व्यक्तींनी लिहिलेल्या लेखांपैकी द. वा. पोतदारांनी लिहिलेला 'विहंगम निरीक्षणा'त्मक स्वरूपाचा एक लेख होय. 'इन्साइड महाराष्ट्र' हा त्यांचा इंग्रजी ग्रंथही दिल्ली येथील 'महाराष्ट्र इन्फर्मेशन सेंटर' साठी लिहिलेला त्रोटक माहिजीवजा लेखच होय एकंदरीत, पोतदाराच्या नावावर असलेल्या ग्रंथांचे स्वरूप हे असे आहे. एखाद्या विषयाचा सर्वांगीण व सखोल अभ्यास करून त्यांतून काढलेले निष्कर्ष काढणारा, साहित्यविषयक किंवा इतिहास विषयक असा त्यांचा एकही ग्रंथ नाही. असे म्हटल्यास वावगे होणार नाही, महाराष्ट्र शासनाने त्यांचा अधिकार लक्षात घेऊन त्यांच्या सोपविलेले शिवचरित्र लेखनाचे कामही त्याच्याकडून पूर्ण होऊ शकले नाही. शेवटी शेवटी तर तो विद्वानांच्या थट्टेचा विषय झाला होता. या संबंधीचा श्री. म. श्री. दीक्षित यांनी नमूद केलेला एक किस्सा सांगण्यासारखा आहे. ते लिहितात, "एकदा दत्तोपंत रायगडवर गेले होते. तिथे समाधीजवळ जाऊन पाहतात तो साक्षात शिवाजी महाराज काही तरी लिहीत बसलेले दिसले. दत्तोपंतांनी विचारलं, 'महाराज, आपण काय लिहिण्यात एवढे मग्न आहात ?' महाराजांनी उत्तर दिलं. 'दत्तो वामनाचं चरित्र लिहितोय." (या बाबतीत राजा दीक्षित यांनी हा किस्सा पुढील प्रमाणे सांगितला आहे. "कुठे तरी पाहिलेलं एक व्यंगचित्र मला आठवतंय. त्यात शिवचरित्र लिहीत असलेल्या पोतदारापुढे साक्षात शिवाजीच अवतरतो आणि म्हणतो, 'आणा इकडे, मीच लिहितो ते शिवचरित्र." (स्मृति गौरव ग्रंथ. पृ. ५०);

दत्तोपंतांच्या शिवचरित्र लेखनाची ही अशी 'गत' होती, शिवचरित्रच काय, पण इतिहास विषयक नव्हे तर इतर साहित्यविषयक लेखनाचीही हीच 'गत' होती. म्हणूनच की काय, साहित्य विषयक किंवा इतिहासविषयक असा एकही ग्रंथ त्यांच्या नावावर नाही.

असे जर आहे तर दत्तो वामन यांना अखिल भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्षपद कसे प्राप्त झाले ? त्यांना 'इतिहासपुरुष' असे कां संबोधतात ? महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष त्यांना का केले ? इत्यादी अनेक प्रश्न समोर येतात. त्यांची उत्तरे शोधली पाहिजेत. कारण त्यातच पोतदारांच्या कार्याची वैशिष्टये आपणाला आढळतील. दत्तो वामन अतिशय बुद्धिमान होते. त्यांची स्मरणशक्ती दांडगी होती, निरीक्षण सूक्ष्म होते. वाणीवर विलक्षण प्रभुत्व असून ती अत्यंत रसाळ होती, ते उत्तम वक्ते होते. गोष्टीवेल्हाळ असल्यामुळे त्यांना वेळेचे भान राहात नसे. ते सतत बोलत त्याचमुळे की काय लेखणीपेक्षा वाणीने त्यांनी महाराष्ट्राची सेवा विशेष केली. शिक्षण, संशोधन व विद्या व्यासंग यात त्यांना विशेष रुची होती. ह्या सर्व अंगभूत गुणांचा उपयोग त्यांनी आपल्या जीवित कार्याच्या, जीवननिष्ठांच्या संगोपन व संवर्धनासाठी केला. इतिहास, मराठी अस्मिता, मायभाषेचे व राष्ट्रभाषेचे प्रेम ह्या त्यांच्या प्रमुख जीवननिष्ठा होत्या. याचे संगोपन व संवर्धन केवळ वैयक्तिक प्रयत्नांनी नव्हे तर सामूहिक प्रयत्नांनीच होऊ शकेल असा त्यांचा दृढ विश्वास होता त्यासाठी त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या, वाढविल्या आणि त्यांच्या द्वारे आपले जीवित कार्य पूर्ण करण्याचा आमरण प्रयत्न केला. तेव्हा पोतदारांच्या श्रेष्ठपणाचे रहस्य त्यांच्या जीवननिष्ठात, त्या निष्ठांच्या संगोपन संवर्धनासाठी अनेक संस्था स्थापन करून त्यांचा योगक्षेम सांभाळण्यात व

त्यासाठी आपले सर्व अंगभूत गुण वेचण्यात आहे. असे म्हणावयास हरकत नाही.

'इतिहास' ही दत्तो वामनांची पहिली व प्रमुख जीवननिष्ठा होय. ही प्रेरणा त्यांना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्यापासून मिळाली. इतिहास-संशोधनासाठी राजवाडे यांनी 'भारत इतिहास संशोधक मंडळ' स्थापन केले त्या प्रसंगी पोतदार उपस्थित होते. बी. ए. साठी 'इतिहास' हा विशेष विषय त्यांनी घेतलेला होता. त्यामुळे त्यात त्यांना विशेष रुची होती. ती अभिजात आवड व राजवाडे यांच्याकडून मिळालेली प्रेरणा यातून त्यांची ही जीवननिष्ठा वहरली. या बाबतीत राजवाडे यांनाच त्यांनी आपले गुरू मानले. राष्ट्राचा भविष्यकाळ घडविण्याच्या दृष्टीने त्याच्या भूतकालीन इतिहासाचे यथायोग्य ज्ञान करून घेऊन त्यातून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार वर्तमान काळात स्वीकारलेल्या ध्येयधोरणानुसार आचरण करणे महत्त्वाचे असते. आपल्या भूतकालीन इतिहासाच्या यथार्थ ज्ञानासाठी ऐतिहासिक साधन-सामुग्रीचे, कागदपत्रांचे संशोधन होणे आवश्यक असते. यासाठी राजवाड्यांनी भा. इ. सं. मंडळ स्थापन केले. साधनसामुग्रीची अनेक दप्तरे-कागदपत्रे गोळा केली. त्यांचे वाचन व अध्ययन करून मग लेखन केले. त्यांचे पट्टशिष्य दत्तो वामन यांनी लेखन केले नसले तरी सर्व प्रकारची ऐतिहासिक साधनसामुग्री संशोधनाचे कार्य अव्याहत केले. या कार्याशी ते इतके समरस झाले होते की त्यामुळेच त्यांना 'इतिहासपुरुष' असे म्हणत. 'श्लाघ्यः स एव पुरुषः रागद्वेष विवर्जितः। भूतार्थकथने यस्य श्रेयस्येषा सरस्वती' ही रागद्वेषांच्या पलीकडे जाऊन ऐतिहासिक घटनांकडे तटस्थतेने पाहण्याची यथार्थ दृष्टी त्यांना प्राप्त झाली होती. इतिहास म्हणजे केवळ दंतकथा नव्हत, खोटा अभिमान नव्हे. पुराव्याशिवाय काही बोलायचे नाही, आणि पुराव्याने जे सिद्ध होईल ते कितीही अप्रिय असले तरी इतिहासकाराने मान्य केले पाहिजे. त्यासाठी त्याच्या ठिकाणी तटस्थता पाहिजे, योग्य ती चिकित्सक दृष्टी पाहिजे. ही तटस्थता, ही चिकित्सक दृष्टी पोतदारांच्या ठिकाणी होती. सौ. उषाताई कोलते यांच्या 'कथाभारत' या पुस्तकावरील अभिप्रायात त्यांनी म्हटले आहे, "दंतकथांना इतिहास समजू नये, ही काळजी शिक्षकांनी घेतलीच पाहिजे. कारण, लहानपणी कानी पडलेल्या गोष्टी जन्मभर ध्यानात राहतात आणि तोच इतिहास म्हणून समजून अज्ञान पदरी येते. उदाहरणार्थ या ग्रंथातील 'सिंहगड' कथा. 'सिंहगड' नाव कोंडाणा किल्ल्यास तानाजीने तो घेण्यापूर्वीच मिळाले होते असा स्पष्ट पुरावा आहे. पण आपट्यांची कादंबरी वाचणारे वाचक निराळेच समजतात! अहल्याबाई व राघोबा, नूरजहान आणि शेर अफगाण, व जहांगीर आणि डॉ. ब्राउटन व सनद या प्रचलित कथाही अर्धवटपणाने अशाच अतिशयोक्त व विपर्यस्त वर्गातच गणाव्या लागतात..."

यापेक्षा त्यांच्या तटस्थतेचे व इतिहासप्रियतेचे उदाहरण त्यांच्या 'शिवचरित्रा'संबंधीच्या प्रतिक्रियेत आढळते. श्री. वा. रं. सुंठणकर यांनी सांगितलेली आठवण अशी : "...लिंगराज कॉलेजचे इतिहासाचे प्राध्यापक कै. बसवनाळ यांनी आपल्या एका पुस्तकात 'शिवाजी हा दासीपुत्र होता' अशा आशयाचे विधान केल्याचे प्रसिद्ध झाले होते. त्यावर बेळगावची तरुण मंडळी चिडली होती : त्यापैकी एका अज्ञात तरुणाने शनिवारच्या बाजाराच्या ऐन गर्दीत प्रा. बसवनाळ यांच्यावर चाकूने हल्ला केला आणि तो गर्दीत पसार झाला. त्याप्रसंगाला उद्देशून म. म. (पोतदार) म्हणाले : तुम्ही 'बेळगावकरांनी काय आरंभले आहे ? त्या बिचाऱ्या प्रा. बसवनाळ यांच्यावर हल्ला का म्हणून करता ? त्यांना कुठे तरी पुरावा सापडला असेल म्हणून त्यांनी लिहिले असेल. त्यांना मारण्यात काय अर्थ आहे?' त्यांच्या बोलण्यावरून इतिहासाची दृष्टी कशी असते हे समजून आले.

श्री. म. श्री. दीक्षित यांनी दिलेली आठवणही अशीच बोलकी आहे. ते लिहितात "वसंत व्याख्यानमालेत आचार्य अत्रे वक्ते तर दत्तो वामन अध्यक्ष असा योग आला होता. गर्दी अर्थात प्रचंड. त्यातून विषय १८५७ चे स्वातंत्र्यसमर.

मग काय, अत्र्यांचे तेजस्वी वक्तृत्व चौखूर उधळू लागले. तासाभराच्या हशा-टाळ्यांच्या भाषणात त्यांनी न. र. फाटकांचीही हजेरी घेतली. त्यांचे भाषण संपल्यावर दत्तोपंत समारोप करताना मिस्किलपणे म्हणाले, "अत्र्यांनी आपल्या भाषणाने तुम्हाला वाहून नेलं ही कौतुकाची बाब झाली. पण 'फेकला तटाहुनि घोडा' हे फक्त काव्यात असते, हे विसरू नका. राणी लक्ष्मीबाई काय मूर्ख होती का ? तटावरून घोडा फेकला असता तर त्याचे पाय आणि राणी सुरक्षित राहिली असती काय ? विचार करा. अहो, इतिहास तो इतिहास, काव्य ते काव्य. पराभव दिसू लागताच राणी गुप्त मार्गाने पोराला पाठीशी बांधून वेगाने निसटून गेली हा इतिहास. ५७ चा उठाव हे मर्यादित अर्थाने स्वातंत्र्यसमर होतं. उगाच भावनेच्या भरात त्या उठावाचं प्रमाणाबाहेर गौरवीकरण करू नका. ज्यांनी या उठावात झुंजारपणे बलिदान केलं त्या सर्वांविषयी आदर ठेवून मी हे सांगतो आहे. अत्रे आणि फाटक या दोघांच्या भूमिका टोकाच्या आहेत. त्या नीट पारखून ५७ च्या प्रकरणाचा अर्थ समजून घ्या म्हणजे पुष्कळ काही आपणास शिकता येईल." असा हा विवेकपूर्ण समारोप करताच अत्र्यांसकट सारे श्रोते क्षणभर अंतर्मुख झाले." (म. सा. पत्रिका–मे १९९० पृ. १४).

इतिहासाचे संशोधन व अध्ययन करण्यासाठी आवश्यक असलेल्या या दृष्टीचे त्यांनी एकदा अतिशय रसिकतेने वर्णन केले होते, मी त्यावेळी अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेजमध्ये प्राध्यापक होतो. तेथील मराठी वाङ्मय मंडळाच्या वार्षिकोत्सवासाठी अध्यक्ष म्हणून एके वर्षी दत्तो वामन पोतदार यांना आम्ही बोलावले होते. त्याच वेळी कॉलेजमधील 'इतिहास मंडळा'त 'इतिहासाचे अध्ययन' या विषयावर प्राचार्य टॉस्टेविन यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. पोतदार यांचे आम्ही एक व्याख्यान आयोजित केले त्या दिवशी प्रा. पोतदार अस्खलित इंग्रजीत बोलले. त्यांचं ते इंग्रजी वक्तृत्व ऐकून आम्ही अक्षरशः भारावून गेलो होतो. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, पांढऱ्या दिसणाऱ्या प्रकाशात अनेक रंग असतात. काचेचा लोलक पुढे धरला म्हणजे समोरच्या पडद्यावर त्या पांढऱ्या प्रकाशातील अनेक किरण दिसू लागतात. इतिहासाचे तसेच आहे. इतिहासातील एखाद्या घटनेकडे पाहण्याचे असेच अनेक दृष्टिकोन असतात. इतिहासाकडे त्या निरनिराळ्या दृष्टिकोनातून पाहावयाचे असते. काचेच्या लोलकाने धवल प्रकाशातील अनेक रंगांचे विश्लेषण झाल्यावर त्यापुढे आणखी दुसरा लोलक धरला तर त्या अनेक रंगांचे एकच किरण होऊन पुन्हा धवल प्रकाश दिसू लागतो. त्याप्रमाणे निरनिराळ्या दृष्टिकोनातून इतिहासातील घटनांचे विश्लेषण केल्यावर मगच ऐतिहासिक सत्याचा प्रकाश दिसू शकतो. त्या लोलकाप्रमाणे इतिहासाच्या अध्ययनाची आपली दृष्टी असावी."

इतिहास संशोधनाच्या या आवश्यकतेतून व त्यासाठी कार्य करण्याचा त्यांच्या तळमळीतूनच त्यांनी स्वतःला भा. इ. संशोधन मंडळाच्या कार्याला वाहून घेतले होते. आरंभी अनेक वर्षे ते मंडळाचे चिटणीस होते. व पुढे १९४७ पासून ते कार्याध्यक्ष व नंतर उपाध्यक्ष झाले. या कार्याशी ते इतके एकरूप झाले होते की भा. इ. सं. मंडळ म्हणजे द. वा. पोतदार असे समीकरणच बनले होते. त्यांच्या या इतिहासनिष्ठेतूनच महाराष्ट्रात सर्वत्र अशी संशोधन मंडळे स्थापन व्हावी असे त्यांना वाटत होते. ११३३ साली नागपूरला महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले होते. त्यावेळी म. म. पोतदार उपस्थित होते. त्यांनी श्री. भवानी शंकर नियोगी, प्रा. वा. वि. मिराशी, प्राचार्य पांढरीपांडे इत्यादी कार्यकर्त्यांशी चर्चा करून नागपुरात एक संशोधन मंडळ स्थापण्याची सूचना केली. त्यांच्या प्रेरणेतूनच त्यावेळी 'मध्यप्रांत संशोधन मंडळ' येथे स्थापन झाले. याचेच नामांतर 'पुढे 'विदर्भ संशोधन मंडळ' असे करण्यात आले. प्रा. मिराशी यांच्या कार्याध्यक्षत्वाखाली या मंडळाने इतिहास व साहित्य यांच्या संशोधनाचे फार महत्त्वाचे कार्य केले आहे हे सांगताना प्रा. पोतदारांचे स्मरण होऊन अंतःकरण भरून येते.

इतिहास संशोधनाचे कार्य सर्व भारतात सुरू राहावे या दूरदृष्टीतून प्रा. पोतदार यांनी पुणे येथे

'मॉडर्न हिस्ट्री कॉंग्रेस' स्थापन केली. पुढे या संस्थेच्या अलाहाबाद येथील अधिवेशनात तिचेच नामांतर 'इंडियन हिस्ट्री कांग्रेस' असे करण्यात आले. या कांग्रेसचे नेतृत्व अनेक वर्षे पोतदारांनी केले. आजही ही संस्था उत्कृष्ट कार्य करीत आहे. प्रा. पोतदारांचा इतिहास व इतिहास संशोधनाचा व्यासंग पाहूनच 'हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स् कमिशन'-वर त्यांची नेमणूक झाली होती, हेही लक्षात घेतले पाहिजे.

'मराठी अस्मिता' ही म. म. पोतदारांची दुसरी जीवननिष्ठा. उंच सडसडीत अंगकाठी, अंगात गळाबंद लांब कोट, त्यावर गळ्याभोवती गुंडाळून दोन्ही बाजूंनी सोगे सोडलेले रेशीमकाठी पांढरे उपरणे, डोळ्यांवर चष्मा, कपाळावर लांब आडव्या गंधाचा पट्टा, डोक्यावर काळी टोपी, समोर निऱ्या घालून नेसलेले जरीकाठी धोतर, पायात लाल चुटुक पुणेरी जोडा आणि हातात अर्धवर्तुळाकार मुठीची लांब काठी, हे त्यांचे सभा-संमेलनातून होणारे नेहमीचे दर्शन. लग्न–मुंजीच्या समारंभाला जाताना टोपीऐवजी ते डोक्यांवर पुणेरी झिळमिळचांची कोकणी पगडी घालीत. या त्यांच्या वेषातच त्यांच्या ठिकाणी असलेल्या मराठी अस्मितेचे दर्शन होत असे. पण तिचा विशेष आविष्कार व्हायचा तो त्यांच्या मराठी भाषेच्या अभिमानात. 'वचनि लेखनीहि मराठी गिरा दिसो' असा त्यांना ध्यास असायचा. मराठी माणसांनी सदैव मराठीतच बोलले पाहिजे हा त्यांचा सार्थ आग्रह असे. श्री. अविनाश द. कुळकर्णी आपली एक आठवण सांगतात, 'दादांना सभास्थानी आणण्याचे काम माझ्याकडे होते. मी दातेवाड्यात गेलो. दरवाजात थांबून म्हणालो, "आपणाला व्याख्यानासाठी नेण्यास मी आलो आहे." पोतदारांनी माझे नाव विचारले. मी म्हणालो, "ए. डी. कुळकर्णी." ते ऐकताच पोतदार मोठ्याने म्हणाले, "अरे, मराठी बोलता येत नाही काय ? मराठीत नाव सांगा ! "मी गडबडून म्हटले, "अविनाश कुळकर्णी." पुन्हा दादा म्हणाले, "सबंध नाव सांगा." मी संपूर्ण नाव सांगताच दादा म्हणाले, 'अहो, वक्तृत्वो-त्तेजक सभा, वसंत व्याख्यानमाला या संस्थांचे कार्यच मराठीचा प्रसार, विकास करण्यासाठी आहे. आणि तुम्ही इंग्रजीत नावे सांगता ?" (स्मृती गौरव. पृ. ९५) या साध्या संवादातून पोतदार यांची मराठी भाषा, इतिहास, संस्कृती याबद्दलची अभिमानाची भावना प्रकर्षाने प्रकट झाली आहे. दुसरी एक आठवण श्री. प्र. ल. गावडे यांनी सांगितली आहे '...पोतदार पुढे म्हणाले, "स्वतंत्र भारतात शास्त्रविषयीची प्रगती इतकी झाली आहे की भारताने अंतराळात स्फुटनिक तर सोडलेच पाहिजे, ते स्फुटनिक बन-विण्यात आपल्या या विद्यार्थ्यांचा मोठा वाटा असला पाहिजे, त्या स्फुटनिकमध्ये बसून आपले विद्यार्थी अंतराळात गेले पाहिजेत .." पोतदारांच्या प्रत्येक वाक्यात इतका जोश होता की वाक्या-गणिक प्रेक्षकांच्या टाळ्या मिळत होत्या. टाळ्यांच्या या प्रचंड गजरानंतर पोतदार थोडे थांबले आणि मग डोळे मिचकावीत हळूच पण ठाशीवपणे उद्गारले की, 'पण त्या स्फुटनिकमध्ये बसलेल्या अंतराळवीराने भारताला संदेश पाठविताना तो हिंदीतून आणि मुख्य म्हणजे मराठी भाषेतूनच पाठविला पाहिजे. मराठी भाषा ही जशी पूर्वी वीरांची भाषा होती तशीच पुढे ती अंतराळवीरांची भाषा बनली पाहिजे." मराठी अस्मितेला जपणारा हा पुराणपुरुष भविष्य काळाचा वेध किती अचूकपणे घेत होता याचा प्रत्यय त्यावेळी मला आला.' (स्मृति गौरव. पृ. ६७).

म. म. पोतदारांच्या मराठी अस्मितेच्या या अभिमानातूनच मराठी माणसाने नेहमी मराठी बोलले पाहिजे. आणि तेही शुद्ध मराठी बोलले पाहिजे हा त्यांचा आग्रह निर्माण झाला होता. महाराष्ट्रात मुसलमानांच्या राज्यात फारसी शब्दांनी जसे मराठीत प्रदूषण निर्माण झाले होते तसे इंग्रजी राज्यात इंग्रजी शब्दांनी आणि वाक्य-प्रयोगांनी निर्माण झालेले आहे, याची त्यांना फार खंत वाटत असे. अहमदनगर येथील ते विसाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना मराठी सुशिक्षितात चालू असलेला इंग्रजीचा वापर व मराठीचे प्रदूषण याविषयी ते म्हणाले होते की, " आमच्या

देशासाठी व लोकांसाठी कायदे मंडळे व्हावयाची, मात्र त्या जागी मराठी बोलण्याचा आमचा स्वयंसिद्ध अधिकार आम्हास उपभोगता यावयाचा. नाही, ही शोचनीय स्थिती होय. पण जर आम्हीच आमच्या दुकानातून आकार पत्रके आणि पावती पुस्तके देखील इंग्रजीतच ठेवतो, दारावर पाट्या इंग्रजीतच लावतो इतकेच काय पण आमच्या विवाहादि मंगलकार्याच्या पत्रिका याही इंग्रजीतच छापतो. आणि अशा या कृत्यांनी आम्ही स्वतःच कळत किंवा न कळत मराठीची पदोपदी अवहेलना करतो तेथे दुसऱ्यांस कोणत्या तोंडाने बोल लावावा? पाट्यात आणि चिठ्यात कसले आले आहे साहित्य असे कोणी म्हणेल. यासाठी हे सांगणे अवश्य आहे की, बारीक सारीक प्रसंगातही मराठीचा बाणा आग्रहपूर्वक चालविणेच आज प्राप्त आहे... आपल्या सर्व संस्थांचे व्यवहार मराठीतच चालले पाहिजेत. सांप्रत पुण्यासारख्या मराठीच्या माहेरघरी रस्त्यातून हिंडले तरी जिकडे तिकडे फर्म्स–स्टोअर्स-डीलर्स आणि मर्चंटस् दिसतात. तो लज्जास्पद देखावाच मोडून काढला पाहिजे. प्रत्येक व्यक्तिपावेतो हे मराठीच्या अभिमानाचे लोण पोचविले पाहिजे' (श्रोते हो. पृ. ८६–८७)

इंग्रजी शब्दांचा सुळसुळाट झालेला असल्याने आपण दैनंदिन व्यवहारातही मराठी भाषा विसरून जाणार नाही ना. अशी भीती व्यक्त करताना पोतदार म्हणतात, "सकाळी उठल्यापासूनच इंग्रजी आपल्या मानगुटीवर बसली आहे. आपण बेडमधून उठल्यावर बाथरूममध्ये जातो. ब्रशला टूथपेस्ट लावून दात ब्रश करतो. नंतर वॉशबेसिनमध्ये वॉश करून आलो की वाइफ ट्रे समोर ठेवते. त्यात किटली, मिल्क आणि शुगर पॉट ठेवलेले असते. चहा गरम राहावा म्हणून किटलीवर आम्ही टीकोझी वापरतो. ब्रेकफास्ट घेण्यापूर्वी शेव्ह करून शॉवर बाथ घेतो, टर्किश टॉवेलच मला आवडतो..." "ही झाली सुशिक्षितांची भाषा. अशिक्षित किंवा अडाणी कामगारही सहज बोलून जातो की, "साहेब, तुमचं काम अगदी फस्ट क्लास आणि टाईमात कंप्लेट करून देतो बघा." – असा हा आपला मातृभाषा मारणारा इंग्रजीचा प्रभाव पाहिला की वाईट वाटते. (स्मृति–गौरव. पृ. ६९)

यावर उपाय काय? उपाय एकच. मराठीची अस्मिता जागवली पाहिजे. प्रत्येक मराठी माणसाने मराठीचा अभिमान बाळगून दैनंदिन सर्व व्यवहारात तिचा वापर केला पाहिजे. तिचे देशीपण सांभाळण्याची काळजी घेतली पाहिजे. आणि याच साठी त्याला सर्व शिक्षण त्याच्या मराठी मायाबोलीतून मिळाले पाहिजे. मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे, हा सर्वमान्य शैक्षणिक सिद्धांत आहे. स्वतंत्र भारत हे लोकराज्य आहे. "लोकशिक्षणाशिवाय खरी लोकशाही नाही, आणि लोकभाषेशिवाय खरे लोकशिक्षण नाही." (श्रोते हो. पृ. १३-४१) यासाठी महाराष्ट्रात मराठी हेच सर्व स्तरावर शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे. स्वतंत्रपणे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीही मातृभाषा हेच सर्वश्रेष्ठ असे उपयुक्त साधन होय. 'ज्ञानाचा मुक्काम गाठण्यास मातृभाषेचा रस्ता हा सगळ्यात जवळचा व ओळखीचा रस्ता होय... जेणेकरून ज्ञानसाधनाचा काळ पुष्कळ वाचेल आणि काळाइतकी मौल्यवान वस्तू नाही हा बहुमोल काळ मातृभाषेचा आश्रय केल्याने वाचतो म्हणूनही मातृभाषेचा आश्रय करणे अत्यंत आवश्यक आहे." (श्रोते हो. पृ. २४). 'महाराष्ट्राला ज्ञानसंपन्न करणे म्हटले तर मराठी भाषा हेच प्रमुख साधन राहील. आणि मराठी भाषेमध्ये सगळ्या महाराष्ट्राला ज्ञानसंपन्न करण्याचे सामर्थ्य संपूर्णपणे विकसित व्हावयाचे असेल तर मराठी भाषा हीच ज्ञानवहनाचे मुख्य साधन म्हणून अवलंबिली पाहिजे" (सदर पृ. १२७) अशी त्यांची श्रद्धा होती.

या मराठी लेखनातही मराठीचे देशीपण सांभाळले पाहिजे. खुद्द पोतदारांनी ते कसे सांभाळले होते याचे एकच उदाहरण देतो. त्यांचा पहिलाच ग्रंथ 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' यातील ही काही वाक्ये पाहा. "स्वराज्याचे साम्राज्य झाले! व्यवहार अफाट झाला. 'राजकारणे' दाही दिशाला खेळू लागली! त्यामुळे वाणीला

वैभवाचे तेज चढले ! तिला विलासाचीही चटक लागली व ती अधिक नटवी, लज्जतदार व प्रौढ झाली पूर्वीची ती लहान लहान साधी वाक्ये शुद्ध मराठी वळणाचे शब्द जाऊन प्रौढ संस्कृत समास व लांबलचक व घोसदार वाक्यरचना त्या जागी आली. व्याकरणी बांधेसूदपणा येण्याला यात कोठेच अवकाश नव्हता कारण हे थोर मुत्सद्दी परस्परांची मनोगते एकमेकास कळविण्यासाठीच लिहीत होते, वाङ्मयसेवा करण्यासाठी काही प्रवृत्त झाले नव्हते. सरस्वतीचे उपासक अद्याप छंदाच्या बहारदारीतच गर्क होते. श्रीज्ञानेश्वर-प्रभृतींनी जो वीणा एकदा झाडला त्याचाच आवाज अजून त्यांच्या कर्णरंध्रात घुमत होता व त्याच समाधीत ते डोलत होते. बाहेर मराठी घोडा चौफेर दौडत होता व तोफांचा गडगडाट होऊन दशादिशा धुंद होत होत्या, तरी भारत भागवतातल्या त्या दिव्य पुरुषांनाच आमची कविमंडळी पुनःपुनः आग्रहाने आवतणे देत होती..." (पृ. ६) प्रा. पोतदार यांच्या गद्य-शैलीची अशी चटकदार उदाहरणे वाचकांचे मन मोहित करण्यास समर्थ नाहीत काय ?

हे सिद्ध व्हावे, सर्व शिक्षण मातृभाषेतून देता यावे. मातृभाषा मराठीचा विकास व्हावा. यासाठी स्वतंत्र मराठी विद्यापीठ स्थापन झाले पाहिजे असे 'आग्रहपूर्वक प्रतिपादन प्रा. पोत-दारांनी अनेक व्याख्यानातून आणि भाषणातून केले. "या कार्यसिद्धीसाठी काही यंत्रणा अवश्य आहे. म्हणून तर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापा असा माझा अट्टाहास आहे" (श्रोते हो पृ. ७८) असे त्यांनी म्हटले आहे. पश्चिम महाराष्ट्रात एक नवे विद्यापीठ स्थापन व्हावे यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली. त्यासाठी 'महाराष्ट्र युनिव्ह-सिटी असोसिएशन' ही संस्था स्थापन केली. प्रा. पोतदार हेच तिचे चिटणीस होते. यासाठीच बडोद्याच्या साहित्यसंमेलनात 'मराठी विद्यापीठ' स्थापन करण्याचा ठराव त्यांनी मांडला होता. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा सर्व व्यवहार मुख्यत्वे मराठीतून चालेल' असा जसा त्यांनी आग्रह धरला होता तसाच मराठीसाठी स्थापन होणाऱ्या स्वतंत्र विद्यापीठाचा सर्व व्यवहार मराठीतूनच चालला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. "मराठी साहित्याच्या भवितव्याच्या दृष्टीने आपण या विद्यापीठाच्या प्रश्नाचे अव-लोकन केले पाहिजे. सकल महाराष्ट्रासाठी एक विद्यापीठ स्थापन व्हावे, त्यात मराठी भाषा प्रधानपद पावावी आणि मराठी भाषेतून सर्व शिक्षण व्हावे, या तीन मुद्यावर आपले एकमत होऊन आपण तसे ठराव मागे बडोद्यास आणि गुदस्ता पुण्यासही केलेले आहेत (श्रोते. हो. पृ. ३) हे त्यांनी १९२६ सालीच पुणे येथे भरलेल्या द्वितीय शारदोपासक संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदावरून भाषण करताना नमूद केले होते. त्याच भाषणात त्यांनी असेही म्हटले होते की, 'भावी महाराष्ट्र विद्यापीठात महाराष्ट्र भाषेसच अग्रमान रहावा, आणि महाराष्ट्रभाषेचे जसे सर्वांगीण व्हावे, तसे अध्यापनार्थही शक्य तेथे तेथे महाराष्ट्र भाषेचा स्वीकार व्हावा" (सदर. पृ. ८) त्यावरून पोतदारांनी हे स्वप्न उराशी बाळगून त्यासाठी फार पूर्वीपासून कसे प्रयत्न चालविले होते याची कल्पना येईल.

महाराष्ट्रासाठी एक स्वतंत्र मराठी विद्यापीठ स्थापन करायचे म्हटले तर सर्व मराठी जनता एका महाराष्ट्र राज्यात आली पाहिजे ना ! "मराठी माध्यमाचे विद्यापीठ असावे, असा आग्रह धरणारा मी माणूस आहे. मराठी ही शासनासह सर्व व्यवहारातून चालू झाली पाहिजे. ती सार्वभौम झाली पाहिजे, त्या करिता संयुक्त महाराष्ट्र पाहिजे." (स्मृति-गौरव. पृ. ३९.) "मराठीशी एकविध संसार आपण करणार तर तो यशस्वी करण्यासाठी काय काय केले पाहिजे त्याचा आता विचार करू. प्रथमच आपण पाहिले की आपणाला भारत वर्षाच्या हितासाठी झटणारा मराठीचा स्वतंत्र प्रांत पाहिजे. स्वतःच्या घरा-शिवाय संसार कसा होणार ! पण आपले घर सांप्रत विभागलेले आहे. वऱ्हाडी, मध्यप्रांती, निजामी, फिरंगाणी असे चार स्वतंत्र तुकडे आणि पाचवा आपण घटकाभर स्वराज्यी म्हणू. प्रस्तुतच्या विभागणीत स्वराज्यी महाराष्ट्रातही जी पोटवाटणी झाली आहे त्यात काही महा-राष्ट्राचा भाग कर्नाटकात गेला आहे. याखेरीज

संस्थांनी आणि वसाहती महाराष्ट्र म्हणून आणखी दोन वर्ग कल्पिता येण्यासारखे आहेत. सर्व सलग महाराष्ट्राचा एक सुभा स्थापन झाल्याशिवाय मराठीचे घर सिद्ध झाले असे होणार नाही." (श्रोते हो. पृ. ७२)

बेळगाव येथील साहित्य संमेलनात अध्यक्ष कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे आवाहन केले. त्यासंबंधीचा ठरावही अध्यक्ष या नात्याने त्यांनीच मांडला होता. त्याच वेळी 'संयुक्त महाराष्ट्र परिषदे'ची स्थापना झाली. त्यात प्रा. पोतदार हे अग्रभागी होते. त्यावेळी बहुतेकांना राजकीय दृष्टया संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची आवश्यकता वाटत होती. पोतदारांचा यासंबंधीचा दृष्टिकोन काय होता ? कै. गो. प. नेने लिहितात : "संयुक्त महाराष्ट्र परिषदेत ते (पोतदार) अग्रभागी होते. कारण तो राजकीय प्रश्न नव्हता, परिषद म्हणजे राजकीय पक्ष नसला तरी राजकीय प्रश्नाकरिताच परिषद आहे ना ? असा प्रश्न विचारला म्हणजे ते एक गोष्ट ठासून सांगत की, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा मराठी जनतेच्या अस्मितेचा आणि मराठी संस्कृती जिवंत ठेवण्याच्या प्रश्न आहे. मराठी भाषेच्या अस्तित्वाशी आणि संगोपनाशी त्याचा घनिष्ठ संबंध आहे म्हणूनच मी परिषदेत भाग घेत असतो." (स्मृति गौरव. पृ. ३९). याच प्रश्नावर 'औरंगाबाद येथील साहित्य समेलनात संयुक्त महाराष्ट्राच्या ठरावाच्या वेळी 'लोकसभेत पंतप्रधानांचे केवळ एक मस्तक आहे आणि बाकी सर्व सभासदांचे फक्त हात आहेत' असे पोतदारांनी कुणाचीही मुलाहिजा न बाळगता ठणकावून सांगितले आणि त्यावेळी महाराष्ट्राची अस्मिता टाळ्यांच्या कडकडाटाने पोतदारांना प्रतिसाद देत जी प्रगट झाली ती खरोखर अवर्णनीय होय.' (प्र. ल. गावडे, स्मृति–गौरव पृ. ६७). त्या भाषणात पोतदारांच्या मराठी भाषेच्या, मराठी संस्कृतीच्या, मराठी अस्मितेच्या अभिमानाचे जे दर्शन झाले ते खरोखरच अपूर्व होते. मी त्या प्रसंगी हजर होतो.

महाराष्ट्राविषयी प्रा. पोतदार यांच्या ठिकाणी असलेल्या अभिमानाचा आविष्कार 'इन्साइड महाराष्ट्र–दि ग्रेट नेशन' या त्यांच्या पुस्तकात पहावे. हा निबंध माहितीवजा व बराचसा संकलनात्मक आहे. पण त्यात महाराष्ट्राचा भूगोल, इतिहास, नगरे, किल्ले,–क्षेत्रे, संत, योद्धे, मुत्सद्दी, साहित्यिक, सुधारक, देशभक्त, कवी, नट–इत्यादिका विषयींची माहिती थोडक्यात पण अतीव सुंदर शैलीत त्यांनी दिलेली आहे, तिच्यावरून महाराष्ट्राविषयीच्या प्रा. पोतदारांच्या अभिमानाचे आगळे वेगळे दर्शन घडते. प्रा. पोतदार म्हणजे 'महाराष्ट्राचा चालता बोलता इतिहास याची साक्ष देणारा हा निबंध' असे श्री. दि. ब. केरूर यांनी त्याचे वर्णन केले आहे ते यथार्थ होय. (स्मृति गौरव पृ. ४२). १९४९ साली पुणे येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या वेळी स्वागताध्यक्ष या नात्याने त्यांनी गाइलेली महाराष्ट्राची गौरव गायाही अभिमानाने ओथंबलेली आहे. (स्मृति–गौरव पृ. ७०१).

मराठी भाषेच्या माध्यमासाठी महाराष्ट्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठासाठी संयुक्त महाराष्ट्र स्थापन व्हावा म्हणून पोतदारांनी जे कष्ट घेतले त्यांना खरोखर तोड नाही. त्यांची ही स्वप्ने साकार झाली–पण पूर्णपणे नव्हेत. कारण त्यांच्या या प्रयत्नातून पुणे विद्यापीठ स्थापन झाले खरे पण तेथे अजूनही पोतदार कुलगुरू असताना सुद्धा–सर्व विद्याशाखात मराठी माध्यम सुरू झाले नाही. आणि नंतर संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला खरा, पण अजूनही बेळगाव–कारवारचा भाग, मध्यप्रदेशातील छिंदवाडा–बैतूल वगैरे जिल्ह्यातील मराठी भाग महाराष्ट्रा बाहेरच आहेत !

राष्ट्रभाषेचे प्रेम–ही म. म. पोतदारांची तिसरी जीवननिष्ठा. तिच्या सेवेसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. "जन्मभाषेच्या हक्काच्या क्षेत्रावर कसलेही आक्रमण सुबुद्ध मनुष्य मान्य करणार नाही. प्रथम मान प्रांतिक भाषेचा. तिचे अध्ययन प्रथम आवश्यक. प्रांतिक व्यवहारही सारा प्रांतिक भाषेतच झाला पाहिजे... पण आजच्या काळात केवळ प्रांतिक भाषेवरच आपले निभणार

नाही. अखिल भारतीय व्यवहार–भाषाही आपणास अवगत करून घेणे अवश्य आहे. हिंदी ही अखिल भारतीय व्यवहाराची भाषा करण्याखेरीज अन्य उपाय नाही." (भारताची भाषिक समस्या, पृ. १४) या जाणिवेतूनच त्यांनी महाराष्ट्रात हिंदीच्या प्रचाराचे व प्रसाराचे कार्य हाती घेतले. राष्ट्रीय स्तरावर महात्मा गांधी यांनी हे कार्य पूर्वीच सुरू केले होते. प्रयाग येथील 'हिंदी साहित्य संमेलन' या संस्थेच्या नेतृत्वाखाली वर्धा येथे राष्ट्रभाषा प्रचार समिती स्थापन झालेली होती. महात्माजी या संस्थेचे आरंभी सभासद व नंतर अध्यक्षही होते. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन, पुणे येथे १९३७ साली हिंदी प्रचार संमेलन भरले त्यावेळी प्रा. पोतदार यांनी हिंदीच्या प्रचारासाठी 'अखिल महाराष्ट्र हिंदी प्रचार समिती' स्थापन केली. पुढे तिचेच नामकरण 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति' असे करण्यात आले. राष्ट्रभाषेचे स्वरूप काय असावे या प्रश्नावरून महात्मा गांधीचे व वर्धा येथील समितीच्या कार्यकर्त्यांचे मतभेद होऊ लागले. 'हिंदी-हिंदुस्थानी' या शब्दांनी तो वाद प्रसिद्ध आहे. वर्धा समिती ही हिंदी साहित्य संमेलनाच्या टंडणजी सारख्या हिंदी अतिरेक्यांच्या विचारांनी भारलेली होती. हिंदी–अर्थात प्रादेशिक हिंदी, खडी बोली हीच भारताची राष्ट्रभाषा व्हावी असा त्यांचा आग्रह होता. पण, खडी बोलीच्या निर्मितीपूर्वीही अनेक वर्षापासून भारतभर बोलली जाणारी हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा, व्यवहार भाषा म्हणून व्हावी असे महात्माजींचे म्हणणे होते. वर्धा समितीशी न पटल्यामुळे महात्माजींनी राष्ट्रभाषा प्रचार समिती–वर्धा, या संस्थेतून आपले अंग काढून घेतले. व 'अखिल भारतीय हिंदी परिषद' ही संस्था दिल्ली येथे स्थापन केली. प्रा. पोतदार यांना हिंदी-हिंदुस्थानीचा पक्ष मान्य होता. त्यामुळे पुणे येथील त्यांच्या संस्थेनेही वर्धा येथील आपल्या संस्थेचे राष्ट्रभाषा समितीशी असलेले संबंध तोडून 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा' या नावाने १९४६ पासून कार्य सुरू केले. आपली ही संस्था १९५० मध्ये त्यांनी दिल्ली येथील अखिल भारतीय हिंदी परिषदेशी संलग्न करून घेतली. संस्थेच्या प्रारंभापासून तो मृत्यूपर्यंत संस्थापक पोतदार हेच तिचे अध्यक्ष होते. या संस्थेने मान्य केलेली हिंदीची व्याख्या अशी "भारत में आंतर–प्रांतीय व्यवहार के लिये जिस एक भाषा का उपयोग सदियोंसे आम तौर पर चलता आ रहा है वह हमारी राष्ट्रभाषा है। इसके लिए हिंदी, हिंदुस्थानी, उर्दू ये तीनो नाम रूढ है। इन में से भारतीय संविधान मे हिंदी नाम स्वीकृत किया गया है।"

प्रा. पोतदारांनी जे कार्य केले आहे ते 'राष्ट्रभाषा हिंदी' चे प्रादेशिक भाषा 'हिंदी'चे नव्हे : आणि ते अत्यंत महत्त्वाचे होय. 'राष्ट्र भाषा हिंदी'च्या स्वरूपासंबंधीचे त्यांचे विवेचन अभिनव असून ते सर्वमान्य झालेले आहे. त्यामुळेच त्यांना अखिल भारतीय कीर्ती प्राप्त झाली आहे.

राष्ट्रभाषा हिंदीचे स्वरूप, राष्ट्रभाषा व प्रांतिक भाषा यांचे परस्पर संबंध आणि त्यातून निर्माण झालेले त्रिभाषा सूत्र या प्रश्नासंबंधीची त्यांची मते त्यांच्या 'भारताची भाषासमस्या' या संकलनात्मक संग्रहातून व्यक्त झालेली आहेत. त्यातील 'हिंदीसंबंधी भूमिका' या लेखात, राष्ट्रभाषा हिंदीच्या स्वरूपासंबंधी ते लिहितात.

"राष्ट्रभाषेच्या चळवळीच्या दृष्टीने हिंदी आणि अ–हिंदी असे भारताचे दोन भाग मानले जातात. जेथे मातृभाषा हिंदी आहे ते हिंदी प्रांत व जेथे मातृभाषा दुसऱ्या आहेत ते अ–हिंदी प्रांत समजले जातात. हिंदी प्रांतांची मातृभाषा ही एक हिंदी आणि हिंदी व अहिंदी अशा साऱ्या विभागांची मिळून आपापसातील सामान्य व्यवहाराची सर्वसाधारण भाषा ही दुसरी हिंदी" "...ह्या दुसऱ्या हिंदीचेच एक दुसरे नाव हिंदुस्तानी असे आहे. ही हिंदुस्तानी म्हणजे एखादी नवीन भाषा नव्हे. या देशात सर्वसाधारण भाषा या नात्याने हिंदुस्तानी प्रचलित होती... ती कुणी तरी जबरीने आमच्यावर लादली आहे अशातला प्रकार नाही. ती काळाची निर्मिती आहे." (पृ. ३३)

मुंबई सरकारने १९५१ साली पोतदार यांचे अध्यक्षतेखाली- 'हिंदी शिक्षण समिती' नेमली

होती. भारताच्या राजभाषेवाबतच्या राज्य घटनेतील तरतुदींची छाननी करून त्या समितीच्या अहवालात हिंदीची ही दोन स्वरूपे स्पष्ट केली आहेत. त्याचा सारांश वरील लेखात पोतदारांनीच पुढीलप्रमाणे दिला आहे. "संविधानाच्या १७ व्या अधिकरणात राजभाषेचा सारा विषय आहे. राजभाषेसाठी स्वीकारण्यात आलेले नाव हिंदी व तिची लिपी देवनागरी असे ३४३ व्या कलमात स्पष्ट करण्यात आले आहे. हिंदी या शब्दाचे दोन वेगळेगळे अर्थ समजून घेतले पाहिजेत. संविधानाच्या १७ व्या अधिकरणात हिंदी या शब्दाची द्विविध स्वरूपे आली आहेत. ३४७ व्या अनुच्छेदातील हिंदी या शब्दाने राजभाषेचे नाव निश्चित करण्यात आले आहे. ३५१ व्या अनुच्छेदात ह्या हिंदीच्या विकासाच्या धोरणाचा निर्णय आहे तो महत्त्वाचा आहे. ह्यामध्ये दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे भारताच्या संपृक्त संस्कृतीच्या साऱ्या प्रवाहांचा आविष्कार करण्याची शक्ती त्या हिंदीत असली पाहिजे व दुसरी गोष्ट अशी की, ह्या हिंदीचे पोषण आणि विकास आठव्या परिशिष्टातील चौदा भाषा आणि हिंदुस्तानी भाषा यांच्या सहाय्याने व्हावयाचे आहे. परिशिष्टातील १४ भाषांच्या यादीत मराठी, गुजराती वगैरे भाषांच्या जोडीने हिंदी आणि उर्दू याही भाषांचा समावेश केलेला आहे. ह्याचा काय अर्थ होतो ? हिंदीचा विकास आणि पोषण हिंदीच्या मदतीने करावे, असा हा आदेश आहे. म्हणजे अनुच्छेद ३४३/१७ मध्ये उल्लेखिलेल्या राजभाषा हिंदी चा विकास करण्यासाठी मातृभाषा हिंदी ची मदत घ्यावी असा यातून अर्थ निघतो." (पृ. ३५) 'भारताची भाषिक समस्या' या संग्रहातील 'आमची राजभाषा' आणि 'राष्ट्रभाषा प्रश्नाची मीमांसा' (पृष्ठे ४५ ते ६९) या लेखातही अशाच आशयाचे विवेचन आले आहे.

प्रा. पोतदार यांचे हे निर्वचन बिनतोड आहे. त्यावरून त्यांचे पांडित्य उत्तम प्रकारे दिसून येते. संविधानातील तरतुदीचे हे निर्वचन पोतदारांनीच प्रथम केले. आणि त्यामुळे त्यावेळचे सर्व हिंदी जग हादरून गेले होते. पोतदारांच्या राष्ट्रभाषा विषयक या कार्याचा गौरव करताना 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभे'चे कार्यवाह आणि पोतदारांचे सहकारी कै. गो. प. नेने लिहितात, "राष्ट्रभाषेच्या प्रश्नाबाबत त्यांनी (पोतदारांनी) जशी फोड करून स्वच्छ दृष्टिकोन लोकांसमोर ठेवला, तसा तो कोणीही मांडला नाही. राष्ट्रभाषेच्या प्रश्नाला त्यांचे हे मोठे देणे आहे असे म्हटले पाहिजे. भारताच्या राज्यघटनेच्या ३५१ व्या कलमात म्हटल्याप्रमाणे संस्कृतचे आणि सर्व भाषाभगिनींचे शब्दशैली, पदावली वगैरे आत्मसात करून केंद्र सरकारच्या व्यवहाराकरिता जी भाषा विकसित होईल ती खरी भारताची राजभाषा होय. ती आजच्या प्रादेशिक हिंदीपेक्षा निराळी होणार असल्याने घटनेतील आठव्या परिशिष्टातील हिंदी त्यापेक्षा थोडी वेगळी असणार. एक भारताची राजभाषा हिंदी व दुसरी इतर भाषाप्रमाणे प्रादेशिक हिंदी. राज्य घटना तयार होण्यापूर्वी हिंदी-हिंदुस्तानीच्या वादात त्यांनी हिंदुस्थानी व देवनागरी लिपीला पाठिंबा दिला होता. अशा विचारामुळे पोतदारावर भारतभर टीका झाली. परंतु कालांतराने पोतदारांचा दृष्टिकोन कसा बरोबर होता हे लोकांच्या लक्षात येऊ लागले." (स्मृति गौरव. पृ. ३७).

इतिहास व इतिहास संशोधन, महाराष्ट्र, मराठी भाषा व मराठी साहित्य आणि राष्ट्रभाषा हिंदी या आपल्या जीवननिष्ठांच्या सेवेसाठी स्थापन केलेल्या संस्था बरोबरच इतर अनेक संस्थांचा संसार पोतदार सांभाळीत होते. त्यात भारत इतिहास संशोधक मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद व महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा ह्या प्रमुख होत. या संस्थांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात पोतदारांचे नाव दीर्घ काळ स्मरणात राहील. पोतदारांनी स्थापन केलेल्या, प्रिय मानलेल्या आणि आत्मीयतेने जोपासलेल्या प्रमुख संस्था जवळ जवळ पन्नास होत्या. पोतदार, यांचे जीवनच संस्थामय होते. किंबहुना ही सुद्धा त्यांची एक जीवन निष्ठाच होती असे म्हणावयास हरकत नाही. "समाजात निरनिराळ्या कार्याकरिता संस्था काढल्या पाहिजेत आणि संस्थारूप समाज बांधून काढला पाहिजे असे राजवाडे म्हणत असत, म्हणूनच मी संस्थांच्या कामात सहभागी होत

असतो." असे त्यांनीच म्हटले आहे. 'मी आयुष्यभर ज्या कार्याचा ध्यास घेतला ते कार्य आहे मंडळीकरणाचे. माझ्या गुरूने मला जशी इतिहास प्रेमाची दीक्षा माझ्या तरुणपणी दिली तशीच मंडळीकरणाचीही दीक्षा दिली. बहुधा विस्त्रस्त्र (अनेक प्रकारे विस्कळित–विघटित) असलेला समाज जर लवकरात लवकर अनेक क्षेत्रातील संस्था–निर्मितीतून बांधला गेला नाही, जर या समाजाचे नाना क्षेत्रात मंडळीकरण केले गेले नाही, तर हा समाज मरेल असा इशाराही मला राजवाड्यांनी दिला होता. मी माझ्या कुवती नुसार आयुष्यभर महाराष्ट्राचे मंडळीकरण करीत राहिलो आहे. मी काही केले की नाही याचे मोजमाप करायचे असेल तर ते या मंडळीकरणाच्या संदर्भात करायला हवे" असे पोतदारांनीच सांगितल्याचे डॉ. रा. चिं. ढेरे यांनी नमूद केले आहे. (स्मृति–गौरव. पृ. ९३–९४). प्रा. पोतदार यांच्या अनेक संस्था स्थापन करून त्यांचे संगोपन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या प्रा. पोतदार यांच्या जीवननिष्ठेचे व सेवाकार्याचे रहस्य यात साठवलेले आहे.

असा अनेक संस्थांचा संसार सांभाळून आपल्या जीवननिष्ठांची सतत सेवा करणारा हा समाज पुरुष विद्याव्यासंगात मग्न असे. त्यासाठी अवश्य असणाऱ्या सर्व प्रकारच्या ग्रंथांचा संग्रह करण्याचा त्यांना छंद होता. पुणे येथे त्यांना भेटायला मी अनेकदा गेलो. शनिवार पेठेतील त्यांच्या 'लोककल्याण' घराच्या तिसऱ्या मजल्यावरील आपल्या बैठकीत ते बसलेले असत. भोवती सर्वत्र पुस्तकांचा पसारा. त्यांच्या घरात 'शिडाळावर, कोनाड्यामधून, मोठमोठ्या पेट्या–रांजणामधून, एवढेच काय परंतु जिन्याच्या पायऱ्यांवरही पुस्तके निराधार स्थितीत विश्रांती घेत असत' हे पुणे विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. कृ. शं. हिंगवे यांनी केलेले वर्णन यथार्थ होय. (स्मृति–गौरव) ही पुस्तके वाचायला त्यांना वेळ केव्हा आणि कसा मिळत असे हे कळत नाही. पण या ग्रंथांचे त्यांचे वाचन सूक्ष्म व चिकित्सक दृष्टीने केलेले असे. त्यांतून व बाह्य जगाच्या सूक्ष्म निरीक्षणातून मिळालेले अपार ज्ञानभांडार त्यांच्या जवळ होते. इतकेच नाही तर भेटायला आलेल्या व्यक्ती-जवळ ते ज्ञानभांडार खुले करण्यात हा गोष्टीवेल्हाळ विद्वान स्वतःला इतका हरवून बसे की वेळेचे त्याला भानही राहत नसे.

दुसऱ्या एकावेळी त्यांना भेटायला 'लोककल्याण' मध्ये मी गेलो होतो. तिसऱ्या मजल्यावरील त्यांच्या अभ्यासिकेत बैठकीवर बसून आम्ही फोडणी दिलेल्या ताकाचा आस्वाद घेत होतो. भोवती पुस्तकांच्या गठ्ठ्याजवळच एके ठिकाणी विवाहाच्या अनेक आमंत्रणपत्रिका पडल्या होत्या. तिकडे माझे लक्ष्य गेले. मी विचारले. "ह्या इतक्या आमंत्रण पत्रिका कशासाठी सांभाळून ठेवल्या आहेत?" पोतदार म्हणाले, "तोही माझा एक छंद आहे. मला आलेल्या विवाहाच्या सर्व पत्रिका मी जपून ठेवतो" मी विचारले, "का?" पोतदार म्हणाले, "अहो, ऐतिहासिक दृष्टचा त्याही महत्त्वाच्या आहेत. पुढेमागे, एखाद्या व्यक्तीचा विवाह झाला होता की नाही, झाला असल्यास कुणाशी, कधी वगैरे संबंधी प्रश्न उपस्थित झाला तर संशोधकांना त्यांचा उपयोग होईल." हे ऐकून त्यांच्या ऐतिहासिक साधनसामुग्रीच्या या कल्पनेने मी आश्चर्यचकित झालो. मी किंचित हसलो. त्यांनी प्रश्न केला, "का, हसता का?" मी म्हटले, "आपल्यासारख्या ब्रह्मचाऱ्याचा इतरांच्या लग्नपत्रिकाविषयीचा हा छंद पाहून हसू आले, एवढेच!"

म. म. पोतदार यांची वाणी रसाळ, जिभेवर सरस्वती नाचत असायची. त्यामुळे त्यांचे वक्तृत्व उत्तम. सभा–संमेलनांचं संचालन करताना या वक्तृत्वाचा त्यांना चांगला उपयोग होई. साहित्य संमेलनातील त्यांची अनेक भाषणे ऐकण्याचे भाग्य मला लाभलेले आहे! त्यांची प्रास्ताविक भाषणे किंवा समारोपाची व आभाराची भाषणे अतिशय सुंदर व्हायची. आपल्या वक्तृत्वाने वादविवादाचा फड जिंकावा पोतदारांनीच आणि त्यांचे वक्तृत्व केवळ मराठीतच नव्हे तर हिंदी व इंग्रजी या भाषातूनही ऐकण्यासारखे असे. ते बहुभाषी होते. मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषांवर त्यांचे उत्तम प्रभुत्व होते. त्यांची मराठी, हिंदी व इंग्रजी

भाषातील भाषणे ऐकण्याचे भाग्य मला अनेकदा लाभले आहे. ‘वक्ता दशसहस्रेषु’ या वचनाचा प्रत्यय मला प्रत्येक वेळी आला. त्यांचे संस्कृत भाषण ऐकण्याचे भाग्य मात्र मला मिळाले नाही हे मी माझे दुर्दैव समजतो. पोतदारांना ‘चालता बोलता इतिहासपुरुष’, ’चालते बोलते विद्यापीठ’, ‘चालता बोलता ज्ञानकोश’ असे म्हणत. ते सर्व दृष्टींनी यथार्थ आहे. इतिहास विषयकच नव्हे तर विद्येच्या अनेक शाखातील ज्ञानामुळे ‘इतिहासपुरुष’, ‘विद्यापीठ’ ‘ज्ञानकोश’ ही विशेषणे जशी यथार्थ आहेत तसेच त्यातील ‘चालते–बोलते’ हे विशेषणही सार्थ आहे. कारण, ते सदैव भ्रमण करीत आणि जातील तेथे आपल्या वक्तृत्वाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत. ‘श्रोते हो’ या संग्रहातील त्यांच्या भाषणात या वक्तृत्वाचा प्रत्यय येतो. या दृष्टीने त्यांतील ’मराठीचा निश्चय घोष’ हे भाषण, विशेषतः त्यातील महाराष्ट्राची व मराठीची गौरव गाथा (पृ. १०५ ते ११२) ही अवश्य वाचून पाहावी. म. म. पोतदार साक्षात समोर उभे असून आपल्याशी हृदयसंवाद करीत करीत, अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या आपल्या देशी मराठी वाणीने–वक्तृत्वाने आपल्याला झपाटून टाकीत आहेत असा भास झाल्याशिवाय राहणार नाही

महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्या अस्मितेच्या या निष्ठावंत थोर पुरुषाला त्याच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगी माझे शतशः विनम्र प्रणाम ! ■

आदरणीय डॉ. वि. भि. कोलते यांचा हा लेख म. म. दत्तो वामन पोतदारांच्या जन्मशताब्दी निमित्त्य जु. ऑ. स. /९० मध्ये प्रकाशित व्हावयाच्या अंकाकरता मागविण्यात आला होता. भाऊसाहेबांनी तातडीने तो दिलेला होता. गेले वर्षभर युगवाणीचे अंक प्रकाशितच होऊ न शकल्याने या लेखाच्या प्रकाशनास होत असलेल्या या विलंबाबद्दल क्षमस्व !

अनुक्रमणिका

॥ ज्ञानेश्वरीतील शृंगारविश्व ॥

सु. बा. कुळकर्णी

ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरीसंबंधातील एक अभ्यासक डॉ. सु. बा. कुळकर्णी यांचा एक लेख युगवाणीत अगोदर प्रकाशित केलेला होताच. युगवाणीतून त्यावर वाचकांनी पत्र लिहून चर्चा देखील केलेली होती.

डॉ. सु. बा. कुळकर्णी यांच्या सोबतच्या लेखावर देखील विचारपूर्ण प्रतिक्रिया अपेक्षित आहेत.

निवडक प्रतिक्रिया युगवाणीतून प्रकाशित करण्यात येतील.

साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व त्याच्या साहित्यात प्रतिबिंबित झालेले असते, हे एक सार्वत्रिक सत्य होय. साहित्यिकाने कितीही मुखवटे धारण केले तरी त्याचा 'अहम्' त्याच्या साहित्यात कोठे तरी डोकावतोच. साहित्यात साकार होणारे विश्व साहित्यिकाच्या प्रत्यक्ष अनुभूतीतून उद्भूत झालेले असेल असे नाही; परंतु त्याच्या बुडाशी विश्वातील व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण अवश्य असते. स्वानुभव, सूक्ष्म निरीक्षण, प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा सुरेख संगम म्हणजे साहित्य. साहित्यातील सृष्टी ही साहित्यिकाने भोगलेल्या सुखदुःखातून, परानुभव–सामरस्यातून, कल्पनाविलासातून व चिंतनातून आविष्कृत होत असते.

साहित्याचा आस्वाद साहित्याच्या विविधलक्षी अभ्यासातून संपन्न होत असतो. साहित्यामध्ये साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे ही अशाचपैकी एक साधना होय. साहित्याचे मूल्य-मापन करताना साहित्यिकाचे चरित्र वा चारित्र्य ध्यानात घ्यावे की नाही हा एक वेळ वादाचा मुद्दा ठरू शकेल; परंतु आस्वादलक्षी साहित्या-ध्ययनाचे तसे नाही. त्यातील प्रत्येक अंश सुजाण साहित्यानंदाला पोषक ठरतो.

ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व

ज्ञानदेवांसारख्या महाकवी आणि महातत्त्व-ज्ञाच्या साहित्याकडे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याच्या हेतूने सामोरे जाणे ही एक अतिदुर्घट कसरत होय. जनमानसात साकार झालेली त्यांची प्रतिमा आणि साहित्यात व्यक्त होणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व ही एकरूप असतीलच असे नाही. माणसाचे व्यक्तिमत्त्व हे एकेरी वा एकसंघ असे कधीच नसते. त्यास मनोधर्मांचे आणि प्रकृति-विशेषांचे नाना पदर असतात. त्यांतील एकेक पदर उलगडत गेल्यास काही ढोबळ अनुमाने करण्याइतपत प्रमाणे हाती लागू शकतात.

ज्ञानदेवांसारख्या महान संतांचे आध्यात्मिक विचार हे एक चिरंतन सामाजिक निधान असते. एका प्रसक्त वैचारिक प्रक्रियेचा तो परमोत्कर्ष बिंदू असतो. त्यांच्या लौकिक जीवनाचे मात्र तसे नसते. ते वैयक्तिक तर असतेच; परंतु कालसापेक्ष आणि समष्टिसापेक्षही असते. दुर्दैवाने, ज्ञान-देवांच्या लौकिक जीवनाची फारशी माहिती उपलब्ध नाही. जी आहे ती कथेकऱ्यांच्या कल्पना-विलासाने अवगुंठित आणि विशीर्ण झालेली आहे. जोपर्यंत त्यांच्या चरित्रासंबंधी समकालीन विज्ञापने उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत त्यांच्या

व्यक्तिमत्त्वाचा शोध त्यांच्या साहित्यामधून घेत राहणे म्हणूनच अपरिहार्य होय.

ज्ञानदेव हे एक संन्यस्त वृत्तीचे, समाजाने उपेक्षिलेले, अल्पायुषी संत होते, अशी त्यांची प्रतिमा जनमानसात साकार झालेली आहे. त्यांच्या कर्तृत्वापेक्षा त्यांनी केलेल्या तथाकथित चमत्कारांचे आविष्करण आणि वर्णन अधिक प्रभावीपणे झालेले आहे. परंतु त्यांच्या साहित्यात मात्र त्यांच्या या लोकप्रिय प्रतिमेस हवा तितका दुजोरा मिळत नाही. विशेषत: ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या ग्रंथांतील प्रचंड बौद्धिक आवाका, सूक्ष्म सामाजिक निरीक्षण आणि भाषेचा अद्भुत उद्‌विलास, हे लेखन कोणा प्रौढ, दीर्घानुभवी, प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत कवीचे असावे असे आक्रोशून सांगत राहते.

अध्यात्माला शृंगाराची फोडणी

चाळीस वर्षांपूर्वी, रा. शं. वाळिंबे यांनी 'अध्यात्माला शृंगाराची पुरवणी' या शीर्षकाचा निबंध महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेत प्रसिद्ध करून एकच खळबळ माजविली होती. (म. सा. प. वर्ष २२, अंक २, जुलै–सप्टेंबर १९४९, पृष्ठे १०–२६.) ज्ञानेश्वरीतील यच्चयावत् शृंगार-विषयक निर्देश एकत्र करून त्यांचे विश्लेषण त्यांनी या निबंधात सादर केले होते. अध्यात्म-विद्येचे प्रतिपादन करीत असताना शृंगारिक वर्णनाचे अनुपान देऊन विषय आस्वाद्य करण्यात ज्ञानदेवांनी दाखविलेले कौशल्य त्यांच्या विदग्ध रसवृत्तीची व रसिकतेची साक्ष देते, असे वाळिंबे यांचे म्हणणे होते. ज्ञानदेवांची ही रसिकता त्यांच्या पारंपरिक प्रतिमेशी विसंगत आहे, असा त्यांचा सूर होता. पौगंडावस्थाही प्राप्त न झालेल्या या ब्रह्मचाऱ्याची शृंगारविषयक जाण पाहून ते म्हणतात

"संवेदनांचें तत्त्वज्ञान प्रमाण मानणारा एखादा आधुनिक कवि ज्या तन्मयतेने मानवी विकारांचे वर्णन करील त्याच तन्मयतेने ज्ञानेश्वरां-नीही अत्यंत रसिकतेने असे वर्णन प्रसंग मिळेल त्याठिकाणी केले आहे. अध्यात्म विद्येवर ज्ञानेश्वर प्रवचन करीत आहेत हे लक्षांत घेतले असता पदोपदी त्यांच्या रसिकतेचा जो साक्षात्कार होतो तो खरोखर अलौकिकच मानला पाहिजे. स्त्री–पुरुषांचे आत्मिक व शृंगारिक प्रेम, लंपट पुरुषाची अनावर भोगासक्ती, निष्प्रेम जीवन कंठून चवचाल प्रेमाचा बाजार मांडणारी पण्यांगना, प्रियकराशी 'तनुमनजीवें' करून समरस होणारी पतिव्रता, केवळ उत्तान शारीरिक प्रेम, इत्यादि अनेक 'प्रेमाच्या जाती' ज्ञानेश्वरांनी मोठ्या रसाळ-पणाने वर्णिलेल्या आहेत. या प्रांतात ज्ञानेश्वरांनी जे जाणतेपण दाखविले आहे ते विचारात घेतले असता या विशीच्या आतील ब्रम्हचारी तरुणाला इतकी किमया कशी साधली याचे नवल वाटल्या-वाचून राहत नाही."

वाळिंबे यांचा हा स्पष्टवक्तेपणा श्रद्धाळू ज्ञानेश्वरभक्तांना आवडला नाही. पांडुरंगशर्मा आणि कोनकरशास्त्री यांनी 'महाराष्ट्र' मासि-कात लेख लिहून (मार्च, १९५० व जुलै, ऑगस्ट १९५१) वाळिंबे यांना झोडपून काढले. कोनकर शास्त्र्यांनी लिहिले आहे :–

"आध्यात्मिक उन्नती, ब्रह्मविद्येचा लाभ या दृष्टीने अधिकारभेदाने अनेकांनी ज्ञानेश्वरीचा लाभ घेतला पण ज्यांना कवीच्या वैषयिक जीवन वर्णनाविषयीच प्रेम वाटते त्यांना ही दैवी वर्णने कशी मानवणार ? धेनू वत्साला अमृतपान करायला लावते परंतु त्या अमृताची सागराजवळ वास करणाऱ्या गोचिडास प्राप्ती कशी व्हावी ?"

शास्त्रीमंडळींच्या शापवाणीला भिऊन पुढे वाळिंबे यांनी आपल्या 'ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ति' या ग्रंथातील 'रसिकतेचा शृंगार' हे प्रकरण लिहिताना पेनमध्ये शाईबरोबर थोडा मधही घातला !

मधुराभक्तीचा मळा

काम, मन्मथ, विषय, शृंगार ही ढोबळमानाने एकाच मानवी सहजप्रवृत्तीची विविध प्रकटने होत. या सहजप्रवृत्तीचे उन्नयन संतांच्या भक्ति-काव्यात झालेले आढळते. आपल्या वैयक्तिक जीवनात या प्रवृत्तीचे दमन करून तीवर त्यांनी विजय मिळविला असला तरी ज्या श्रोत्यांसाठी वा पाठकांसाठी ते काव्य आहे त्यांना सहज समजेल अशा भाषेचा आश्रय त्यास करावा लागला.

अनुक्रमणिका

यामुळेच जिवाशिवाचे ऐक्य स्पष्ट करण्यासाठी ते शृंगाराची परिभाषा वापरताना दिसतात. यातूनच प्रियकर-प्रेयसी, वल्लभा—कांत यासारखे व्यावहारिक जीवनातील दृष्टांत या काव्यात शिरले. परमेश्वर आणि भक्त यांमधील उत्कट प्रेमाचा आविष्कार म्हणजे भक्ती. या भक्तिभावनेचा परमोत्कर्ष संतांच्या गौळणी, विरहिणी, सौरी इत्यादी प्रकारच्या अभंगांतून झालेला दिसतो. मराठी संतांच्या या मधुराभक्तीचे सुंदर आणि संयमित विवेचन प्र. न. जोशी यांच्या 'मराठी साहित्यांतील मधुराभक्ति' (१९५७) या ग्रंथात आढळते.

मराठी साहित्यातील मधुराभक्तीचे मूलस्रोत ज्ञानदेवांच्या अभंगांतून प्रवर्तित होतात कृष्णाच्या बालक्रीडा, गोपींची प्रेमक्रीडा, कृष्णभेटीची आतुरता, कृष्णाच्या नीलवर्णाचा साक्षात्कार, मीलनोत्सुकता, कामासक्ती, आलिंगनातील अद्वैत, मीलनोत्तर शांती इत्यादी विषयांवरील अभंगांतून याचे प्रत्यंतर मिळते. अद्वैतभक्तीचा उत्कर्ष संतांच्या 'गौळणी'च्या अभंगांतून अनुभवायास मिळतो. या गौळणी एकसारख्या नाहीत. त्यांच्या शृंगाराचे ढंग निरनिराळे आहेत. नाथांची गौळण नखरेल आहे; तुकोबांची फटकळ आहे; नामदेवांची भावडी आहे; विष्णुदास नाम्याची चवचाल आहे; निळोबांची वैराग्यशील आहे. ज्ञानदेवांच्या गौळणीत निर्व्याज प्रेमाचा उत्कट आविष्कार आढळून येतो. ज्ञानदेवांच्या अभंगांची वैशिष्ट्ये सांगताना डॉ. जोशी म्हणतात, "ज्ञानदेवांच्या अभंगवाङ्मयांत दिसून येणारी अनुभूतीची सखोलता दुसरीकडे मिळणार नाही... 'निर्गुण मेरा पीव निर्गुण मेरा पीव' म्हणणारा कबीरच कदाचित या बाबतीत ज्ञानदेवांच्या शेजारी बसू शकेल."

एकीकडे ज्ञानदेवांच्या काव्यातील शृंगाराच्या प्रेरणा, त्यांतील काव्यगुण, त्यांची मनोवैज्ञानिक पार्श्वभूमी इत्यादींचे परिशीलन होताना दिसते; तर दुसरीकडे ज्ञानदेवांच्या पारंपारिक प्रतिमेला धक्का पोहोचेल म्हणून त्यातील शृंगाराचे ज्ञानदेवजनकत्वच नाकारणाऱ्या प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसतात. या दुसऱ्या प्रकारच्या प्रतिक्रियांचा प्रातिनिधिक मासला श्रीज्ञानेश्वर–दर्शन ग्रंथातील कृ. वें. गजेंद्रगडकर यांच्या लेखात (भाग, १ पृ० ३०८–) पुढीलप्रमाणे आढळतो–

"ज्ञानदेव महाराज आपल्या स्वतःस गौळीण किंवा विरहिणी समजून देवास प्रियकर समजतात ही कल्पनाच मुळी अप्रशस्त, अक्षम्य व अशक्य वाटते. नाइलाजाने फक्त जन्माच्या वेळी जो, स्त्रीसंपर्क घडला, तो घडला. त्यापुढे आजन्म स्त्रीसंपर्क घडू नये व जीवितसर्वस्व परमेश्वरास वाहून तद्रूप होऊन जावे, अशी ज्यांची शिकवणूक व ज्यांचे प्रत्यक्ष आचरण ते ज्ञानदेव आपली देवाविषयी वाटत असलेली तळमळ विरहिणीच्या रूपाने व्यक्त करतात, हेच मुळी संभवत नाही ...हे अभंग एखाद्या अननुभवी मूर्खाने किंवा भोंदूने लिहिले असावेत व त्यांस मान्यता मिळावी म्हणून ते ज्ञानदेवांसारख्या श्रेष्ठ संतांच्या नावावर प्रसिद्ध केले असावेत. हे अभंग प्रक्षिप्त असावेत असे वाटते."

ज्ञानेश्वरीतील शृंगार

ज्ञानेश्वरी हे गीतेवरील एक महान प्रवचन आहे. 'मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळ' करणे हे या प्रवचनाचे प्रयोजन आहे. त्यात शृंगाराची तरफदारी नाही; की शृंगारातून समाधीकडे वा मोक्षाकडे जाण्याचा मार्गही दाखविलेला नाही. किंबहुना, भक्तिसाधनेतील विघ्न म्हणून शृंगाराची निर्भर्त्सनाच केलेली आहे. असे असले तरी, कधी कधी ज्ञानदेवांमधील कवी त्यांच्यामधील तत्त्वज्ञानावर मात करताना दिसतो. त्यांच्या वाणीतील वसंत बहरास येतो. जिवाशिवाचे ऐक्य स्पष्ट करण्यासाठी ते प्रणयाची परिभाषा वापरू लागतात. एका पाठोपाठ एक व्यावहारिक उपमा, रूपके आणि दृष्टांत यांची खैरात करू लागतात. अत्यंत स्वाभाविकपणे प्रियकर-प्रेयसीमधील प्रेम, विरहवेदना, मीलनातील मधुतृप्ती शब्दबद्ध करतात. यातूनच कामिनी, कुलवधू, पतिव्रता यांच्या बरोबर धांगडी, धिटा, स्वैरिणी, पण्यांगना यांचीही हजेरी लागते. क्षणार्धात, आपण वाहवत गेलो याची ज्ञानदेवांस जाणीव होते. मग ते ईश्वर निष्ठांच्या मांदियाळीची क्षमा मागतात.

'म्हणोनि असोतु इयें वायाणीं ।
कायशीं मूर्खांचीं बोलणीं ॥
वायां वाढवितां वाणी ।
शिणेल हन ॥'

असे म्हणत कथावस्तूचा धागा पुन्हा हातात घेतात.

संतांना श्रृंगाराचे वावडे असते, अशी एक भ्रामक कल्पना जनमानसात रूढ आहे. ज्ञानेश्वरीतील श्रृंगारविषयक निर्देश या कल्पनेला छेद देतात. ज्ञानदेव हे एक रसिक आणि श्रृंगारमर्मज्ञ कवी होते याचा प्रत्यय त्यांच्या सर्वच काव्यांत येतो. श्रृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या या कवीने श्रृंगाराचे सखोल ज्ञान प्राप्त केले होते याची खात्री पटते. किंबहुना, कोठेकोठे आढळणारी वर्णनातील सूक्ष्मता आणि अचूकता निरीक्षणापेक्षा निजानुभवाचीच साक्ष देते.

ज्ञानेश्वरी आणि लीळाचरित्र हे दोन ग्रंथ यादवकालीन समाजात प्रचलित असलेल्या श्रृंगार आणि सौंदर्यविषयक कल्पनांचे, आणि लैंगिक आचरणाचे दर्शन घडविणारे विशाल दर्पण होत. ज्ञानेश्वरीतील शृंगारविश्वाच्या प्रस्तुत अध्ययनाकडे तत्कालीन समाजमनाचा मागोवा घेण्याचा आणि ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेण्याचा एक प्रयत्न म्हणूनच पहावे. त्यातील अध्याय आणि ओवींचे संदर्भ ह. भ. प. वै. सोनोपंत दांडेकर यांच्या 'सार्थ ज्ञानेश्वरी'तील आहेत.

लावण्याची नव्हाळी

श्रृंगाराचा स्थायीभाव काम होय. भारतीय संस्कृतीत या कामाची गणना पुरुषार्थामध्ये होई. काम म्हणजे पाप, अतएव निषेधार्ह आणि त्याज्य, हा विचार मध्ययुगीन संतांनी रुजविला. आजही कामाकडे एक जैविक वा प्राकृतिक अपरिहार्यता म्हणून पाहिले जात नाही. कामवासना ही एक वस्तुस्थिती आहे. तिचा दृश्य प्रादुर्भाव स्त्रीच्या बाबतीत सामान्यपणे १२ ते १४ या वयात व पुरुषाच्या बाबतीत १६ ते १८ या वयात होत असतो. या शारीरिक परिवर्तनाचे सखोल ज्ञान ज्ञानदेवांनी प्राप्त केले होते असे दिसून येते.

महाभारतातील विषय व विवेचनामध्ये प्रतिक्षणी प्रकट होणारे नावीन्य त्यास नवऋतुस्नात अंगनेसारखे भासते.

कीं प्रथमवयसाकाळीं ।
लावण्याची नव्हाळी ।
प्रगटे जैसी आगळी ।
अंगनाअंगीं ॥ (१.४२)

मायेची तुलना ज्ञानदेव नदीशी करतात. या मायानदीत प्रमदा महामीनाप्रमाणे तळपत असतात. या नदीत रतींची बेटे आहेत व त्या बेटांवर कामाच्या लाटा आदळत असतात, असे ते सांगतात (७.७२–७४). अन्यत्र तरुण स्त्रियांची तुलना परावाणीशी केलेली आहे. त्या स्त्रीशी विलास करणाऱ्या गुरुस ज्ञानदेव नमस्कार करतात (१०.१–२). माया ही कामरूपी वेलासाठी वनविलेला मांडव आहे, वा मोहरूपी वनातील वेल आहे, असेही ते सांगतात.

हे कामाची मांडवी।
हे मोहवनींची माधवी ।
इये प्रसिद्धचि दैवी ।
माया हे नांव ॥ (१३.९९१)

भगवद्गीता आणि ज्ञानेश्वरी यांची तुलना करताना ते म्हणतात, की माझी ज्ञानेश्वरी ही एक अशी शोभिवंत सुंदरी आहे की तिचे अंग कोणते आणि तिने ल्यालेले अलंकार कोणते, आणि कोणी कोणाला शोभा आणली याचाच संभ्रम निर्माण व्हावा.

जैसे अंगाचेनि सुंदरपणे ।
लेणियासी आंगचि होय लेणें ।
अळंकारिसें कवण कवणें । हें निर्वचेना ॥
(१०.१४)

हीच कल्पना त्यांनी अन्यत्रही मांडली आहे.

सुंदर आंगीं लेणें न सूये ।
तैं तो मोकळा श्रृंगार होये ।
ना लेइलें तरी आहे ।
तैसें की उचित ॥ (१८.१७३८)

स्त्री सौंदर्य हे प्रच्छन्न असण्यापेक्षा अवगुंठित असल्यास त्याची ओढ अधिक वाढते हे ज्ञानदेवांस माहीत होते. 'ना तरी कुळवधू लपवी अवेवांतें' (१३.२०५) या शब्दांत ते व्यक्त होते.

रजोगुणामुळे कामाच्या मस्तीत आलेल्या जिवाची चंचलता त्यांना माशाच्या तळपण्या–

सारखी, विजेच्या चमचमण्यासारखी, वा कामिनीच्या कटाक्षासारखी भासते.

काय चंचळु मासा ।
कामिनी कटाक्षु जैसा ।
लवलाहो तैसा । विजू नाहीं ।। (१४.१७०)

नववधूच्या लाजण्याचे ज्ञानदेवांनी सूक्ष्म निरीक्षण केले असावे. नवीनच लग्न झालेल्या लहान मुलीस वेगवेगळ्या पुरुषांची नावे घेऊन, 'हा तुझा नवरा काय?' असे विचारत असता, प्रत्येक नावास 'नाही, नाही' म्हणणारी ती, ज्या नावाच्या उच्चारावरोवर लाजेने मुरकून गप्प राहते, त्या न वोलण्यातच ती आपला अमुक नवरा आहे असे दर्शविते.

जैसें न सांगणे वरी ।
वाळा पतीसी रूप करी ।।
वोलु निमालेपणें विवरी ।
अचर्चातें ।। (१५.४६८)

नत्य कर्माला नैमित्तिक कर्माची जोड मिळाली असता त्या नित्य कर्माला शोभा येते. ज्ञानदेव या कर्मांची तुलना तरुण स्त्रीच्या गहिऱ्या डोळ्या-तील काजळाशी करतात.

सांवळ्या आंगा चंदन ।
प्रमदा लोचनीं अंजन ।।
तैसें अधिकारासी मंडण ।
नित्यरूप जें ।। (१८.५८७)

देहाचा रेखीवपणा आरम्याप्रमाणे पवित्र आणि सुंदर असतो. सापाने कात टाकली वा अतिशय उकडत असल्याने वस्त्र फेडून टाकले तरी देह-सौंदर्यात काही वदल होत नाही (८.६६). ज्ञानदेवांनी, भरजरी पीतवस्त्र काढून ठेवलेल्या नग्न सुंदरीची तुलना तेजार्पणानंतर प्राणवायूरूप होणाऱ्या कुंडलिनीशी केली आहे.

हो कां जे पवनाची पुतळी ।
पांघुरली होती सोनेसळो ।।
ते फेडुनियां वेगळी ।
ठेविली तिया ।। (६.२८४)

प्रमदांचां आलिंगनीं

ज्ञानेश्वरीत चुंबनाचा निर्देश नाही. परंतु ज्ञानदेवांच्या अभंगात मात्र त्याचा आढळ होतो. 'त्वचेचिया राना धाई नको मना' या रूपकात नदाचा कान्हा डोळा घालतो, अचुळा धरतो, एक्या करें धरून त्रिजा करें वेढारतो व चुंबन देतो. (साखरे गाथा, अभंग क्र. ६१४). आलिंगनाचे निर्देश मात्र पदोपदी आढळतात. या आलिंगनाचे प्रयोजन प्रकृति-परमात्म्याचे अद्वैत स्पष्ट करणे हे आहे. प्रियकर-प्रेयसी वा पति-पत्नी यांचे आलिंगन हे शिवाशिवाच्या भेटीसारखे; तर मैथुन हे ब्रह्मसुखप्राप्तीसमान होय.

पाचव्या अध्यायात योग्यास होणाऱ्या ब्रह्मसुख प्राप्तीचे वर्णन करताना ज्ञानदेव आलिंगन व सुरत या दोन्ही कामक्रीडांचा दृष्टांत देतात. आत्मभाव विसरून विषयांपलीकडे गेलेला ब्रह्मज्ञानी योगी ब्रह्मसुखाकडे कसा जातो याचे वर्णन संगमोत्सुक प्रियेच्या आलिंगनाने व सुरतक्रीडेने साकार झाले आहे. त्यातील, आलिंगनाच्या वेळेला स्त्री स्वतः होऊन कवळा मारते हे वास्तव स्वानुभवाशिवाय अशक्य वाटते.

तिये आलिंगनमेळीं ।
होय आपेंआप कवळी ।।
तेथ जळ जैसें जळीं ।
वेगळें न दिसे ।।
कां आकाशीं वायु हारपे ।
तेथ दोन्ही हे भाष लोपे ।।
तैसें सुखचि उरे स्वरूपें ।
सुरतीं तिये ।। (५.१३३-३४)

आलिंगन हे वात्सल्यापोटी असू शकते; तसेच काममूलकही असू शकते. या दोन प्रकारच्या आलिंगनांतील वेगळेपण ज्ञानदेवांनी अचूक टिपले आहे.

कां पतिपुत्रातें आलिंगी ।
एकचि ते तरुणांगी ।।
तेथ पुत्रभावाचां अंगीं ।
न लगेचि कामु ।। (१३.४८०)

विषयभोगलोलुप माणूस आपल्या संसाराला, स्त्रीला व जीवरूपी झोपडीला कसा चिकटून राहतो याचे वर्णन प्रियकर-प्रेयसीच्या आलिंगना-द्वारे ज्ञानदेव व्यक्त करतात.

प्रियोत्तमाचां कंठीं ।
प्रमदा घे आटी ।।

तैशी जीवेंसी कोंपटी ।
धरूनि ठाके ।। (१३.७८५)

'ब्रह्म हे सत्य व माया ही मिथ्या' या तत्त्वाचे निरूपण करण्यासाठी ज्ञानदेव स्वप्नातील आलिंगनाचा दाखला देतात. स्वप्नामध्ये तरुण स्त्रीचे आपल्या प्रियकराच्या पुढ्यात झोपणे, स्वप्नातच झटकन जाग येऊन त्यास आलिंगन देणे आणि त्यास कामपीडित करणे, हे सर्व जसे खोटे तसेच मायेचेही आहे.

स्वप्नीं प्रियापुढें तरुणांगी ।
निदेली चेवऊनि वेगीं ।।
आलिंगिलेनिवीण आलिंगी ।
सकामु करी ।। (१५.८६)

आणि स्वप्नातून जागे झाल्यावर तिला झोंबायला जावे तर ती तेथे असतेच कोठे ?

तेथ स्वप्नीचिया प्रिया ।
चेवोनि झोंबों गेलिया ।।
ठायिजे दोन्ही न होनियां ।
आपणचि जैसें ।। (१८.११५८)

आसुरी प्रवृत्तीच्या लोकांना मादक पदार्थांच्या सेवनाने आणि प्रमदांच्या आलिंगनाने परमसुख प्राप्त होते असे वाटते. आजही या परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही !

माजिरां अन्नपानीं ।
प्रमदांच्यां आलिंगनी ।।
मी होईन त्रिभुवनीं ।
आनंदाकारु ।। (१६.३६२)

फलाकांक्षा न धरता केलेले विहित कर्म हे पतिव्रतेने स्वपतीला दिलेल्या आलिंगनासारखे सौख्यदायी असते (१८.५८६). सागराशी मीलन झाल्यावर गंगेच्या प्रवाहाचा खळखळाट नाहीसा होतो; त्याचप्रमाणे ती पतीशी स्थिर होते.

घडता महोदधीसी ।
गंगा वेगें सांडिजे जैसी ।
कां कामिनी कांतापासी ।
स्थिर होय ।। (१८.१०८१).

पहिल्या अध्यायात 'अशारीर प्रेमाचा नमुना ज्ञानदेवांनी सादर केला आहे. चंद्र दिसू लागताच चंद्रविकासी कमलिनी प्रफुल्ल होऊन, आपली जागा न सोडता त्याला आलिंगन देते; हे प्रेम-सौख्य कसे भोगावे हे एक तिचे तिलाच ठाऊक ! (१.६०). अठराव्या अध्यायात गीता ही कोणी सुंदरी आत्मारूपी स्वपतीला बाह्या पसरून भेटण्यासाठी येत आहे, असे वर्णन आले आहे.

तो वल्लभा, मी कांतु

पति-पत्नीमधील उत्कट प्रेमाचा निर्मळ आविष्कार ज्ञानेश्वरीत जागोजागी आढळतो. 'प्रेमाचेनि बहुवसपणें । नाहीं राती दिवो जाणणें ।' असे ज्ञानदेव सांगतात (१०.१२९). भक्त आणि परमेश्वर यामधील अन्योन्य प्रेम व्यक्त करण्यासाठी भक्त हा 'वल्लभा' व मी त्याचा 'कांतु' आहे, असे श्रीकृष्ण सांगतात.

अर्जुना गा तो भक्तु ।
तोचि योगी तोचि मुक्तु ।
तो वल्लभा मी कांतु ।
ऐसा पढिये ।। (१२.१५६).

भक्त हे माझे 'कुटुंब' आहे. राजाची कांता काय भीक मागते ? माझ्या 'कुटुंबा'ची काळजी घेण्यास मला कोणतीही लाज वाटत नाही !

एऱ्हवीं तरी माझिया भक्तां ।
आणि संसाराची चिंता ।
काय समर्थाची कांता ।
कोरान्न मागे ।।
तैसे ते माझें ।
कलत्र हे जाणिजे ।
कायिसेनिही न लाजें ।
तयांचेनि मी ।। (१२.८५-८६)

'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' या गीतेतील श्लोकावर भाष्य करताना ज्ञानेश्वर सांगतात, स्वपत्नी जरी कुरूप असली तरी ती स्वपत्नीच होय. तिच्यावरोबरच 'संसार' करणे चांगले !

हे असो वनिता आपुली । कुरूप जरी जाहली ।
तरी भोगितां तेचि भली । जियापरी ।। (३.२२४)

परमेश्वराच्या मुख्य विभूती सांगताना श्रीकृष्ण म्हणतात, पश्चिम दिशा ही कोणी तरुण स्त्री आहे व तिचा स्वामी वरुण तो मीच होय. (१०.२४३) तेराव्या अध्यायात प्राण हा पुरुष व क्रियाशक्ती ही त्याची अंगुरी झाली आहे. ही

क्रियाशक्ती जीभ, हात, पाय, उपस्थ आणि गुद या पंचद्वारांनी ये-जा करीत असते (१३.१०२).

गुरुसेवेचे माहात्म्य वर्णन करताना गुरु हा पती व शिष्य हा पत्नी या भूमिका वारंवार येतात. प्रिया प्राणनाथाला उचित अशी सेवा देते; तशीच सेवा शिष्य गुरूला देतो (१३.१७२), विरहिणी स्त्री सतत वल्लभाचे चिंतन करीत असते; तसेच शिष्य गुरूचे चिंतन करीत असतो (१३.३७४). त्याचे गुरूवरील प्रेम इतके उत्कट असते, की तो जीवरूपी शय्येवर गुरूला पती करून भोगतो. ' गुरू कांतु करूनि भुंजें ' (१३.३९०). चौदाव्या अध्यायात श्रीकृष्ण सांगतात, ' अविद्या ही माझी गृहिणी आहे ती तरुण आहे. तिच्यापाशी अनिर्वचनीय असे गुण आहेत ' (१४.८७).

सासर आणि माहेर यामधील आप्तांपेक्षा स्त्रीला आपला पतीच अधिक जवळचा वाटतो. ' सांडूनि कुळें दोन्ही प्रियासी अनुसरे कामिनी ' असे ज्ञानदेव सांगतात (१८.१०१३). पतीचा वियोग हा तिला अतिशय क्लेशदायक ठरतो. ती सारखा पतीचा ध्यास घेते. तिला जगणे देखील नकोसे होते.

> प्राणनाथाचिया आधी ।
> विरहिणीतें जिणेंही बाधी ॥ (१८.९२०).

पतिव्रतेचा मनोधर्म

ज्ञानेश्वरीत पतिव्रता स्त्रींचे गुणगान जागोजागी केलेले दिसते. त्यातून ज्ञानदेवांचे लक्ष्य शृंगारनिर्मितीपेक्षा लोकांना सुमार्गाला लावावे असे असावे हे स्पष्ट होते. तरी पण स्त्रियांचा विषय काढून श्रोतृगणांचे मधूनमधून रंजन करावे हा हेतूही लपलेला नाही.

पतिव्रता स्त्री आपल्या पतीशिवाय अन्य पुरुषाविषयी आपली कामवासना वाढू देत नाही.

> तरी एकु प्रियोत्तमु-।
> वांचोनि वाढों नेदी कामु ।
> जैसा का मनोधर्मु ।
> पतिव्रतेचा ॥ (१७.१७१).

पतिव्रतेप्रमाणेच कुलवधूचीही वागणूक असते. परपुरुषाने भोगाची इच्छा व्यक्त केली तरी ती आपला देह त्याच्या स्वाधीन करीत नाही.

> आणि परपुरुषें कामिली ।
> कुळवधू आंग न घाली ॥ (१८.१०२७).

पतिव्रता स्त्री पतीच्या मनाप्रमाणे वागून आत्मकल्याण साधते (१६.४५६). पती परगावी गेल्याने विरहवेदनांनी तळमळणारी पतिव्रता स्त्री इंद्रियांकरवी भल्याबुऱ्या संवेदना प्राप्त होत असल्या तरी मनाची चलबिचल होऊ देत नाही (१६.७९). पहिल्या अध्यायातही हेच सांगितले आहे. पतिव्रतेचे मन पतीवाचून इतरांना स्पर्श करीत नाही (१.१११). ती आपल्या पतीला एकनिष्ठेने भजते (३.९२). पतिव्रता ही भक्त व पती हा प्रभू यासारखे परस्परांचे नाते असल्याने पतिव्रतेचे गुणगान तिच्या पतीपेक्षा अधिक करावयास नको काय ?-असे ज्ञानदेव विचारतात (६.१२९)

योगभ्रष्ट माणूस स्वर्गातील सर्व भोग यथास्थित भोगून, नंतर मनुष्यलोकात जन्म घेतो. ज्या कुळात तो जन्मतो त्या कुळात सदाचरणाची चिंता हीच ईश्वराची एकनिष्ठ पत्नी असते (६.४४७). आठव्या अध्यायात आत्मा हा पती व प्रकृती ही पतिव्रता स्त्री अशा भूमिका आहेत (८.१८९). तेराव्या अध्यायात ज्ञानी भक्ताची लक्षणे सांगताना श्रीकृष्ण सांगतात, की त्याची आणि माझी एकच शेज असते. पतीकडे जाताना पतिव्रतेला जसा शरीराने आणि अंतःकरणाने कोणताही संकोच वाटत नाही तशा एकनिष्ठेने तो मला अनुसरतो (१३.६०६).

सुंदर स्त्री पतिव्रता असणे ही तेव्हा देखील चिंतेची बाब होती. शांतरसाला साहित्यगुणांची जोड म्हणजे सुंदरी पतिव्रता असल्याप्रमाणेच एक दुर्मिळ योग होय.

> जेथ साहित्य आणि शांति ।
> हे रेखा दिसे बोलती ।
> जैसी लावण्य कुळवती ।
> आणि पतिव्रता ॥ (४.२१८).

कामवासना निषेध

सर्व दुःख आणि अज्ञानाचे मूळ कामवासना ही आहे, हा विचार ज्ञानेश्वरीमध्ये जागोजागी मांडलेला आढळतो. पाचव्या अध्यायात ज्ञानदेव सांगतात,

विषयभोगीं जे सुख ।
तें साद्यंतचि जाण दुःख ॥
परि काय करिती मूर्ख ।
न सेवितां न सरे ॥ (१.१२०)

सातव्या अध्यायायातही असाच इशारा आला आहे.

आणि फळाचिया हांवा ।
हृदयीं कामा जाला रिगावा ॥
कीं तयाचिये घसणी दिवा ।
ज्ञानाचा गेला ॥ (७.१३९)

या जगाच्या उत्पत्तीचे मूळ कारण कामवासना आहे, हे सोळाव्या अध्यायात सांगितलेले आहे.

या कारणें कामें ।
स्त्री पुरुष युग्में ॥
मिळती तेथ जन्मे ।
आघवें जग ॥ (१६.३१०)

असाच विचार आठव्या अध्यायात कर्माची व्याख्या करताना आला आहे. या विश्वातील अमर्याद जीवांना जन्म देणाऱ्या 'प्रसवतीया योनींचे लाखो प्रकार' शून्यातून उद्भवतात असे सांगितले आहे.

आसुरी अवगुणांच्या संदर्भात बोलताना ज्ञानदेव म्हणतात, की जगदुत्पत्तीसाठी विवाहाची गरज आहे असे असुरांना वाटत नाही. पशुपक्ष्यांचे कोठे विवाह होतात ?

आणि कुळे शोधूनि दोन्ही ।
कुमारेंचि शुभलग्नीं ।
मेळवीजती प्रजासाधनीं ।
हेतु जरी ॥
तरी पशुपक्ष्यादि जाती ।
जया मिती नाही संतती ।
तया कोणें प्रतिपत्ती ।
विवाह केले ॥ (१६.३०३-४)

असुराना स्त्रीभोगाशिवाय चैनच पडत नाही. सर्व सुखाचे सार स्त्रीच आहे असे त्यांना वाटते.

स्त्रिया गाइले आइकावें ।
स्त्रीरूप डोळां देखावें ।
सर्वेंद्रियीं आलिंगावें ।
स्त्रियेतेंचि ॥
कुरवंडी कीजे अमृते ।
ऐसें सुख स्त्रिये परौतें ।
नाहींचि म्हणौनि चित्तें ।
निश्चयो केला ॥
मग तयाचि स्त्रीभोगा- ।
लागीं पाताळस्वर्गां ।
धावती दिग्विभागा ।
परौतेही ॥ (१६.३३४-३६)

विषयांध पुरुषांना स्त्रीवेड आयुष्यभर पुरते.

पहिलिये बाळदशे ।
आई बा हेंचि पिसें ।
ते सरे मग स्त्रीमांसें ।
भुलोनि ठाके ॥
मग स्त्री भोगितां यावो ।
वृद्धाप्या लागे येवों ।
तेव्हां तोचि प्रेमभावों ।
बाळकासी आणी ॥ (१३.७०९-१०)

अज्ञानी मनुष्याची सर्व धाव स्त्रीविषयाकडेच असते. तो पूर्ण बाईलवेडा होऊन जातो. स्त्रीची 'गारी' भरणे एवढेच त्याला कळते (१३.७९४) गारुड्याच्या इशाऱ्यावर माकडाने नाचावे, तसा तो स्त्रीच्या इशाऱ्यावर नाचू लागतो.

हानि लाज न देखे ।
परापवादु नाइके ।
जयाचीं इंद्रियें एकमुखें ।
स्त्रिया केलीं ॥
चित्त आराधीं स्त्रीयेचें ।
स्त्रीयेचेनि छंदें नाचे ।
माकड गारुडियाचें ।
जैसें होय ॥ (१३.७९१-९२)

कामासक्त पुरुषाला स्त्री जिंकता येत नाही; स्त्रीच त्याला जिंकते (७.९६) आकाशात भराऱ्या घेणारा पारवा ज्याप्रमाणे पारवी पाहताच तिच्यावर आपले सर्व अंग लोटून देतो; त्याप्रमाणेच कामासक्त पुरुष स्त्री पाहताच तिला धरण्यास धावतो (१८.४८०-८३) सर्व स्त्रीजात ही भोगण्यासाठी आहे असे त्याला वाटते (१८.५६१). विषयभोगाने भोगाची इच्छा अधिकच वाढते (११.४३२).

कामशास्त्रातील जाणतेपण

ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात, एखाद्या पंडिताला नाना शास्त्रांचे ज्ञान असले; आणि तो अध्यात्म जाणत नसला, तर त्याच्या त्या सर्व

ज्ञानास आग लागो असे ज्ञानदेव सांगतात. हे सांगताना त्यांनी उपनिषदे, योगशास्त्र, कर्मकांड, पुराणे, ज्योतिषशास्त्र, कला, पाकक्रिया, मंत्रशास्त्र, इंद्रजाल, महाभारत, नीतिशास्त्र, वैद्यक, काव्य, नाटक, स्मृती, निघंटू, व्याकरण, तर्कशास्त्र इ. शास्त्रांची भलीमोठी यादीच सादर केली आहे. या यादीत 'कोकशास्त्रा'चाही समावेश आहे. (१३.८३०). ज्ञानेश्वरीत प्रतीत होणारा ज्ञानाचा सर्वस्पर्शी वेध ध्यानात घेता, ही सर्व शास्त्रे ज्ञानदेवांनी उत्तमरीत्या अभ्यासिलेली असावी असे ठामपणे म्हणता येते. त्यांच्या योगशास्त्र आणि इंद्रजाल विद्येतील ज्ञानाची साक्ष समकालीन कवत्रियी महदायिसा हिने लीळाचरित्रात दिलेली आहेच. (अज्ञात लीळा क्र. ८६) त्यांच्या साहित्यात स्त्री–पुरुष आणि अन्य प्राण्यांच्या लैंगिक व्यवहाराचे निर्देश जागोजागी आढळतात.

ज्ञानेश्वरीमध्ये कामव्यवहाराशी संबंधित सर्व क्रिया व इंद्रियांचे उल्लेख आलेले आहेत. उदा. मेंढ्र (६.१९५), शिश्न (१८.५५८), स्वाधिष्ठान (६.१९५), शुक्र (१३.१०६), मूत्ररंध्र (१३.५३९), आपान रंध्रद्वय (१८.१०३६), पूय गर्त्ता (१३.५३९), अधोद्वार (१३.१००; १८.३३५), रिगिनिगी द्वार (१३.१०२), योनी (८.२६), थान (९.३८), कुचस्वेद (१३.५३९), प्रथम वयसाकाळ (१.४२), दुहवेवारी (१८.६८१), माहेवणी (१८.८६६), विटाल (१८.६८१), शोणित (१३.१०६), गुर्विणी (१४.८९), उल्व (३.२६०) इत्यादी.

ज्ञानेश्वरीमध्ये संभोग आणि सुरतक्रियेचे निर्देश अनेक ठिकाणी आलेले आहेत. चौदाव्या अध्यायात अविद्या ही माझी तरुण स्त्री असून माझ्या सत्तासंभोगाने ती गरोदर राहते, असे श्रीकृष्ण सांगतात.

तरी माझी हे गृहिणी ।
अनादि तरुणी ।
अनिर्वाच्यगुणी ।
अविद्या हे ॥
इये नाहीं हेंचि रूप ।
ठाणें हूं अति उभप ।
हे निद्रितां समीप ।
चेतां दुरी ॥
पैं माझेनिचि आंगें ।
पोढल्या हे जागे ।
आणि सत्तासंभोगें ।
गुर्विणी होय ॥ (१४.८७–८९)

पाचव्या अध्यायात योग्यांना ब्रह्मसुख प्राप्त होताना अनुभवास येणारी अवस्था ज्ञानदेव सुरतक्रीडेच्या रूपकाने व्यक्त करतात.

तिये आलिंगनमेळीं ।
होय आपेआप कवळी ।
तेथ जळ जैसें जळीं ।
वेगळें न दिसे ॥
कां आकाशीं वायु हारपे ।
तेथ दोन्ही हे भाव लोपे ।
तैसें सुखचि उरे स्वरूपें ।
सुरतीं तिये ॥ (५.१३३-३४)

नवव्या अध्यात श्रीकृष्णांना 'बालभावेनि व्याजे मीनलेली व्रजागनांची निजे' आठवतात (९.४६५). पंधराव्या अध्यायात ब्रह्मानंदाची तुलना सुरत क्रीडेतील आनंदाशी केली आहे. ब्रह्मानंद हा मैथुनादी साधनांशिवाय प्राप्त होणारा मूर्तिमत आनंद होय, असे ज्ञानदेव सांगतात (१५.७४). ज्ञानदेवांच्या काळातील संभोगातून समाधीकडे नेणाऱ्या वज्रयान संप्रदायाचा प्रभाव ध्यानात घेतल्यास ब्रह्मानंदाच्या विवेचनासाठी शृंगाराची कास धरणे ही काही आश्चर्य करण्यासारखी बाब नव्हे.

अज्ञानी विषयांध पुरुषांना विषयाची चटक कशी लागलेली असते हे सांगण्यासाठी ज्ञानदेव गाढव-गाढवीच्या मैथुनाचे सरळसरळ वर्णन करतात.

खरी टेंकों नेदी उडे ।
लातौनि फोडी नाकाडें ।
तऱ्ही जेवीं न काढे ।
माघौता खरु ॥ (१३.७०५).

ज्ञानदेवांना सुरतक्रीडेतील वारकावे माहीत होते याची साक्ष जागोजागी मिळते. स्त्री रजस्वला

(मांहेवणी) असली तरी तिला अनिच्छेने पतीशी शय्यासोबत करावी लागते अशी स्त्री हरप्रयत्नाने पतीला आपल्या अंथरुणावर येऊ देत नाही (१८.८६६). परंतु झोपलेल्या रजस्वलेला चुकून उघडी केलीच तर?—ज्याला काही लाजलज्जा आहे अशा माणसाला तिच्या अंगावर पांघरूण घातल्याशिवाय तिच्याकडे पाहवणार देखील नाही! (१६.१४३).

सुमन संयोग

कामशास्त्राची देखील एक सांकेतिक परिभाषा आहे. ही परिभाषा ज्ञानदेवांस अवगत होती. कामव्यवहारातील सांकेतिक शब्दांचा त्यांनी अचूक वापर केला आहे. काही वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरीतील पुढील ओवीच्या पाठ व अर्थ यासंबंधी बरीच चर्चा झाली होती; परंतु कामसूत्रातील संकेतांच्या अज्ञानामुळे ती भलतीकडेच वाहवत गेली.

फुलांचिया भोगा-।
लागीं प्रेम टांगा।
तें करेयाचा गुडघा।
तैसें होईल ॥ (१३.५५७).

या ओवीचा अर्थ वै. दांडेकर यांनी खालीलप्रमाणे दिला आहे.

"फुलांच्या (सुवासाच्या) भोगाकरिता ज्या नाकाचं प्रेम गुतलल असतं, ते (नाक) उटाचा गुढघा जसा असतो, तसं विद्रूप व वास घेण्यास असमर्थ असे होईल."

या ओवीतील 'फूल' या शब्दाचा कामशास्त्रीय संकेत ध्यानात न घेतल्यानं वरीलप्रमाणे अर्थ प्रचारात आला. फूल, पुष्प, सुमन, अरळ हे शब्द 'प्रथम रजोदर्शन' वा 'मीलनोत्सुक' यांनी साठी वापरीत. या मूळ शब्दापासून पुढ 'पुष्पवती, सुमनाचां शज, आरळ शंज' इ. शब्द प्रचारात आल. ज्ञानदवाच्या अभगगाथ्यातील ६४६ क्रमांकाच्या अभगात आलेलो 'सुमन सयोग' निव्वळ मैथुनसूचक आहे. हे संकेत ध्यानात घेतल्यास प्रस्तुत ओवीचा अर्थ, 'पहिले नहाण आलल्या युवतीच्या भोगासाठी वापरावयाचा विषयदंड वृद्धापकाळी उंटाच्या गुढग्याप्रमाणे सुरकतून जाईल' अशासारखा असावयास पाहिजे. पुष्पसंकेताच्या अज्ञानामुळे तेराव्या अध्यायातील 'हाती हाला फुली' (१३.४९६) या ओवीचा अर्थही असाच चुकलेला आहे. तेथे 'माजावर आलेला हत्ती' असा अर्थ अभिप्रेत आहे.

लैंगिक व्यवहारासंबंधीच्या अशाच काही शब्दांचा चुकीचा अर्थ प्रचारात आहे. 'माहेवणी' (१६.१४४; १८.१६६) या शब्दाचा अर्थ 'गरोदर स्त्री' असा केला जातो. वस्तुत: तो 'मासिक पाळी आलेली', 'रजस्वला' असा आहे. हंसकोशामध्ये 'रजस्वला' असाच अर्थ दिला आहे. अशाच प्रकारचा आणखी एक शब्द 'कश्मल' (१७.१०७) हा होय. याचा मूळ अर्थ 'शिश्नाग्रावर जमणारा मळ' असा आहे. मराठी बोलीत तो 'कसमळ' या स्वरूपात आजही आढळतो. 'कश्मल' शब्दाचा विस्तारित अर्थ 'घाण' असा झाला. 'रिगिनिगी' या शब्दाचा संबंध मूलत: मैथुनक्रियेशी आहे 'पूयगर्ते रिगाला, मूत्ररंध्रे निघाला (१३.५३९) यातही तीच क्रिया अभिप्रेत आहे. लैंगिक व्यवहाराचा निर्देश करताना ज्ञानदेव प्राय: संस्कृत किंवा प्रौढ मराठी शब्द वापरताना दिसतात. अशा वेळी स्त्रीचे गुह्यांग हे 'गर्भ-मेदमूस' बनते, रज हे 'रक्त' वा 'शोणित' बनते, आणि वीर्य 'मूत्ररस' बनते (१६.९८०).

पण्यांगनेचे मंत्र

पतिव्रतेच्या पावित्र्याची जागोजाग स्तुती करणारे ज्ञानदेव पण्यांगनांचे मंत्रही तितक्याच अचूकपणे टिपतात. वेशीत पाल ठोकून बसलेली वेश्या ही गावातील सर्व लोकांचेच 'कुटुंब' असल्याने, त्या सर्वांच्या योगाने ती अखंड सौभाग्यवतीच राहते, असे ज्ञानदेव सांगतात (१३.८२१). गावात अन्नसत्र झाले की तेथे कोणीही जेऊ शकतो. गावकूस कोण ओलांडणार नाही? बाजारबसवी माजावर आली की तिच्या उंबऱ्याच्या आत कोण प्रवेश करणार नाही?

पैं उवडां काइ न पडे।
मोकाटु कोणां ना तुडे।
ग्रामद्वारींचें आडें।
नोलांडी कोण ॥
जैसें सत्रीं अन्न जालें।
कीं सामान्या बीक आलें।

वाणसियेचें उभलें ।
कोण न रिगे ॥ (१३.६९९-७००)

पेशवाईमध्ये पुण्यातील पंडित मंडळी सायंकाळच्या निवांत वेळेस पाय मोकळा करण्यासाठी बावण खणीकडे फेरफटका करीत, असे म्हणतात. यादवकाळातही तशीच प्रथा असावी असे वाटू लागते !

ज्ञानदेवांच्या काळातही उद्याने होती. वसंत ऋतूच्या आगमनाने 'वागोमें वहार' येई. संकेताप्रमाणे त्या वागेत 'पियामीलन' होई. मग लटक्या धांगडधिंग्याला काय तोटा ?

आणि ऋतु वरवा शारदु ।
शारदीं पुढती चांदु ।
चंद्री जैसा संबंधु ।
पूर्णिमेचा ॥
कां वसंतीं वरवा आरामु ।
आरामीं्ही प्रियसंगमु ।
संगमीं आगमु ।
उपचारांचा ॥ (१८.३४४-४५).

सार्वजनिक उद्यानाप्रमाणे रंगमहालही होते. तेथे रूपसुंदरी नृत्यांगना असत. त्यांच्या डोळे भारणीस लोक भुलून जात. तेथे गायनवस्ताद भाट असत. नृत्यांगनांच्या छमछमाटाने व भाटांच्या सुरेल गायनाने लोक अगदी भ्रमून जात. त्यातही फुलांचा आणि धुपाचा मंदमंद सुगंध नाकात शिरला म्हणजे माणसातील वेताळ जागा होई व मातंगी नृत्यांगनांवर 'चवल्यापावल्यां'चा पाऊस पडे !

रूपानृत्याची पुरवणी ।
ते पुढां डोळेभारणी ।
गीत भाटींव तो श्रवणीं ।
कर्णजपु ॥
तयाहीवरी अळुमाळु ।
जैं घे फुलागंधाचा गुगुळु ।
तंव भ्रमाचा तो वेताळु ।
अवतरे तैसा ॥
तेथ विभांडुनियां जग ।
आणिले पदार्थ अनेग ।
तेणें घालूं लागे मातंग ।
गवादीसी ॥ (१७.२९७-९९)

परंतु, वेश्येच्या नादाने कवडीन् कवडी संपली म्हणजे तिच्या दाराला हात लावण्याचीही सोय रहात नाही.

जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचे ।
मग दारही चेपूं न ये तियेचे ।
तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें ।
काय सांगों ॥ (९.३२९)

व्यभिचार ही एक सार्वकालिक वस्तुस्थिती आहे. ज्ञानदेवांचा कालखंड त्याला अपवाद नाही. ज्ञानदेव सांगतात, कामुक पुरुष हा भ्रमराप्रमाणे स्वच्छंदी होय. योग्यायोग्यतेचा विचार न करता तो स्वस्त्रीस सोडून अन्य स्त्रियांच्या पाठीशी लागतो.

नविये आवडीचेनि भरें ।
कामुक निजवनिता विसरे ।
मग पाडेंविण अनुसरे ।
भ्रमला जैसा ॥ (१.१८७)

सुंदर स्त्री दिसली की तिच्यावर त्याची नजर गेलीच म्हणून समजावे (१८.१३५६). परस्त्री बरोबर झोपणे तो निषिद्ध मानीत नाही.

परदारादिक पडे ।
परी विरुद्ध ऐसें नावडे ॥
मग शेळियेचेनि तोंडें ।
सैंघ चारी ॥ (१४.२२१)

कामांध असुरांना जगाला कामाशिवाय काही मूळच नाही असे वाटते (१६.३१२). असे लोक विचारतात, "विषयप्रेमापोटी व्यभिचार केला तर त्याने काय कोणी 'कोढी' होतो ?" सामान्यतः कोढी म्हणजे महारोगी होय. येथे ज्ञानदेवांना 'लैंगिक रोगाने पछाडलेला' असा अर्थ अभिप्रेत असेल काय ? (१६.३०५).

मन व शरीर यांचा निग्रह सुटल्यावर कुलीन स्त्रियाही व्यभिचाराकडे वळतात (१.२४९). अशांपैकी एखाद्या ढालगज भवानीचा पती दांडगा असेल तर तो तिला घरात कोंडून ठेवतो (१३.५०५). परंतु काही चलाख निघतातच. जाराकडे जाण्यासाठी त्या नवऱ्याच्या अंतःकरणात शिरून असतात.

कां कांताचां मानसीं ।
रिगोनि स्वैरिणी जैसी ।

राहाटे जारेंसीं ।
जावयालागीं ॥ (१३.८०८)

अशा लफडेबाज स्त्रियांना परगमन ही सौभाग्याची गोष्ट वाटते (१६.३७७). काहीजणी नवऱ्याच्या जाचास कंटाळून नवा घरठाव करतात; परंतु तेथेही त्यांना टिकुल्याचे तडाखे सहन करावे लागतात. मग त्यांनी आपल्या लग्नाच्या नवऱ्याला व्यर्थ सोडले नव्हे काय ?

अकुळस्त्री दांडघाचे घाये ।
परघर रिगालीहि जरी साहे ।
तरी स्वपतीतें वायें ।
सांडिलें कीं ॥ (१८.९४४).

पण्यांगनेचे मैत्र हे दिखाऊ असते (८.१४६). तिची दृष्टी आणि तिची वाणी या दोन्ही मायावी असतात (१८.६७२). 'हाटभेटीच्या कलत्रा'ची, म्हणजे बाजारबसवीची मैत्री ही संभावित चोराप्रमाणेच फसवी असते (१८.७९७). स्वतःस विकण्यासाठी ती साजशृंगार करते (१७.२४६). खोडचाळ गाम जशी पान्हा चोरते, तशी वेश्या नखरा करून आपले उतार वय लपविते (१३.२०४). वेश्या आपल्या यजमानाला 'सर्वस्व' अर्पण करते; परंतु तिचे हे 'देणे' म्हणजे 'नागवणे'च होय (१३.७४४). वेश्येचा अंगस्पर्श झाला नाही तोवरच ती चांगली (१८.२५०). धर्मपत्नी पोसण्यास श्रम पडतात, तेवढेच श्रम 'धांगडी' म्हणजे रखेली पोसण्यास पडतात; मग रखेली पोसून नावाला बट्टा का लावून घ्यावा ? (१८.९४२).

ज्ञानदेवांचे स्त्रीविश्व

स्त्रियांचे मनोधर्म, स्त्रियांचे शरीरधर्म, स्त्रियांचे कौटुंबिक जीवन व स्त्रियांचे सामाजिक बर्तन याविषयी ज्ञानदेवांनी सखोल ज्ञान प्राप्त केले होते याची प्रचीती ज्ञानेश्वरीत येते. ज्ञानेश्वरीतून प्रतीत होणारे स्त्रीविश्व अतिशय विशाल आहे त्यात 'बाला, कन्या, लेकी, कुमारी, आत्मजा' आहेत. त्याचप्रमाणे त्यांना जन्म देणाऱ्या 'माता, मातृका, जननी, माए, माउली व आयिस' ह्या देखील आहेत. विवाह संस्काराचे सूत्र गळयात बाळगणाऱ्या 'नोवरी, कांता, कलत्र, वल्लभा, आंतोरी, आवुली, दारा नारी, पतिव्रता, धर्मपत्नी व सवती' आहेत. आपल्या तारुण्याने आणि लावण्याने पुरुषजनांची हृदये विद्ध करणाऱ्या 'प्रमदा, सुंदरा, कामिनी, तन्वंगी, तरुणांगी, प्रिया, विरहिणी, वनिता, अंगना व युवती' ही आहेत. कौटुंबिक आचरणास अनुलक्षून 'कुलस्त्री, कुलवती, कुलवधू. घरणी, ऐहेव, कांतहीना, परदारा, पराविया, साध्वी, महासती' आहेत. सामाजिक भेदानुसार 'गीसांविणी चोखी, चांडाली, मांगी, माहारी, अधमायोनी' आहेत, व्यवसायास अनुलक्षून 'दासी, दाशिरूं, धाया, चितारणी, रांधवणी' आहेत. शारीरधर्मानुसार 'माहेवणी, रजस्वला, प्रथमवयसा, दुहवेवारी, गुर्बिणी व वांझ' अशा स्त्रिया आहेत. वित्त-प्राप्तीच्या हेतूने वा स्वैर मनःप्रवृत्तीने अनुरागाला सिद्ध असणाऱ्या 'गणिका, धिटा, धांगडो, विलासिनी, पण्यांगना, गावदारीच्या ऐहेवा, वेश्या, हाटभेटीची कलत्रे, वाहिरी, नटी, नायका, वाणसी, सामान्या, कुस्त्री, स्वैरस्त्री, स्वैरिणी, अंगहीना, नाचणी, नृत्यांगना' या देखील आहेत. ज्ञानेश्वरीत 'रंभा, रती, उर्वशी' यांची देखील हजेरी लागते. स्त्रियांचे इतके प्रकार, त्यांचे विभ्रम, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांचे व्यवहार इत्यादी असूनही ज्ञानेश्वरीत भगिनीची भूमिका पार पाडणाऱ्या स्त्रीचा निर्देश नाही याचे नवल वाटते.

शब्दसृष्टीचे ईश्वर

ज्ञानेश्वरीमध्ये प्रतीत होणारे ज्ञानदेवांचे शृंगारविश्व हे असे आहे. ज्ञानेश्वरीचा प्रमुख विषय अध्यात्मविद्या हा असल्याने या विश्वाला युक्तायुक्ततेच्या, औचित्याच्या व सभ्यतेच्या मर्यादा पडलेल्या आहेत. त्यात निरीक्षणाची सूक्ष्मता आहे; तशीच वर्णनातील वेधकताही आहे. आत्मानंदाबरोबर आत्मानुभवाची साक्ष आहे. संकेत आणि परंपरांचे परिज्ञान आहे. परंतु, ज्ञानदेवांचे शृंगारज्ञान एवढेच मर्यादित होते काय ? हिमनगाचा अदृष्ट भाग दृष्ट भागापेक्षा कित्येक पटींनी मोठा असतो. ज्ञानदेवांच्या शृंगारविश्वाचेही असेच असावे. त्यातील व्यक्तापेक्षा अव्यक्त हे अधिक विशाल असावे, याची साक्ष त्यांच्या गौळणी, विरहिणी, सौरी, अंबुला, मदालसा इत्यादी प्रकारच्या, अभंगांतून मिळते. शृंगारनायिका व शृंगारांतील

नाना अनुरागांचे हे ज्ञान ज्ञानदेवांना कोठून प्राप्त झाले ? ज्ञानदेवांना फक्त बावीस वर्षांचे आयुष्य बहाल करून वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिण्यास भाग पाडणाऱ्यांपाशी याचे उत्तर नाही.

ज्ञानदेव हे शब्दसृष्टीचे ईश्वर होते. त्यांच्या शब्दभांडारात कामविश्वाचेच नव्हे, तर यादव–कालीन संस्कृतीच्या अंगोपांगांचे उदंड दर्शन घडते. प्रपंच, अध्यात्म, व्यापार, उद्योगधंदे, जनरीती, राज्यव्यवहार, कृषिकर्म, निसर्ग, प्राणिजीवन इत्यादी शेकडो विषयांवरील त्यांची शब्दकळा भक्क करून सोडणारी आहे. शब्दांतील लालित्य लावण्य, सामर्थ्य आणि नादमाधुर्य यांचा इतका मधुर मिलाफ मराठी भाषतील अन्य कोणाही कवीला आजवर जमलेला नाही. भाषाशक्ती ही जरी दैवायत्त असली तरी, तिचा आविष्कार हा समष्टिसापेक्ष असतो. लोकव्यवहारातील सहभाग आणि सूक्ष्म निरीक्षण यांतूनच भाषा वर्धमान होते. भाषेच्या उद्‌विलासाची विर्वृती ऋतंभरा प्रज्ञा, अगर योगभ्रष्टाच्या पुनर्जन्म सिद्धान्ताने होऊच शकत नाही. शृंगारज्ञानाचेही तसेच आहे. कामप्रवृत्ती ही जरी जन्मजात असली तरी तिच्या दृश्य आविष्काराचे कालक्रम सार्वत्रिक आहेत. एका अपोगंड ब्रह्मचाऱ्याने कामजीवनाचे एवढे सूक्ष्म व विस्तृत ज्ञान संपादन करणे व ते लीलया शब्द-बद्ध करणे, हीं केवळ असंभवनीयच नव्हे तर अतर्क्य गोष्ट होय.

ज्ञानदेवांच्या आयुर्मर्यादेसंबंधीची प्रचलित प्रमेये ही विसंगत, निराधार व अनैतिहासिक आहेत. त्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संपूर्ण अभाव आहे. अंधश्रद्धेचा वृथा अनुनय आहे. ज्ञानदेवांच्या लौकिक जीवनातील वास्तवाला सामोरे जाण्याचे सामर्थ्य त्यातील एकाही प्रमेयात नाही ज्ञानदेवांची आयुर्मर्यादा ऐंशी वर्षांची होती; व वयाची सत्तरी ओलांडल्यानंतर त्यांनी ज्ञानेश्वरीची निर्मिती केली या प्रमेयास ज्ञानदेवांचे शृंगारविषयक ज्ञान हे पुष्टीच देते ■

‘युगवाणी’संबंधी माहिती

प्रकाशनस्थळ : विदर्भ साहित्य संघ, राणी झाशी चौक, सीतावर्डी नागपूर ४४० ०१२ सिद्धीचा नियतकाल : त्रैमासिक. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, भारतीय, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर ४४० ०१२ प्रकाशकाचे नाव, मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सीतावर्डी, नागपूर–४४००१२. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : श्रीपाद भालचंद्र जोशी, ‘कृष्णकुंज’, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर–४४० ०१०. वृत्तपत्राची मालकी : विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

मी, मनोहर म्हैसाळकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे

नागपूर दि ३० मार्च ९०	मनोहर म्हैसाळकर, प्रकाशक

मेंदी : काही विचार

प्रा. मधु जामकर

इंदिरा संतांचा 'मेंदी' हा काव्यसंग्रह त्यांच्या एकूण कविता संग्रहात महत्त्वाचा वाटतो; त्यातील कविता ही त्यांच्या प्रतिभेचा विचार करता उत्कर्षबिंदूला पोहचलेली वाटते. या अगोदरची इंदिराबाईंची कविता किंवा त्यानंतरची कविता ही 'मेंदी'च्या अनुकरणात किंवा या संग्रहातील एकच एक भावानुभवाच्या आवर्तनात सापडलेली दिसते. 'शेला' मध्ये ज्या स्वतत्र वाटचालीच्या खुणा इंदिरा दाखवून जाते त्याचे अगदी स्पष्ट रूप 'मेंदी'त दिसते आणि पुढे या वाटेवरच त्या आपल्या काव्यात्म प्रवास करू लागतात. 'मेंदी' मधील त्यांची कविता आशय-अभिव्यक्तीचा गुणात्मक आलेख तर दाखवितेच, परंतु या कवितेला पडलेल्या अधिक सीमारेषा देखील याच संग्रहाने स्पष्ट केलेल्या दिसतात. इंदिरा संतांच्या कवितेची प्रकृती आणि स्वत: कवयित्रीची प्रवृत्ती 'मेंदी'ने रसिकापुढे उभी केली आणि पुढे तो रसिक 'मेंदी'ला 'वाटाड्या' समजून त्यांच्या नंतरच्या कवितेचा वेध घेऊ लागला. 'भावकविता' म्हणून या कवितेचा केलेला गौरव, तिची अनलंकृत आशयसन्मुख राहणारी स्थिती, सुबक परंतु बांधेसूद असा तिचा घाट आणि आटोपशीर पण मोठा आशय देणारी कविता, ही सारी वैशिष्ट्ये 'मेंदी'नेच निश्चित केली आहेत. म्हणून 'मेंदी'चे महत्त्व आणि तिचे गुण दोष हेच इंदिरा संतांच्या एकूण कविते-बाबतचे विचार म्हणून दाखविता येतील. अशा एका मोक्याच्या आणि धोक्याच्या वळणावर हा संग्रह उभा आहे.

विरह हा इंदिराबाईंच्या कवितेत एक भावना नसून ती एक सूक्ष्मातिसूक्ष्म अशी संवेदना होऊन राहिली आहे. पती निधनानंतरची ही संवेदना असे रसिक गृहीत धरतो, पण ही वैयक्तिक संवेदना विश्वात्मक कशी होते याचा सतत शोध या कवितेत आपण घेतो. एकापरी हा दिवंगत पतीशी-प्रियकराशी चाललेला अखंड संवादच असतो. हा संवाद केवळ कवयित्रीशीच असतो असे नव्हे तर त्यात रसिकही प्रत्येक कवितेबरोबर आपलाही संवाद साधीत असतो. कै. तांबे यांच्याही कवितेत असेच विवाहोत्तर सफल प्रीतीचे चिंतन दिसते, पण ते मोजक्या रसिकांचे हक्काचे ठिकाण असते. या उलट 'मेंदी'मधील विरह हा विवाहोत्तर असूनही तो रसिकागणिक वेगवेगळा पुन:प्रत्यय आणून देतो. आधुनिक मराठी कवितेत आपली वैयक्तिक संवेदना एवढी विश्वात्मक पातळीवर सातत्यपूर्ण राखणे जवळ पास कोणालाही जमलेले नाही. वैयक्तिक संवेदना सातत्याने काव्या-त्मक पातळीवर नेणे आणि तिचे विश्वात्मक रूप दाखवित जाणे हे इंदिरा संतांना विशेषत्वाने जमले आहे. यातच त्यांच्या प्रतिभाधर्माचा विशेष आहे. या संदर्भात त्यांच्या अभिव्यक्तीचा एक महत्त्वपूर्ण गुणधर्म असा दाखविता येईल की त्या कवितेमधून जे सांगतात ते व्यक्त करताना बरेच काही हातचे राखून ठेवतात. आणि रसिक जेव्हा हे सारे वाचतो तेव्हा बाईंनी या कवितेत न सांगता देखील कितीतरी सांगितले आहे याचा प्रत्यय आलेला असतो. शब्दांच्या अलिकडे आणि शब्दांच्या पलिकडे एकाच वेळी या कवितेत रसिक सन्मुख झालेले आपण पाहतो उदा.

'असेच कांही द्यावे...घ्यावे—
दिला एकदा ताजा मरवा
देता घेता त्यात मिसळला
गंध मनांतिल त्याहुन हिरवा'

यातील विविध संवेदना रसिकापर्यंत येताना किती तरी भाववलये निर्माण झालेली असतात. ही प्रक्रिया आटोपशीर ओळीतूनच होते. बाईंची कविता जवळपास १२ ओळींची, क्वचित ती १६ ओळींची असते. त्यात पहिली दोन किंवा तीन कडवे शब्दा अलिकडची असतात आणि शेवटचे कडवे एकदम शब्दावाचून शब्दापलिकडच्या विश्वात रसिकांना घेऊन जाणारे असते. रुढार्थाने ही कविता सूचक असते परंतु केवळ सूचकतेतून अनंत ध्वनीवलये निर्माण करणे एवढेच इंदिरा-बाईंचे कविता कार्य नव्हे तर त्या प्रत्येक ध्वनी-

वलयात रसिक परत्वे भिन्न भिन्न असा आत्मप्रत्यय आणून देणे महत्त्वाचे आहे. संदर्भ सूचकत्त्व हे तिचे कार्य नसून संदर्भातील भाववलये साक्षात् करणे हे तिचे कार्य आहे. या अर्थाने ही कविता खरी भावकविता आहे.

हे सांगणे किंवा सांगण्यापलिकडे जाणे विरहाचे असले तरी हा विरह दोन जीवाचा सांसारिक विरह नाही; त्याला रुढार्थाची कौटुंबिक पातळीं नाही किंवा तो ऊरवडव्या विलापिकेतून आलेला नाही. प्रथम विरहातून कवयित्रीला आपल्या पतीची आठवण होते, या आठवणी साठी मग त्या कविता लिहू लागतात, आणि नंतर आठवण व कविता यातील सीमारेषा मिटल्या जातात :

'तूंच लाविली ओढ अशी ही
धूळ निघाली उंच उंच वर
जमिनीपासून सुटले पाऊल
गळले पायामधले घुंगर...'

यात 'घुंगर' शब्दानंतर आलेले... हे चिन्ह रसिकांच्या अनंत भाववलयाशी छेदत राहते, त्यातून कवितेची सुरवात अधिक बोलकी होती, एक भावचित्र साक्षात् करते

टाकून अवघा तोल तुझ्यावर
ढगाढगांतुन चालायाचे;
कुपण तारावरून विजेच्या
खुशाल पाऊल टाकायाचे.' !

इंदिरा संत इथे शब्दाबरोबर त्यापुढील विरामचिन्हे देखील बोलकी करून जातात. आटोपशीरवृत्तो, कलापूर्ण विरामचिन्हे आणि मोजकी, समर्पक अर्थांचा विस्तार करणारी शब्दे त्यांच्या उपजत भावानुभवास सामर्थ्य देण्यास, कलापूर्ण करण्यास जणु काही आतुर झालेले असतात.

यामुळेच की काय या कवितेतील मूर्त आणि अमूर्त जाणिवा आणि नेणिवा, संदिग्धता आणि निःसंदिग्धता ही द्वंद्वे या कवितेत वेगळी अशी दिसतच नाहीत, जिथे सुरवात मूर्तातून होते तिथे शेवट अमूर्त राहतो आणि दोन्हीतील अंतर एकदम नाहीसे होते. किंवा प्रथम कवितेची जाणीव रसिक सन्मुख होताना तिच्या आंतरिक नेणिवेने तो अधिक या कवितेशी बांधला जातो किंवा जे स्वच्छ, बटबटीत शब्दात सांगितले जाते ते एकदम शेवटास निःसंदिग्ध होऊन जाते. या दृष्टीने 'सुरंगा, 'उशी' आणि 'ऐकतील जर पिंपळपाने' या कविता अभ्यासण्यासारख्या आहेत. या तिन्ही कविता इंदिराबाईंच्या प्रकृतीधर्माशी प्रामाणिक राहून त्यातील अभिव्यक्तीचे बारकावे आपल्यासमोर ठेवत साक्षात् झाल्या आहेत. ही कविता रसिक आणि कलावंत यांना आलटून पालटून कलेच्या कक्षेत घेऊन जाते. तिची क्षितिजे विस्तारपूर्वक करते आणि भावविश्वाचा परिघ वाढवीत अनिर्वचनीय करते. रसिक तिच्याबाबत नेहमीच गुणगुणतो :

आणिक तुझिया लाख स्मृतींचे
खेळवीत पदरांत काजवे
उभे राहुनी असे अधांतरि
तुजला घ्यावे...तुजला घ्यावे.

'तुजला घ्यावे' या शब्दांची पुनरावृत्ती त्यातील कवयित्री आणि रसिक यांच्यासाठीची आणि मधले...चिन्हे हा भेद संपविणारे आहे. अशी ही द्वंद्वाकडून द्वंद्वापलिकडे जाणारी कविता आहे. 'मेंदी 'तील नव्हे तर समग्र इंदिरा संताची कविता या स्थायीभावाशी अतूट नाते जोडून आहे.

आपल्या भाववृत्तीचा आलेख चित्रित करणे हे या कवितेचे कार्य नसून त्या भाववृत्तीची एकाग्रता दाखवित ती रसिकसन्मुख ठेवणे हे तिचे कार्य आहे. या किमयेसाठी त्या ज्या निसर्गप्रतिमा वापरतात त्या देखील या निसर्गाच्या एकाग्रतेतूनच आलेल्या असतात. इथे निसर्गाची एकाग्रता आणि भाववृत्तीची एकाग्रता एकमेकातून केवळ एकाग्रतेची पातळीच दाखवून देतात. शिवाय रंग, स्पर्श, नाद आणि गंध संवेदनांनी या एकाग्रतेला वेगळीच धार आलेली असते. रसिक येथे एकाचवेळी निसर्ग, भाववृत्ती आणि विविध अशा संवेदनाशी भावसमाधी घेतो. वस्तुतः समग्र कवितेतून रसिकाला आलेली ही एक कविता समाधी असते. आपल्या वैयक्तिक संवेदनेचा पदर तोडीत, रसिकांना या संवेदनाविश्वात घेत ही कविता नव्या नव्या उन्मेषासह भावविश्व समृद्ध करणारी असूनही ती या समाधीपासून भंगत नाही हे विशेष. एकजिनसीपणा, एकसंघपणा

आणि झपाटलेपण असलेली अशी कविता मराठी कविताविश्वात इंदिराबाईंनी दुर्मिळ करून टाकली आहे. ती साध्या विषयातून मोठा आशय तर देतेच पण ती आटोपशीरपणातूनही मोठा आशय देऊन जाते. तिला भावविवशतेचा मोह नाही. ती मूलतः भावाकुल आहे. वस्तुतः भावविवश होणे तिच्या पाचवीला पूजले असूनही ती या मोहापासून दुरावते यातच तिचे कलासामर्थ्य आजमावण्या–सारखे आहे. चरित्रातील चारित्र्य आणि कला–कृतीतील चारित्र्य तिने अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने जपल्यामुळे ही कविता मराठी भाषेतील एक समृद्धतेचा टप्पा झाली आहे. स्थूलातून येणारी पण सूक्ष्मावर थांबणारी, बालबोध वळणाने संमिश्र होणारी ही कविता रसिकांच्या सामर्थ्याची नेहमी परीक्षा घेत त्याला रसिकतेच्या उंच पातळीवर ठेवणारी वाटते. या पातळीवर तो आस्वाद घेईल तो असा :

कोसळताना वर्षा अविरत
स्नान समाधीमधे डुबावे
दंवात भिजल्या प्राजक्तापरि
ओल्या शरदामधि निथळावे.

या कवितेने कारागिरीतून कलाकृतीच्या सीमा-रेषा स्पष्ट करून आपले रसायन अभूतपूर्ण निर्माण केले आहे. ही कविता प्रथम व्यंग चित्रातून उभी राहते; त्यात विविध रंग खुलवून देते. नंतर हे रंग आकर्षक चित्र दाखवून देतात; यातूनच पुढे रंगसंवेदना जागृत होत रसिक या कवितेकडे भावसमाधीतून पाहू लागतो. आणि उरते ते :

तूं गेल्यावर नसते मीही
नसते माझे . . . माझे काही;
उरलेली ही अशी कोण मी
माहित मजला नाही . . . नाही.

या भावसमाधीची अपरिहार्यता या कवितेची मांडणी आपणास पटवून देते. तिची शीर्षके या शीर्षकांची मांडणी देखील पटवून देते. यादृष्टीने 'वाट पाहते . . .' या कवितेकडे विशेष पाहावे. यातील क्रियापदांची बाईंनी केलेली वैशिष्ट्यपूर्ण निवड जेवढी अपरिहार्य तेवढीच ती वैविध्यपूर्ण आहे. आणि या कवितेचा शेवट ज्या मांडणीतून येतो तो केवळ पाहण्यासारखा, आस्वादण्यासारखा आहे. शुचिर्भूत अंगाने, शिपडलेल्या अंगणात, रंगबेरंगी रांगोळी काढताना प्रत्येक ठिपक्यागणिक आपली संवेदना ओतीत एखादी सात्विक स्त्री आपले कलावैभव रसिकासाठी साक्षात् करते तसे इथे होते :

'वाट पाहते तुझी अशी मी–
वाटे परि भावोत्कट होऊन
वाटच होऊन . . .
वाट पाहते तुझी अशी मी . .

आठवणीसाठी कविता लिहिली आणि आठवण हीच कविता झाली. या कवितेतील शब्दच काय यातील काना, मात्रा, वेलांटी किंवा विराम चिन्हे यांचे स्थान या कलापूर्ण मांडणीतून बदलले तरी आपण ही भावसमाधी भंग पावू असे तिचे अढळ स्वरूप आहे. ही मांडणी साधी, सुभग परंतु नजरेत भरणारी आहे. ती दिसते सोपी पण असते कठीण. मुख्य म्हणजे ती आपल्या अंगच्या प्रसाद गुणातून अनंत ध्वनी निर्माण करते; अनलंकृत राहूनही वैचित्र्यपूर्ण रंगछटा, अर्थछटा दाखवून देते. बाईंच्या शब्दात सांगायचे तर :

'नांव तुझे तर लहान साधे
रंगित इवल्या रानफुलापरि
विरघळतांना सुरांत अस्फुट
रंग सांडती तनू मनावरि'

याही कवितेत शाश्वत काय ?

नांव तुझे ते . . . तुझेच अगदी
तुलाच ते; पण नव्हेस तूंच.

बाईंच्या कवितेचा आणखी एक विशेष म्हणजे शब्दचित्राच्या वळणाने ती भाववृत्ती साकार करते. ही शब्द चित्रे कारागिरीची असतात पण ती कलाकृतीकडे जाणारी असल्याने त्याचे स्वरूप नदीने समुद्राशी मिळताक्षणी समुद्रच व्हावे तसे असते. शिवाय ही शब्दचित्रे पाल्हाळवजा राहत नाहीत. ती अचूक, मार्मिक व आकर्षक असतात. 'सुरंगा' कवितेत १२ ओळींपैकी पहिल्या ८ ओळीत असेच मार्मिक शब्दचित्र आले आहे.

गडद नीलिमा चष्म्यावरचा
शर्टावरची बटणे काळी

अंगठींतला लाल खडा अन्
बूटावरची उदी झळाळी
पेन मुलायम हिरवट राखी
गडद जांभळे नाजुक पाकिट
पट्टयावरचा राजवर्ख अन्
गहन रुपेरी घड्याळ चौकट

या शब्दचित्रात जी कारागिरी दिसते तिचाच भाग भावचित्र राहिल्याने या कवितेचा शेवट एका अभिजात कलाकृतीची निर्मिती करून जातो.

रंग रंग हे जमती, भिनती–
मीच होतसे इंद्रधनू अन्
तुझ्या जिवाच्या आकाशावर
अशी सुरंगा, रहाते रेलुन...

इथे शोधन, निरीक्षण, परीक्षण, आणि चिंतन या पायरी पायरीने आपण कलाकृतीचा उत्तुंग कळस गाठलेला असतो, त्यावर भावसमाधी लागलेली असते. बाळबोध व्यक्तिमत्वातून आलेली अशी बाळबोध कविता जेव्हा काळजात शिरते तेव्हा त्या कवितेतील विद्युतभारित शब्दकळा आपणास झपाटून देते. क्षणभर आपण स्वतःचे राहत नाहीच; कविताच होऊन जातो.

या कवितेतील निसर्गाचे वैशिष्टय हे की तो स्वतःच बाईंच्या व्यक्तिमत्वात मिसळण्यास आतुर झालेला असतो; आणि बाईंसह आपले रंग, रूप दाखविण्यास तत्पर असतो. ही किमया गणिती वळणाची नसून अगदी सहज, परस्परांना नकळत झालेली असते. त्यातही पुन्हा 'विरह' या स्थायीभावाभोवतीच तो पिंगा घालत असल्याने तो सरळ वाटेनेच येतो, पण ही वाटही अनेक वळणांची संदर्भसूचकता दर्शविते. 'हिरवे पिवळे तुरे उन्हाचे' या कवितेत हे सामर्थ्य दिसून येते.

सहसा शिंपुन गुलाब पाणी
ढगा आड दडलास वृथा कां–
प्रतिबिंबांनी निळ्या जांभळ्या
तनमन अवघे व्यापिसि कां–

या निसर्गाची बाईंनी केलेली उधळण त्यातील रंग संवेदनामुळे आपल्या मूळ प्रकृतीची खूणगाठ सोडत नाही;

भरली घागर माथ्यावरती
मुळि न कसे डचमळते पाणी
कमरेवरती भरली घागर
मुळि न कसे डचमळते पाणी'

पुनरावृत्तीने बाई आपल्या कवितेला वेगळाच सूर, वेगळाच भाव आणि वेगळाच रंग आणून देतात.

राधा आणि कुब्जा या बाईंच्या लाडक्या पौराणिक प्रतिमा. पण त्यातही अनेक संदर्भ सूचकत्वाने जाईसह कवितेचे व्यक्तिमत्त्व खुलवून देतात.

अशी हरवली राणी मीरा
अशी हरवली राधा गवळण
असेच मी मज हरवुन जावे
हेच तुझ्या मनि जागत कां–

इथे त्या प्रश्नाशिवाय अनेक उत्तरे आपल्या कक्षेत आणून सोडतात. हे त्यांनी प्रश्न न वापरता दाखवून दिले आहे आणि 'कुब्जा'च्या निमित्ताने शिल्लक एवढेच उरते.

डोळ्यामधुनी थेंब सुखाचे
"हे माझ्यास्तव... हे माझ्यास्तव...'

इथे देखील पुनरावृत्तीने एक नवाच साक्षात्कार रसिकास गिळून जातो. 'भरदुपार' 'आषाढ', या कवितेतील निसर्ग देखील असाच आपले अनन्य साधारण रूप दाखवून देतो. सारांश, निसर्गाच्या निमित्ताने, विविध संवेदना त्यातून जागृत करताना, पौराणिक प्रतिमांच्या सहाय्याने जी कविता बाई आपल्या समोर ठेवतात, त्यात दिवंगत प्रियकराशी चाललेला अखंड असा संवाद असतो. तो प्रीती, भक्ती आणि युक्ती या त्रिवेणी संगमातून येतो, कधी मधुरा भक्तीचा, तर कधी विरोधी भक्तीतील सायुज्यता दाखवितो. तो एकाच वेळी लौकिक आणि अलौकिक, शाश्वत आणि अशाश्वत पातळीवरील समरसता पटवून देतो. हा संवाद सांताकडून अनंताकडे जाताना निसर्गाचे माध्यम अधिक बोलके, भावगर्भ करीत जातो. जिथे हा संवाद संपलेला असतो तिथे बाईंची कविता शिल्लक राहत नाही. 'दावण' आणि 'अंधांतरीच्या निळ्या तळचातुन' या कवितेत हा संवाद नसल्याने त्या बाईंच्या प्रकृतीशी विसंवाद साधतात. शिवाय आपल्या कवितेचा जो निश्चित केलेला


घाट आहे, त्यापासून बाई जेव्हा दूर जातात तिथेही ही कविता स्वतःबरोबर रसिकांची फसवणूक करते. मुक्त छंदातील बाईंची कविता आत्मवंचनेतून रसिकापुढे एक रसहीन, भावहीन तडजोड मांडून जाते.

'मेंदी'मधील कविता आस्वाद घेताना आपण ज्या वेगवेगळ्या वळणाने बाईंच्या भावानुभवाचे शिखर गाठतो; तो भावानुभव केवळ बाईंच्या आत्मानुभूतीचा अधिकार आहे. ही त्यांची एकपरी मर्यादा आहे आणि तितकेच ते सामर्थ्य आहे. सामर्थ्य यासाठी की बाईंच्या त्या आत्मानुभूतीचे पदर्‌न्‌पदर आपल्या कवितेतून सूक्ष्मातिसूक्ष्म पद्धतीने उकलून दाखविले आहे आणि तेही नाजुक निसर्ग प्रतिमेतून, रंगसंवेदनेतून. बाईंच्या या प्रांजलतेला मराठी कवितेत तोड नाही तीत असलेल्या लेखनगर्भ आत्मनिष्ठेने हे अपूर्व केले; हे कलासामर्थ्य बाईने एवढे स्वतःशी बांधून घेतले आहे त्या पलिकडे जाऊ शकल्या नाहीत. 'मेंदी' नंतरची त्यांची सर्व कविता कळसूत्री 'बाहुल्या'सारखी झाली. रसिकांना 'मृगजळ' वाटली. ही कविता 'मृण्मयी' आहे ती 'मेंदी' मुळे. या कवितेची 'गर्भरेशमी' पोत दिसते ती देखील 'मेंदी' मधील कवितेत. तिने स्वतःपुढे आणि रसिकांपुढे ठेवलेला आदर्श तो असा.

धगधगते जीवन हे
धरून असे ओंजळींत
आले मी कुठून कशी—
आले मी हेच फक्त

■

—'दिलासा' स्नेहनगर
परळी वैजनाथ, ४३१५१५



टिपण

तीन पसायदान : मर्ढेकर / तुकाराम / ज्ञानेश्वर

डॉ. द. भि. कुळकर्णी

: १ :

मर्ढेकरांचे निधन वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी झाले. एवढ्या अल्प वयात मर्ढेकरांनी काव्य, कादंबरी आणि सौंदर्यशास्त्र या क्षेत्रांत जी कामगिरी केली ती अतुल आहे; तिच्यामुळे मराठी वाङ्मयाचा आणि अभिरुचीचा चेहरा-मोहराच बदलून गेला.

अशा या युगप्रवर्तक साहित्यिकाचं पसायदान 'आणखी काही कविता' या संग्रहाच्या सुरुवातीलाच आलेलं आहे. ते कवीनं परमेश्वराला उद्देशून लिहिलं आहे की रसिकरूपी परमेश्वराची त्यात आळवणी आहे हे सांगणं कठीण आहे; पण त्याचा रोख कोणताही असला तरी त्यातला आशय मात्र अजोड आहे यात शंकाच नाही.

बारा कडव्यांच्या या पसायदानाची सुरुवात अशी आहे :

भंगु दे काठिन्य माझे
आम्ल जाऊ दे मनीचे;
येउं दे वाणींत माझ्या
सूर तूझ्या आवडींचे.

आर्तता, नम्रता आणि उदात्तता या भाववृत्तींनी हे पसायदान चिंब भिजलं आहे. कवी म्हणतो-

लोभ जीभेचा जळू दे
दे थिजू विद्वेष सारा;
द्रौपदीचे सत्त्व माझ्या
लाभु दे भाषा-शरीरा.

'द्रौपदीचे सत्त्व.' पाचांशी रत होऊनही जिचं पातिव्रत्य अभंग राहिलं. दुर्योधन-दुःशासन यांनाही जिचं वस्त्रहरण करता आलं नाही आणि आपल्या सहस्र शिष्यांसह भोजनास आलेल्या दुर्वासांचे जी आपल्या थाळीने समाधान करू शकली-अशी द्रौपदी. तिचं सत्त्व कवीच्या भाषेला मिळाल्यावर मग आणखी काय हवं ? मग शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध या पंच संवेदनांचं बळ, विविध अर्थांचे असंख्य पदर आणि सहस्रांना तृप्त करणारा रस तिच्यात अवतरणारच.

परंतु असं घडण्यासाठी मनाची कृपणता गेली पाहिजे, भावना आणि वास्तव यांच्यात काटेकोर संतुलन साधलं पाहिजे आणि कवीपाशी सर्वांना पोटाशी धरण्याची वृत्ती पाहिजे. वरून जगाचे आणि आतून अतींद्रियांचे आघात त्यासाठी सोसायची कवीची तयारी पाहिजे आहे. नुसती तयारीच नाही तर तो प्रतिज्ञाच करतो–

आण तृष्या लालसेची,
आण लोकांची अभागी,
आण माझ्या डोळियांची
पापणी ठेवीन जागी.

आणि अखेरीच विनम्रपणे तो म्हणतोय–

काय मागावें परी म्यां
तूंहि कैसे काय द्यावें;
तूच देणारा जिथे अन्.
तूच घेणारा स्वभावें !!

मर्ढेकर म्हणजे यंत्रयुग, मर्ढेकर म्हणजे अंधश्रद्धा, मर्ढेकर म्हणजे बीभत्सता अशी एकेकाळी मराठीत समजूत रूढ झाली होती; ती आता दूर झाली आहे, पण आता नवीनच गैरसमज रूढ होत आहेत; मर्ढेकर म्हणजे आकृतिवाद, मर्ढेकर म्हणजे आत्मकेंद्रितता, मर्ढेकर म्हणजे समाज-विस्मृती; पण पहिल्या समजुतीप्रमाणेच ही दुसरी समजूतही अनाठायी आहे.

मर्ढेकरांप्रमाणे आपणही म्हणू या–

धैर्य दे अन् नम्रता दे
पाहण्या जे जे पहाणे,
वाकुं दे बुद्धीस माझ्या
तप्त पोलादाप्रमाणे

घेऊं दे आघात तीतें
इंद्रिय–द्वारा जगाचे;
पोळुं दे आंतुन तीतें
गा अतींद्रियार्थ आंचे.

आशयाचा तूंच स्वामी !
शब्दवाही मी भिकारी;
मागण्याला अंत नाहीं,
आणि देणारा मुरारी !

: २ :

तुकोबा देखील प्रापंचिकच. प्रारंभी बायकामुलांत, देण्याघेण्यात रमले होते; आणि तुमच्या आमच्या आयुष्यात संकट येतात तशीच ती त्यांच्याही आयुष्यात आली होती. दुष्काळ काही फक्त त्यांच्या पुरता पडला नव्हता की बायको फक्त त्यांचीच वारली नव्हती. त्या अस्मानी सुलतानीखाली सारा समाजच भरडून निघाला होता; पण आपण काय आणि तुकोबांच्या काळातील पोटार्थी काय –

फोडगेच. तुकोबा मात्र संवेदनशील, सत्त्वशील आणि 'सत्या असत्यासी मन केले ग्वाही । मानियेले नाही ॥ बहुमता ॥' असं म्हणणारे–मनस्वी.

अस्मानी आघाताच्या निमित्तानं त्यांनी सरळ तळच गाठला जीवनाचा. कर्मकांड, शब्दप्रामाण्य, अंधश्रद्धा यांचा धिक्कार करून त्यांनी अंतरात्म्याला' आवाहन केलं, अंतःस्फूर्तीचा आधार घेतला आणि अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचा जयजयवंती रागच छेडला. ज्ञानोबांनी सुरू केलेल्या भक्तिसंप्रदायावर कळस चढविला.

असा संतश्रेष्ठ देवाला मागणं काय मागणार ? पैसा, कीर्ती, ललना ? सत्ता, संतती, सन्मान ? छट् !

हेचि दान देगा देवा ।
तुझा विसर न व्हावा ॥

परमेश्वरा, एकच माझं मागणं. माझं मागणं हे की, मला कधीही तुझा विसर न पडो. परमेश्वर म्हणजे शाश्वत. त्याचं स्मरण असलं की जन्म काय आणि मृत्यू काय याचं अशाश्वतपण आपोआप जाणवू लागतं; मग सगेसोयरे, मान–अपमान देणे घेणे याबद्दल बोलायलाच नको.

पण देवाची निरंतर आठवण राहावी असं वाटत असेल तर निरंतर त्याचे गुण आठवले पाहिजेत. कोणते वरं त्याचे गुण ?– सर्वाभूती समभाव, दया, क्षमा आणि आनंदमयता. या गुणांचं नित्य स्मरण केलं तर थोडे थोडे ते आपणा- तही उतरणार नाहीत का ? म्हणूनच तुकोबा म्हणतात–

गुण गाईन आवडी ।
हेचि सर्व माझी जोडी ॥

ईश्वराचं स्मरण करता करता जर भक्तच ईश्वरसदृश व्हायला लागला तर मग त्याला मोक्ष तरी कशाला हवा आणि धनसंपदा तरी कशाला हवी ! त्याला हवा संत सज्जनांचा सहवास. कारण त्याच्यातही हे ईश्वराचे सद्गुण एकवटलेले असतात.

न लगे मुक्ती धन संपदा ।
संतसंग देई सदा ॥

भगवंताच्या चिंतनाचं, भगवंताच्या गुणकोषाच्या अनुकरणाचं आणि भगवंताच्याच मूर्ती असलेल्या सुजनांच्या सहवासाचं सुख आकंठ लाभावं म्हणून तुकोबा ईश्वराला मागण मागतात–

तुका म्हणे गर्भवासी ।
सुखे घालावे आम्हांसी ॥

या अभंगात तुकोबांनी जे आध्यात्मिक पसायदान मागितलं आहे. त्याची पार्श्वभूमी ऐहिकात रमलेल्यांच्या पार्थिव इच्छा आकांक्षा ही आहे. ती लक्षात घेऊन हा अभंग जाणला म्हणजे त्याचं द्विदल स्वरूप किती सूक्ष्म आणि तलम आणि तरीही बळकट आहे याची कल्पना येते आणि तुकोबांच्या आध्यात्मिक प्रतिभेप्रमाणेच त्यांच्या वाङ्मयीन प्रतिभेबद्दलही नितांत आदर वाटू लागतो.

: ३ :

ज्ञानदेवांचे गुरू गीतेवर प्रवचने करीत असत. ती ऐकत असताना ज्ञानदेवांची समाधी लागे. त्या अपूर्व समाधीला जे शब्द फुटले ते शब्द म्हणजे ज्ञानेश्वरी.

गुरूंच्या कृपेनं ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी रूपी वाक्यज्ञ सफल झाला. म्हणून ग्रंथाच्या अखेरीस ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरूंनाच प्रसाद मागितला, आणि गुरूनीही त्यांच्या मागणीला होकार भरला.

काय मागणं मागितलं ज्ञानराजांनी गुरूंपाशी ?

बाळपणीच माता पिता दुरावले होते; समाजानं वाळित टाकलं होतं—या अनुभवांची व्यथा ज्ञानेश्वरांच्या अंत.करणात आहे का ? नाही; भय ? नाही. कडवटपणा ? तोही नाही. जीवनाचे असे अनुभव येऊनही ज्ञानेश्वरांचे अंतःकरण जिव्हाळ्यानं ओतप्रोत आहे; त्यांना खळांचं निर्दालन व्हावं असं नाही वाटत; त्यांचं मागणं आहे, 'खळांची व्यंकटी सांडो।' वरं, नुसता दुष्टांचा दुष्टपणा जाऊन भागणार नाही—ही नकारात्मक, रिती अवस्था. म्हणून तया 'सत्कर्मी रती वाढो।' आणि नुसतं सत्कर्माबद्दल प्रेम वाढूनही भागणार नाही. जीवसृष्टीत सुसंवाद प्रस्थापित झाला पाहिजे.

विश्वातील विविध घटकांत सुसंवाद प्रस्थापित होणं म्हणजेच त्यांच्यातील मैत्र. त्यांच्यातील प्रेम. तसं घडलं की मग पापाचा अंधार दूर व्हावयास कितीसा वेळ लागणार ! प्राणीमात्रास स्वकर्तव्याचा बोधही आपोआप होणार आणि मग अशा सुसंवादी, स्वकर्तव्यरत जीवाच्या सर्व इच्छाही सफल होणारच; नाही ?

अशा सुसंवादी विश्वव्यवस्थेचं मूर्तिमंत प्रतीक म्हणजे या जगातील निरीच्छ, विश्वकल्याणाचीच इच्छा बाळगणारे संत. त्यांच्यापर्यंत जग पोचणार आहेच पण त्या आधीच या संतांच्या दिंड्याच्या दिंड्या जीवसृष्टीपर्यंत पोहोचतं.

ज्ञानेश्वरांचं हे पसायदान म्हणजे विश्वजिव्हाळा, विश्वसंवाद आणि विश्वव्यवस्था यांचा आवाहक मंत्रच. शिव आणि शक्ती यांच्या प्रीतिमीलनातून हे जग निर्माण झालेलं; अनौरस नव्हे; त्यांच्या परस्पर प्रेमाचं प्रतीक. चैतन्य, आनंद आणि चारुता हे या मातापित्यांचे मूलधर्म. ते या बालकातही पुरेपूर उतरलेले. फक्त ते मानवाने ओळखायला हवेत. मानवानंच या जगात निर्माण केलेलं, जडत्व, दुःख आणि कौरूप्य मानवानंच दूर करायला हवं—अशी ज्ञानदेवांची जीवनदृष्टी आहे. या नऊ ओव्यांच्या पसायदानात ती अर्करूपानं उतरली आहे. म्हणूनच करुणा, भक्ती आणि उदात्तता यांचा उत्कट आविष्कार करणारं हे पसायदान महाराष्ट्राचं 'राष्ट्रगीत' झालेलं आहे. ■

[आकाशवाणीच्या सौजन्याने]

लेखकांना विनंती

साहित्य पाठविताना त्यावर संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. नाव व पत्ता लिहिलेले आणि पुरेसे पोस्टेज लावलेले पाकीट लेखनासोबत असेल तरच साहित्य परत पाठविणे शक्य होईल.

धनसत्ता, राजसत्ता आणि वाङ्मय--कला--व्यवहार एक टिपण

प्रसन्नकुमार भावे

वाङ्मय–कलेचाच नव्हे तर एकूणच जीवनव्यवहार गेल्या दशकाच्या उत्तरार्धापासून मूल्यनिष्ठांचा जवळजवळ संपूर्णच त्याग करून धननिष्ठ, सांपत्तिक, सत्तांकित व राजसत्तेशी संपूर्णपणे संघर्ष टाळणारा असा झालेला आहे.

साऱ्या विश्वातील, विवेकवादी व भोगवादी वृत्ती व शक्तीच्या आक्रमणाने चिंतित अशा विचारवंत व सर्वसामान्यांचे एका वेगळया प्रकारचे वैचारिक ध्रुवीकरण हा कालखंड घडवून आणतो आहे. तर दुसरीकडे उपभोक्तावादावर आधारलेल्या अर्थव्यवस्थांचे व पर्यायाने राज्यव्यवस्थांचे आक्रमण अत्यंत प्रबळ आहे. एवढे की त्यातून उद्‌भवणाऱ्या सांपत्तिक व स्वतंत्रतेच्या मोहमयी वातावरणाने 'पोलादी' विचारांच्या व निष्ठांच्या मजबूत चौकटी देखील उध्वस्त केल्या आहेत. 'मूल्याधिष्ठित' व्यक्ती, गट, समाज वा राज्ययंत्रणा या कल्पनाच मुळी वेडगळपणाच्या वाटाव्या असे वैश्विक वातावरण 'मार्केट एकानॉमी' नावाच्या भोगवादी भांडवलशाही व्यवस्थेने निर्माण केलेले आहे.

परिणामत: शोषणा विरुद्ध लढा, त्याग, बांधिलकी, सहानुभूती, परदु:खाची जाणीव, सामूहिक वेदना, तिचे असंख्यामधील समान वास्तव्य व त्याच्या निराकरणार्थ सामूहिक प्रयत्न, क्रांती, उठाव, विद्रोह, संघर्ष, अथवा सामाजिक न्याय, सामाजिक पुनर्रचना या गोष्टींना 'मूल्य' म्हणून असणारा 'दर्जाच' नाहीसा झाल्यासारखे वातावरण आपण अनुभवतो आहोत.

कालपरवापर्यंत केवळ उपभोक्तावादावर आधारलेली धनसत्ता व तिच्या आश्रयाने चालणारी अथवा तिला संरक्षण प्रदान करणारी राजसत्ता ही असंख्य वेदनाग्रस्तांची सामूहिक शोषणशक्ती म्हणून वर्णिल्या जात होती. हीच 'शोषणशक्ती' आज अचानक साऱ्या जगभरच 'पोषणशक्तीच्या' स्वरूपात रूपांतरित, स्वीकृत व मान्य झाल्याचे वातावरण उभे ठाकले आहे.

'शोषणशक्ती'च्या स्वरूपात जाणवत होत्या तोवर दबून वागणाऱ्या छोटया–मोठया 'धनसत्ता' व त्यांना संरक्षण देणाऱ्या राजसत्ता आज आपले दवलेपण टाकून देऊन अधिक 'आक्रमक' स्वरूपात समोर उभ्या आहेत. राजसत्ता, या धनसत्तांच्या शरणागत वा आश्रितांच्या स्वरूपात जाणवायला लागल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य, जनसामान्य, त्यांचे शोषण व त्याविरुद्धचा लढा, व्यक्ती व समूह यांच्या मूल्यनिष्ठा इ. संबंधाने बोलणे, वागणे, लिहिणे वा अशा बाबींचा आविष्कार हे काहीतरी (Ridiculous) हास्यास्पद असे होऊन बसलेले आहे.

परिणामत: ज्या उपभोगवादामुळे हा ताप साऱ्या विश्वाला वेगाने चढलेला आहे त्यावरील उतारा म्हणून एकीकडे धार्मिक आधारावरील चळवळी आपल्या

पुनरुज्जीवनाच्या आकांक्षापूर्तीकरता हे योग्य वातावरण समजून आपले डोके वर, अधिक वर काढून अधिकाधिक 'आक्रमक' भाषेत बोलू लागल्या आहेत. तर दुसरीकडे ही आक्रमकता सारेच मुखवटे फाडून कसलेच सोयर सुतक नसलेल्या अत्यंत निखळ अशा आपल्या मूळ क्रूर स्वरूपात थैमान घालू लागली आहे.

या साऱ्या वातावरणाच्या काळचाकुट्ट सावल्यांनी सर्वप्रथम काही साधले असेल तर विवेकाचा, मूल्यनिष्ठेचा, सत्याचा, जाणीवा-भावनाचा विपर्यास, अतिरेक अथवा मग त्यांचा 'आवाज'च पूर्णपणे यांनी गमावून गवसणे. स्वार्थ हा परमार्थाच्या कल्पनेचा नायनाट करून पराकोटीला पोहचलेला असणे.

या वातावरणाचा पहिला बळी विवेकाधिष्ठित मूल्यविचारच असल्याने साऱ्या विश्वातील विवेकवादी आज सर्वाधिक चिंतित आहेत, 'भोग' आणि 'भय' ही या वातावरणाची फलनिष्पत्ती ठरली आहे.

मिडास राजाने हात लावावा त्याचे सोने होत जावे त्या प्रमाणे प्रत्येकच जण हात लावीन त्याचे प्रत्यक्ष सोनेच व्हावे या अपेक्षेने 'मिडास स्पर्श' प्राप्तीच्या मार्गानेच तेवढा जाऊ पहातो आहे.

वाङमय, कला, सौंदर्यमूल्यांचा व्यवहार करणारे 'व्यवहारी' देखील याला अपवाद नसल्याने व याच वातावरणाने लिप्त असल्याने 'लोकनिष्ठ', 'जननिष्ठ' वाङमयव्यवहार देखील जननिष्ठा वा लोकनिष्ठेऐवजी 'लोकप्रियते-वरील निष्ठा' व 'जनप्रियनिष्ठ' होत चाललेला आहे. "सत्य असत्याशी मन केले ग्वाही ! मानियले नाही बहुमता !" याला आज मूल्य समजले जात नाही. धनसत्तेने निर्मिलेली मूल्यव्यवस्था, वाङमय, कलाप्रांताने निर्मिलेल्या मूल्यांना गिळंकृत करून वाङमय-कला व्यवहारास धननिष्ठ, राजनिष्ठ व सत्ताकांक्षी करून सोडू पहाते आहे.

वाङमय-कला व्यवहारांच्या संदर्भात हा संघर्ष सनातन आहे व तो नेहमीच उद्‌भवलेला आहे. वाङमय-कलाप्रांताने निर्मिलेल्या मूल्यांची या संघर्षात तशी नेहमीच सरशी झालेली आहे, परंतु मध्ये प्रचंड संहार व संहारक शक्तींचा विजय होऊन गेल्यानंतर.

निर्मितीकरता, आविष्काराकता 'भयमुक्त' वातावरणाचा आज पूर्णपणे अभाव असून 'भयग्रस्तता' या सामाजिक स्थायीभावाचे वेगवेगळे विभाव, अनुभाव व संचारी भाव व्यक्तींच्या चेहेऱ्यावर व वर्तनातून समाजात स्पष्टपणे दिसताहेत.

मात्र वाङमय-कला व्यवहारातून त्याचे मुक्त आविष्करण करण्याइतकी आविष्कार स्वतंत्रता लेखक, कवी, चित्रकार, पत्रकार, कलावंत उपभोगू शकत नाही. मुळात त्याची गरजच फारशी कुणाला नसावी असे वातावरण आहे. कोणीच कोणत्याच कायद्याने कुणाचेच कसलेच स्वातंत्र्य काढून न घेताही आविष्कार स्वातंत्र्यावर 'आतल्या आतून' काही अनामिक, अनाहून, अनियोजित दडपणे वाङमय-कला-आविष्काराच्या एकूणच व्यवहारात त्यातल्या 'व्यवहारीं'नी परस्परच लावून घेतलेली असावीत अथवा लागलेली असावीत अशी सामसूम सर्वत्र जाणवते आहे.

ही अघोषित अथवा स्वयंघोषित आणीबाणी सदृश स्थिती कोणत्याही विशिष्ट पक्ष, वा राजकीय हालचालींचा परिणाम नसून वैश्विक स्तरावरच उपभोगवादाच्या विस्तारक, संरक्षक व्यवस्था व यंत्रणांची आक्रमक चाल, तिला लाभलेले यश व त्यातून उद्भवलेल्या वातावरणाचा आपआपल्या परीनी लाभ उचलू बघणाऱ्या पुनरुज्जीवनवादी व कट्टरपंथी प्रवृत्तींचे संस्थात्मक संघटन यांचा तो एकूण परिणाम आहे.

या साऱ्याचा परिणाम अस्सल निर्मिती कुंठित होणे, होणाऱ्या निर्मितीचा स्तर, दर्जा, विषय यातली घसरण, लोकप्रियतेचा अनुनय करणारी, 'बाजारू' निर्मिती होण्यावर झालेला असून केवळ 'माध्यमानुसारी' व 'लोकानुयायी' लेखन व कला प्रकारांना अधिक मागणी, पुरवठा व प्रतिष्ठा प्राप्ती त्यातून साधली गेली आहे.

वाङमय आणि कलेचे मूल्यनिकष हे जणू हरवल्यासारखे झाल्याने समीक्षा-व्यवहार देखील असून नसल्यासारखा वा ज्याला कोणतीच भूमिका जणू समकालीन समाजात उरलेली नाही असा निरर्थक, अस्तित्वहीन होऊन पडलेला आहे.

साहित्यविषयक संस्थात्मक कार्य हे साहित्यविश्वाचे म्हणजे नेमके कुणाचे प्रतिनिधित्व करते ते कुणालाच कळेनासे झाले आहे, किंबहुना त्याची गरजही उरलेली नाही. साहित्यसंमेलने आयोजित करणाऱ्या आयोजकांचे 'साहित्येतर' हेतु व उद्दिष्टे पूर्ण करण्याकरिता साहित्यसंस्था संमेलने जणू 'विकू' बघताहेत. साहित्यसंमेलनांचे हिशेब देखील न देणे—न मागणे ही जणू प्रथा वा संकेत स्वरूपात स्वीकारले गेले आहे. विविध धनदात्यांकडून 'धन' उभारण्याचा छोटी छोटी वेगवेगळी 'साहित्य संमेलने' आयोजिणे हा देखील कित्येकांचा एक 'लघुउद्योग' होत चालला आहे.

धनगंभीर विषयांवरील चर्चा वा प्रश्न समस्या वा उत्तरे हे उपहास व टिंगलटवाळीचे विषय झालेले असून त्यांची साहित्य संमेलनापासून कधीचीच फारकत झालेली आहे. वाङमय, निर्मिती, कला व्यवहारातील मंडळींना कोणत्याच विषयाशी संबंधित कोणतेच प्रश्न पडेनासे झालेले आहेत. नव्हे, उलट या विश्वातील मंडळींनी आपसात वा परस्पर भेटीत देखील वाङमय, कला, साहित्य, निर्मिती इ. विषयक गोष्टींवर बोलणे हे जणू मागासलेपणाचे लक्षण असल्यासारखं त्यांनी ते कधीच सोडून दिलेले दिसते. अशा स्थितीतील किमान मराठीतील तरी हा वाङमय—कला व्यवहाराचा प्रांत सर्वसामान्यपणे, दैनंदिन जीवनाच्या प्रांतापेक्षा कुठेच, किंचितसाही वेगळ्या चेहेऱ्याचा जाणवत नाही.

या प्रांताला मुळात वाङमयकला—व्यवहाराचा प्रांत तरी का म्हणायचे हाच खरा प्रश्न आपल्याला का पडू नये ? ■

मराठी लेखन व लेखन परिचय प्रकल्प

ललित कला भारती व संभव प्रकाशनाचा संयुक्त उपक्रम

मराठी लेखकांचे समग्र लेखन, लेखनविषयक संपूर्ण माहिती व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व बाजूंचा परिचय प्रकाशित स्वरूपात एकत्र घडविणारा मराठी लेखक व लेखन परिचय प्रकल्प हा एक उपक्रम मराठीतील महत्त्वाची वाङ्मयीन चळवळीची संस्था ललित कला भारती व येथील संभव प्रकाशन यांनी संयुक्तरीत्या करण्याचे ठरविले आहे.

या योजनेतील पहिला खंड "व्यक्तित्व परिचय ग्रंथ" म्हणून प्रकाशित होईल. मराठीतील हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे.

मराठी लेखकांच्या समग्र लेखनाचा तसेच त्यांचे इतर लेखन प्रकार, प्रकाशित, अप्रकाशित लेखन, त्यांच्या प्रकाशकाचे नाव, लेखनाबद्दलची समीक्षकांची मते, त्यांना लाभलेले सन्मान, पुरस्कार, त्यांच्या आवडी निवडी व्यवसाय, संमेलने, मेळावे, चळवळी यातील सहभाग, लेखनाव्यतिरिक्तचे इतर कार्य व नियोजित लेखन या व अशा माहितीचा या व्यक्तित्व परिचय ग्रंथात समावेश असेल.

वर्तमानपत्राचे संपादक, त्यांच्या साहित्य तसेच इतर पुरवण्यांचे सह-संपादक, वाङ्मयीन व इतर नियतकालिकांचे संपादक, समीक्षक, लहान–मोठ्या साहित्य, नाट्य, कला, संस्था, फीचर सिंडीकेट्स्, विद्यापीठांची अभ्यासमंडळे, पाठ्य पुस्तकाशी संबंधित वर्ग, लेखकांच्या स्थानिक, प्रादेशिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्था, शासनाची विविध खाती, शिक्षक, शाळा, महाविद्यालये, विद्यार्थी, साहित्याचा विविध भाषात अनुवाद करू इच्छिणारे अनुवादक, नवोदित लेखक, लेखनावर, वाङ्मयावर प्रेम करणारे वाचक, वाङ्मय प्रेमी, लेखनप्रेमी व या उपरोक्त माहितीची गरज पदोपदी भासणाऱ्यांना या उपक्रमामुळे प्रथमच सोय उपलब्ध होईल.

भारतीय भाषात फार मोठ्या प्रमाणावर वाढलेले आदान–प्रदान व अनेक नियतकालिके, अनुवादक, लेखक यांना, विशेषत: मराठीतील लेखन व लेखकाच्या संबंधातील माहितीची, त्यांच्या लेखनाची तीव्रतेने भासणारी गरज या उपक्रमाने भागविली जाईल.

अशा माहितीची गरज भासणाऱ्यांशी लेखकांना देखील मोठ्या प्रमाणावर कर्तव्य असू शकते.

हा उपक्रम राबविणारी ललित कला भारती ही मराठीतील–महाराष्ट्रातील गेली दोन दशके प्रबोधनाची कला चळवळ व एक महत्त्वाची साहित्यिक–सामाजिक-सांस्कृतिक संस्था म्हणून ज्ञात असून या उपक्रमातील सहभागी संभव प्रकाशनाने प्रा. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा "संवादशास्त्र" या विषयावरील पहिलाच आणि एकमेव मराठी ग्रंथ व श्री. निरंजन घाटे यांचा "प्रोटोकॉल" हा विज्ञान कथा संग्रह ही पुस्तके नुकतीच प्रकाशित केलेली आहेत.

या व्यक्तित्व परिचय ग्रंथ योजनेकरिता माहिती ही मागे दिलेल्या "व्यक्तित्व विवरण पत्राद्वारे" एकत्र करण्यात येत आहे. या ग्रंथात आपले लेखन व व्यक्तीत्व यांची नोंद देऊ इच्छिणाऱ्यांनी सहभाग शुल्क रुपये १२५/– मे. संभव प्रकाशन यांचे नांवे चेक अथवा ड्राफ्टने मे. संभव प्रकाशन द्वारा, प्रकल्प संयोजक / ३९, टिळक, नगर, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर या पत्त्यावर पाठवावे असे आवाहन करण्यात आले आहे.

नियोजित "व्यक्तीत्व परिचय ग्रंथ" अपेक्षित माहिती उपलब्ध होताच प्रकाशित व्हावयाचा असून सर्व संबंधितांनी या कामी सहकार्य करावे अशी विनंती ललित कला भारती व संभव प्रकाशन यांच्या वतीने करण्यात आली आहे. ■

छायाचित्र

व्यक्तित्व-विवरण पत्र

मराठी लेखक व लेखन परिचय प्रकल्प

[संभव प्रकाशन/३९, टिळकनगर वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर-१०]

- नाव
- पत्ता
- जन्म तारीख :
- शिक्षण
- व्यवसाय
- छंद / आवड :
- आपला प्रमुख लेखन प्रकार :
  लेखनाचे प्रमुख विषय / स्वरूप
- महत्त्वाचे प्रकाशित लेखन
  (कृपया प्रकाशित पुस्तकाची / :
  लेखांची नांवे द्यावीत)
- कुठे प्रकाशित ? प्रकाशकाचे नाव,
  नियतकालिक / वृत्तपत्र इ. चे नाव
- आपल्या लेखन कार्याबद्दलची
  महत्त्वाच्या समीक्षकांची मते / इतर, आपणास
  महत्त्वाच्या वाटणाऱ्यांची मते
- वरील मते कुठे व्यक्त झालेली आहेत ?
- सन्मान / पुरस्कार इ. बद्दलची माहिती :
  -पुरस्काराचे नांव
  -प्रदान करणारी संस्था
  -पुरस्कार प्राप्त लेखनासंबंधी माहिती
  -प्रकाशक
  -प्रकाशनकाळ
  -इतर
- साहित्य संमेलने / मेळावे / चर्चासत्र
  अभ्यास परिषदा इ. तील सहभागांची माहिती :
- लेखनाव्यतिरिक्त वाङमयीन / :
  ग्रंथविषयक / नाट्य / क्रीडा अथवा कोणत्याही :
  इतर कार्यातील सहभाग
- नियोजित लेखन / कार्य / योजना इ.
- आपणास पुरवावीशी वाटणारी
  इतर माहिती :

[कृपया छायाचित्र सोबत अवश्य जोडावे]

रात कधीची झुरते

येतो आठवाचा पूर असा एकांताच्या वेळी
येते उदास हिंदोळे रात पावसाची काळी

मिट्ट काळोखात अशा तूच डोळाभर येतो
डोळ्यातून काळजात थेट आरपार जातो

स्वर उठती सारखे फिर रात पाखरांचे
कस जपावे डोहाळे अशा पाऊस देहाचे

सोन–सोहळ्यात दंग ओली पापणी वुडते
कुण्या सागर काठाशी नाव हेलकावे खाते...

दारी पाचोळा वाजतो साद ओळखीची येते
काळोखाच्या पावसात रात कधीची झुरते !

याद

आलं आभाळ भरून
गाव पावसात न्हालं
चिंब झाल्या झाडांवर
भोळं मन पांघरलं...

दूर दूर शिवारात
गेल्या पावसाळी वाटा
काळजाशी सलू आला
कुण्या वाटेतला काटा

झाली सादळ गारवी
रात भोवताली आता
उबारले अंगभर
तुझी याद पांघरता !

नको सोडून जाऊस...

तुझ्या वाचून सख्या येते मज अवकळा
नको जाऊ दूरदेशी असा लावूनिया ळळा

देते धडका उरात नदी वाहे काठोकाठ
तुझ्या रेशमी शेल्याची माझ्या पदराशी गाठ

...सळाळत्या नागिणीने कात देहाची टाकली
कंफ अनावर होता रात जागून काढली

तुंब काळोखाच्या राती झरे डोळ्यांनी पाऊस
थांब उबारा होवून नको सोडून जाऊस...

सदानंद देशमुख

संभ्रम

कुठून येतात कातरवेळी
आभाळ व्यापून सारे पक्षी ?
काळजातल्या घरट्यातल्या
मातीवर उमटलेल्या
त्यांच्या चोचींचे ठसे
देशांतराला निघाल्या वेळची
आठवण करून देतात.

मिट्ट काजळी काळोखाची
विखरून पडते समंजसपणे.
संयमित रात्रीचा विखार
ओटीपोटावर
फुले माळल्यासारखा
सजून जातो.

उध्वस्तपणाच्या खुणा
पानापानांना विचारतांना
फांद्यांना झालेले विस्मरणही
दृष्टीआड दडवता येत नाही.

अंडी घरट्यातच टाकून
देशोधडीला लावलेली मादी
आताही शोधत असेल का
तरण्या नर पक्षाची सायसंगत ?
मागच्या गाण्याचे चरण
तिच्या रंगारंगात उतरत असेल का
बेमुर्वतपणे ?
झाडं कान लावून घरट्यांना
ऐकत असतील का पक्ष्यांची गुपितं ?
नरमादीचा विलक्षण वाद संवाद ?
नी ताल धरून करीत असतील का नाद ?
त्यासाठी काय व्हावे ?
पक्षी, घरटे, झाड की रात्र ?

पान

भर माध्यान्हात
पानांना कापरं भरतं.
जख्खड वृद्धाच्या त्वचेसारखा
भीतीने त्याचा
थरकाप उडतो.
तसा आसमंताच्या नजरेला नजर भिडवून
धीटपणानं उभं राहण्यापलीकडे
त्यांनी कुठलाही गुन्हा
केलेला नसतो.

खुल्या तुरुंगवासाचं अस्तित्व
असल्यानं, त्यांना जेरबंद करून
डांबताही येत नाही कैदखान्यात.
असह्य होऊन फुलांनी
पानांच्या बाजूने साक्ष द्यायला
मान वर केली तर,
त्यांचाही वध करण्यात आला.
देठापासून खुडून, अकल्पितपणे.
वारा सावधपणे आपलं बोचकं बांधून
भर दुपारशी गांधर्व विवाह
करण्याच्या तयारीनिशी.
वृक्ष फांद्याफांद्यांच्या डहाळीवर
आपल्या दैनंदिन घटना लिहीत;
कमालीच्या शांतपणे
जीभ छाटलेली पानं आता
स्तब्धपणे उभी
ज्यूं सारखी.

मधुकर धाकराव

चार कविता

१.

खूप दिवसाचा तू इथेच रेंगाळलेला दिसतोस
तुझे रंगही आता थोडेसे गडद झालेत
हरकत नाही सख्या असा तू स्थिरावलेला
पण तुझी नाळ तुटता तुटत नाही
ना तुझ्याशी ना ह्या तांड्याशी
जहरील्या वेदमंत्राने तू
केंव्हाचा होतास निद्रिस्त
हे बघ तू कधी अजाण दिलीस
आकाशातील बापाही म्हटलेस कधी कधी
हरकत नाही सख्या म्हणरे तू काहीही
पण तुझ्या अंगांगातून निथळणारा
इथल्या मातीचा वास
कसा चिव करतोय सारखा
तुला मला नि ह्या संबंध आसमंताला
आता तू स्थिरावलास ना सख्या
ती वाट बघ मंतरलेली
कशी उदास उदास झालीहे
त्यापुढची वाट तर आताशा
धूसर होऊ लागलीहे
म्हणून म्हणतो सख्या
तू चालायला तरी लाग किंवा
बाजूला तरी हो
नाही तर ना तुझी समाधी बनेल
ना वितभर जागा मिळेल सावलीला
आता नव्या पिढीचे अंकूर असे तरारलेले
तुझ्या रंगाला झाकोळण्याची किमया
ह्यांना नव्याने साकारादीही लागणार नाही
कारण ह्यांनी केंव्हाच अडकलेले धम्मचक्र
आता उस्कटून फिरते केलेहे

२.

तुझ्या हळव्या श्वासांवर फुंकर घालायला
कालचक्र थांबायला हवे का ?
या निगरगट्ट पावलांच्या ठशातच बघना
तुझी दमदार स्वच्छ पावलं कुठं सापडतात का?
सांभाळ
या निसरड्या क्षणाच्या छाताडावर
कालप्रवाहाची सतत धार ठिबकतेहे
कालपरवाचे तुझे व्रण
दु:खाची आवर्तने आणि विद्रोहाचे
घनगर्द उच्छवास
सर्वच धुवून निघतील
काही म्हणून शिल्लक उरणार नाही
हे तुझ्या अस्तित्वाचे देणे
उगवत्या पिढीसाठी
तो तुझ्या खांद्यावर उभा असेल
तेंव्हा दिसणार नाही तिला
तुझ्या पिरगळलेल्या सावलीची दुर्दशा
येणाऱ्या पिढीचे वेध असतात क्षितिजापल्याड
या वेध व्याधकाच्या प्रत्यंचेला
तू जोडून दिली पाहिजेस
तुझ्या हळव्या श्वासांची लक्तरे
की तूच बघशिल
गरज नाही थांबायची ह्या कालचक्राला
मात्र न विसरता तू हे कर

बबन चहांदे

३.

सर्व रानच आज सैरभैर झाले
श्वासही क्षणभर थंड होऊन गेले
कालच वस्तीत निनादत होते मुक्तस्वर
आज चिमण्याही तेथे दाणे टिपायला नव्हत्या
अपयश यशाची पहिली पायरी आहे
अशा कित्येक पायऱ्या या वस्तीने
आजवर पालथ्या घातल्या
श्वेतध्वज खांद्यावर घेऊन
नेहमीच ही वस्ती स्नेहार्द्र झाली
आव्हानांचे स्विकार
बुद्धाच्या मंद तेजाळ नजरेने
अंतरात साठवीत राहिली
वस्तीतली काही लाचार झाडे
नात्यागोत्याचे वृक्षही
कित्येकदा वारा आला की पानं हलावी
तशी गदागदा बूड हलवून
आपली मुळे पक्की केल्याचे
या वस्तीने पाहिले होते

ही वस्ती कित्येकदा
सोशिक लाचार पडखाऊ
माडखाऊही झाली होती
कातडीवर गोंदविलेल्या
शतकांच्या निगरगट्टी रेषा
काल कुणा महाभागाने अचानक पुसल्या
आणि काल राख झालेली वस्ती
हे जगच राख आहे
या नजरेने पाहू लागली
सर्व रानच आज सैरभैर झाले
साऱ्या दिशांचे श्वास स्तंभीत होऊन गेले.

४.

हे दर्दिले नागवेपण आणि
लाचारीच्या सुरावटीचा भोगवटा
आर्यावर्ताच्या घोड्यांनी उधळलेला
अख्ख्या जीवनाचाच सारीपाट
आता वेचित बसलेत काही शहाणे
गळयात विद्वत्तेचे ताबिज बांधून
काही गल्लाभरू नावभरू, हिजड्यांच्या
गर्दीचे नेतृत्व शिरपेचात खोचून

" जंबोरे, तुम बतलायेगा,
हां, सब कुछ बतलायेगा "च्या आवेशात
आणि आयुष्याचाच केलाय
एक पोरसवदा खेळ
सर्वांनाच जाणवतेहे, यातील
गुपिते आणि खेळखंडोबा
तरीही आम्ही गर्दीचे पायिक
कायद्याने आमची इभ्रत सामायिक
कोणीही यावे टिचकी मारून जावे
आम्ही आपले जोजवत
डोळ्यावर नुसतीच
झापड बांधून अस्मितेची
वाऱ्यावर हात हलवीत
ठेचाळत गचकाळत...

बबन चहांदे

अनुक्रमणिका

गझलचे छंदशास्त्र : एक अभ्यास

आनंद आडे

या प्रदीर्घ लेखाच्या पूर्वार्धातील काही भाग जा–फे–मा / ९० व ए-मे जू/ ९० च्या अंकात प्रकाशित झालेला आहे. उर्वरित मजकुरापैकी काही भाग या अंकात प्रकाशित करीत आहोत. उर्वरित मजकूर व पुढील भाग यथावकाश प्रकाशित करीत आहोतच.

(५) मुसम्मन मखबून अवदत छंदाचा २ प्रकार : १५ वर्ण २५ मात्रा

गण– फाअलातुन्–फाअलातुन. फाअलातुन्–फउलुन

वजन– गा ल गा गा – गा ल गा गा – गा ल गा गा – ल ल गा = १५ वर्ण

मात्रा– २ १ २ २ – २ १ २ २ – २ १ २ २ – १ १ २ = २५ मात्रा

(६) या छंदाचा ३ रा प्रकार

गण– फाअलातुन् – ३ वेळा, – फअलुन

वजन– गा ल गा गा – ३ वेळा, – गा गा = १४ वर्ण

मात्रा– २ १ २ २ – ३ वेळा, – २ २ = २५ मात्रा

(७) मुसम्मन मखबून महझूफ

गण– फइलातुन् – फइलातुन् – फइलातुन् – फअलन्

वजन– ल ल गा गा – ल ल गा गा – ल ल गा गा – ल ल गा = १५ वर्ण

मात्रा– १ १ २ २ – १ १ २ २ – १ १ २ २ – १ १ २ = २२ मात्रा

(८) मुसम्मन मशकूल : १६ वर्ण २४ मात्रा

गण– फइलात् – फाइलातन् – फइलात् – फाइलातन्

वजन– ल ल गा ल – गा ल गा गा – ल ल गा ल – गा ल गा गा = १६ वर्ण

मात्रा– १ १ २ १ – २ १ २ २ – १ १ २ १ – २ १ २ २ = २४ मात्रा

(९) मुसम्मन मशअस : या छंदात १६ वर्ण २४ मात्रा असतात.

गण – मफऊलन् – ४ वेळा

वजन – ल ल गा गा – ४ वेळा

मात्रा – १ १ २ २ – ४ वेळा

(१०) मुसद्दस महझूफ : या छंदात ११ वर्ण १९ मात्रा असतात.

गण – फाअलातन् – फाअलातन् – फाअलन्

वजन – गा ल गा गा – गा ल गा गा – गा ल गा = ११ वर्ण

मात्रा – २ १ २ २ – २ १ २ २ – २ १ २ = १९ मात्रा

(११) मुसद्दस अवतर

फाइलातन् – फाअलातन् – फउलून
गा ल गा गा – गा ल गा गा – ल ल गा = ११ वर्ण   १८ मात्रा
फइलातन् – फइलातन् – फउलुन
ल ल गा गा – ल ल गा गा – ल ल गा = ११ वर्ण   १६ मात्रा
फाइलातन् – फइलातन् – फअलुन
गा ल गा गा – ल ल गा गा – ल ल गा = ११ वर्ण   १७ मात्रा
फइलातन् – फइलातन् – फअलन् ११ वर्ण   १६ मात्रा
ल ल गा गा – ल ल गा गा = गा गा

टीप : अ-इ-लन्-तुन् यांच्या वजनात फरक नाही. संपूर्ण रमल छंदात या प्रमाणे आहे. 'फअलातन्' मध्ये 'गागागा' किंवा 'ललगागा' आवश्यकतेनुसार बदल करता येतो. असे फक्त लय आणि प्रवाहित्व सांभाळून करावयास पाहिजे.

(७) मुतफाइलुन् गण
मुत + फा + इलुन्
ल ल – गा – ल गा

हा 'कामिल' छंदाचा सालिम गण आहे. हा गण दोन सबब आणि एक वतद मिळून बनलेला आहे. येथे फक्त अंत्य गुरु असलेले उपछंद दिले आहेत.

(१) कामिल मुसम्मन सालिम छंद : या छंदात २० वर्ण, २८ मात्रा असतात.
गण– मुतफाइलुन् – मुतफाइलुन् – मुतफाइलुन् – मुतफाइलुन्
वजन– ल ल गा ल गा – ल ल गा ल गा – ल ल गा ल गा – ल ल गा ल गा
मात्रा– १ १ २ १ २ – १ १ २ १ २ – १ १ २ १ २ – १ १ २ १ २

(२) मुसम्मन मझमर रुकनी सानी : या छंदात १८ वर्ण २८ मात्रा असतात.
गण– मुतफाइलन् – मुसतफ्अलन् – मुतफाइलन्–मुसतफ्अलन
वजन– ल ल गा ल गा – गा गा ल गा – ल ल गा ल गा – गा गा ल गा

(३) मुसम्मन मझमर रुकन अव्वल : या छंदात १८ वर्ण, २८ मात्रा असतात.
गण– मुसतफअलुन् – मुतफाइलुन् – मुसतफअलुन् – मुतफाइलुन्
वजन– गा गा ल गा – ल ल गा ल गा – गा गा ल गा – ल ल गा ल गा
मात्रा– २ २ १ २ – १ १ २ १ २ – २ २ १ २ – १ १ २ १ २

(४) मुसम्मन मोकूझ : या छंदांत १८ वर्ण, २६ मात्रा असतात.
गण– मुतफाइलन् – मफाइलन् – मुतफाइलन् – मफाइलन्
वजन– ल ल गा ल गा – ल गा ल गा – ल ल गा ल गा – ल गा ल गा
मात्रा– १ १ २ १ २ – १ २ १ २ – १ १ २ १ २ – १ २ १ २

(५) उपरोक्त छंदाचा २ रा प्रकार : यात सुद्धा १८ वर्ण, २६ मात्रा असतात.
गण– मफाइलन – मुतफाईलन – मफाइलन् – मुतफाइलन्
वजन– ल गा ल गा – ल ल गा ल गा – ल गा ल गा – ल ल गा ल गा
मात्रा– १ २ १ २ – १ १ २ १ २ – १ २ १ २ – १ १ २ १ २

(६) कामिल मुसद्दस सालिम : या छंदात १५ वर्ण, २१ मात्रा असतात.
गण– मुतफाइलन – ३ वेळा
वजन– ल ल गा ल गा – ३ वेळा

(७) **मुसद्दस मझमर** : या छंदात १४ वर्ण, २१ मात्रा असतात.

गण– मुतफाइलन् – मुतफालन् – मुसतफअलन्

वजन– ल ल गा ल गा – ल ल गा गा – ल गा गा ल गा

मात्रा– १ १ २ १ २ – १ १ २ २ – १ २ २ १ २

(८) **मुसद्दस मोकूझ** : या छंदात १४ वर्ण, २० मात्रा असतात

गण– मुतफाइलन् – मफाइलन – मुतफाइलन्

वजन– ल ल गा ल गा – ल गा ल गा – ल ल गा ल गा

मात्रा– १ १ २ १ २ – १ २ १ २ – १ १ २ १ २

(९) **मुसद्दस मोकूझ** (२ रा प्रकार) या छंदात १३ वर्ण, १९ मात्रा असतात

गण– मफाअलन् – मुतफाअलन् – मफाअलन्

वजन– ल गा ल गा – ल ल गा ल गा – ल गा ल गा

मात्रा– १ २ १ २ – १ १ २ १ २ – १ २ १ २

(८) मफऊलातु गण | हा 'मनसरिह' छंदाचा सालिम गण आहे.
मफ + ऊ + लातु | हा दोन सबबे खफीफ आणि एक वतद मिळून बनला आहे,
गा – गा – गाल

'मनसरिह' छंद : हा छंद किचकट असल्यामुळे तितकासा प्रचलित नाही. उर्दू शायरीत याचा कमी प्रमाणात वापर झालेला दिसून येतो. कारण उर्दूत सालिम छंदात शेर रचणे अशक्य आहे. किंवा कष्टसाध्य आहे. जवळ जवळ सर्वच उपछंदात अंत्य लघु येत असल्यामुळे मराठी गझलसाठी उपयोगी पडणारे नाहीत. म्हणून मोजकेच उपछंद येथे दिले आहेत. या छंदात समाधानासाठी 'मुफतअलन'= (गाललगा)ला पाहिजे त्या ठिकाणी 'मफऊलन'= (गागागा) सारखा उपयोग करता येतो तसा बदल करता येतो.

(१) **मुसम्मन मतवी मकसूफ हर दो रुक्न, छंद** : यात १४ वर्ण, २२ मात्रा असतात.

गण : मुफतइलन् – फाइलन् – मुफतइलन् – फाइलन्

वजन : गाललगा; गालगा,– गाललगा – गालगा – १४ वर्ण

मात्रा : २ १ १ २ – २ १ २ – २ १ १ २–२ १ २ = २२ मात्रा

(२) **प्रकार २ रा** : यात १५ वर्ण, २३ मात्रा असतात.

गण : मुफतइलन – फाइलात् – मुफतइलन् – फाइलन्

वजन : गाललगा, – गालगाल – गाललगा – गालगा = १५ वर्ण.

मात्रा : २ १ १ २ – २ १ २ १ – २ १ १ २ – २ १ २ = २३ मात्रा

(३) **मुसम्मन मतवी मनहूर**

गण : मुफतइलन् – फाइलात् – मुफतइलन् फअ्

वजन : गा ल ल गा – गालगाल – गाललगा गा. = १३ वर्ण.

मात्रा : २ १ १ २ – २ १ २ १ २ १ १ २ २ = २० मात्रा

(४) **मुसद्दस मतवी मकतूअ्**

गण : मुफतइलन् – फाइलात् – मफऊलन्

वजन : गा ल ल गा – गालगाल – गा गा गा – ११ वर्ण.

मात्रा : २ १ १ २ – २ १ २ १ २ २ २ = मात्रा.

(५) मुसद्दस मखबून मतवी : १२ वर्ण, १८ मात्रा.

गण : मफाइलन् – फाइलात् – मुफतइलन्

वजन : ल गा ल गा – गा ल गा ल – ल गा ल गा – १२ वर्ण.

मात्रा : १ २ १ २ २ १ २ १ १ २ १ २ = १८ मात्रा.

(९) मुसतफअलुन् गण : मुस + तफ्अ + लुन् गा – ल गा – गा | हा 'खफीफ', 'मुजतस्स' आणि 'मुतकारिब' नावाच्या बहर = छंदाचा सालिम गण आहे. हा सबवे खफीफ, एक वतद आणि एक सबबे खफीफ अशा तीन सिलेबलचा गण आहे.

(९) खफीफ बहर : ही बहर उर्दूत प्रचलित आहे. काही पोट छंद रुचिकर आहेत तर काही अरुचिकर सुद्धा आहेत. यात काही अरकानांची भेसळ प्रमाणभूत आहे. म्हणजे 'फाअलातन्'– 'फअलातन्' आणि 'मुसतफअलन्', – 'मफाइलन' बनू शकते. या बहरमध्ये सुद्धा समाधानासाठी काही फेरफार योग्य असून मान्यता प्राप्त आहेत. 'फअलातन्' आणि 'मफऊलन'चा मेळ प्रत्येक ठिकाणी योग्य व दुरुस्त समजला गेला आहे.

(१) खफीफ मुसद्दस सालिम : या छंदात १२ वर्ण, २१ मात्रा असतात.

गण : फाअलातन् – मस्तफअलन् – फाअलातन्

वजन : गा ल गा गा, गा ल गा गा – गा ल गा गा.

मात्रा : २ १ २ २, २ १ २ २, २ १ २ २

उदा. वागणे माझें जरी साधेच होते

दावलेले हुंदके ताजेच होते (सुरेश भट)

(२) मुसद्दस मखबून छद : या छंदात १२ वर्ण, २० मात्रा असतात.

गण : फाअलातन् – मफाअलन् – फाअलातन्

वजन : गा ल गा गा - ल गा ल गा – गा ल गा गा = १२ वर्ण

मात्रा २ १ २ २, १ २ १ २, २ १ २ २ = २० मात्रा.

(३) प्रकार २ रा : यात १९ मात्रा, ११ वर्ण असतात.

गण : फाअलातन् – मफाअलन् – फ्अ्लातन्

वजन : गा ल गा गा – ल गा ल गा – गा गा गा

मात्रा : २ १ २ २ १ २ १ २ २ २ २

(४) प्रकार ३ रा : या छंदात १२ वर्ण. १८ मात्रा असतात.

गण : फअलातन् – मफाअलन् – फअलातन्

वजन : ल ल गा गा – ल गा ल गा – ल ल गा गा

मात्रा : १ १ २ २ – १ २ १ २ – १ १ २ २

(५) मखबून महजूफ : या छंदात ११ वर्ण, १७ मात्रा असतात.

गण : फाअलातन् – मफाअलन् – फइलुन

वजन : गा ल गा गा – ल गा ल गा – ल ल गा

मात्रा : २ १ २ २ – १ २ १ १ – १ १ २

(६) मुसद्दस मखबून अबतर : या छंदात १० वर्ण, १७ मात्रा असतात.

गण : फाअलातन् – मफाअलन् – फअलुन

वजन : गा ल गा गा – ल गा ल गा – गा गा

मात्रा : २ १ २ २ – १ २ १ २ – २ २

उदा० : रात गेली निघून मान्याची
हाक आली पहाट तान्याची. (सुरेश भट)

(७) मुसद्दस मखबून अवतर : प्रकार २ रा, १० वर्ण, १६ मात्रा
गण– फअलातन् – मफाइलन् फइलन्
वजन– गा गा गा – ल गा ल गा – ल ल गा
मात्रा– २ २ २ – १ २ १ २ – १ १ २

(८) मुसद्दस मखबून अवतर : प्रकार ३ रा. १० वर्ण, १६ मात्रा.
गण फअलातन् – मफाइलन् – फअलन्
वजन– ल ल गा गा – ल गा ल गा – गा गा
मात्रा– १ १ २ २ – १ २ १ २ – २ २

(९) मुसम्मन मखबून : ९ वर्ण, १४ मात्रा
गण– फअलातन् – मफाअलन् – फअ्
वजन– ल ल गा गा – ल गा ल गा – गा
मात्रा– १ १ २ २ – १ २ १ २ – २

(१०) खफीफ मुसम्मन मखबून छंद : या छंदात १६ वर्ण, २४ मात्रा असतात.
गण– फअलातन् – मफाअलन् – फअलातन् – मफाअलन्
वजन– ल ल गा गा – ल गा ल गा – ल ल गा गा – ल गा ल गा
मात्रा– १ १ २ २ – १ २ १ २ – १ १ २ २ – १ २ १ २

(१०) फाअलातुन् गण
फा अ + ला तु न्
गा ल – गा गा

हा मझारिअ बहरचा सालिम गण आहे.
एक वतद आणि दोन सबब किंवा एक वतद आणि एक फासला मिळून बनलेला गण आहे.

(१०) मझारिअ छंद : या छंदाचे निवडकच पोटछंद उर्दूत प्रचलित आहेत : ज्या उपछंदात अंत्यगुरु आहे असेच काही उपछंद येथे दिले आहेत.

(१) मझारिअ मुसम्मन सालिम : या छंदात १६ वर्ण, २८ मात्रा असतात.
गण– मफाईलुन् – फाअलातुन् – मफाईलुन् – फाअलातुन्
वजन– ल ग गा गा – गा ल गा गा – ल गा गा गा – गा ल गा गा
मात्रा– १ २ २ २ – २ १ २ २ – १ २ २ २ – २ १ २ २

(२) मुसम्मन अखरब छंद : या छंदात १४ वर्ण, २६ मात्रा असतात.
गण– मफऊलुन् – फाअलातुन् – मफऊलुन – फाअलातून्
वजन– गा गा गा – गा ल गा गा – गा गा गा – गा ल गा गा
मात्रा– २ २ २ – २ १ २ २ – २ २ २ – २ १ २ २

(३) मुसम्मन अखरब मकसूर छंद.
गण– मफऊलु – फाइलातुन् – मफऊलु – फाइलन्
वजन– गा गा ल – गा ल गा गा – गा गा ल – गा ल गा = १३ वर्ण
मात्रा– २ २ १ – २ १ २ २ – २ २ १ – २ १ २ = २२ मात्रा (पुढील अंकी)

विदर्भ साहित्य संघाची– ग्रंथ वाचक चळवळ

ग्रंथवाचन, प्रकाशन व एकूणच ग्रंथव्यवहारात आलेली उदासीनता झटकून एक नवे चैतन्य निर्माण करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाने "ग्रंथसहवास" हा नवा उपक्रम या वर्षाच्या प्रारंभास सुरू केला आहे.

ग्रंथ व वाचक यांची मैत्री पक्की करणाऱ्या या उपक्रमाने शहराच्या विविध भागात छोटी ग्रंथ-प्रदर्शने आयोजित करून अनेक नवे ग्रंथ – मित्र मिळविले आहेत ग्रंथप्रदर्शनाच्याच जोडीला एक तासाचा वाङ्मयीन कार्यक्रम आयोजित केला जातो. या कार्यक्रमातून नव्या ग्रंथ समीक्षकांकडून केलेले नव्या ग्रंथाचे समीक्षण, कथाकथन, काव्य-गायन, ग्रंथप्रकाशन इ. कार्यक्रम केले जातात.

प्रत्येक विभागातून एक ग्रंथप्रेमी घर या कार्यक्रमासाठी निवडले जाते. त्या घरातील हॉलमध्ये हा कार्यक्रम आयोजित केला जातो. जे घर कार्यक्रमासाठी निवडले जाते, त्या घरातील प्रमुखाने एक कोणतेही आवडीचे पुस्तक या कार्यक्रमाच्या निमित्ताने विकत घ्यावे अशी अपेक्षा असते. तसेच ज्या ग्रंथवाचकाकडे हा कार्यक्रम घेतला जातो, त्या घरातील लहान मुलांना या "ग्रंथसहवास"तर्फे ग्रंथ भेट दिले जातात. संपूर्ण एक दिवस ग्रंथसहवासाचे हे छोटे ग्रंथप्रदर्शन या यजमानांकडे मुक्कामाला असते. या काळात त्या त्या विभागातील ग्रंथप्रेमी लोकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी, नवे ग्रंथ पहावे, चाळावे अशी व्यवस्था असते. प्रदर्शन पहाणाऱ्या एखाद्या व्यक्तीने एखादा ग्रंथ विकत घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यानंतर तो ग्रंथ त्यांना विकत मिळवून देण्याची व्यवस्था ग्रंथसहवास करते. त्याकरता नागपूरच्या सर्व ग्रंथ विक्रेत्यांचे चांगलेच सहकार्य लाभले आहे. त्याबाबतीत नागपूरच्या साहित्य प्रसार केंद्राचा व त्याचे संचालक राजाभाऊ कुळकर्णी ह्यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

फ्लॅट संस्कृतीपासून तो झोपडपट्टीपर्यंत तसेच जेष्ठ नागरिकांपासून ते बालवाचकांपर्यंत सर्वांना या चळवळीने आपल्यात आत्मीयतेने सामावून घेतले आहे. नागपूर शहरातील एका झोपडपट्टीत ग्रंथ-सहवासने घेतलेला कार्यक्रम तर खूपच यशस्वी झाला. आपल्याही घरात पुस्तक असावे, आपल्याही वस्तीत एखादे ग्रंथालय असावे अशी भावना या चळ-वळीने लोकांच्या मनात निश्चितच रुजविली आहे.

ग्रंथसहवास चळवळीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्टय असे की या उपक्रमाच्या द्वारे ही छोटे-खानी ग्रंथदर्शने आयोजित केले जातात, त्यात वैदर्भीय लेखकांच्या ग्रंथांना मानाचे स्थान दिले जाते. याशिवाय ग्रंथकार छोटा की मोठा, प्रसिद्ध प्रसिद्ध की अप्रसिद्ध असा भेदभाव केला जात नाही. अगदी छोट्यातल्या छोट्या लेखकाला सुद्धा विशेष सन्मानाचे स्थान या ग्रंथसहवास चळवळीत दिले जाते.

ग्रंथसहवासचे गेल्या तीन महिन्यात ३२ कार्य-क्रम शहराच्या विविध भागात झाले असून वर्षाच्या अखेरीस पर्यंत कार्यक्रमाची "सेंचुरी" गाठायची आहे. या उपक्रमाच्या द्वारे या वर्षभरात कमीत कमी ५० हजार वाचकांशी संपर्क साधायचा आहे. चळवळ यशस्वी करण्यात वि. सा. संघाच्या युवा कार्यकर्त्यांचा फार मोठा हातभार आहे. या चळवळीचे लोण अधिक व्यापक करण्यासाठी "ग्रंथसहवास" याच नावाचे द्वैमासिकही प्रकाशित केले जाते. यात महत्त्वाच्या ग्रंथांची तोंडओळख 'लक्षवेधी ग्रंथ' या सदरात करून देण्याचा प्रयत्न असतो, त्याच सोबत ग्रंथसहवास कार्यक्रमाचीही माहिती असते.

विदर्भ साहित्य संघाचे सर्व उपक्रम जनता-भिमुख करण्याच्या चळवळीचाच एक भाग म्हणूनही "ग्रंथसहवास" ही चळवळ जोमात सुरू आहे. □

चंद्रकांत कुळकर्णी
संचालक, ग्रंथसहवास, विदर्भ साहित्य संघ

सौ. कुंदा केळापुरे
संयोजक, ग्रंथसहवास, विदर्भ साहित्य संघ

कै. वा. ना. देशपांडे स्मृती
वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद

मराठीतील वाङ्मयीन नियतकालिकांच्या अस्तित्व व उपजीविकेच्या समकालीन वास्तवावर चर्चा करणारी मराठीतील पहिलीच वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद २७ मार्च १९९० रोजो विदर्भ साहित्य संघाने आयोजिली होती.

अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या सहकार्याने आयोजित ही परिषद युगवाणीचे प्रथम संपादक कै. वा. ना. देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजिण्यात आली होती.

मराठीतील सर्वच महत्त्वाच्या वाङ्मयीन नियतकालिकांचे संपादक / संचालक संस्था, जनप्रतिनिधी, माध्यमांचे प्रतिनिधी, लेखकांचे विधान परिषदेवरील प्रतिनिधी, अ. भा. साहित्य संमेलनांचे अध्यक्ष, म. रा. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष इ. यांना या परिषदेत सहभागार्थ आमंत्रित करण्यात आले होते.

मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या या जिव्हाळयाच्या विषयावरील अशा प्रकारच्या या पहिल्याच परिषदेतील संबंधित आमंत्रित मान्यवरांच्या उपस्थितीत झालेली चर्चा, त्यांचे लेख, त्यांनी व्यक्त केलेले विचार व त्यातून होणारे या विषयावरील समकालीन वास्तवाचे दर्शन तसेच पुढील दिशादिग्दर्शन सोबत प्रकाशित करीत आहोत.

कै. वा. ना. देशपांडे स्मृती
वाङमयीन नियतकालिक विकास परिषद : २७ मार्च १९९०

चर्चासत्रातील विषय

१. वाङ्मयीन नियतकालिके : संकल्पना, भूमिका व कार्य
२. वाङमयीन नियतकालिकांची सद्य:स्थिती : कारणमीमांसा, विकासातील अडचणी व उपाययोजना
३. वाङमयीन नियतकालिकांच्या व्यवसायीकरणाची गरज
४. साहित्य संस्थांची मुखपत्रे : संघर्ष, समस्या व उपाय
५. वाङमयीन नियतकालिकांचे पोषण : समाज, जनप्रतिनिधी, वृत्तपत्रे व शासन यांचे दायित्व
६. – समारोप
- – निरीक्षकांचा अहवाल
- – सूचना / मागण्या / निवेदन
- – संयुक्त कृतीची योजना
- – समारोपीय भाष्य

निरीक्षण :

कै. वा. ना. देशपांडे स्मृती वाङमयीन नियतकालिक विकास परिषद

निरीक्षक :

प्रा. सुधाकर जोशी

युगवाणीच्या एप्रील-मे–जून १९८९ च्या अंकात एक दीर्घ संपादकीय लिहून, संपादक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांनी वाङमयीन नियतकालिकांच्या एका मोठ्या व्यथेला वाट मोकळी करून दिली होती. निखळ वाङमयीन जाणीवांच्या संवर्धनाचे व आविष्करणाचे महत्त्वाचे काम करण्यात व त्या निमित्ताने मराठी भाषेतील व्यवहाराचे, संवेदनेचे प्रतिबिंबन करणाऱ्या नियतकालिकांना विविध कारणांमुळे वाईट दिवस आले असून त्यातून विविध समस्या निर्माण होत आहेत आणि त्यावर उपाय शोधणे अगत्याचे झाले आहे असे आंत्यतिक पोटतिडिकेने ह्या संपादकीयात सांगण्यात आले होते. संपादकीयत काहीं उपाययोजनांचीही चर्चा केल्या गेली होती.

जुलै–ऑगस्ट-सप्टेंबर १९८९ च्या युगवाणी च्या अंकात आणखी एक छोटेसे संपादकीय लिहून व काही मान्यवरांची मते त्या विषयावर टिपणांच्या स्वरूपात प्रस्तुत करून एक चर्चाही त्यांनी घडवून आणली होती. युगवाणीतील त्या पहिल्या संपादकीयातून मांडलेल्या विचारांनी या समस्येची गंभीरपणे दखल घेण्यास अनेकांना प्रवृत्त केले. काहींनी संपादकीयाचे पुनर्मुद्रण करून साहित्यिक, संपादक, टीकाकार विचारवंतांना ह्यावर कळकळीने विचार करण्यास भाग पाडण्याचे धोरण जाहीर केले तर काहींनी सामूहिक कृतिशीलतेची आवश्यकता प्रतिपादिली.

वृत्तपत्रांनी सुद्धा ह्या समस्येची दखल घेतली आणि अग्रलेखांच्याद्वारा आपल्या वाचकांना वाङमयीन नियतकालिकांच्या होत असलेल्या परवडीची नोंद घेण्याचे आवाहन केले.

ह्या पार्श्वभूमीवर विदर्भ साहित्य संघाने दि. २७ मार्च १९९० रोजी नागपुरात एक वाङमयीन नियतकालिक विकास परिषद आयोजित केली होती. तत्पूर्वी पुण्याच्या मराठी साहित्य संमेलनात संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यु. म. पठाण यांनी या नियतकालिकांच्या उदरनिर्वाहाकरिता स्थायी निधीची तरतूद मागणारा एक ठराव संमत करून घेतला होता.

एकूण वाङमयीन नियतकालिकाच्या अस्तित्वाचा प्रश्न धसास लावण्याचे जे प्रयत्न युगवाणीच्या संपादकीयांमुळे होऊ लागले त्यातले एक भरीव महत्वाचे पाऊल म्हणजे २७ मार्चची वाङमयीन नियतकालिक विकास परिषद होती. युगवाणीचे प्रथम संपादक कै. वा. ना. देशपांडे यांच्या स्मृतीला ही परिषद अर्पण करण्यात आलेली होती.

पाच सत्रे १३ तासांची

विषयाची एकूण व्याप्ती लक्षात घेऊन त्याची पाच भागात वाटणी करून त्यावर पाच सत्रे राबविण्यात आली. सत्र विषय आणि त्यानिमित्ताने तयार करण्यात आलेली सहा प्रमुख भाष्ये अशी होती.

१. वाङमयीन नियतकालिके संकल्पना, भूमिका व कार्य / सूत्रधार : अस्मितादर्शचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे / प्रमुख निबंध : वामन तेलंग.

२. मराठी वाङमयीन नियतकालिकांची सद्य:स्थिती. : कारणमीमांसा, विकासातील अडचणी व उपाययोजना / सूत्रधार : डॉ. भास्कर गिरधारी / प्रमुख निबंध : डॉ. प्रभाकर बागले.

३. वाङमयीन नियतकालिकांच्या व्यावसायिकरणाची गरज ? / सूत्रधार डॉ. पद्माकर दादेगावकर / प्रमुख निबंध श्री. प्रभाकर पुराणिक.

४. साहित्य संस्थांची मुखपत्रे : संघर्ष, समस्या व उपाय / सूत्रधार : डॉ. गंगाधर पानतावणे. प्रमुख निबंध श्रीपाद भालचंद्र जोशी. (युगवाणीची दोन संपादकीय)

५. वाङ्मयीन नियतकालिकांचे पोषण : समाज, जनप्रतिनिधी, वृत्तपत्रे व शासन यांचे दायित्व. / सूत्रधार : प्रा. पुरुषोत्तम पाटील.

प्रमुख निबंध : १. डॉ. वि. स. जोग.

२. श्री. शंकर सारडा.

सहावे सत्र हे समारोपाचे असल्याने ह्या सत्रात चर्चा अशी फारशी अपेक्षित नव्हतीच. निरीक्षकांचा अहवाल, सूचना, ठराव आणि इतर कृतींची पाऊले उचलण्याच्या धोरणात्मक बाबी मांडणे व अनुमोदन देणे हेच होते.

सत्र १ ले : वाङ्मयीन नियतकालिके संकल्पना, भूमिका व कार्य

"मराठीची स्थिती ही केवळ वाङ्मयीन नियतकालिकापुरती मर्यादित नाही. एकंदर वाचनाच्याच प्रांतात ही परिस्थिती आहे. वाचनाचा एकंदरीत उत्साह कमी झाला असून साहित्याच्या दृष्टीने ही बाब चिंतनीयच. कदाचित ह्या चर्चेतून काही निष्पन्न होणारही नाही, पण तरीही ह्या जिव्हाळ्याच्या विषयावर चर्चा करणे महत्वाचे आहे. पुसदच्या विदर्भ साहित्य संमेलनातही वाचकांच्या कमी होत असलेल्या उत्साहाची काळजी केल्या गेली होती, त्या नंतर कित्येक वर्षे निघून गेलीत. आणि हा आटता उत्साह कमी होण्याचे काही थांबले नाही. ह्या काळात हे होत असतानाही मासिके वाचनीय कशी होतील ह्या बाबतीत कुणी प्रयत्न करीत नाही. मासिके वाचनीय राहलेली नाहीत कारण त्यांची विश्वासार्हता कमी होत आहे. मासिकांत भाषांतरित, स्वैर, अनुवादित, कल्पना परकीय, अशा प्रकारच्या गोंडस प्रयोगातून देशबाह्य कल्पना मराठी साहित्यात डोकावत आहे. त्यामूळे ह्या वाङ्मयात मन, आमच्या जीवनाचे संदर्भ हद्दपार होत आहे. अशी संदर्भहीनता आणि सध्याच्या मराठी वाचकांची विचक्षणता पूर्ण करण्याची ह्या वाङ्मयाची हतबलता ह्या दोन बाबींचा परिणाम म्हणजे त्याची एकूण विश्वासार्हता कमी होऊन त्यामुळे वाचनीय न ठरणे व त्यातून इतर मासिकांप्रमाणेच वाङ्मयीन नियतकालिकांबद्दलचा वाचकांचा ओढा कमी होत राहणे हा होय."

परिषदेला आशीर्वाद देताना कथाकार वामनराव चोरघडे ह्यांचे या समस्येचे विश्लेषण असे नवा विचक्षण मराठीवाचक- संदर्भहीनता आणि विश्वासार्हता अशा त्रिदोषावर आधारित होते.

नवा विचक्षण मराठी वाचक, त्यातला खरोखरच अमराठी किंवा देशबाह्य सकल्पना किंवा संवेदनाबद्दल नाराज आहे किंवा त्याला ओढ नाही व सध्याच्या वाङ्मयीन नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या कथा, कविता खरेच एवढे परकीय संदर्भ व्यक्त करतात का असा प्रश्न या निमित्ताने निर्माण होतो. जर सध्याचे मराठी जीवनच पाश्चात्य धर्तीचे किंवा अद्ययावत पद्धतीची वळणे होत असेल तर त्याचं प्रतिबिंबन वाङ्मयीन नियतकालिकात होणारच, चोरघड्यांच्या ह्या विश्लेषणात शिवाय दलित साहित्य, जनसाहित्य आणि ग्रामिण साहित्य ह्या साहित्यप्रकारांना वाहिलेले, त्या वाङ्मयीन मासिकांना वगळण्यात आले आहे. त्यावर 'भाषांतरित', कल्पना परकीय किंवा संवेदनेचा शिक्का मारता येत नाही.

डॉ. भाऊसाहेब कोलते यांचे विश्लेषण

"नियतकालिकांची वाढती गर्दी, वाङ्मयीन नियतकालिकांची प्रादेशिकता आणि त्यांच्या किंमती ह्यांचा मेळ वाचकाला घालता येत नाही. वाचक ह्या संदर्भात अगतिक आहे. आणि त्याचे अगतिकत्व नियकालिकांच्या संदर्भात संसर्गजन्य ठरत आहे. युगवाणी / प्रतिष्ठान / कवितारती / अक्षरवैदर्भी / नवभारत / महाराष्ट्र साहित्य पत्रिका / अस्मितादर्श इत्यादी दर्जेदारांबरोबरच हा दर्जा गाठू पाहणारी आणखी कित्येक, अशातून कुणाची निवड करावी ? विशेषत: वाङ्मयीन गुणवत्तेत, अर्वाचीनतेत किंवा इतर तत्सम निकषावर कुणीही कमी ठरत नसताना केवळ मध्यमवर्गीय वाचकांची सीमा–द्रव्यबळावर अपुरेपण, ह्या सीमेच्या संदर्भात वाचकांची क्रयशक्ती कमी पडून तोच स्वत: संभ्रमात पडतो. अशा वेळेस वाचकाच्या केवळ पाठिंब्यावर वाङ्मयीन नियतकालिके टिकूच शकत नाही. त्यांना प्रकाशक,

मुद्रक, जाहिरातदारांचाही पाठिंबा असायला हवा. त्यांनी त्यांचे उत्तरदायित्व स्विकारायला हवेच.

या परिषदेला बंद पडलेल्या मासिकांच्या प्रतिनिधींना देखील निमंत्रणे होती परंतु त्यापैकी कुणीही प्रतिनिधी हजर नव्हते. त्यांच्या असण्याने परिषदेच्या चर्चेत मोलाची भर पडली असती ही गोष्ट महत्वाची होती. म्हणजे मासिके बंद पडण्यात वाचकांचा निरुत्साह वगैरे काही बाबीं-बरोबरच संपादक, प्रकाशकही वाढत्या स्पर्धेच्या या युगास, आपला आवाज आणि अनुभव दुसऱ्यांच्या कानावर टाकून प्रयत्नांना धार आणण्याचा मनस्थितीत नाही असे हताशतेचे दृश्य आहे, असे असे डॉ. भाऊसाहेब कोलत्यांनी आपल्या अध्यक्षीय भाष्यात मांडून, ह्या अनुपस्थितीचा उल्लेख करून, एकंदर अगतिकतेच्या सीमा कुठपर्यंत भिडल्या आहेत ह्याचे दर्शन घडविले.

सत्र पहिले : संकल्पना, भूमिका, कार्य वगैरे

"नियतकालिकांच्या संकल्पनेत कार्यकारण भापाचे एक तार्किक चक्र आहे. एक विशिष्ट कार्य करण्यासाठी नियतकालिक कारण बनून निर्माण होते. हे कार्य संपले की त्या कारणाचे अस्तित्वही संपुष्टात येते. एखाद्या चळवळीला वाहून घेतलेले, मग ती चळवळ वैचारिक असो–कलात्मक असो–किंवा वाङ्मयीन असो–मासिक निघाल्या नंतर ही चळवळ आणि ते मासिक दोघेही परस्पर पूरक पद्धतीने विकसित होतात. चळवळीचे उद्दिष्ट साध्य झाले किंवा चळवळच संपुष्टात आली की मासिक सुद्धा बंद पडते, किंवा क्षीण व्हायला लागते, असे हे चक्र.

अशा परिस्थितीत अशा मासिकांच्या अस्तित्वाचे कारण एकांगी असल्याने ते इतर विषयांच्या अंगाच्या बाबतीत 'सोवळे' राहते व त्यामुळे त्याचा आधार एकखांबी असतो किंवा पोषण एकाच मूळातून होते. 'सोवळे–ओवळे' मानणाऱ्या अशा वाङ्मयीन नियतकालिकांचा अपमृत्यू हा त्या भाषिक समाजाच्या इतर जाणीवांना स्पर्श न करण्याचा, त्यांना प्रतिबिंबित न करण्यामुळेच येतो. सत्यकथेचा मृत्यू हा असाच जीवनातील इतर अनेक प्रभावी घटनांना संदर्भहीन व अस्पर्श मानल्याचा परिणाम. असा ऱ्हास होत राहतो. कारण पर्यायाने अशा मासिकांचा लेखक व वाचकवर्गही संकुचित होत जातो." हा वाचन तेलंगाच्या वाङ्मयीन नियतकालिकांच्या संकल्पनेचा पूर्वभाग होता. भोवतालच्या सर्वच बाबींचे विश्लेषण करणे, वाचकांच्या वैचारिक/वाङ्मयीन प्रवृत्तीचा मागोवा घेणे, (नुसते कलात्मक दर्जा राखणारे किंवा 'कला' ह्या संज्ञेला पात्र ठरणारेच नव्हे) हे वाङ्मयीन मासिकात असावे; त्याचप्रमाणे ते सर्वस्पर्शी असावे, जीवनातल्या सर्व प्रवाहांची, चळवळींची दखल घेणारे असावे. उदा. नवता हे मूल्य कलात्मक पातळीवरचे असूनही ते मूल्य जर पर्यावरण चळवळीला सामाजिक पातळीवरून लागू होत असेल, तर वाचकाच्या जिव्हाळ्याच्या संदर्भातही तो एक नवा विषय, वाङ्मयीन नियतकालिकांचा स्पर्शविषय होऊ शकतो, असे तेलंगांचे विवेचन होते. नवीन वातावरण, नवीन जाण, म्हणून नवनवीन विषय अशी जवळपास सर्वसमावेशक संकल्पना ह्या सत्रात पुढे आली.

एकूण आजचा वाचक केवळ कलाशाखेचा अभ्यासक नसून तो, विज्ञान शाखेचा, समाजशास्त्राचा, वैद्यकशास्त्राचा किंवा परंपरागत पद्धतीने कलाबाह्य मानल्या गेलेल्या इतर कोणत्याही शाखेचा असतो. ह्याचे भान वाङ्मयीन नियतकालिकाच्या संपादकाने राखावे आणि अशा वाचकाची त्या त्या संदर्भातील वाङ्मयीन–बौद्धिक भूक त्याने आपल्या नियतकालिकातून भागवावी [अर्थात हे साहित्य निरस राहणार नाही ह्याची संपादकाने काळजी घ्यावी हे अभिप्रेत आहेच].

आजची वाङ्मयीन नियतकालिके ह्याची जाग ठेवीत आहेत काय ? ह्याचे उत्तर अर्थात होय आणि नाहीही असेच द्यावे लागेल. विषयाचे वर्ज्यत्व हळूहळू कमी होत आहे. प्रमुख निबंधातही ही भूमिका जवळपास सर्वमान्य होती. सत्राचे सूत्रधार डॉ. गंगाधर पानतावणे ह्यांनी आपल्या समारोपीय भाष्यात ती उचलून धरली. निव्वळ वाङ्मयीन न राहता मासिक हे वाङ्मयाच्या पातळीवरून समृद्ध झालेल्या अवांतर विषयांनाही स्पर्शणारे व प्रदर्शित करणारे असेच असावे असे त्यांनी आवर्जून मांडले.

पुढील चर्चेत "सत्यकथेचा सोवळे-ओवळेपणा" ह्याबद्दल दुमत असू शकते. आणि ते होतेही. साक्षर नसणाऱ्या समाजाचे वाङ्मय प्रस्तुत व्हायला लागल्यावर त्याची दखल सत्यकथेने निश्चितपणे घेतली होती ती नवतेच्या निकषावरच. निव्वळ कलावाद सत्यकथेने स्वीकारला नव्हता तर ह्या नवीन प्रागतिक जाणीवांचे सौंदर्यस्पर्शी स्पंदन सत्यकथेला जाणवले होते व त्याचे प्रकटन करणे ही सत्यकथेची वाङ्मयीन भूमिकाच होती. अर्थात वाङ्मयवत्ता हा निकष कायम होताच असे, प्रा. पुरुषोत्तम पाटील म्हणाले.

खरे म्हणजे ह्या चर्चेच्या वेळी निमंत्रणानुसार राम पटवर्धन किंवा श्री. पु. भागवत हजर असते; तर चर्चा आणखी भरीव झाली असती. खरोखरच वाङ्मयीन मासिके सर्वस्पर्शी व्हावीत काय? ह्या सर्वस्पर्शीपणाच्या मोहात वाङ्मयीन निकषांचे काय? हा सर्वस्पर्शीपणा गरजपोटी व सोयीसाठी म्हणून की वाङ्मयीन गरज व वाङ्मयीन निकषांच्या एकूणच बदलत्या वातावरणापोटी त्याला वाङ्मयीन नियतकालिकांत किती स्थान किंवा त्याचे निखळ वाङ्मयीन काय प्रमाण असावे? सवगोलकारी [होल्डॉल] होणार नाही ह्याचे तारतम्य बाळगावे असे डॉ. कुळकर्णी म्हणाले. नियतकालिका बाबत, ते वाचक / रसिकांची चिंतनशीलता वाढविणारे असावे अशी संकल्पना ह्या सर्व चर्चेच्या घुसळणीतून बाहेर आली.

प्रा. पुरुषोत्तम पाटील म्हणाले वाङ्मयीन नियतकालिकांपेक्षा वृत्तपत्रांच्या रविवारीय पुरवण्यांना जास्त मागणी असणे हे दुर्दैवी जरी असले, तरी (प्रा. पुरुषोत्तम पाटील) त्याचे कारण नियकालिकांच्या संपादकात आपल्या वाङ्मयीन भूमिकेचा स्पष्टपणा नसणे व त्यामुळे त्याची कठोरपणे अंमलबजावणी न करणे ह्यात आहे. वामन तेलंगाचा सत्यकथेच्या सोवळे—ओवळेपणाबद्दलचा दृष्टांत पुरुषोत्तम पाटलांनी अतिशय समर्थपणे आणि हिरीरीने खोडून काढला. वाङ्मयीन नियतकालिकांच्या गुणवत्ताधारित सर्वसमावेशक भूमिकेला समर्थन देण्यास प्रा. पुरुषोत्तम पाटील, डॉ. गिरधारी, डॉ. श्रीकांत तिडके, डॉ. कुलकर्णी, डॉ. खांदेवाले, डॉ. सुभाष सावरकर (अक्षर वैदर्भी), डॉ. प्रभाकर वागले, आदी होते. अर्थात प्रत्येकाने आपआपल्या अटी त्याबरोबर मांडल्या होत्याच.

ह्याउलट वाङ्मयीन नियनकालिकाने असे काहीही होऊ नये; निखळपण राखण्यातच त्याचे वैशिष्टय आहे, ही वाङ्मयीन नियतकालिकामागची आद्य भूमिका असल्याने ती संकल्पनाच कायम ठेवणे अशीही भूमिका डॉ. आशा सावदेकर यांनी मांडली. डॉ. पद्माकर दादेगावकर (हैद्राबाद) जोग, तरुण भारताचे संपादक श्री. लक्ष्मणराव जोशी, आदींची ही भूमिका अर्थात जोरकसपणे त्यांचेकडून मांडल्या गेली पण तरी पूर्णपणे स्विकारल्या मात्र गेली नाही.

विविध विषयांना स्पर्शणारी मासिकेही बेटासारखी एकमेकांपासून अलग—अलग राहून-जगण्याचा प्रयत्न करतात असे दिसले. ह्या बेटांनी एकत्रित होण्याचा परस्परपूरक असा प्रयत्न करावा असे डॉ. प्रकाश खरात म्हणाले. वाङ्मयीन नियतकालिक सर्वसमावेशक असतानाच ते सवगोलंकारी नसावे व शिवाय त्याचे सर्वसमावेशकपण हा विकासासाठी (पळवाट म्हणून नव्हे) पर्याय आहे असे डॉ. सुभाष सावरकर म्हणाले, वाङ्मयीन नियतकालिकांनी सर्वसमावेशकांच्या निकषाबरोबरच समाजाचा उपयोग हाही निकष लावावा असे डॉ. विमलकिर्ती यांचे म्हणणे होते. संवादमाध्यमाच्या भाराखाली दबलेल्या रसिकांचे उरलेले निकोपमन जपण्याचा वाङ्मयीन नियतकालिकाने प्रयत्न करावा असे दिलीप राखोडे म्हणाले तर वाङ्मयीन नियतकालिकांची संकल्पना ही करमणुकीतून लोकशिक्षण असावी असे ज्येष्ठ पत्रकार श्री. परांडे म्हणाले. समाजाला उपलब्ध असलेल्या साधनांच्या सुयोग्य व नियोजित वापराने जाणीवांचे प्रवाह मोकळे करावे असे वास्तु शिल्पज्ञ श्री. अशोक जोशी यांचे मत होते. नियतकालिक तात्कालिक असले तरी त्याची उपयोगिता नतर येणाऱ्या पिढयांनाही असतेच व म्हणून ती सर्वस्पर्शीच असावीत, असे डॉ. किर्ती यांचे म्हणणे. निबंध हा वाङ्मयाचा एक प्रकार

आहे व त्यातून मानवी व सामाजिक समस्यांचा विचार होत असतो तेव्हा वाङ्मयीन नियतकालिकातून निवंधास स्थान असण्याचाही भाग त्यांच्या संकल्पनेत असावा. लेखकाने इमानदार असावे. लेखकाच्या क्षमतेवर व वाचकांना समजून घेण्यावर या नियतकालिकांचे यश अवलंबून आहे. आजच्या समस्या ह्या लेखक आणि संपादकांनीच निर्मिलेल्या आहेत. त्यांचे त्यांनीच निराकरण करावे, असे प्रकाश जोग म्हणाले. डॉ. सुभाष सावरकर म्हणाले की ध्येयवादी जिद्दीपण हवे. सर्वस्पर्शी असावे पण सवगोलंकारी नको. वाङ्मयीन गुणवत्ता कमी व्हायला नको. [पुरुषोत्तम पाटील] व सर्वसमावेशकपणात तारतम्य वाळगण्यात यावे [डॉ. कुलकर्णी] ह्या निकषांचा चर्चेत स्वीकार झाला.

ह्या चर्चासत्राच्या समारोपाच्या भाष्यात नियतकालिकांच्या ऐतिहासिकतेचा मागोवा घेत ह्या नियतकालिकांमागील संकल्पनांमध्ये काळाच्या प्रवाहात कसे बदल होत गेले ह्याचे विश्लेषण करीत, डॉ. गंगाधर पानतावणे ह्यांनी हे सर्व निष्कर्ष सूत्रबद्ध केले. विलक्षण वेगाने विकसीत होत असलेल्या, मानवी जीवनाच्या विविध स्तरावरून येणाऱ्या हुंकारांना स्विकारणे हे वाङ्मयीन नियतकालिकांना आवश्यक असून जीवन निरपेक्ष काहीच नसल्याने सर्वच प्रयत्नांची जाण ठेवणे, निखळ वाङ्मयीन असा एकांगीकरणाचा त्याग आणि अभिव्यक्तीचे सर्वस्पर्शीपण संपादकाने आपल्या नियतकालिकाच्या संपादनात येऊ देणे हे क्रमप्राप्त व अती आवश्यक आहे. विषयांचे कोंवणे तेवढे टाळावे, वाङ्मयीन गुणवत्तेचा निकष असूच द्यावा असे डॉ. पानतावणे म्हणाले.

सत्र २ रे : वाङ्मयीन नियतकालिकांची सद्य:स्थिती

वाङ्मयीन नियतकालिके; काही बंद पडलेली, काही अल्पायुषी, काही पडण्याच्या मार्गावर, काही ऑक्सीजनवर, तर काही सलाईनवर. इतर संवादमाध्यमे [जर वाङ्मयीन नियतकालिके ही संवादमाध्यमाचाच एक प्रकार मानला तर] मात्र जोरात. वृत्तपत्रे, दूरदर्शन यांची वाढती आक्रमणे –नियतकालिकांचे एकंदर माघारलेपण, लेखकांची व वाचकांची ही अनावस्था, हे सर्व प्रा. प्रभाकर वागले यांनी सांगताना त्याची कारणमीमांसाही करण्याचा प्रयत्न केला. संवेदनेची विकासप्रक्रिया सुरू ठेवणारी ही नियतकालिके संवेद्यपणे भावणे' ह्याचे वाचकाला वाचनाबरोबरच शिक्षणही देत असतात. एखादे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होण्यापूर्वीच ते नियतकालिकातून क्रमशः येत राहते आणि त्यायोगे वाचकाची भूमिकाच ह्या संदर्भात तयार होण्याचे काम नियतकालिक करीत असते. म्हणून वाङ्मयीन नियतकालिक असलं काय नसलं काय अशी वाचकांची भूमिका तयार होणं ही एकंदर वाङ्मयाच्या दृष्टीनेच धोक्याच कंदील आहे, असे ते म्हणाले.

नियतकालिकांच्या संदर्भात आलेल्या एकंदर थंडपणाचा मांडण्यात आलेला हिशेब हा असा

१. लेखकाचा थंडपणा : माझी कथा /कविता/ टिपण स्वीकारत नाही म्हणून मी त्या नियतकालिकाच्या संदर्भात थंड ! माझं काय चुकलं ?

२. संपादकाचा वैताग : नियतकालिकातून प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यावर वाजवीपेक्षा जास्तीची कधीकधी न भावणारी टीका. संपादकाला सांभाळून घेण्याची प्रवृत्तीच नाही.

३. इतर लेखकांचा उपरोध "सत्यकथा" संप्रदाय चालवता काय ? मग आमचं सहकार्य नाही.

४. आर्थिक बाजू लेखकाची मानधनाची वास्तव मागणी संपादकाला अशक्य. लेखकाचे दुरावणे.

५. वाङ्मयीन नियतकालिकातील ललितेतर लेख : वाचकांना ते न आवडणे म्हणून त्याचे आकर्षण कमी होणे.

६. संपादकीय धोरण अस्थिर : कारण संपादक सतत काही कालनुक्रमे बदलल्या जातो. संस्थेची कार्यकारिणी बदलते, तेव्हा तेव्हा साहित्यिक संस्थांच्या बाबतीत किंवा विश्वस्त बदलतात तेव्हा.

७. इतर वाङ्मयासारखी वाङ्मयीन नियतकालिके ही विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात नसतात. संदर्भाकरिता त्यांची शिफारस केल्या जात नाही म्हणून विद्यापीठे उदासीन, व वाङ्मयाचे विद्यार्थी उदासीन. ते वर्गणीदार नसतात म्हणून.

८. नियतकालिकांचे पेव फुटणे वाचकांनी कोणते घ्यावे कोणते न घ्यावे ? परिणामी नकार तर काहींचा स्वीकार व त्यातील चढउतार.

९. ज्या विशेष ध्येयासाठी नियतकालिक निघते त्याचे साध्य होणे व परिणामी संबंधित नियतकालिकाच्या अस्तित्वाचे प्रयोजनच संपणे. (सत्यकथा) किंवा त्याच ध्येयासाठी एकतर वाङ्मयीन नियतकालिकांचे अस्तित्वात येणे व मूळ नियतकालिकाच्या प्रयत्नांच्या प्रयोजनाचे प्रमुखपण नष्ट होणे.

१०. वाचकांची सौंदर्यरुची-अभिरुची इतर माध्यमातून पूर्ण होणे व म्हणून वाङ्मयीन नियतकालिकांचे आकर्षण न राहणे.

११. एकंदरीतच सांस्कृतिक दर्जा खालावणे व उथळ स्वस्त प्रवृत्ती बोकाळणे.

१२. आर्थिक कारणे.

१३. दूरदर्शन व भाषिक वृत्तपत्रांच्या साप्ताहिक पुरवण्यातून वाङ्मयीन भूक भागत राहणे.

१४. वाचकांच्या सामाजिक बांधिलकीस योग्य प्रतिसाद देणारे वाङ्मयीन नियतकालिक नसणे. (ह्या सर्वस्पर्शी कारणपरंपरेवर मात करण्यासाठी अनेक उपायांचाही विचार चर्चेत करण्यात आला.)

उपाययोजनांच्या संदर्भात—ती अत्यावश्यक व अगत्याची असल्याने—कारण नियतकालिकांच्या अस्तित्वाशीच त्यांचा सरळ संबंध असल्याने झालेली चर्चा अत्यंत उद्बोधक व प्रबोधनपूर्ण अशीच होती. त्यात महत्त्वाचे जे विविध उपाय सुचविण्यात आलेत ते असे.

१. लेखकांनी विशेषत: आघाडीवरच्या लेखकांनी थंडपणाचा त्यांचा निर्णय बदलावा, आणि त्यांचे सर्जनशीलतेचे व्रत त्याने चालू ठेवावे. नियतकालिकाच्या संपादकांना स्वत: कडून सहकार्य देत राहावे. एकंदर वाङ्मयाच्या समृद्धीचा दृष्टिकोण समोर ठेऊन हे व्हावे.

२. टीकाकारांनी आपल्या अस्त्रांचा वापर तारतम्याने करावा, संपादकाला व लेखकांना जायबंदी करताना लेखक-संपादक व पर्यायाने अशी नियतकालिकेच नष्ट होण्याचा धोका स्वत:च्या ललित लेखकांच्या व संपादकांच्या हितासाठी तरी पत्करू नये. थोडी कमी आक्रमक व व्यवहारवादी भूमिका घेतल्यास ते सर्वांच्या सोयीचे व भल्याचेच होय. संप्रदाय हा तसा नसतोच. तसे एखादे 'स्कूल' असू शकेल. व त्या 'स्कूल'च्या मागची वाङ्मयीन भूमिका तपासून घ्यावी. संप्रदाय—संप्रदाय असले शिक्के मारण्याचेही कारण नाही.

३. संपादकाच्या किंवा साहित्यिक संस्थांच्या मर्यादा व अडचणी ओळखून साहित्यिकांनी मानधनाचे धोरण सैल करावे. वाचकांनी वाङ्मयीन नियतकालिकांतील वैचारिक, प्रबोधनपूर्ण ललितेतर साहित्य हे एकंदर वाङ्मयीन जीवनाला पूरक व निर्मितीक्षम आहे हे ओळखून अशा साहित्याला वगळा अशी मागणी न करता त्याचे अस्तित्व देखील अपरिहार्य आहे ह्याचे भान राखावे.

४. साहित्य संस्थेची कार्यकारिणी बदलली तरी संपादक तावडतोब बदलण्यात येवू नये. किंबहुना संपादक व कार्यकारिणी यांची अशी सांगड न घातलेलीच बरी. संपादकाचा कार्यकाल हा कार्यकारिणीच्या कार्यकालापेक्षा अधिक मोठा असावा आणि जेव्हा नवीन संपादक सूत्रे स्विकारतो तेव्हा त्यानेही संपादकीय धोरणात अचानक वाटेल असे मोठे परिवर्तन घडवून आणू नये. परपरांना फारसे खंडीत न करता नव्या वाङ्मयीन परंपरा त्याला निर्माण करता येतात, राबवता येतात. संपादकानेही जुन्या कसदार लेखकांकडून साहित्य योग्य प्रमाणात मिळेनासे होत असल्यास अथवा सातत्य व नवता राखण्यासाठी, नवीन कसदार लेखकांची जाणीवपूर्वक व अगत्याने दखल घेत रहावेच.

५. मराठीचे प्राध्यापक, महाविद्यालयांचे प्राचार्य व ग्रंथालय यांनी प्रयत्नपूर्वक महाविद्यालयाच्या अनुदानातील काही भाग निश्चितपणे वाङ्मयीन नियतकालिकांच्यासाठी राखून ठेवावा. प्राध्यापकांनी स्वत:हून वर्गणीदार होणे व

आपल्या विद्यार्थ्यांमध्ये ती जाणीव निर्माण करणे ह्या संदर्भात अगत्याचे आहे. ह्याच पद्धतीने जिल्हापरिषदा, नगर व महानगर पालिकांनीही पुढाकार घ्यावा. सांस्कृतिक संस्थांनीही या संदर्भातील आपले उत्तरदायित्व स्विकारावे.

६. एकाच वळणाची किंवा सारख्या विषयांना वाहिलेली किंवा सर्वच विषयांचा अंतर्भाव करणारी अनेक वाङमयीन नियतकालिके निघायला लागल्यास होणाऱ्या अपमूल्यला किंवा वाचक वर्ग रोडावत जाण्याच्या प्रक्रियेला थोपविण्यासाठी संबंधित सर्व संपादकांनीच विचार करावा. जमल्यास एकत्र यावे, विशिष्ट वाङमय प्रकारांनाच वाहून घ्यावे व त्या संदर्भातील भरपूर साहित्य वाचकाला प्रत्येकाने मिळते करावे; असे 'स्पेशलायझेशन' सुद्धा त्या त्या नियतकालिकाला तारक ठरू शकेल.

७. दूरदर्शन (प्रकाशवाणी ?) वरील वाङमयीन कार्यक्रम, फिचर्स, वृत्तपत्रांच्या साहित्य विषयक पुरवण्या, त्यांचे विशेषांक ह्याचा वाढता प्रभाव कमी होणे आवश्यकच आहे. त्यासाठी त्यांचीही हत्यारे वाङमयीन नियतकालिकांच्या संपादकांनी वापरणे क्रमप्राप्त झाले आहे. त्याकरिता चमकदारपणा, चांगली छपाई, सुबक व आकर्षक रचना, जाहिरातींचा स्विकार, चित्रांचा, रंगांचा उपयोग, इत्यादी व इतर सर्व अंगांचा कौशल्याने वापर करणे म्हणजे वाङमयीन नियतकालिकांच्या संपादनात व्यावसायिक दृष्टिकोण स्वीकारणे होय. (ह्यावर एक स्वतंत्र चर्चासत्रच होते.) वाचकांना सातत्याने आकर्षित करीत राहणे व टिकवून ठेवणे हे महत्त्वाचे.

उपायांच्या अनुषंगाने मराठी भाषिक कारखानदार, उद्योगपती व मराठी भाषिक कलावंत यांच्या परस्पर सहकार्यातून वाङमयीन नियतकालिकांच्या पोषणासाठी एखादा मोठा निधी उभा करण्यासाठी ज्येष्ठ व नावाजलेल्या संपादक प्रकाशकांनी प्रयत्नशील होणे असाही एक उपाय सुचविण्यात आला. मे. पु. रेगे, श्री. पु. भागवत, इचलकरंजीचे उद्योगपती कुळकर्णी, लता मंगेशकर, किर्लोस्कर ही नावे ह्या निमित्ताने या चर्चेत पुढे आलीत. ह्या मान्यवरांचा सक्रीय सहभाग, व त्यांचे वाङ्मयाच्या मुख्य प्रवाहात अशा प्रकारे सामील होणे अतिशय मोलाचे ठरेल असे सर्वांचेच (जवळपास) मत पडले. अर्थात किर्लोस्कर मासिकेच जिथे हस्तांतरित झालीत किंवा जी नियतकालिके प्रस्थापित नाहीत किंवा प्रस्थापित साहित्यमूल्याच्या विरोधात जाऊन नवी साहित्यमूल्ये प्रस्थापित करून पाहत आहे त्या नियतकालिकांना अशा प्रतिष्ठितांकडून न्याय मिळणार नाही, साधनसंपन्नतेने व्यक्तीची वैचारिक बैठक बदलते व त्यामुळे त्या त्या विचारांची किंवा दृष्टिकोनाची सावली वाङमयीन नियतकालिकांवर पडण्याचा धोका कां पत्कारायचा ? व अस्यायिकांच्या साहित्यिक नियतकालिकांना प्रस्थापित सहाय्य करणे कसे शक्य आहे ? इथपर्यंतच्या सर्व शंका–पृच्छा–नकार ह्या निमित्ताने चर्चेत प्रकट झालेत.

ह्या संदर्भात लोकांची वाङमयीन-वैचारिक साक्षरता ही ह्या नियतकालिकांचा खरा आधार आहे. जशी उद्योगपतीचा आधार असलेली मासिके हस्तांतरित होऊ शकतात तशी परिस्थिती राजकीय पक्षाचे पाठबळ असलेली मुखपत्रे (उदा. लोकवाङमय) ही कामगारांना भावेनाशी होतात तेव्हा अशा अवस्थेत नुस्तीच साक्षरता महत्त्वाची नसून बांधिलकी असलेला जनाधार हा 'क्ष' घटक वाङमयीन नियतकालिकांना पुढे नेण्यास आधारभूत ठरेल असा विचार पुढे डॉ. खांदेवाले, डॉ. वि. स. जोग, यांनी मांडला. अर्थात हा क्ष घटक म्हणजे नक्की काय हे निश्चित नाही. पण क्ष म्हणजे वाङमयीन गुणवत्ता–व्यावसायिकता–परस्पर सहकार वगैरे.

सत्र २ : समारोपीय भाष्य : डॉ. गिरधारी यांचे

नियतकालिकांचा एक "फॉर्म पिरीअड" असतो. तोपर्यंत ते वाळसे धरुन आपला वाचक वर्ग तयार करते, पण हा "फॉर्म पिरीअड" केव्हातरी उत्पत्ती–स्थिती–लय ह्या पद्धतीने संपतो आणि ते नियतकालिक ही संपते. तोपर्यंत त्या नियतकालिकांच्या प्रयोजनासंबंधीच्या कल्पनाही रावबून झालेल्या असतात.

नवीन नियतकालिकांचे निघणे हेंही जुन्यांच्या विघटनाला जबाबदार असतेच. जुन्यांनी साधलेली वाङ्मयीन पातळी वरची असल्याने त्याचा लेखकांचा गटच तयार होतो आणि ह्या गटाची मक्तेदारी संपविण्यासाठी दुसरी नियतकालिके निघतात. जुने लयाला जाण्याचे पर्व सुरू होते.

मराठीच्या प्राध्यापकांची वाङ्मयीन नियतकालिकांच्या संदर्भातील उदासीनता प्रकर्षाने जाणवणारी आहे. (न वाचता जर प्राध्यापकांचे भागत असेल तर त्यांना वाङ्मयीन नियतकालिकांच्या अस्तित्वाच्या संदर्भात जाग तरी कशी आणायची ही डॉ. प्रभुदेसाईंची चिंता) सहकारी तत्त्वावर आधारित उपाययोजना फारशी उपकारक ठरत नाही. (पत्रकार परांडे ह्यांची ह्या बद्दलची एक सूचना होती.) सरकारी मदत देताना साहित्य संस्था, ट्रस्ट इत्यादी बरोबरच व्यक्तिगत पातळीवर चालविल्या जाणाऱ्या वाङ्मयीन नियतकालिकांचाही अगत्याने विचार व्हावा. साहित्य संस्था किंवा ट्रस्टमधली रस्सीखेच व्यक्तिगत पातळीवरील प्रयत्नांत नसते हे त्यातल्या त्यात चांगले लक्षण. महाराष्ट्रात ९०० महाविद्यालये आणि १२०० कनिष्ठ महाविद्यालये असून नियतकालिकांची ही दशा. याचा अर्थ प्रयत्न कुठं तरी कमी पडतात. विद्यापीठाच्या अभ्यास मंडळानेही ह्या संदर्भात पुढाकार घ्यावा. आणि शेवटी जबाबदारी ही वाचकांची, अभिरुचीसंपन्न मराठीभाषिक समाजाची व प्राध्यपकांचीही आहेच. ती सर्वांनी निभविण्याच्या प्रयत्नात वाङ्मयीन नियतकालिकांच्या अस्तित्वाचा प्रश्न गुंतला आहे. असे डॉ. भास्कर गिरधारी दुसऱ्या सत्राचे समारोपीय भाष्य करताना म्हणाले.

सत्र ३ रे : वाङ्मयीन नियतकालिकांचे व्यावसायीकरण

"स्पर्धेच्या या युगात वाङ्मयीन नियतकालिकांचे व्यवसायीकरण" होणे आवश्यक आहे. व्यवसायीकरण म्हणजे "बाजारूपणा" नव्हे. आर्थिक चक्रात सापडलेल्या ह्या नियतकालिकांना त्यांच्या माध्यमातून नेमक्या कोणत्या संस्कृतीचे आणि समाजाचे दर्शन घडवायचे आहे याचा निर्णय घेता येणे, ह्या संस्कृतीत-समाजात होत चाललेल्या बदलाचा वेध घेता न येणे ह्यामुळे ही आर्थिक दुरावस्था निर्माण झालेली आहे;" असे प्रभाकर पुराणिक या सत्राची सुरवात करताना म्हणाले. नियकालिकांच्या सद्य:स्थितीतील कुंठावस्थेच्या विश्लेषणानंतर त्याच्यावरील त्यांची उपाययोजना म्हणजे अशा नियतकालिकांचे व्यावसायीकरण होय असे त्यांनी आणि नागपूरातील महाराष्ट्रीय उद्योजककरणाचे प्रवर्तक श्री. दिलीप देवधर ह्यांनी मत मांडले, तशा आशयाचे श्री. पुराणिक यांचे टिपणही ह्यापूर्वी युगवाणीत प्रसिद्ध झाले होतेच. त्याचाच धागा पकडून त्यांनी आपल्या सिद्धांताची या परिषदेत मांडणी केली होती.

मराठी वाङमयीन नियतकालिकांच्या संपादकांनी तोंड वेंगाडण्यापेक्षा ती पूर्णत: व्यापारी / व्यावसायीक पद्धतीने चालवावी; व्यापाऱ्यांशी, उद्योजकांशी दोस्ती करावी. वृत्तपत्रांचे संपादक ज्या व्यावसायिक पद्धतींचा अवलंब वृत्तपत्रांच्या व्यवस्थापनात करतात त्याच पद्धतीचा अवलंब या नियतकालिकांच्या संपादकांनी करावा. तीं लोकाभिमुख कशी होतील ह्याच्या नवनव्या क्लृप्त्या शोधाव्यात. त्यासाठी वाटल्यास कार्यशैली बदलावी. समाजात भरपूर पैसा उपलब्ध आहे. त्याचा ओघ स्वत:च्या नियतकालिकाकडे वळवण्याचे प्रयत्न करावे.

व्यावसायीकरण म्हणजे नुसत्या जाहिराती मिळवणे आणि छापणे नसून एखाद्या उपक्रमाला व्यवसाय म्हणून पहाण्याच्या दृष्टिकोनातून ज्या काही धोरणांचा क्लृप्त्यांचा, पावलांचा पाठपुरावा करावा लागतो व जी चिकाटी, धाष्टर्य, लवचिकपणा अंगी बाणवावा लागतो तो होय. त्यासाठी थोडीशी किंमतही मोजावी लागते. हे सर्व ह्यात पर्यायाने येतेच. अर्थात अशा पद्धतीने चालविलेल्या मासिकांना मोठ्या प्रमाणात जाहिराती व जनाधार मिळण्याची भरपूर शक्यता असते म्हणून संपादकांनी हे करावेच. काही साहित्यबाह्य गोष्टी कराव्या लागतात. उदा. वसुलीचा तगादा लावणे, जाहिरातदारांशी संपर्क प्रस्थापित करणे- तर त्यात वावगे काहीच नाही, व संपादकाने बिचकून जाण्याचेही कारण नाही.

नियतकालिकांच्या संपादकांचा नसेल पण साहित्यिकाचा, साहित्य संस्थांचा, राजकारण्यांशी जर संबंध असू शकतो तर व्यावसायिकांशी, उद्योगपतींशी का असू नये? त्यात वाईट काय? त्यांनाही साहित्य प्रेम आहेच. ते लोक सभ्य असू शकत नाही काय? वाङ्‌मयीन व्यवहारातील त्यांची उत्कंठा आणि रुची ह्यांचा आपण फायदा कां घेऊ नये? लिज्जत पापडाची जाहिरात आणि मंगेश पाडगावकरांची कविता हे आता समीकरण दृढ झाले आहे आणि त्याने पाडगावकरांची कविताही बिघडली नाही, वा प्रतिष्ठाही घसरली नाही असे प्रतिपादन या सत्रात हिरीरीने पुराणिक-देवधर यांनी केले.

व्यावसायीकरण करायचे म्हणजे त्यासाठी पूर्णवेळ संपादक नेमावा लागेल (अंशकालीन, न्याय देऊ शकणार नाही) त्याने नियतकालिकांचे व्यवस्थापन व संपादन अर्थानुवर्ती धोरणाने करावे, एक छंद म्हणून नाही.

पुराणिक-देवधरांच्या निबंधाची तार्किक बाजू निश्चितच भक्कम होती पण प्रत्यक्षात अशी नियतकालिके या पद्धतीने चालवतो म्हटले तरी तसा वाव आहे काय आणि वाचकांना खरेच ती तशी चालविल्या जावीत असे वाटते काय? हा प्रश्न उरतोच!

कारण अशा प्रकारे प्रयत्न केला तरी अनुभव समाधानकारक नाहीच. वर्गणीदार अनुत्सुकच आणि व्यापारीही जाहिराती देण्यात मागेपुढे पाहतातच. असा 'साहित्य सूची'चे संपादक अनिल वळेल ह्यांचा 'अनुभव' त्यांनी मांडला. ह्यावर तोडगा असा की, आपल्या मासिकाच्या वाचकवर्गातील थोडीशी माहिती-जर संपादकाने गोळा केली व ती जाहिरातदारांकडे रँडम पद्धतीने पाठवून दिली तर त्याच्या आधारावर ते ते व्यापारी किंवा उद्योजक आपल्या जाहिराती संपादकांकडे पाठवतील. जाहिरात वाया घालवायची नसल्याने अशी एक 'खिडकी' संपादकाने त्यांच्यासाठी उघडली तर श्रम थोडे जास्त होतील, पण जाहिरातीही मिळतील. शिवाय उद्योजकांच्या हाती काही सूत्र द्यायची नसतात. डॉ. सुभाष सावरकरांनी याचे समर्थन करताना असे मत मांडले की वाङ्‌मयीन मासिकांच्या संपादकाने व्यवस्थापनाच्या अद्ययावत पद्धतींचा आग्रह धरावा. शुद्ध वाङ्‌मयीन दृष्टीने नियतकालिक चालविण्याच्या धोरणातील "व्रतस्थ कडकपणा" सैल करून जमल्यास व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापन करण्याच्या तंत्रांचेही सहकार्य आपल्या कामात जरूर घ्यावे. आपल्या नियतकालिकातील मजकुराची मांडणी, चित्रे, टाईपच्या निवडीतील विचक्षणा इत्यादी बाबींच्या संदर्भात व्यावसायिकपण दाखवावे, व त्याचे ज्ञान असेल तर उत्तम, नसेल तर साधावे. अर्थात उद्योजकांच्या मदतीचा हात मिळतांना त्या उद्योजकाची वाङ्‌मयीन संवेदना ही नियतकालिकाच्या संपादकाच्या संवेदनेशी मिळती जुळती असल्याचे प्रसंग जास्त व म्हणून दोहीत सहकार्य हीभरपूर असू शकेल. पण अप्रस्थापित (विस्थापित) मासिकांच्या संदर्भात उद्योजकांची संवेदना संपादकाच्या संवेदनेशी मेळ घालेलच असे नाही. किंबहुना ते अशक्यच (ह्या संदर्भात डॉ. विमल कीर्तीचाही ह्याच मुद्दा होता) व्यवस्थाविरोधी वाङ्‌मयाला एकतर उद्योजक सहकार्य करणार नाही किंवा जमल्यास कुरघोडी करण्याचा प्रयत्न करेल. त्यातून मग वाङ्‌मयीन गुणवत्ता बाधित होण्याचा संभवच जास्त आणि परिणामत: नवीन वाङ्‌मय-मूल्ये निर्माण करण्याची व रुजविण्याची नियतकालिकांची क्षमता कमी होत जाईल. हा महत्त्वाचा धोका ओळखूनच असावे, अशी मते मांडल्या गेली.

व्यावसायिकतेच्या मुद्यांवर परिषदेत हुरहूर, चिंता, अनामिक आकर्षण, उत्सुकता आणि तीव्र नापसंती, ह्यांचे संमिश्र वातावरण तयार झालेले आढळले. वाङ्‌मय आणि व्यावसायिकता म्हणजे भलतेच! व्यावसायिक म्हटला की तो मग्रूर, बेरकी, हिशोबी, अभिरुचीहीन, धडाकेबाज आणि 'थीकस्कीण्ड', तर वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्व कसे हळुवार, संवेदनशील, विधीनिषेध बाळगणारे, आणि अभिरुचीसंपन्न. पैसा पैसा न करणारे, बेदरकार, चिंतनशीलता वगैरेंनी संपन्न असे. अशा दोन प्रवृत्तींचे एका व्यासपीठावर येणे एकमेकांच्या किंबहुना त्यातील एकाची म्हणजे सहाय्य घेणाऱ्याची बरीचशी अस्मिता, मूल्ये

वगैरे बासनात बांधून ठेवावी लागणार. व्यावसायिकतेच्या गोठ्यात वाङ्मयीन नियतकालिकांची कालवड बांधायची ? अशी धास्ती काहींनी घेतल्याचे जाणवत होते, पण त्याच बरोबर कालान्तराने ह्याच कालवडीचे भरपूर दूध देणाऱ्या 'जर्सी' किंवा 'होल्स्टीन' गायीत रूपान्तर होणार असेल तर त्याबद्दलचे आकर्षण अनेकांना असल्याचे चर्चेत आढळले. काहींनी मात्र स्पष्ट भूमिका प्रथमपासून घेतली. तोटयात चालणे हेच वाङ्मयीन नियतकालिकांचे विधीलिखित असते. उद्योजकांच्या सहकार्याने ते बदलणार नाही. (डॉ. आशा सावदेकर) व्यावसायीकरण नकोच, कारण त्याचा अप्रस्थापित नियतकालिकांत कोणताही फायदा नसतो. (डॉ. विमल कीर्ती) महत्त्व कशाचे ? वाङमयीन महत्तेचे की यशस्वी होण्याचे ? (डॉ. पद्माकर दादेगांवकर)

यशस्वी होण्यामागच्या मानसिकतेची आवश्यकताच आज या नियतकालिकांच्या संपादकांनी बाळगणे कसे आवश्यक आहे हे दिलीप देवधरांचे म्हणणे. उद्योजक व्यावसायिक दृष्टिकोण स्वीकारून यशस्वी होतात तर संपादकाने संपादन हाही व्यवसाय आहे असे समजून तशी पावले उचलली तर त्यात वाङमयीन दर्जा वगैरे कशाला घसरणार ? व्यावसायिकांना नाक मुरडण्यापेक्षा त्यांचा कित्ता गिरवावा. (ह्यावर दादेगावकरांची पृच्छा)

व्यावसायीकरण / व्यवहारीकरण ह्या शब्दांचा उपयोग, नियतकालिके ज्या अॅमेच्युअरीश पद्धतीने चालविली जातात त्या पद्धतीला लगाम घालण्याच्या, 'प्रोफेशनॅलीझम'चे जे विज्ञान आणि ह्या अंतर्गत निर्माण झालेले जे तंत्रज्ञान आहे त्याचा संपादनात योग्य प्रमाणात वापर करावा ह्या हेतूने करण्यात आला आहे (प्रा. सुधाकर जोशी)

सत्र ३ : समारोपीय भाष्य डॉ. दादेगावकरांचे

नुसत्या व्यावसायीकरणाने प्रश्न सुटणार नाही. शेवटी वाङमयीन महत्ताच महत्त्वाची. त्याला व्यवसायीकरण पूरक ठरत असेल तर त्याचे स्वागत करावे. पैसा उभारायचा आहे तो वाङमयीन गुणवत्ता टिकवून, ती कमी करून नव्हे. म्हणून व्यावसायीकरणाचे फायदे स्वीकारतांना हा धोका टाळता आला तरच ते होऊ द्यावे, अन्यथा नाही. त्यापेक्षा सर्वांसाठी एक सहकारी व्यासपीठ निर्माण करणे जास्त महत्वाचे ठरेल. ह्या व्यासपीठावरून शासनाकडे मागणी घेऊन जाताना एकत्रित असण्याचा फायदाही मिळेल असे डॉ. पद्माकर दादेगावकर (प्रतिनिधी; पंचधारा) सत्राचा समारोप करताना म्हणाले.

मर्यादित स्वरूपाचे विवेकी व्यावसायीकरण स्वीकारताना आणखी काही गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतील. उदा. वाङ्मयीन नियतकालिकांची संख्या जर बेसुमार झाली असेल तर त्यातून नुस्ते 'रिपीटीशन' होत राहते. म्हणून ज्या नियतकालिकांची वाङमयीन भूमिका, विशेषतः कोणता साहित्यप्रकार ह्याला सर्वस्पर्शी पद्धतीने जवळ करायचा आहे, कोणती भूमिका राबवायची आहे ह्याची निश्चित बैठक सिद्ध करावी, तेच ते 'रिपीट' करणारी नियतकालिके ह्यानंतर निघू नयेत. वाचकांनी सुद्धा त्यांना थारा देऊ नये. त्याच बरोबर एखाद्या नियतकालिकाने आपली प्रस्थापित झालेली परंपरा टिकवून ठेवणे म्हणजे नव्या परंपरा निर्माण न करणेही नव्हे. परंपरेने प्रस्थापित झालेल्या व ज्या परंपरेसाठी असे नियतकालिक ओळखले जाते ती खंड न पडू देता देखील नवता आणता येते. असा चर्चेचा सूर असल्याचे डॉ. दादेगावकर म्हणाले.

व्यावसायीकरणाचा मुद्दा वाङमयीन नियतकालिकांच्या अस्तित्वाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे हे खरे. पण आर्थिक स्थैर्य आणि सुबत्ता आली की कलावंतामधली, त्याच्या धडपडीमागची प्रेरणा नष्ट होते. तो यशस्वी होतो पण त्याच्यातली जिद्द संपते. विनासायास त्याला सर्व मिळत जातं. म्हणून तोटयात चाललं तरी वाङमयीन गुणवत्तेला यशस्वितेपेक्षा जास्त महत्त्व असावं. कल्पनाशक्ती व प्रेरणा शाबूत राहण्याच्या दृष्टीने हे बरे राहील. म्हणून व्यावसायीकरण आणताना आर्थिक स्वावलंबन यावे एवढीच माफक अपेक्षा नियतकालिकाच्या संपादकांनी बाळगावी; असा चर्चासत्राचा सूर मांडून डॉ. दादेगावकरांनी या सत्राचा समारोप केला.

सत्र ४ थे : साहित्य संस्थांची मुखपत्रे संघर्ष, समस्या व उपाय

युगवाणीचे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी यांची युगवाणी, एमेजू–८९ व जुऑस–८९ या दोन्हीची संपादकीये हाच या सत्राचा प्रमुख निबंध होता.

साहित्यिक संस्थांच्या मुखपत्रांची स्थिती उत्साहजनक अजिबात नाही. काहींचे विलयास जाणे, काहींची अस्तित्वासाठी धडपड व ह्या पार्श्वभूमीवर इतरांचे अलिप्तपण त्याच बरोबर चिल्लर नियतकालिकांचे फोफावणे. भारतीय समाजाचे 'माहिती–समाजात' रूपांतर होत आहे आणि त्या झपाट्यात वाङ्मय 'नॉनप्रायोरिटी' होत आहे. नियतकालिकांच्या विकासाची जबाबदारी सामूहिक-सामाजिक आहे. वाङ्मयीन नियतकालिकांच्या आणि वाङ्मयाच्या विकासातून अभिरुचीसंपन्न समाज निर्माण होईल. नियतकालिकांची अशी भूमिका विशद करण्याची जबाबदारी त्या त्या संस्थांनी घ्यायला हवी. त्याच बरोबर जिल्हा नियोजन मंडळे आदी यंत्रणांनीही ही जबाबदारी उचलायला हवी. अशा संस्थांच्या ह्या संदर्भातील अंदाजपत्रकीय तरतूदी ह्या अभिरुचीसंपन्न समाजाच्या निर्मितीसाठी करण्यात आलेली गुंतवणूक आहे असे समजण्यात यावे. आपण मराठीच्या विश्वात्मकतेबद्दल खंत आणि चिंता करतो. हे करण्याऐवजी संस्थांनी, साहित्यिकांनी मराठी वाङ्मयाच्या, नियतकालिकांच्या स्थानीय पातळीवरून सुटण्यासारख्या प्रश्नांची, त्यांच्या स्थानिक गळचेपीची, दुर्लक्षाची चिंता करून त्या प्रश्नाची उकल करण्याचे मनात आणणे अधिक महत्त्वाचे आहे.

कुणी हतोत्साहित जर असे म्हणत असेल की मरायची असतील तर मरू द्या त्या वाङ्मयीन नियतकालिकांना किंवा साहित्य संस्थांच्या मुखपत्रांना, तर ते अयोग्य आहे. तसे न म्हणता उद्योजकांच्या मदतीचा हात स्वीकारावा. त्यासाठी मिंधे होण्याचीही काहीच आवश्यकता नाही. त्या मदतीची असेल ती किंमत चुकवून टाकावी. पण असली मदत उद्योगपतींची असो किंवा शासनकृत असो ती जेमतेम तुटपुंजी किंवा अर्धवट पद्धतीची नको त्यासाठी स्थायी निधीच उभारण्यात यावा. अशा निधीच्या व्याजातून साहित्य संस्थांची मुखपत्रे सहज चालविल्या जाऊ शकतात. सांस्कृतिक ऱ्हास टाळण्याचा हा एक उत्तम व भरभक्कम उपाय ठरेल.

नियतकालिके ही बहुधा एकाकी, असंलग्न व स्वायत्त असतात. पण त्यामुळे ती दुबळी राहून त्यांच्या प्रयत्नांना मर्यादा पडतात. त्यांनी त्याऐवजी एकमेकांशी संलग्न व्हावे. एकवटलेल्या ताकदीने एक नवा सांस्कृतिक उठाव महाविद्यालये, ग्रंथालये, भाषिक वर्तमानपत्रे इ.नीही घडवून आणण्यास हातभार लावावा.

वाङ्मयीन संस्थांच्या (व तसे एकूणच) मुखपत्रांच्या ऱ्हासामागे सांस्कृतिक कारणेही भरपूर आहेत. हा सांस्कृतिक ऱ्हास थोपविण्यासाठी भारतीय समाजात चिंतनाच्या व आकलनाच्या पातळीवर भरपूर सांस्कृतिक मंथन व्हावयास पाहिजे. समाजाची इच्छाशक्ती इतर क्षेत्रांकडे वळली आहे. ती आज वाङ्मयाकडे देखील वळायला हवी जेणेकरून ही दुरावस्था संपायला सोपे जाईल.

साहित्य संस्थांच्या मुखपत्रांविषयी श्रीपाद भालचंद्र जोशींचा हा विचार तसा युगवाणीच्या एमेजू, १९८९ च्या अंकात संपादकीय रूपाने विस्तृतपणे प्रकट झाला होताच. ह्या निमित्ताने तो पुन्हा परिषदेसमोर चर्चेसाठी आला.

ह्या सत्रात हैद्राबादच्या म. सा. परिषदेचे मुखपत्र पंचधाराचे प्रतिनिधी डॉ. पद्माकर दादेगावकर यांनीही साहित्य संस्थाच्या मुखपत्रांच्या समस्येसंबंधी काही विचार मांडले.

वाङ्मयीन नियतकालिकांना (साहित्यिक संस्थांची मुखपत्रे ही ह्याच प्रकारात मोडतात) चांगले लेखन मिळत नाही. ही समस्या शिक्षणाच्या वाढत्या प्रसारानंतरही सुटू शकत नाही. व आता तर ती अधिकच गंभीर झालीय. लेखकांना पूर्वी मिळायचा तो आदरही आज मिळेनासा झालाय. त्यावर डॉ. दादेगावकर यांची उपाययोजना अशी :

१. प्रत्येक नियतकालिकाचा विशिष्ट वाचक–वर्ग तयार होणे.

२. त्या त्या नियतकालिकांची परंपरा खंडित न होणे.

३. नवीन परंपरा निर्माण करणे.

४. संपादकाने आपल्या धोरणातील व्रतस्थपणा थोडा सैल करावा. थोडा मोकळेपणा त्यात असावा.

५. नियतकालिकामधून होणारी समीक्षा मात्र गंभीरच असावी, रुचेल ते बोलावे अशी नकोच.

६. मराठीच्या प्राध्यापकांनी सर्वंकश सहकार्य करणे पण त्यांच्यावर अवलंबून राहायला नको.

७. उपक्रमशीलता व संपादकांचे कौशल्य.

८. संस्थेच्या नियतकालिकासाठी वेगळी वर्गणी असावी. संस्थेच्या वर्गणीशी त्याचा संबंध नको.

९. शिवाय उद्योजक, शासन इत्यादींचे सहकार्य घ्यावे.

१०. नियतकालिकांमध्ये स्पर्धेचे संबंध असावेत.

११. वाङ्मयीन विचारांचा व दृष्टींचा संघर्ष, असावा, तो असा की ज्यातून योग्य ते ठरेल व ते जोपासल्या जाईल. ह्यासाठी संबंधितांचे वारंवार मेळावे घेणे अगत्याचे.

१२. वाचकांची विविधता लक्षात घेता त्यांच्याकडून संपादकाकडे 'फीडबॅक' वाहत राहावा.

शंकर सारडा यांचा निबंध :

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे संपादक शंकर सारडा यांच्या निबंधात त्यांनीही जवळपास ह्याच अडचणी उपस्थित केल्या होत्या.

शासकीय अनुदानाच्या संदर्भात सर्वच नियतकालिकांना सारखे लेखण्याच्या वृत्तीवर त्यांनी नापसंती व्यक्त केली. शिवाय स्थायी स्वरूपाची कार्यालयीन व्यवस्था नसल्याने एकंदर व्यवस्थापन व संपादनात व्यावसायिक तत्परतेचा अभाव निर्माण होतो, व त्याचे दुष्परिणाम नियतकालिकांना भोगावे लागतात. असे त्यांचे विवेचन. म्हणून इतर उपायांबरोबरच :

१. वाङ्मयीन विचारांच्या (समीक्षा, प्रवाह वगैरे) नियतकालिकांचे अस्तित्व स्वतंत्र असावे इ. नियतकालिकांनी आपल्या मर्यादांचे भान ठेवावे.

२. काही व्यवस्था (जशी अंकाची आखणी वगैरे)– स्थायी असावी निवडणूकीशी–कार्यकारिणीशी तिचा संबंध जोडू नये.

३. शासकीय अनुदानाचे धोरण लवचिक व तारतम्यपूर्ण असावे.

हे उपाय श्री. शंकर सारडा ह्यांनी परिषदेत मांडले (शंकर सारडांचा निबंध ते न आल्याने त्यांच्या अनुपस्थितीत वाचल्या व चर्चिल्या गेला.)

श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. पद्माकर दादेगांवकर व शंकर सारडा ह्यांच्या पूर्वकथनावरील चर्चेत आणखी काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झाले.

१. मुखपत्रात अवाङ्मयीन मजकूर असतो (संस्थाची कार्यवृत्ते वगैरे). असला भाग काढला (अवाङ्मयीन म्हणून) तर ते संस्थांना चालेल काय ? शिवाय वाङ्मयीन संस्थांना आपली मुखपत्रे त्यासहित चालावीत असे वाटते काय ? (डॉ. गिरधारी.)

२. संस्था कोणतेच ओझे घेऊ शकत नाही. संपादकानेच उद्यमशील असावे असा संस्थांचा आग्रह असतो. (प्रा. वामनराव चोरघडे.)

३. संपादकाला मिळणारा एकूण कार्यकाल व त्याला विविध पातळ्यांवरून करावा लागणारा संघर्ष ह्याच्या जमाखर्चाचाही संबंध संस्थांच्या मुखपत्राच्या गुणवत्तेशी जोडावा.

४. ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात जमा करण्याच्या लायकीच्या परंपरांचे, प्रवाहांचे संवर्धन वाङ्मयीन नियतकालिकांनी करावे, व अशांचे अस्तित्व लिहून ठेवावे हे महत्त्वाचे. पण समाज ज्याच साहित्याचे संवर्धन करतो जे विकासाच्या वेगाचा वेध घेत असते. ह्या विकासाच्या प्रक्रियांशी ज्यांचे नाते नाही त्या परंपरांचे कशाला वाङ्मयीन नियतकालिकांनी अनुसरण करायचे ?

(भाऊ समर्थ.)

सत्र–४ : समारोपीय भाष्य : डॉ. पानतावणे यांचे

साहित्य संस्थांच्या (व एकूणच) मुखपत्रांच्या समस्या काही तात्कालिक तर काही नेहमीच्या आहेत. पण संपादकाला मात्र निश्चित अशी वाङ्मयीन दृष्टी असायलाच हवी. त्याचबरोबर लेखकांना विचक्षणपणाने निवडण्याची, टिपण्याची क्षमताही त्याच्याजवळ असायला हवी.

वाङ्मयीन दृष्टी आणि उपलब्ध असलेले लेखक ह्यातून संघर्ष निर्माण होतो. हे जेव्हा कळत नाही तेव्हा समस्या निर्माण होते. अशा परिस्थितील संपादकाची उपक्रमशीलता, योजकता त्याला समस्येवर मात करण्यात मदत करीत असते; असे डॉ. पानतावणे या सत्राचा समारोप करताना म्हणाले.

वाङ्मयीन गुणवत्तेची ताकद असेल तर वाङ्मय काळाच्या ओघातही टिकून राहतेच. संपादक वाङ्मयीन अभिरुची निर्माण करतात व काळाच्या ओघात ही अभिरुची बदलत जाते. ह्या बदलाची दखल घेण्याची संपादकाची वृत्ती असावी लागते. जीवनाचे संदर्भ बदलत असताना त्यांची दखल, निर्मितीच्या संदर्भात घेतल्या जाणे हे संपादकाचेच कर्तव्य. संपादकाने वर्तमानाचे भान राखावे व दृष्टी भविष्याकडे ठेवावी.

परंपरा आणि नवता ह्या पैकी परंपरा डॉ. पानतावण्यांनी नाकारली नाही. त्याचा स्पष्ट उल्लेख जरी त्यांनी केला नाही; तरी संपादकाच्या वाङ्मयीन दृष्टीने त्याच्या जवळ असणे हे नंतरच्या काळासाठी परंपरा ठरू शकते. वाङ्मयीन गुणवत्तेचा निकष हा एक परंपरेचा भाग असू शकतो. उदा. नित्य नवे हा निकष; नित्य नवे देण्याची परंपरा निर्माण करू शकतो. अशा प्रकारे वाङ्मयीन दृष्टीची निश्चितता, त्याची उपक्रमशीलता संपादकाकडून लेखकाला घडवीत नेते. त्या दोघांची परस्पर पूरकता, व बदलत्या अभिरुचीची बदलत्या जीवनाच्या अनुषंगाने दखल घेऊन त्याचे वाङ्मयीन प्रतिबंधन व भविष्याचे वेध घेण्याची क्षमता ह्या उपाययोजना समस्यांवर मात करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतील अशी या सत्राचे अध्यक्ष डॉ. पानतावणे ह्यांच्या एकूण भाष्याची मांडणी होती. परंपरेबरोबर येणारे शिळेपण, आणि सौंदर्यलक्षीपण पानतावण्यांना मान्य असावे हाच ह्याचा अर्थ.

सत्र ५ वे : वाङ्मयीन नियतकालिकांचे पोषण समाज, जनप्रतिनिधी, वृत्तपत्रे व शासन ह्यांचे दायित्व

संवाद माध्यमांच्या आक्रमणाने (उदा. दूरदर्शन) कंबर खचलेली वाङ्मयीन नियतकालिके भविष्यात पुन्हा कंबर कसून उभी राहतील, सक्रीय होतील ह्यात काही शंका नाही असा आशावाद बाळगून डॉ. वि. स. जोगांनी आपल्या निबंधाने ह्या सत्रात त्यांच्या पोषणाच्या जबाबदारीची विभागणी केली.

जर कुपोषण होत असेल (किंबहुना उपोषण होत असेल असेच म्हणावे लागेल) तर त्यासाठी जे घटक जबाबदार आहेत त्यांची मीमांसा येणे प्रमाणे :

१. साहित्य संस्कृती मंडळासारख्या संस्था वाङ्मयीन नियतकालिकांच्या विकासात शुक्राचार्यासारख्या वागतात. त्यांनी जवळ केलेल्या साहित्यिकाला 'लॉबीज'च्या, दबावगटाच्या म्हणण्यानुसार घडवावे लागत असल्याने वाङ्मयीन नियतकालिकांची सद्यः कुपोषणाची वा उपोषणाची परिस्थिती आहे.

२. शासनानेही पुढाकार घेऊन वाङ्मयीन दिशा बदलाचा प्रयत्न केला नाही. आणि शासनाची भिस्त असलेल्या संस्थांचा तो वकूब नाही.

उपायांचे उत्तरदायित्व येणेप्रमाणे

१. लॉबीच्या प्रभावाखाली येऊन शासनाने वाङ्मयीन नियतकालिकांच्या संबंधी केवळ औपचारिक भूमिका न घेता स्वतः या दिशेने काही पावले उचलावीत. उदा. जाहिरातीचे धोरण, ठरवावे, दर दुप्पट करावा, उधारीवर कागद द्यावा वगैरे.

२. वृत्तपत्रांनी नियतकालिकांच्या अंकांची-समीक्षणे करावी व वाचकांची उत्कंठा वाढवावी.

३. नियतकालिकांनी आपले रूप अंतर्बाह्य बदलावे. स्वतःची स्वतंत्र प्रतिमा निर्माण करावी. त्यासाठी विशिष्ट वाङ्मयप्रकारांना वाहून घ्यावे.

४. प्रयोगशिलता वाढवावी. साहित्यीक असलेल्या जनप्रतिनिधींच्या समित्या तयार करून त्यांच्या प्रतिक्रिया नोंदवीत राहाव्यात, विधान सभा वगैरे मधूनही ह्या प्रतिक्रिया उमटाव्यात.

५. नगरपरिषदांनी वाचनालये चालवावीत व त्यात वाङ्मयीन नियतकालिकांना स्थान द्यावे.

६. प्राध्यापकांनी स्वतःला वाङ्मयीन नियतकालिकांचे प्रसार माध्यम म्हणून वावरावे. विद्यार्थ्यांचेही ह्यात सहकार्य घ्यावे.

७. व्यक्तिगतरित्या संस्थांना ह्यात गुंतवावे.

निबंधावरील चर्चेच्या ओघात काही सूचना निश्चितच महत्त्वाच्या होत्या. इतर नियतकालिके आपला खप कसा टिकवतात व वाढवतात ह्याचा व त्याच प्रमाणे विविध संवाद माध्यमांचा वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादकांनी अभ्यास करावा. (जी. टी. परांडे) साहित्य व साहित्यातली रुची नष्ट होत जाणे हे अपघातात्मक नसून ते एका मोठ्या कटाचा भाग आहे. रुची बदलविण्याचा हा कट शासन, सधन संस्था, प्रतिष्ठित व्यापारी वर्ग जनतेच्या पैशातूनच करीत आहे. उद्योजक, नोकरशाही सुद्धा ह्याला जवाबदार असून ह्या सर्व पार्श्वभूमीवर सर्जनशील साहित्यिक जगविण्याच्या ध्यासाचाही अभाव ही सध्याची शोकांतिका आहे. (भाऊ समर्थ) वृत्तपत्रे वाङ्मयीन नियतकालिकांच्या गरजांच्या, अस्तित्वाच्या बाबतीत उदासीन नाहीत व त्यांच्या स्पर्धेतही नाहीत. नियतकालिकांनी नियमितपणाचे भान ठवल्यास वृत्तपत्रांनाही त्यांच्यापर्यंत सहज पोचता येईल. (सुनील शिनखेडे) नॅशनल बुक डेव्हलपमेंट बोर्ड, बुक फायनान्सींग ॲथोरिटी वगैरे स्थापून ह्या परिस्थितीत हस्तक्षेप करावा (विलास देशपांडे) लेखकांनी वाङ्मयीन नियतकालिकांकडून किंवा इतर ठिकाणाहून मिळणाऱ्या मानधनाचा काही भाग नियतकालिकांना देत राहावा (दिलीप इंगोले)

समारोपीय भाष्य : सत्र–५
प्रा. पुरुषोत्तम पाटील

पोषणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. पण पोषणासाठी तडजोड करून चालणार नाही. वाङ्मयीन निकषच सर्वात महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे त्याचा दर्जा राखणेच महत्त्वाचे. नियतकालिकांच्या वाङ्मयीन गुणवत्तेवरच (पाटलांचा शब्द : वाङ्मयवत्ता) संबंधित नियतकालिकांचे अस्तित्व व पोषण अवलंबून असते. असा विचार पुरुषोत्तम पाटलांनी या सत्राचा समारोप करताना मांडला.

अर्थात पाटलांचा हा निखळ आणि तडजोडविहीन निकष मान्य करण्यासारखा नाही असेच बहुतेकांच्या मनात असावे. गुणवत्ता राखूनही काही सन्मान्य तडजोडी (उदा. व्यावसायीकरण) करून नियतकालिकांच्या अस्तित्वाचा प्रश्न सुटू शकतो असे वाटण्याइतपत बहुतेकांचे मत एव्हाना तयार झाले होते.

परिषदेचा समारोप :
शेवाळकरांचे भाष्य

"वाङ्मयीन नियतकालिके आणि साहित्य संस्थांची मुखपत्रे ह्यांची स्थिती एकूण गंभीर आहे. वास्तविक पहाता हे विपरीतच. साक्षरता वाढतेय. वाचकांची एकूण संख्याही वाढत आहे. पण वाङ्मयीन नियतकालिकांची मात्र परिस्थिती हलाखीची होत आहे. वाचकवर्ग, लेखक वर्ग त्यांच्यापासून दुरावत आहे. ह्याचे कारण काय ?

साहित्य संस्थांच्या मुखपत्रांचे प्रश्न इतर वाङ्मयीन नियतकालिकांपेक्षा वेगळे आहेत. त्यात विविध विषयांचा अंतर्भाव होत असल्याने ते निर्माण होणारे आहेत. वाङ्मयीन वाचकास व समाजास जागृत करण्याच्या त्यांच्या ध्येयवादातून ते निर्माण झालेले आहेत.

ह्या संदर्भात बऱ्याचदा शासनाकडे मदतीसाठी पहाण्यात येते. पण यात शासनाचा फारसा सहभाग अपेक्षित नाही. कारण शासनाला ती दृष्टीच नसते. त्यांच्या दृष्टीतून साहित्यिक, साहित्यिक संस्था, आणि वाङ्मयीन नियतकालिके म्हणजे नगण्यच. अर्थात शासनाने मदत केली तर तिचा स्वीकार व्हावा. पण मदत करता येत नसेल तर किमान त्यांनी अडचणी तरी निर्माण करू नये. हाच न्याय स्थानिक स्वराज्य संस्थांनाही लागू आहे.

खरे म्हणजे विशिष्ट वेडाने झपाटलेली माणसेच वाङ्मयीन नियतकालिके जगवीत असतात. शासनाचा सहभाग ह्यात फारसा महत्त्वाचा नाही. म्हणून वाङ्मयीन नियतकालिकांची गुणवत्ता वाढवीत राहणे हेच महत्त्वाचे. ह्याच वाढत्या गुणवत्तेतून आपोआपच नियतकालिकांचे संवर्धन होत असते. म्हणजे शासनापेक्षा वेडी, समर्पित

माणसे व त्यांची जिद्द ह्या बाबीच वाङ्मयीन नियतकालिकांचे प्रमुख आधारस्तंभ होत.

ह्या सर्व प्रकारांत ह्या जिद्दी, समर्पित संपादकांना ते एकाकी नाहीत, ह्याचा संस्थांनी व वाचकांनी दिलासा मात्र देत राहावा. ते त्यांचे कर्तव्यच. ही हमी त्यांनी देत राहावी. आणि ह्या दिलाशापोटी साहित्यिक संस्थांनी नियतकालिकांना जगविण्याचे हे आव्हान पेलण्यासाठी आपली तपश्चर्या वाढती ठेवावी. हाच आजच-आपला निर्धार." अशा शब्दात वि. सा. संघाचे व या परिषदेचे अध्यक्षप्रा. राम शेवाळकर यांनी रात्री अकरा वाजता या परिषदेचा समारोप केला. ■

[प्रा. सुधाकर जोशी यांनी परिषद सुरू झाल्यापासून तो समरोपापर्यंतची त्यांची निरीक्षणे परिषदेचे निरीक्षक म्हणून सादर करावीत अशी विनंती त्यांना केलेली होती. त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक ही निरीक्षणे सादर केल्यावद्दल आभारी आहोत.]



मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या समस्या—
आजच्या आणि कालच्या

वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद घेऊन युगवाणीने एक महत्त्वाचे कार्य केले याबद्दल हार्दिक अभिनंदन. या निमित्ताने प्रकाशित केलेल्या चक्रमुद्रित परिपत्रकात असे म्हटले आहे की मराठी वाङ्मयीन, विशेषत: 'युगवाणी'सारख्या विभागीय साहित्य संस्थांच्या नियतकालिकांच्या अस्तित्वाचा प्रश्न युगवाणीच्या नव्या संपादकांना कार्यकाळाच्या सुरवातीसच अग्रक्रमाचा म्हणून जाणवला. ही वस्तुस्थितीच आहे. एप्रिल–मे–जून ८९ च्या 'युगवाणी'च्या 'संपादकीय...थोडे वेगळे' यामध्ये पृ. ३ वर "अशा सर्व परिस्थितीतही 'युगवाणी' हे आजवर तरी संपूर्णपणे सुरक्षित असलेले एक महत्त्वाचे बेट आहे. थेट पंचेचाळीस वर्षे सातत्याने समृद्ध जीवन जगलेले इ." असे संपूर्ण विवेचन आलेलेच आहे.

आजच्या संपादकमंडळाला जी समस्या भेडसावत आहे तीच 'युगवाणी'च्या बाळपणीही होती हे विशेष. १९४८ हे विदर्भ साहित्य संघाचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. "विदर्भ साहित्य संघाची २५ वर्षे" (अहवाल)- या शीर्षकाखालील 'युगवाणी'च्या नोव्हें. १९४८ च्या अंकात वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी यांनी 'युगवाणी'च्या त्यावेळच्या स्थितीचे वर्णन केले आहे ते त्यांच्याच शब्दात देत आहे. त्यावर वेगळे लिहिण्याची गरज नाही. ते असे :

वि. सा. संघाचे मुखपत्र 'युगवाणी'

वि. सा. संघाच्या अकोट संमेलनात संघाचे मुखपत्र म्हणून एक मासिक काढावे असा ठराव मंजूर झाला होता. त्यानंतर त्या दृष्टीने ताबडतोब कामाला सुरुवात झाली. या मासिकाचे नाव 'युगवाणी' असे ठेवावे असे ठरले. आणि सुप्रसिद्ध वैदर्भीय साहित्यिक व टीकाकार यवतमाळचे रा. वामन नारायण देशपांडे यांच्या हाती संपादकीय सूत्रे सोपविण्यात आली. या मासिकाचे प्रकाशन एक वर्षभर वि. सा. संघाने केले. या कठिण दिवसात मासिक चालवावयाचे–विशेषत: निधीचे पाठबळ नसताना चालवावयाचे–म्हणजे कोण कठिण काम! तरी पण सर्व आपत्तींना तोंड देऊन वि. सा. संघाने १९४६ साली वर्षभर अंक प्रसिद्ध केले. अंक चांगले निघाले, पण वि. सा. संघावर कर्ज झाले. पण कर्ज काढून 'युगवाणी' किती दिवस चालणार! परंतु ऐन वेळी विदर्भ साहित्य संघाचे एक उत्साही तहहयात सभासद रा. द. ना. ठाकूर हे संघाच्या मदतीला धावून आले. 'युगवाणी'च्या प्रकाशनाची जबाबदारी त्यांनी आपल्या शिरावर घेतली (पृ. ३४६) 'युगवाणी'चे प्रकाशन संघाच्या शिरावर होते तेव्हाचे संघाध्यक्ष प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी वेळोवेळी झीज सोसून संघातील उत्साहाचे वातावरण कायम ठेवले. गेल्या दोन वर्षात निवडून आलेल्या का. मं. च्या सभासदांनी कर्जफेडीची आपली जबाबदारी जाणली...." (पृ. ३४७)

[संकलक : डॉ. वसंत विष्णू कुळकर्णी]

वाङ्मयीन नियतकालिकांची सद्यःस्थिती : कारणमीमांसा, विकासातील अडचणी व उपाययोजना

डॉ. भा. त्र्यं. गिरधारी

: १ :

कारण मीमांसा

वाङ्मयीन नियतकालिकांची सद्य:स्थिती डबघाईची आहे ही वस्तुस्थिती आहे. या ना त्या निमित्ताने अनेक वाङ्मयीन नियतकालिकांशी जवळून संबंध आलेला असतोच. त्यामुळे सद्य:स्थितीची पुरेपूर कल्पना असते आणि येते. नवभारत, प्रतिष्ठान, युगवाणी, अस्मितादर्श, पंचधारा, आरती, अभिरुची, महानुभाव साहित्य पत्रिका, म. स पत्रिका यांच्याशी लेखनाच्या निमित्ताने तर सत्यकथा, अनुष्टुभ, कवितारती, आलोचना, समुचित यांचे संपूर्ण संचालक परिवारच सुपरिचित आहेत वैखरी, मांडवी, विविधा, लोकवाङमय, सत्यकथा, मराठी संशोधन पत्रिका इ. अनेक नियतकालिके चालताना आणि थांबतांना पाहिली.

पण छंद, सत्यकथा, बंद होण्याच्या वेळची स्थिती आणि आजची स्थिती यात महदंतर आहे. कमालीची वाढलेली महागाईच केवळ याला कारणीभूत नाही तर नवीन रुळलेली संवादमाध्यमेही तेवढीच त्याला कारणीभूत आहे. दूरदर्शन, धारावाहिक आणि विविध लोकप्रिय मालिका, व्ही. डी. ओ. कॅसेटस, टेलीफिल्म आणि ग्रामीण भागात आकाशवाणीची स्वर्धिष्णूवृत्ती त्याला कारणीभूत आहे. आज लेखक कवी मंडळींनाही वाङमयीन नियतकालिकापेक्षा दूरदर्शन, टेलिफिल्म माध्यमातून आपले लेखकपण साकारण्यात धन्यता वाटते. शब्द माध्यमा पेक्षा दृश्य आणि श्राव्य माध्यमाशी हा सामना होतो आहे. दुसऱ्या बाजूने लोकप्रभा, चित्रहार सारखी लोकप्रिय, व्यावसायिक नियतकालिके शह देत आहेत. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवशक्ती, तरुण भारत, लोकमत, सकाळ, नवाकाळ पुन्हा त्यांच्या विविध जिल्ह्यांच्या आवृत्त्या, या सर्व वृत्तपत्रांच्या साप्ताहिक, साहित्य–संस्कृती–कला वाङमयाला वाहिलेल्या पुरवण्या, त्याही रंगीत, त्यांची सततची वाढती लोकप्रियताही आज वाङमयीन नियतकालिकांपुढील मोठे आव्हान आहेच. दूरदर्शन आणि विविध रंगीत साप्ताहिक पुरवण्या यामुळे लेखकांची, वाचकांची, कलावंतांची, आश्रयदात्यांची आणि विक्रेत्यांची मन:स्थिती द्विधा झाली आहे. वाङमयीन नियतकालिकांच्या मुकाबल्यात या वृत्तपत्रांच्या पुरवण्या म्हणजे चुरमुरे खाण्यातील समाधान मानणे नव्हे तर ते उत्तम साहित्य छापतात आणि लेखकालाही त्याचे समाधान लाभते. तसे नसते तर पु. ल. / शिरवाडकर / स. गं. मालशे, गाडगीळ यांनी वृत्तपत्रांच्या पुरवण्यातून लिहिलेच नसते.

: २ :

विकासातील अडचणी

वाङमयीन नियतकालिकांच्या बाबतीत व्यावहारिक बाजू तर फारच लूळी पडली आहे. वाढलेले कागदांचे भाव, मुद्रणाचे-पोस्टाचे दर त्यामुळे त्रासलेले संपादक आपले नियतकालिक तगणार कसे या विवंचनेत आहेत. साहित्यसंस्था आणि संपादकांनाही या परिस्थितीपुढे आज हात टेकावे लागत आहेत.

वाङ्मयीन नियतकालिके आज एकाकी पडत आहेत. लेखकांपेक्षा व्यक्तिगत हितसंबंधांनाच जास्त महत्व आले आहे. आणि थोडे अपवाद वगळता गटगटाने माणसे वावरतांना दिसत आहेत. अशाने खऱ्या वाङ्मयीन चळवळी कशा जोर धरतील असा प्रश्न पडतो. मात्र केवळ त्या संस्थेची वा चळवळीची ती नियतकालिके बनण्याचा धोका टाळला पाहिजे. बाह्यांगावरूनही नियतकालिकांच्या आजच्या स्थितीची कल्पना येते. आर्ट पेपर-चित्रकला, आकर्षक मोकळी मांडणी, विविध ललित-कलांचा एकच प्रत्यय या गोष्टी दुर्मिळ आणि दुर्लभ झाल्या आहेत. याची खंत निश्चितच वाचकांना आहे. वाचकांना वाचायला सवड नसली तरीही आवड निर्माण करता येण्याजोगी आज स्थिती या नियतकालिकांची नाही.

: ३ :

उपाय योजना

ध्येयवादी, जिद्दी आणि हौशी माणसेच अशा वेळी संपादक म्हणून योजिले पाहिजे. (अभिरुचीचे संपादन आत्मारामपंत चित्र्यांनी तसे केलेही आहे.) साहित्यसंस्थाही संपादन मंडळे बदलती ठेवतातच. एकतर आपल्या सगळ्या कल्पना पहिल्या ५ वर्षात राबवून होतात. निदान त्यापुढे इतरांकडून उचलाव्या लागतात आणि नवी उमेद नवे कार्य घडवून आणू शकते म्हणून अत्यंत जागरूक आणि सावध संपादकांवरच या नियतकालिकांची सारी भिस्त आहे.

संपादक आणि मंडळाची विचारसरणी, मते ध्येयधोरणे काही असणे स्वाभाविकच आहे. पण केवळ आपल्या सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि राजकीय विचारांशी जुळते घेणाऱ्यांचेच कडे करून त्यांच्या फेरात संपादकाने राहता कामा नये. उलट मोठ्या मनाने परमतसहिष्णुता दाखविली पाहिजे. डाव्यांनी उजव्यांचे आणि उजव्यांनी डाव्यांचे साहित्य छापायला काय हरकत आहे. म्हणजे वाङ्मयीन नियतकालिकांना कोणी ' शार्दूलविक्रीडित ' झाले म्हणणार नाही. समाजाला अभिरुची-संपन्नता नसते ती वाढवा पण समाजविन्मुख होऊन चालणार नाही. नाहीतर 'सत्यकथा 'कारासारखेच 'जोगवा मागून कायमचे जगवता येत नाही आणि कृत्रिम श्वासोच्छ्वास आणि कायम रक्तदान करून एखाद्या मरणोन्मुखाला वाचवता येणार नाही ' असे म्हणायची पाळी येईल.

या उपाययोजनेचा अवलंब करण्यात जर आपण यशस्वी होऊ शकलो नाही तर दत्त, बालकवी, अनिल बर्वे सारख्या गुणी आणि कसदार साहित्यिकांसारखीच ही वाङ्मयीन नियतकालिकेही अल्पायुषी ठरतील.

नुसत्या महाराष्ट्रात ७ विद्यापीठे, १२०० महाविद्यालये, ४००० ग्रंथालये (अ, ब, क, ड वर्ग) हजारो शाळा आणि मंडळे आहेत. त्यांचा आधार घेतला पाहिजे. आपल्याला संपर्क (Approach) साधता आला पाहिजे.

शिक्षण संचालनालयाकडून शिक्षण संस्थांना वर्गणीदार होण्याचे आदेश काढावेत. लेखक वाचक मेळावे भरवून, हितचिंतकांशी चर्चा करून काटकसरीचे धोरण अवलंबून, सेवाभावी वृत्तीचे लेखक आणि माणसे जोडूनच हा वाङ्मयीन नियतकालिकांचा प्रपंच सावरता येईल.

आजची अभिरुची म्हणून अवकाश-अंतराळ युगालाही सामोरे जाणारे विज्ञान साहित्य वाचकांची अपेक्षा म्हणून दिले पाहिजे. जुन्या काळातही करमणूकीचा आणि लोक-मागणीचा विचार संपादकांनी अग्रक्रमाने केला होताच, हे विसरून चालणार नाही.

अंक विद्यार्थी विश्वापर्यंतही पोहचावयाचे असतील तर पुण्याच्या ' साहित्यसूची 'प्रमाणे पाठ्य-पुस्तक म्हणून अभ्यासक्रमात नेमलेल्या विविध विद्यापीठातील साहित्यकृतींवर चर्चा घडवून आणावी. दर्जेदार आस्वादात्मक समीक्षा यावी. म्हणजे ते मासिक मुलांचे होईल. तेव्हा तात्पर्य असे काढता

येईल की स्थायी निधी उभारणे. आजीव व साधारण सदस्य, हितचिंतक, आश्रयदाते, आणि जाहिरातदार, दर्जा राखून वाढविणे, शासनाचे व व्यक्तिगत दात्याकडून अनुदान मिळविणे, कागद स्वस्त दरात वेळेवर उपलब्ध करून घेणे, लेखकांनी–चित्रकारांनी नाफक मानधनाची अपेक्षा बाळगणे, वाचकांनी स्वतः मूल्य भरून इतरांनाही प्रवृत्त करणे, जिल्हावार वर्गणी घरोघर जाऊन गोळा करण्याची व्यवस्था अधिकृत प्रतिनिधी नेमून करणे, लेखक / वाचक मेळावे भरविणे, सहकारी तत्त्वावर कायम स्वरूपी मुद्रण व्यवस्था करणे, या नियतकालिक अंकांना संदर्भ ग्रंथाचे मूल्य प्राप्त करून देणे, समाजातील सगळ्या घटकांची गुंतवणूक (involvement) त्यात वाढविणे म्हणजे वाङमय व्यवहाराबरोबरच लौकिक व्यवहार सांभाळणे शक्य होईल. ■

[२७ मार्च, १९९० रोजी वि. सा. संघातर्फे आयोजित वाङमयीन नियतकालिक विकास परिषदेतील दुसऱ्या सत्राच्या सूत्रसंचालकांचे समारोपीय भाषण]

साहित्य संस्थांची मुखपत्रे : संघर्ष, समस्या व उपाय

शंकर सारडा

विषय व्यापक असला तरी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या अनुषंगाने काही विचार येथे मांडीत आहे. महाराष्ट्रातील साहित्य संस्थांच्या नियतकालिकांमध्ये महाराष्ट्र साहित्य पत्रिका नियमित निघत आलेली आहे. अडीच–तीन हजार आजीव सदस्य व हजार–दोन हजार वार्षिक सदस्य. सर्व सदस्यांना ही पत्रिका मोफत पाठवली जाते. संस्थांना मात्र वर्गणीदार बनवून घेतले जाते. परिषदेचा वार्षिक अर्थसंकल्प गेल्या वर्षी २ लाख ४० हजारांचा होता. पत्रिकेसाठी त्यात साठ ते सत्तर हजारांची तरतूद करण्यात येते. गेल्या वर्षी कागदाचे भाव व पोस्टेजचे दर बरेच वाढल्यामुळे मा तरतुदीत खर्च भागविण्यासाठी पृष्ठसंख्येत काटकसर करणे अपरिहार्य ठरले.

महाराष्ट्र साहित्य पत्रिका–जमाखर्च

आजीव सदस्यत्व शुल्क २०० रु. व वार्षिक सदस्य शुल्क रु. २० सध्या आहे. त्याचा विचार करता पत्रिकेचा खर्च हा या शुल्कापेक्षाही अधिक होतो, म्हणजे वीस रुपये भरून सुमारे पन्नाससाठ रुपयांचा ऐवज पत्रिकेच्या रूपाने सदस्याला मिळतो. सदस्याचे वार्षिक शुल्क हे संपूर्णतया पत्रिकेसाठी नसते, त्यातून इतरही खर्च भागवायचे असतात. परंतु हे शुल्क वाढत्या महागाईच्या संदर्भात वाढविण्याची गरज असूनही घटना दुरुस्तीच्या वेळखाऊ सोपस्कारामुळे ते शक्य झालेले नाही. वार्षिक सदस्यांची वर्गणी वेळेवर येत नाही, बरेच लोक दरवर्षी गळतात, त्यामुळे प्रतींची संख्या दरवर्षी बदलत राहते. या दृष्टीने केवळ आजीव सदस्यांनाच पत्रिका मोफत पाठवावी, इतरांसाठी जादा वर्गणी खास पत्रिकेकरिता घ्यावी असाही मार्ग सुचवला जातो.

संस्थेच्या अंदाजपत्रकातील बराच मोठा भाग पत्रिकेसाठी वापरावा लागतो, यामुळे कार्यकारी मंडळातही अनेकदा वाद होत असतो. केवळ चार पृष्ठांची पत्रिका काढा, आणि वर्षाच्या ताळेबंदाच्या वेळी जरा मोठी पत्रिका काढा असेही आमच्या कार्यकारी मंडळातील काही सदस्य आजही आग्रहाने प्रतिपादन करतात.

स्थायी कार्यालयीन व्यवस्थेचा अभाव

पत्रिका वर्षानुवर्षे निघत असली तरी पत्रिकेला दैनंदिन पत्रव्यवहार, वर्गणीची सूचना, नूतनीकरणाची सूचना, जाहिरातदारांशी संपर्क, जाहिरातीची बिले पाठवून ती वसुल करणे, प्रेसमध्ये तगादा लावून अंक वेळेवर निघावा म्हणून प्रयत्न करणे, मुद्रिते तपासणे, कागदाची किफायतशीर खरेदी, अभिप्रायार्थ आलेल्या पुस्तकांची नोंद वगैरे गोष्टींकडे लक्ष देण्यासाठी स्वतंत्र व्यक्ती वा व्यवस्था आज तरी नाही. कार्यालयातील नेहमीचेच सेवक हे काम वेळ सापडेल त्याप्रमाणे व वरिष्ठांच्या आदेशानुसार करीत असतात. अशी स्थायी यंत्रणा नसल्याने प्रत्येक अंकाच्या वेळी सर्व गोष्टी नव्या नवलाईने सांगाव्या लागतात व त्यामुळे कार्यालयीन एकूणच कामकाज हे एकेकाच्या मर्जीप्रमाणे होत राहते. त्यात व्यावसायिक तत्परता व कार्यक्षमता यांचा अभाव असतो. जाहिरातींची बिले त्यामुळे बुडितखाती जातात. नव्या जाहिराती मिळण्याबाबतही प्रयत्न अर्धकच्चेच होतात. पुस्तकांच्या प्रकाशकांच्या जाहिरातीही मिळविणे सोपे नसते. इतरांच्या जाहिराती बँका, कारखाने, सहकारी संस्था, शासन, वैयक्तिक स्नेहसंबंधाशिवाय मिळत नाहीत. येथे कोणी शब्द टाकावयाचा हा प्रश्न असतो.

निवडणुका–बदलती कार्यकारिणी

साहित्यपत्रिकेचा संपादक हा दर तीन वर्षांनी बदलतो. कार्यकारिणीच्या निवडणुका दर तीन वर्षांनी होतात. त्यात निवडून आलेल्या सदस्यांपैकी एकाची निवड यासाठी केली जाते. इतरही काही जणांचा संपादक मंडळात समावेश होतो. परंतु परगावचे सदस्य असल्याने दैनंदिन कामात त्यांचा उपयोग होतोच असे नाही.

संपादकाची भूमिका

संपादकांच्या वाङ्‌मयीन व अन्य अभिरुचीप्रमाणे अंकातील मजकुराचे व लेखकांचे स्वरूप बदलत जाते. योजना खूप आखल्या जातात. परंतु अपेक्षेप्रमाणे दिलेल्या विषयावरचे लेखनसाहित्य वेळेवर मिळतेच असे नाही. लेखनाचा एक दर्जा सांभाळणे त्यामुळे अवघड असते. अनेक लेखक लेख लिहिण्याचे मान्य करतात. परंतु वेळेवर लेख देऊ शकत नाहीत. त्यामुळे अंकाची योजना विस्कटते. आलेला मजकूर छापणे म्हणजे काही संपादन नव्हे. विशिष्ट योजना आखून, योग्य अधिकारी व्यक्तीकडून लेखन मिळविणे व ते सुबकपणे प्रसिद्ध करणे ही अपेक्षा किमान तरी असते. परंतु तीही अनेकदा पूर्ण होत नाही.

पुस्तक परीक्षणांची परवड

नवीन पुस्तकांवरील अभिप्रायांची तर परवडच होते. मान्यवर व्यक्तींकडे पुस्तके महिनो न् महिने पडून राहतात. अभिप्राय मिळत नाही. पुस्तकेही परत येत नाहीत. इकडे पुस्तकाचे लेखक–प्रकाशक तगादा लावत असतात. जे अभिप्राय येतात त्यातही वाङ्‌मयीन दृष्टिकोनाबाबत एकसूत्रता नसते. त्यामुळे एखाद्या सुमार पुस्तकाचेही बेफाट कौतुक होते, आणि एखाद्या चांगल्या पुस्तकावरही हात राखून लिहिले जाते. तारतम्य पाळले जात नाही. अनेकदा भीड मोडवत नाही त्यामुळे काही सामान्य लेख वा अभिप्राय घ्यावे लागतात. लेखकांना देण्यात येणारा मोबदला अगदीच नाममात्र असल्याने बरेच लेखन हे केवळ ऋणानुबंधाच्या जोरावर मिळवावे लागते. फार कोटेकोरपणे दर्जाचा आग्रह धरता येत नाही. अंकाच्या प्रसिद्धीच्या तारखेचे भान ठेवून पुन्हा लिहा वगैरेही सांगता येत नाही. साहजिकच अन्य नियतकालिके आणि साहित्यसंस्थांची नियतकालिके यात फरक पडतो. एकाच विशिष्ट वाङ्‌मयीन दृष्टीचे प्रतिबिंब अशा नियतकालिकात पडू लागले तर तेही गैरच ठरेल. त्याचप्रमाणे एकीकडे विशिष्ट अपेक्षित लेखन मिळत नाही तसेच दुसरीकडे अनाहूत

वेगवेगळ्या विषयांवरचे लेखन इतके असते की मर्यादित पृष्ठसंख्येमुळे त्यापैकी बरेचसे मागे ठेवावे लागते वा परत पाठवावे लागते. इतर रंजक मासिके, वाङ्मयीन नियतकालिके आणि विशिष्ठ विषयांचा मागोवा घेणारी अभ्यासपूर्ण नियतकालिके यामध्ये फरक असतो. याचा अनेकदा विसर पडतो.

शासनाचे अनुदान

शासकीय अनुदान-साहित्य संस्कृति मंडळाकडून मिळते. परंतु त्याबाबत बरीच अनिश्चितता व अनियमितता दिसते. वर्षारंभीच अनुदानाच्या रकमा मिळाल्या तर कागदखरेदी वगैरे किफायतशीर करून खर्चात बचत करता येते. काही योजना आखता येतात. अनुदानाबाबत " सब घोडे बारा टक्के " असे सध्या सूत्र दिसते. पत्रिकेचे चार हजारावर ग्राहक आणि पाचशेही प्रती न निघणारे त्रैमासिक या दोहोंना एकाच मापाने मोजले जाते.

या सर्व अडचणीतूनही महाराष्ट्र साहित्य पत्रिका निघत राहते. कारण महाराष्ट्र साहित्य परिषदेसारखी प्रदीर्घ परंपरा असणारी संस्था तिच्या मागे भक्कम उभी आहे. इतर साहित्य संस्थांनाही हे कठीण जात आहे संस्थेत अंतर्गत मतभेद असू शकतात, परंतु त्यांचा प्रतिकूल प्रभाव मुखपत्रावर पडू नये अशी अपेक्षा असते.

अॅकॅडेमिक जर्नल्स स्वतंत्र हवीत

अॅकॅडमिक स्वरुपाचे लेखन, समीक्षात्मक व संशोधनपर लेखन, प्राचीन वाङ्मयाची चिकित्सा यावर अशा मुखपत्रांमध्ये जे लेखन येते ते अनेकदा अवाजवी जागा व्यापून टाकते. सर्वसामान्य वाचकाला त्यात रस नसतो. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या अंकाबाबत काही वाचक कळवतात की अंक उघडून बघण्याची इच्छा होऊ नये असले जुन्या विषयांवरचे कंटाळवाणे लेख आपण का देता ? अर्थात अशा अभ्यासपूर्ण लेखांसाठी अॅकॅडमिक जर्नल्स ही अधिक उपयुक्त ठरतील. साहित्यसंस्थांची मुखपत्रे ही प्राधान्याने समकालीन साहित्यातील ठळक प्रवाहांचा वाचकांचा परिचय करून देण्यासाठी असावीत. त्यांचा वाचकवर्ग हा केवळ प्राचीन वाङ्मयाचा अभ्यासक असल्याचे गृहीत धरून चालणार नाही. दुर्दैवाने सध्या मराठीत अॅकॅडमिक स्वरुपाचे लेखन प्रसिद्ध करण्यासाठी माध्यमेच जवळजवळ नाहीतच.

मुखपत्राच्या मर्यादा

अशा मुखपत्रामध्ये कथा, कविता, ललित लेख वगैरे साहित्य किती असावे याचाही विचार करावा लागेल. काही नव्या प्रवृत्ती वा परदेशी साहित्य यांचा परिचय करून द्यायचा असेल तर असे ललित लेखन त्यात येणे इष्ट ठरेल. परंतु कथा-कवितांच्या प्रसिद्धीसाठी इतर माध्यमे उपलब्ध असतात. त्यामानाने गंभीरपणे केलेल्या समीक्षात्मक लेखनास व विश्लेषणाला पत्रिकेसारखा वाङ्मयीन नियतकालिकात अधिक स्थान मिळावयास हवे. सत्यकथा व महाराष्ट्र साहित्य पत्रिका यातील सीमारेषांचे भान ठेवणे उचित ठरेल. दोहोंच्या भूमिकाच वेगळ्या राहणार.

वाङमयीन नियतकालिके ही जेव्हा साहित्य संस्थांची मुखपत्रे म्हणून चालविली जातात. तेव्हा त्या संस्थांच्या मर्यादा लक्षात घेऊनच त्याबाबत स्थायी/अस्थायी यंत्रणा उभी राहू शकते. इतर खाजगी वाङमयीन वा रंजक नियतकालिकांचा वेगळा विचार करावा लागेल.

स्थायी व्यवस्था श्रेयस्कर ठरेल

साहित्यसंस्थांची मुखपत्रे चालायला हवीत, चांगल्या तऱ्हेने चालायला हवीत. नियमित चालायला हवीत. यासाठी दर तीन वर्षांनी निवडणुकातून यशस्वी होणाऱ्या व्यक्तीला संपादक नेमण्याच्या पद्धतीत बदल करून स्थायी संपादक समिती ठेवली तर अंकाची आखणी, विषयांचे

सातत्य, लेखकांची एक किमान टीम, जाहिरातदारांचा पाठपुरावा, वर्गणीदारांमधील समतल, मुद्रणव्यवस्था, वितरण व्यवस्था, पत्रव्यवहार व स्वतंत्र स्थायी कार्यालय यात शिस्त व सातत्य राहील.

शासकीय अनुदानाबाबतही अधिक उदार व लवचिक धोरण अपेक्षित राहील. काही विशेषांकासाठी खास अनुदाने उपलब्ध असावीत. काही वाङ्मयीन दीर्घकालीन प्रकल्प व अशी नियतकालिके यांची सांगड घातली तर त्याचा लाभ उभयपक्षी मिळू शकेल. कार्यकारिणीतील निवडणुकांमुळे होणाऱ्या गटबाजीचा प्रभाव संस्थांच्या प्रगतीला अनेकदा विघातक ठरतो. मुखपत्र व काही दीर्घकालीन प्रकल्प याबाबत निवडणुक-निरपेक्ष अशी यंत्रणा कार्यान्वित केली तर त्यायोगे त्यांची वाटचाल अधिक जोमाने होऊ शकेल. केवळ आर्थिक सुबत्तेशी हा व्यवहार निगडित नाही याचे भान रहावे. □

प्राकृती प्रिंटर्स,
८५७ शनिवार पेठ सातारा

[२७ मार्च १९९० रोजी विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेत वाचला गेलेला निबंध]

साहित्यसंस्थांची मुखपत्रे : संघर्ष, समस्या व उपाय

डॉ. पद्माकर दादेगावकर

वाङ्मयीन नियतकालिकांपुढील समस्यांचा विचार करण्यासाठी आज आपण येथे जमलो आहोत. इतर वाङ्मयीन नियतकालिके आणि साहित्यसंस्थांनी चालविलेली आपली मुखपत्रे यांच्या समस्या फारश्या वेगळ्या नाहीत. या समस्यांमधे जो थोडाफार फरक पडत असेल तो त्यांच्या व्यवस्थापन पद्धतीतील वेगळेपणामुळे. तेव्हा त्याचा विचार थोडा नंतर करून आधी काही मूलभूत समस्यांकडे लक्ष देऊ या.

या नियतकालिकांपुढील समस्या म्हणून ज्या प्रश्नांचा आपण आज विचार करतो आहोत ते प्रश्न आज एकाएकी उत्पन्न झाले आहेत असे नाही. पन्नास-पाऊणशे वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्तार, मनोरंजन किंवा अन्य वाङ्मयीन नियमकालिकांमधून वेळोवेळी जी निवेदने आलेली आढळतात ती पाहिली म्हणजे हा प्रश्न केवळ आजचा नाही, संघर्ष काही नवा नाही, तर जुनाच आहे असे आढळून येईल. त्यात पुरेसा वाचकवर्ग नाही, आर्थिक व्यवहार विषम आहे, वेळेवर वर्गण्या मिळत नाहीत, चांगले लेखक व लेखन दुर्मिळ होत चालले आहे या आजच्याच समस्या मांडलेल्या दिसून येतील. गेल्या पन्नास वर्षात शिक्षणाचा अमाप प्रसार झाला, महाविद्यालयांची संख्या बेसुमार वाढली, आणि तरीही परिस्थिती पालटली नाही. याचा अर्थ या समस्यांकडे पाहण्याची आमची दिशाच कुठेतरी चुकली होती, असा होतो हे आपण समजून घेतले पाहिजे. या दिशेचा शोध घेऊन या समस्यांवरील मूलगामी उपाय योजण्याकडे आपण आता लक्ष दिले पाहिजे.

प्रथम आपण नियतकालिकांचे स्वरूप कसे असावयास हवे ते पाहू या. या नियतकालिकांच्या वाचकांत विद्वान, जिज्ञासू, केवळ वाङ्मयप्रेमी तसेच केवळ मनोरंजनाची अपेक्षा करणारे असे भिन्नभिन्न स्तर असतात. या प्रत्येकासाठी थोडेथोडे देऊन नियतकालिक चालवावयाचे म्हटले तर

ती एक गोचडी ठरते. त्या ऐवजी प्रत्येक नियतकालिकाने आपला वाचकवर्ग कोणता हे मनाशी निश्चित ठरवावे व त्याची मनोभावे सेवा करावी. आज होताना दिसते काय तर सगळी मंडळी सगळ्या प्रकारचे साहित्य देतात. त्यामुळे प्रत्येकाचे वेगळे असे व्यक्तिमत्व स्थापित होत नाही. अपवाद म्हणून आलोचना, कवितारती सारखी वेगळेपण जपणारी नियतकालिके असतात. पण अशी नियतकालिकेही स्वतःच्याच परंपरेत जखडली जातात. तसेच बऱ्याच वेळा ती एकमेकांना छेदही देताना दिसतात. उदाहरणार्थ परभाषेतील काव्यविषयक लेखन आलोचनेनेही छापावयाचे व कवितारतीनेही छापावयाचे यात वाचकाची काही एक गैरसोय होऊ शकते ही गोष्ट आपण विचारात घेणार आहोत की नाही? आधीच मराठी वाचकाचा नियतकालिके विकत घेण्याचा उत्साह कमी, त्यात दोन नियतकालिके एकाच प्रकारचे लेखन छापायला लागली तर त्या दोन्हीचा वर्गणीदार होण्याचा आग्रह आपण तरी कुठवर धरायचा? वाचकांना सतत नवे, ताजे हवे असते, मग तो कोणत्याही गटातला असो याचे भान सुटले की नियतकालिकाचा ऱ्हास व्हायला वेळ लागत नाही. मिळेल ते छापणे किंवा स्वतःचे आग्रह लेखक, वाचकावर लादणे, यातून काही समस्या निर्माण होतात. संपादकीय कल्पकता आणि उपक्रमशीलता हाच त्यावर खरा उपाय आहे. त्याला पर्याय नाही.

मराठी वाङमयीन नियतकालिकांमधील ग्रंथपरीक्षणे या विषयावर खूप काही लिहिले, बोलले जाऊ शकेल. एकेकाळी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतील अशा परीक्षणांना एक खास दर्जा होता. आज त्यांचे स्वरूप वर्तमानपत्री थातुरमातूर अभिप्रायांपेक्षा फारसे वेगळे नाही असे खेदाने म्हणावे लागते. व्यक्तिगत रागलोभ, भीड, वर्तमानपत्रीपणा, उपेक्षा व कधीकधी तर विपर्यासही, यातून मार्ग काढून वेगवेगळ्या अंगांनी अशी समीक्षणे व्हावीत यासाठी खास प्रयत्न होणे आज आवश्यक झाले आहे.

■ मराठीचा आजचा वाङमय-व्यवहार हा फार मोठ्या प्रमाणावर मराठीच्या प्राध्यापकांभोवती केंद्रित झालेला आहे. तो आणखी विस्तारायला हवा आहे. त्यामुळे वातावरणात एक मोकळेपणा येईल. शाळांमधील अध्यापक आज फार मोठ्या प्रमाणावर नाराज आहेत ही गोष्ट लक्षात आली तर बरे. या लोकांबरोबरच आज आपण अन्य व्यावसायिकांकडेही गेले पाहिजे. विविध प्रकारची उपक्रमशीलता दाखविल्याशिवाय तरणोपाय नाही. काय केले याचा अभिमान बाळगण्यापेक्षा काय करावयाचे अद्याप शिल्लक आहे याचा विचार प्राधान्याने करावयास हवा.

साहित्य-संस्थांची मुखपत्रे, इतर प्रस्थापित संस्थांची नियतकालिके, विस्थापितांची कालिके आणि एकेकट्या व्यक्तींनी आपल्या हिंमतीवर चालविलेली नियतकालिके यांच्या प्रत्येकाच्या काही सोयी आहेत आणि काही अडचणी आहेत हे आज आतापर्यंत झालेल्या चर्चेतून आपल्या लक्षात आले आहे. साहित्य-संस्थांच्या नियतकालिकांसमोर त्यांचा फार मोठा सभासदवर्ग हीच एक मोठी डोकेदुखी ठरताना दिसत आहे. उदाहरणार्थ, विदर्भ साहित्य संघाचे आज पाचसहा हजार सभासद आहेत. त्यांच्या सभासदत्वाच्या वर्गणीतच त्यांना युगवाणीचा अंकही पाठवावा लागतो. दुसरीकडे सकाळी प्रा. पुरुषोत्तम पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे अनेक वर्गणीदार वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही थकबाकीचीही पूर्तता करीत नाहीत. नियतकालिकांचा संपूर्ण खर्च वर्गणी, विक्री वा जाहिरातीतून कुणाचाच निघत नाही हे एक सत्य आहे. तेव्हा स्पर्धा वा अनावश्यक पुनरुक्ती टाळून कोण किती भार सोसू शकेल व त्यांना इतरेजन किती हातभार लावू शकतील हा खरा प्रश्न आहे. कटू वाटले तरी एक सत्य मी इथे सांगू इच्छितो की पुनरुक्ती टाळण्यासाठी विद्यमान वाङमयीन नियतकालिकांच्या भरमसाठ वाढलेल्या संख्येवर काहीतरी नियंत्रण आणल्याशिवाय समस्यांचा डोंगर कमी होणार नाही हेही आपण लक्षात घ्यावयास हवे.

मराठीतील वाङमयीन नितकालिकांचा मुख्य संघर्ष दृष्टिकोनाचा आहे, वाङमयीन दृष्टीचा

आहे. ती किती पुरोगामी वा किती प्रतिगामी आहे, किती नवतावादी वा किती पारंपरिक आहे याचा निर्णय केवळ संपादकाच्या खुर्चीत बसून लागणारा नाही असे मला आवर्जून सुचवावेसे वाटते. त्यासाठी वाचक-संपादक-लेखक यांचे छोटे-छोटे संवाद-मेळावे महाराष्ट्रांच्या सर्व भागात एका वर्षभरात भरविता आले तर दृष्टी पुष्कळच मोकळी होण्यास सहाय्य होईल. अशा मेळाव्यांनी गेल्या काही वर्षातील निर्मिती व समीक्षा यांची सामर्थ्यस्थाने व उणीवा यांचा शोध घ्यावा. तो घेताना निर्भिडपणा असावा पण व्यक्तिगत निंदानालस्ती टाळावी.

सत्यकथेने अतिकलावादी भूमिका घेऊन एक वलय निर्माण केले व त्यातून वाङमयीन मानदंडाच्या बाबतीत भिन्न कल्पना प्रसारात आल्या. परिणामत: वाचकवर्ग दुरावला. सत्यकथेचा त्यात बळी गेलाच पण एक संबंध पिढीही आवर्तात सापडली. आज दुसरीकडे दलित साहित्यातील प्रवृत्तीचा अट्टाहास तीच चूक करीत नाही ना याचा गंभीरपणे विचार होण्याची आवश्यकता आहे. वाचकाला विविधता हवी व तो रंजनापेक्षा थोडे वर सरकायला तयार असतो. तेथून त्याला अभिजाततेकडे नेता येणे शक्य होते. यात आपला प्रयत्न एवढाच हवा की, ही क्रिया एकेरी न होता अनेकपदरी व्हावी.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, अंतिमत: कुणीच कुणावर काही लादू शकत नाही पण भिन्नत्वाचा आदर करणे आपल्या हाती असते. तो करीत उपरोक्त प्रकारे कार्य करणाऱ्या वाङमयीन नियतकालिकांच्या हाती मराठीचे भवितव्य आहे एवढेच सांगावेसे वाटते. ■

प्रतिनिधी /पंचधारा /म. सा. प. आंध्रप्रदेश हैदराबाद

[वाङमयीन नियतकालिक विकास परिषदेच्या एकदिवसीय चर्चा सत्रातील चवथ्या सत्रात वाचला गेलेला निबंध]

वाङ्‌मयीन नियतकालिकांचे पोषण : समाज, जनप्रतिनिधी, वृत्तपत्रे व शासन यांचे दायित्व

डॉ. वि. स. जोग

विदर्भ साहित्य संघाच्या पुढाकाराने, मराठी साहित्य महामंडळाच्या सहकार्याने आणि श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अथक प्रयत्नाने ही वाङमयीन नियतकालिक परिषद आयोजित झाली आहे. मी प्रथम त्या तिघांनाही धन्यवाद देतो.

आपण मराठीचे रसिक अभ्यासक भूतकालीन वाङमयीन इतिहासातील एक वाक्य नेहमी वाचत / ऐकत आलो आहोत. ते म्हणजे "चित्रपटाच्या धक्क्याने मराठी रंगभूमी कोसळली." वर्तमानकाळात त्या धर्तीवर विधान करण्याची इच्छा होऊ शकते. "दूरदर्शनच्या धक्क्याने वाङ्‌मयीन नियतकालिके कोसळली" किंवा "दूरदर्शनच्या धक्क्याने वाङमयीन नियतकालिकांची कंबर खचली." अर्थात चित्रपटाच्या धक्क्याने कोसळलेली रंगभूमी कालांतराने पुन्हा उभी झाली. आत्मविश्वासाने सक्रीय झाली. त्याच प्रमाणे दूरदर्शनच्या धक्क्याने आज कोसळलेली वाङमयीन नियतकालिके भविष्यात पुन्हा उभी राहतील. दूरदर्शनच्या धसक्याने कंबर खचलेली वाङमयीन नियतकालिके भविष्यात पुन्हा कंबर कसून उभी राहतील. सक्रीय होतील यांत मला तरी शंका वाटत नाही.

मात्र हा आशावाद कल्पनारम्य न ठरण्यासाठी किंवा पोकळ औपचारिक धीराचे – नेमका शब्द वापरायचा झाल्यास पोकळ सांत्वनाचे – न ठरण्यासाठी सर्वच समाजघटकांचे साह्य अपेक्षित आहे. त्या साह्यासाठी आपण जमलो देखील आहोत.

शासनाचे दायित्व

प्रथमतःच हे सांगून टाकतो की, समाजजीवनातील कोणत्याही उणीवांचे मूळ शासनामध्ये शोधण्याची घातक सवय आपल्याला लागली आहे. परंतु या विशिष्ट संदर्भात तरी, म्हणजे वाङमयीन नियतकालिकांच्या कुपोषणाच्या संदर्भात शासनाला फार मोठे उत्तरदायी ठरविण्यास मी स्वतः सिद्ध नाही. याउलट माझे म्हणणे आहे की वाङमयीन नियतकालिकांचे जे कमीअधिक पोषण आज होतेय त्यात शासनाचा. साहित्य संस्कृती मंडळ सारख्या शासननिर्मित संस्थांचा वाटा मोठा आहे.

शासनाच्या वाङमयविषयक धोरणाबद्दल माझ्या मनात संशय नाही. त्या धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या नोकरशाहीबद्दल माझा फारसा आक्षेप नाही. कै. यशवंतराव चव्हाण काय किंवा श्रीमान शरद पवार काय किंवा सुशीलकुमार शिंदे काय, महाराष्ट्राला मिळालेले हे नेतृत्व सुदैवाने साहित्य संदर्भात तरी समंजस आहे. श्री. अंतुले किंवा श्री. साठे यांच्या राजवटीतले अपवादात्मक प्रसंग सोडले तर शासनाने साहित्यिक संस्थांची अवहेलना केली, वाङ्‌मयीन उपक्रमांना शुक्राचारी पद्धतीने अटकाव केला, असे सहसा घडले नाही. वाङ्‌मयीन नियतकालिकांवर विशिष्ट दिशा घेण्याचे दडपण आणले असेही सहसा घडले नाही.

शासनाच्या किरकोळ चुका

तरीही शासनाच्या समग्र वाङ्‌मयीन धोरणाबाबत काही किरकोळ चुका झाल्या आहेत. त्यातली एक चूक म्हणजे राजकीय नेतृत्वाने आणि प्रशासनयंत्रणेने काही विवक्षित साहित्यवर्तुळांवर जास्त भिस्त ठेवली. धोरणे आणि त्यांची अंमलबजावणी यासाठी राजकीय नेतृत्व किंवा प्रशासनयंत्रणा अनेकदा केवळ स्वाक्षरीपुरते उरले. प्रत्यक्षात असे घडले की सद्‌हेतूने एखाद्या वाङ्‌मयीन उपक्रमासाठी शासनाने चार नामधाऱ्यांना आमंत्रित करावे, अशांमध्ये कुणा आगावूंच्या बदसल्ल्याने तथाकथित साहित्यिक महानुभाव किंवा या ना त्या चळवळींच्या दबाव गटाचा एखादा मुसंडीबाज शिलेदार याची वर्णी लागावी. अशा समित्यांनी आपल्या वकुबाप्रमाणे किंवा सोयीसवलतीप्रमाणे वाङ्‌मयीन उपक्रमांची रचना करावी, शासनाधिकाऱ्यांनी या सर्वांवर स्वाक्षरीमय उपस्थिती तेवढी दर्शवावी, परिणामी येणाऱ्या प्रतिक्रियांना तोंड केवळ शासनाधिकाऱ्यांना द्यावे लागावे, असे या वाङ्‌मयव्यवहाराबद्दल अनेकदा घडत आले आहे.

खेदजनक उदाहरणे

यासंबंधी कुणाच्याही अवमानाचा हेतू मनात न ठेवता पुढील चार उदाहरणे तेवढी आपणासमोर ठेवतो. [१] शासनकृत शिवचरित्र लेखन प्रकल्प. या योजनेत शासनाची खूप दिशाभूल झाली. हजारो रुपये पाण्यात गेले. शासनाचे हसे झाले. [२] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "रिडल्स" ग्रंथसंपादनात विवेक न राहिल्यामुळे शासनावर अकारण रोष ओढवला. [३] अलिकडे शासनाने प्रसिद्धिलेल्या महाराष्ट्रातील पंधरा समाजसुधारकांच्या चरित्रग्रंथांत स्वातंत्र्यवीर सावरकर आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचा समावेश न झाल्यामुळे शासनावर ओढवणारा संभाव्य रोष. [४] मराठी भाषा प्रसारासाठी शासकीय व्ययाने मॉरीशसला गेलेल्या शिष्टमंडळातील भ्रष्टाचारी वर्तनाचा वृत्तपत्रीय गवगवा.

"लॉबी"च्या प्रभावाखाली शासन नसावे

माझी ही उदाहरणे आपल्या विषयाच्या परिघाबाहेरची असतील, पण ती विषयाच्या कक्षेतील मात्र निश्चित आहेत. मुद्दा असा की प्रतिभाशाली शासकीय नेतृत्वाने केवळ "मम" म्हणण्याची

भूमिका ठेवली तर वाङ्मयीन नियतकालिकाच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. माझे म्हणणे असे की, एखाद्या "लॉबी"च्या प्रभावाखाली येऊन शासनाने वाङ्मयीन नियतकालिकांसंबंधी स्वतः केवळ औपचारिक भूमिका घेऊ नये. मग ही लॉबी पुण्यामुंबईच्या धनी प्रकाशकांची असो की आपली बडेजावी प्रतिभा निर्माण करणाऱ्या तथाकथित पत्रकारांची असो, की ही लॉबी जातीच्या मागासलेपणाचे भांडवल करणाऱ्यांची असो.

शासनाकडून अपेक्षित साह्य

वाङ्मयीन नियतकालिकांच्या भरीव पोषणासाठी शासनाने भरघोस विज्ञापने द्यावीत अशी माझी सूचना आहे. संस्थांची मुखपत्रे नसलेल्या ज्या वाङ्मयीन नियतकालिकांची नोंदणी होऊन कमीत कमी पाच वर्षे झाली आहेत आणि जी नियमितपणे निघत आहेत अशा सर्व वाङ्मयीन नियतकालिकांना शासनाने त्या नियतकालिकांच्या प्रत्येक चाळीस किंवा साठ पानांचा मुद्रणव्यय भरून निघेल इतक्या रकमेच्या जाहिराती द्याव्यातच. परिवार – कल्याण, मद्यपानबंदी, पर्यटन– उत्तेजन या तीन जाहिराती प्रत्येक अंकात पण वेगवेगळ्या आल्याच पाहिजेत. सध्याच्या जाहिरातीच्या रकमेचा दर दुप्पट करावा. जर पाच वर्षात महागाई भत्ता चौपट वाढू शकतो, शिक्षणखात्याकडून देण्यात येणाऱ्या अनुदानांचे किंवा वेतन श्रेण्यांचे (वाढीचे) प्रमाण कितीतरी पटीने वाढू शकते तर जाहिरातींच्या रकमेचे प्रमाण दुप्पटीने वाढविल्यास काही आभाळ कोसळणार नाही

याच सोबत आणखीही. अंकांचा कागद उधारीवर शासनाने या नियतकालिकांच्या संचालकांना मागवू द्यावा. कागद आणि मुद्रणव्यय यांची अशा प्रकारे अजिबात विवंचना नसली की प्रामाणिक संपादक किंवा संपादक मंडळ हे वाङ्मयीन नियतकालिकांची प्रतिष्ठा निश्चितच वाढवू शकतील ?

कोणी शंका उपस्थित करेल की समजा विपरीत घडले तर ? म्हणजे फुकट उधारीवर मिळालेला कागद काळ्या बाजारात विकला गेला तर ? किंवा अंक नाममात्र निघाले तर ? माझा यावर उपाय असा की या वाङमयीन नियतकालिकांची शासनाने पुढील कसोट्यांवर तपासणी करावी. [१] अंक दिलेल्या तारखेला प्रत्यक्षात पोस्टात पडला आहे की नाही ? [२] केवळ अंक काढणे नव्हे तर त्या अंकाच्या निमित्ताने चर्चा, परिसंवाद आदी गोष्टी या नियतकालिकांनी घडवून आणल्यात की नाही ? [३] या नियतकालिकांच्या वाचकवर्गाचे सर्वेक्षण शासकीय किंवा विनशासकीय पद्धतीने झाले आहे काय ?

अशा परिस्थितीत या सर्व (आणि इतरही) प्रश्नांची होकारार्थी उत्तरे आली तरच त्या वाङमयीन नियतकालिकांना पलिकडे सवलती द्याव्यात (व पुन्हा वर्षभर तपासणी करावी) अन्यथा नाहीत.

वाङमयीन नियतकालिकांच्या पोषणाचे शासकीय उत्तरदायित्व इतपत असावे.

वृत्तपत्रांचे दायित्व

वाङमयीन नियतकालिकांच्या पोषणासंबंधी वृत्तपत्रांचे दायित्व हा तसा नाजूक प्रश्न आहे. कारण वृत्तपत्रे ही काही एक प्रमाणात वाङमयीन नियतकालिकांची स्पर्धक असतात. आजकाल प्रत्येक मोठ्या वृत्तपत्राच्या आठवड्यातून तीन विशेष पुरवण्या निघतातच. त्यातील किमान एका पुरवणीचा मजकूर वाङमयीन नियतकालिकांच्या मजकुरावर आक्रमण करणारा असतो. वाङमयीन नियतकालिकांच्या सार्वत्रिक प्रसारास अप्रत्यक्षपणे या पुरवण्या अडथळा ठरतात हे सत्य आहे. हे सत्य सर्वच संबंधित पक्षांनी पचवले पाहिजे.

तरीही एक दोन गोष्टी करता येतील. वाङमयीन नियतकालिकांच्या जाहिरातींचे काम वृत्तपत्रांना करता येईल. म्हणजे असे की वाङमयीन नियतकालिकांच्या प्रत्येक अंकाचे सविस्तर

समीक्षण वर्तमानपत्रांनी द्यावे. "समीक्षण"च हवे परिचय किंवा समालोचन नको. समीक्षण अनुकूल प्रतिकूल कसेही असले तरी चालेल पण ते वृत्तपत्रांच्या स्वभावधर्मांप्रमाणे तीव्र असावे. या समीक्षणामुळे संबंधित नियतकालिकांचे अस्तित्व एकदम ठसठशीतपणे वाचकांच्या डोळ्यांसमोर येईल.

वृत्तपत्रांकडून अपेक्षिलेले सहकार्य अर्थातच वाङमयीन नियतकालिकांच्या स्वरूपावर आणि दर्जावर अवलंबून असणार. वाङमयीन नियतकालिकांचे अंतर्बाह्य स्वरूप हे दखल घेण्याजोगे असलेच पाहिजे.

चेहरा हरवलेली वाङ्‌मयीन नियतकालिके

याच ठिकाणी आपल्या मूळ विषयाच्या कक्षेत या स्वरूपाची थोडी चर्चा अपरिहार्य आहे. मराठीतील शिल्लक वाङमयीन नियतकालिकांपैकी बरीच आज चेहरा हरवलेली आहेत. उद्दिष्ट आणि फलश्रुती यांचा विचार करीत संभ्रमात पडली आहेत. "ललित"सारखे अव्वल नियतकालिक केशवराव कोठावळे यांच्या मागे आज कांहीसे बेचव झाले आहे. "रुचि"चा गुळगुळीत कागद आणि सुबक अक्षरमुद्रण हीच त्याची इतिकर्तव्यता आपण समजणार आहोत काय ? त्यातील मुलाखतीमधील रटाळपणा, भिन्नस्तरीय मजकुरांची कोंबाकोंब, मांडणीतील अव्यवस्थितपणा चोखंदळ रसिकालाच निराशाजनक वाटतो. मग का म्हणून वृत्तपत्रांनी त्याची दखल घ्यावी. अन्य प्रतिष्ठाप्राप्त नियतकालिकांपैकी काही साचेबंद आणि काही हास्यास्पद अनियमित झाली आहेत.

वाङ्‌मयीन नियतकालिकांचे कर्तव्य

वृत्तपत्रांनी आपली दखल घेऊन प्रसिद्धी करावी अशी जर वाङमयीन नियतकालिकांची मनापासून इच्छा असेल तर त्यांनी काही गोष्टी कराव्यात. (१) आदर्श "कवितारती"चा कित्ता गिरवून प्रत्येकाने स्वतःची कार्यकक्षा अगोदर निश्चित करावी. कथेला, कादंबरीला, नाटकाला, चरित्र-आत्मचरित्रांना वाहिलेले नियतकालिक अशी स्वतःची स्वतंत्र प्रतिमा निर्माण करावी. कथेला वाहिलेले म्हणजे त्यात फक्त अथ पासून इतिपर्यंत कथाच दिल्या पाहिजेत असे नाही. कथा या वाङमयप्रकारांची सर्वस्पर्शी चर्चा, अन्य भाषातील कथांची चर्चा, दूरदर्शनवरील कथांची चर्चा, आदीही गोष्टी त्यात आल्या पाहिजेत. हेच अन्य वाङ्‌मयप्रकारासंबंधीही करता येईल. (२) प्रत्येक वाङमयीन नियतकालिकाने स्वतःचा प्रत्येक अंक हा विशेषांक म्हणूनच काढला पाहिजे. त्याचा प्रकाशन सोहोळा केला पाहिजे म्हणजे वृत्तपत्रांना त्याची दखल घ्यावी लागेल. यासंदर्भात साहित्य महामंडळाच्या घटकसंस्थांच्या मुखपत्रांचे दायित्व मोठे आहे. श्रीपाद भालचंद्र जोशी हे 'युगवाणी'चे मुख्य संपादक झाल्यापासून युगवाणीने हे दायित्व नीट पार पाडले आहे. (यापूर्वी "ग्रेस"च्या कारकीर्दीत असे घडले होते.) "युगवाणी"च्या माध्यमातून मांडल्या गेलेल्या प्रश्नांना त्यामुळे वृत्तपत्रांना स्वतःच्या माध्यमाचा ध्वनिक्षेपक द्यावाच लागला. आजची परिषद ही देखील "युगवाणी"च्या दखलपात्र अस्तित्वाची काही एक फलश्रुती आहे.

अर्थात त्याचबरोबर याही गोष्टीकडे आवर्जून लक्ष वेधले पाहिजे की काही नियतकालिके सारखी आक्रोश करीत आहेत. पण वृत्तपत्रे त्यांच्याबाबत संवेदनाशून्य बनली आहेत. डॉ. यशवंत मनोहरांच्या संपादनाखाली सुरू असलेले "समुचित" आणि डॉ. सुभाष सावरकरांचे "अक्षर-वैदर्भी" ही विदर्भातीलच पण संपूर्ण महाराष्ट्राने मान्य करावीत अशी आदर्श वाङमयीन नियतकालिके आहेत. माझ्या मते डॉ. गंगाधर पानतावणे यांचे "अस्मितादर्श" हे आजचे सर्वश्रेष्ठ वाङमयीन नियतकालिक आहे. पण त्या खालोखाल "समुचित" आणि "अक्षर-वैदर्भी"ला मान द्यावा लागेल. पण "समुचित" (उदा. मुक्तिबोध विशेषांक) ला किंवा तळागाळाच्या पण सुसंस्कृत ग्रामीण बहुजनसमाजाचे मुखपत्र असलेल्या "अक्षर वैदर्भी"ला वृत्तपत्रीय प्रसिद्धी माध्यमांनी कितीसा न्याय दिला ?

जनप्रतिनिधींचे दायित्व

वाङ्मयीन नियतकालिकांच्या जगण्यामरण्याच्या प्रश्नांत जनप्रतिनिधींना गुंतवून या चर्चा-सत्राच्या आयोजकांनी चांगली गोष्ट केली आहे. जनप्रतिनिधी म्हणजे केवळ राजकीय प्रश्नांची तड लावणारे सामाजिक अन्यायांना वाचा फोडणारे, नागरी सुधारणांविषयी प्रयत्नशील असणारे या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक समृद्धता येण्यासाठी वाङमय व्यवहारात त्यांचा सहभाग अपेक्षिला हे चांगले झाले. सुदैवाने आज सर्वश्री विद्याधर गोखले, सुनील दत्त, राम कापसे, ना. धों. महानोर, नेताजी राजगडकर, लक्ष्मण माने इत्यादी अनेक साहित्यिक कलावंत हे जनप्रतिनिधी आहेत. शिवसेना, भाजप, कॉंग्रेस, समाजवादी, मार्क्सवादी इ वेगवेगळ्या विचारधारांचे प्रतिनिधित्व ते राजकारणात करतात. पण एखाद्याचा अपवाद वगळता वाङ्मयीन प्रश्नांवर सहसा सगळ्यांची उदार आणि आजच्या रूढ भाषेत म्हणजे पेरेस्त्रोईका किंवा ग्लासनोस्तवादी भूमिका आहे. अशा सर्व साहित्यिक आमदार–खासदारांची एक समिती तयार व्हावी. ती अनौपचारिक असली तरी चालेल. ती समिती पडताळणी समिती असावी. वाङ्मयीन नियतकालिकांच्या मजकुराविषयी अनुकूल–प्रतिकूल प्रतिक्रिया तिने द्याव्यात. वेळप्रसंगी विधानसभा, लोकसभा यांच्या व्यासपीठां-वरून या प्रतिक्रिया प्रत्यक्षाप्रत्यक्ष बोलक्या कराव्यात. जनप्रतिनिधींच्या या प्रतिक्रियातून निघाले काही तर चांगलेच निघेल.

जनप्रतिनिधींमध्ये मोठ्या शहरांमधून महानगरपालिकांचा नगरसेवक हाही महत्त्वाचा असतो. कारण प्रत्येक नगरसेवकाला वार्षिक काही मोठी राशी स्वतःच्या वार्डातील विकास कार्यासाठी मिळत असते. छोटे पक्के रस्ते, छोटे पुल, नाली स्वच्छता, पाईपलाईन इ. साठी ही रक्कम असते. या रकमेपैकी थोडी रक्कम जरी त्या त्या शहरातून निघत असलेल्या वाङ्मयीन नियतकालिकांना मदत म्हणून देता आली (शिवाय नगरसेवकांच्या प्रभावामुळे मिळू शकणाऱ्या महापालिकेच्या जाहिराती) तरी नियतकालिकांचे भरीव पोषण होण्याची शक्यता आहे.

नागपूरचे एक प्रतिभाशाली महापौर (आणि साधारणतः कायम नगरसेवक) सरदार अटलबहादूरसिंह यांनी नागपूर शहरात वॉर्ड वाचनालयांची स्थापना केली आहे. अडाणी नोकर-शाहीच्या काळात ही वॉर्ड वाचनालये आजारी होतात. पण पुनश्च लोकप्रतिनिधींच्या हाती सत्ता आल्यावर ही वॉर्ड वाचनालये पूर्ववत तुकतुकीत होतात. या वॉर्ड वाचनालयांमधून वाङ्मयीन नियतकालिकांची खरेदी सक्तीची केली तर या नियतकालिकांचा प्रसार व्यापक होण्यास आणि तळापासून वाङमयीन अभिरुची निर्माण होण्यास मदत होईल.

मराठी प्राध्यापकांचे दायित्व

वरील सर्व समाजघटक वगळून पुन्हा जो "समाज" शिल्लक उरतो त्याच्या दायित्वाविषयी दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. या उरलेल्या "समाजा"ची वेगवेगळ्या व्यवसायातील सुविद्य, चोखंदळ, बऱ्यापैकी आर्थिक क्षमता असलेले अभिरुचिसंपन्न वाङमयरसिक अशी व्याख्या सध्यापुरती मी करतो. या व्याख्येत अंतर्भूत असलेला पहिला घटक अर्थात मराठीच्या प्राध्यापकांचा आणि पदव्युत्तर वर्गातील मराठीच्या विद्यार्थ्यांचा आहे. वाङ्मयीन नियतकालिकांचा मोठा वाचकवर्ग हाच समाजघटक आहे. पण या आणिबाणीच्या परिस्थितीत नुसते वाचक होऊन चालणार नाही, तर ग्राहक आणि प्रसारक व्हावे लागेल.

भरीव वेतनश्रेणी असलेल्या मराठीच्या प्राध्यापकाने निदान एका तरी वाङमयीन नियतका-लिकाचा आश्रयदाता का असू नये ? सुवत्तेतील आपल्या विद्यार्थ्यांना त्याने एका तरी वाङ्मयीन नियतकालिकांचा ग्राहक का करून घेऊ नये ? अर्थात ही गोष्ट सोपी नाही. भरभक्कम आर्थिक स्थितीतील विद्यार्थी बाकी सर्व चैनींच्या गोष्टींवर वाटेल तसा व्यय करतील पण एखाद्या वाङ्मयीन

नियतकालिकाची वाङ्मयीन वर्गणी भरणे त्यांच्या जीवावर यते हे मी स्वतः प्राध्यापक म्हणून अनुभवले आहे.

अशी प्रबळ इच्छा निर्माण होण्यासाठी एक उपाय करून पहाण्याजोगा आहे. मराठी एम. ए. आणि एम. फीलच्या वर्गात आठवड्यातून एक तासिका वाङ्मयीन नियतकालिकांच्या चर्चेवर खर्च झाली तर अनायसेच प्रसाराला ते उपकारक ठरेल.

विदर्भातील ओॲसिस

इतर नागरिकांविषयी बोलावयाचे झाल्यास सधन सुविद्य वर्गाची इंग्रजाळलेली संस्कृती त्यांच्या घरात साधे मराठी दैनिक येऊ देत नाही तर वाङ्मयीन नियतकालिकांना काय प्रवेश देणार ? मात्र वाङ्मयीन नियतकालिकांसंबंधी समाजात असे उदासीनतेचे वाळवंट पसरले असताना कांही "निर्झर" [ओॲसिस] ही दिसतात. नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे श्री. चंद्रकांत कुळकर्णी, गुरुवर्य डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यान्वित असलेली 'प्रास' [मराठी प्राध्यापक संघटना] ही संघटना आणि श्री. सुधीर देव आणि सौ. अपर्णा देव हे दांपत्य निष्ठेने चालवीत असलेली "मायस" ही संघटना या असे "ओॲसिस" आहेत. दूरदर्शन प्रभावाची वस्तुस्थिती मान्य करूनही लेखक वाचक नाते बळकटपणे टिकवून धरण्यात या तीन संस्था / व्यक्ती आपली ताकद पणाला लावीत आहेत.

वाङ्मयीन नियतकालिकाच्या एखाद्या विशेषांकावर चर्चा घडवून आणणे वाङ्मयीन नियतकालिकांचे स्वस्थानात किंवा शहरात ज्या ज्या ठिकाणी वाङ्मयीन घडामोडी चालू आहेत त्या त्या ठिकाणी जाऊन प्रदर्शन भरविणे, वाङ्मयीन नियतकालिकांना वाङ्मयीन घटनांच्या वार्ता पुरविणे इ. विविध माध्यमातून या संस्था स्वतःचा सहभाग देत आहेत.

अशा प्रकारे वाङ्मयीन नियतकालिकांच्या संदर्भात विविध घटकांचे उत्तरदायित्व या विषयावर मी माझे मनोगत मांडले आहे. या दिवसभराच्या कार्यक्रमातील हा शेवटला कार्यक्रम व निबंध असल्यामुळे माझ्या निबंधात कदाचित काही मुद्यांची पुनरावृत्ती आपणास वाटेल.

तरीही चर्चेचा हा सूत्ररूप तेवढा आराखडा मानून आपल्यासारख्या जाणकार श्रोत्यांनी या टिपणावर विविधांगी चर्चा करून टिपणातील विचाराचे आवश्यक वाटल्यास शुद्धीकरण करून नवीन भर टाकावी अशी माझी सगळ्यांना विनंती आहे. ■

[लेखनसमाप्ती / १६ मार्च १९९०]

एस–२/६६ "मांडवी",
हिंदुस्थान कॉलनी, वर्धा मार्ग नागपूर–४४००१५.

[२७ मार्च १९९० रोजी विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेकरिता लिहिलेला व परिषदेत वाचला गेलेला निबंध]

प्रश्न : मराठी नियतकालिकांचा

बा. ह. कल्याणकर

वाङ्मयीन नियतकालिकासंबंधी महाराष्ट्रात एक ठोस स्वरूपाची चर्चा आज सुरू झाली आहे ही एक अभिनंदनीय गोष्ट आहे. या चर्चेच्या निमित्ताने वाङ्मय आणि वाङ्मयाची नियतकालिके यांचे स्वरूप, त्यांची आवश्यकता, वाङ्मयीन नियतकालिकांच्या गरजा आणि मर्यादा इ॰ संदर्भात अगदी सूक्ष्मपणाने विचार व्हावा अशी अपेक्षा आहे. तो जर आम्ही करणार नसु तर ही चर्चा म्हणजे एरंडाचे गुऱ्हाळ ठरेल. वाङ्मय ही कल्पनाच आमच्या जनतेला (Masses) ला कळत

नाही. मग वाङ्मयीन नियतकालिकांचा विचार कळणं ही आणखीनच वेगळी बाब आहे. आणि जनतेला (Masses) काही कळलं पाहिजे असं आम्हा वाङ्मयवाल्या आणि वाङ्मयाच्या नियतकालिकवाल्या मंडळींना अजूनही मनापासुन वाटत नाही. ते का वाटत नाही ? याचा अगोदर गंभीरपणे विचार झाला पाहिजे. असा विचार करण्याचं सोडून आम्ही शुद्ध वाङ्मयीन बोलू लागलो तर त्या वाङ्मयालाही अर्थ नाही. आणि त्या वाङ्मया संबंधीच्या वडबडीलाही काही अर्थ नाही. आपण किती पंडित आहोत हे दाखवायचा मोह हा आम्हा वाङ्मयवाल्या मंडळीचा तसा फार सनातन रोग आहे. वाङ्मय हे लोकजीवनाचा आरसा आहे. तो लोकांच्या सुखाचा आणि दुःखाचाही कलात्मक वारसा आहे. वाङ्मय हे लोकातून फुलते. असा विश्वास बाळगणारे वाङ्मयवाले आणि वाङ्मयनियतकालिकवाले लोक आपल्याकडे किती आहेत ? याचा निकाल आपणाला या निमित्ताने कधीतरी लावावा लागेल.

वाङ्मय म्हणजे एक स्वतंत्र बेट आहे. आणि वाङ्मयीन नियतकालिके म्हणजे या सर्व बेटांच्या वर्तुळांचं एक वेगळं राष्ट्र आहे या झोकात आमचे आजवरचे सारे वाङ्मयवाले आणि वाङ्मयाचे नियतकालिकवाले वावरत आले. हा वर्ग म्हणजे जणु लोकांची (त्यांनीच निर्माण केलेल्या संस्कृतीची) संस्कृतीपासून नाळ तोडणारा सनातन अतिरेकी वर्ग वाटावा असाच लोकांना वाटत होता, आणि आजही तो तसाच आहे.

लोकांच्या गरजा शोधायला हव्यात !

वाङ्मय आणि वाङ्मयाचे नियतकालिकवाले यांच्या बद्दल मी या चर्चेच्या टिपणात वेगळा सूर लावतो आहे असं कुणाला जाणवलं तर आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. सत्याचा शोध घेणं हा एक अतिशय खडतर प्रवास आहे. सत्य शोधताना स्वतःविरुद्धही अशा सत्याचा शोध घेणाऱ्या व्यक्तीला लढावं लागते. लढतानाच तो घडत असतो आणि त्याच वेळी सार्वजनिक सत्यही घडत असते. समाजातील तात्कालिक सत्यांच्याकडे आणि तथ्यांच्याकडे पाठ फिरवून वाङ्मय आणि वाङ्मयाच्या चळवळी जेव्हा स्वतःतच आत्ममग्न होतात तेव्हा त्यांचा विनाश हा अटळ असतो. सत्यकथेचं मरण हेच सांगते. कारण कोणतं की 'सामाजिक तथ्य' (Social fact) लोकांच्या गरजेतून निर्माण होत असते. जनतेची (Masses) कत्तल झाली तर होऊच द्या. आमचा संबंध फक्त पोटार्थी मूठभर वर्गाशी (Classes) आहे. याच बांधिलकीतुन जेव्हा वाङ्मय आणि त्या वाङ्मयाची नियतकालिके आपलं अस्तित्व टिकवितात तेव्हा त्यांना भवितव्य असूच शकत नाही हे मी समाजशास्त्राचा विद्यार्थी म्हणून छातीठोकपणे सांगू इच्छितो.

वाङ्मयच लोकांपासून दूर !

वाङ्मयीन नियतकालिकांना वाचक नाही. अशी खंत आज सर्वत्र व्यक्त केली जाते आणि ती काही प्रमाणात खरी सुद्धा आहे. वाङ्मयीन नियतकालिकं वाचली जात नाहीत याचं महत्त्वाचं कारण वाङ्मय ही आपली संस्कृती आहे असं लोकांना वाटतच नाही. लोक वाङ्मयापासून दूर आहेत तसंच वाङ्मयही लोकांपासून दूर आहे. वाङ्मय हा शब्दच लोकांना जवळचा वाटत नाही. लोकांना कळणार नाही, समजणार नाही अशा भाषेत आम्ही कां बोलत आहोत ? याचा विचार आम्ही मंडळींनी करायची आज आवश्यकता आहे. सर्वसामान्य माणसाना वाङ्मय, वाङ्मयाची नियतकालिके, आणि वाङ्मयात बोलणारी माणसे आपल्या जवळची वाटत नाहीत ही सर्वात खरी अशी महत्त्वाची गोष्ट आहे. याचा गंभीरपणे विचार वाङ्मयीन नियतकालिकासंबंधी विचार करताना आपण करायला हवा असं मला वाटते.

नियतकालिकं वाङ्मयीन असोत वा वैचारिक असोत, आमच्या नियतकालिकांतील विषय तेच ते असतात. शिवाय ते खूपच क्लिष्ट आणि रटाळ असतात. जुन्या कलात्मक मूल्यांना सारखं

उकरत आणि चिवडत बसण्यातच आमच्या नियतकालिकवाल्या मंडळींना यथार्थता वाटत. सर्वसामान्य वाचकांना त्यात त्यांच्या उपयोगी, काहीतरी घेण्यासारखं आढळल्याशिवाय तो ही नियतकालिकं का वाचील ? आणि त्यानं ती वाचावीत असा आम्ही आग्रह तरी का धरावा ? 'नवभारत' असो वा 'युगवाणी' त्यातील विषय पाहू जाता आणि भाषा पाहू जाता माझ्यासारखा माणूस गांगरून जातो. अवघड शब्द, क्लिष्ट विचार, विचारांची प्रचंड गुंतागुंत, तेच ते जुने विषय यामुळं वाचक शिक्षण क्षेत्रातला असो वा साहित्याच्या क्षेत्रातला असो असे विषय हातात घ्यायला सहसा तयार होत नाही.

आमच्या नियतकालिकांच्या टोळचा आहेत. नवभारतचे अंक अगर इतर जे दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिक आपण काढतो अशा थाटात वावरणाऱ्यांचे अंक बघितले तर आपल्या हे सहज लक्षात येईल. अस्मितादर्श, समुचित, महाराष्ट्र साहित्य पत्रिका इ० अपवादात्मक आणखी काही नियतकालिके वगळता इतर नियतकालिकांना पाहिलं तर लेखक तेच, विषय तेच ते आलटून, पालटून. जुन्या मुल्यांचा पहारा करण्यासाठीच यांच्या लेखण्या परजलेल्या असतात. जणू ही सारी मंडळी विझलेल्या कंदिलाचा पहारा करीत आहेत. अशा पार्श्वभूमीवर या नियतकालिकांना सर्वदूर वाचकवर्ग नाही मिळाला तर आश्चर्य वाटण्याचं काहीही कारण नाही.

या सर्व संदर्भात खरं तर असं आहे, की आमच्या नियतकालिकांनी त्यांना चालविणाऱ्या संस्था, आणि संस्थाप्रमुखांनी नेमलेल्या संपादकमंडळांनी वर्तमानकालीन समाजाची गरज ओळखलेली नाही. आम्ही सर्वांनी स्वतःभोवती एक रेशमी आत्मकोश विणलेला आहे आणि त्या कोशातच आमच्या कलात्मक वगैरे वेणा घेण्याचं काम अजून आम्ही थांबवलेलं नाही. महाराष्ट्रातल्या तमाम नियतकालिकांनी स्वतःच्या अस्तित्वासाठी स्वतःच्या उद्दिष्टांच्या संदर्भात आत्मपरीक्षण करण्याची आज गरज आहे असं मला नम्रपणे वाटते. यांच्यावर होणारी टीका शत्रूची नसून आपल्या प्रगतीसाठी ती योग्य आहे असं मानून Self assessment होणं या निमित्तानं मला योग्य वाटतं. यात येथून तेथून सारी नियतकालिक कालबाह्य आहेत, जुनाट श्रद्धाळू आहेत, ते लोकांच्या प्रश्नांना बगल देऊन सनातन काळात चालतात असं मला म्हणायचं नाही. महाराष्ट्रातील नियतकालिकांची दिशा आणि दशा काय आहे हे समजून घेण्याचा हा माझ्यापुरता आणि माझ्याशी जे सहमत आहेत, नाहीत त्यांच्यापुरता हा प्रयत्न आहे असं मी मानतो. उगीच क्लिष्ट वाद आणि प्रश्न निर्माण करणाऱ्या भाषेत मला हे मांडायचं नाही.

एक सत्य आपण कबूल केलं पाहिजे ते हे की वाङ्मय लिहिणारा, वाङ्मय वाचणारा, त्यावर चर्चा करणारा, आणि आवड म्हणून या प्रश्नांवरची नियतकालिकं विकत घेणारा वर्ग महाराष्ट्राच्या आणि मराठी संस्कृतीच्या दुर्दैवानं अगदी बोटावर मोजता येईल इतका कमी आहे. सहा—सात कोटीच्या महाराष्ट्रात वाङ्मयीन नियतकालिकं घेणारा वर्ग किती आहे हा खरोखर संशोधनाचा म्हणून तो चिंता आणि चिंतनाचा प्रश्न आहे. आमची अनेक मंडळी वर्तमानपत्र विकत घेत नाही, शेजारी ते येते आणि आम्ही ते वाचतो असं जिथं अभिमानानं सांगतात तिथं वाङ्मय आणि वाङ्मयीन नियतकालिकाची आम्ही काय वासलात लावली आहे याचा विचारच न केलेला बरा.

आणि आपण हेही कबूल केलं पाहिजे की आपल्याकडे विचार करणारा वर्गच आता कमी होत चालला आहे. मराठी भाषा, मराठी समाज, मराठी संस्कृती, मराठी अस्मिता या सर्व बाबी पुस्तकातल्या आणि म्हणून आज त्या भंपक ठरण्याचा संभव आहे. तसं वातावरण सरकार आणि त्या सरकारला खुर्चीवर बसविणारे आपण सर्वच निर्माण करून देत आहोत. पु. ल. देशपांडे बोलताहेत, कुसुमाग्रज बोलताहेत. 'वाचवा', मराठी भाषा वाचवा. मराठी संस्कृती वाचवा. मराठीला दासीचा दर्जा देऊ नका. मंत्रालयासमोर तिला भीक मागायला लावू नका. त्याचं कुणीच ऐकायला तयार नाही. त्यांचा सत्कार, सन्मान करणारं सरकार त्याचा हा आक्रोश ऐकत नाही. तिथं आपलं

बोलणं म्हणजे तापलेल्या तव्यावरचं पाणी. पण हेच पाणी पेटेल असा विश्वास बाळगणारे आम्ही लेखक, कवी यांनी पुढे यायला हवं. मी महाराष्ट्रभर प्रत्येक व्यासपीठावरून ओरडतोय. 'विना अनुदान शिक्षणानं महाराष्ट्रातील मराठी संस्कृतीला विक्रीच्या बाजारात उभं केलं आहे. इंग्रजी शाळेत काळे इंग्रज पोसण्याचे पोल्ट्री फॉर्मस वाढविले आणि घडविले जात आहेत. सर्वसामान्य माणसांच्या मुलांची मग तो गरीब माणूस ब्राह्मण, मराठा, माळी, कोळी कुणीही असेल त्यांच्या गुणवंत मुलांची व्यावसायिक शिक्षणापासून आज कत्तल केली जात आहे. आणि हे महापाप म. जोतिराव फुले, डॉ. आंबेडकर, आगरकर, राजर्षि शाहु आणि शिवाजीच्या महाराष्ट्रात. या सर्वांची दररोज नाव घेतली जात आहे. आणि आमचे वाङ्मयीन सम्राट आजचे हे सारे प्रश्न पाठीशी घालून भूतकाळात वावरत आहेत. त्यांना मूलतत्त्ववादाची बाधा झाली आहे. जणू आपण मूठभर अवघडवाले म्हणजे सारा मराठी माणूस अशी त्यांची समजूत झाली आहे. महाराष्ट्राच्या रोज गाडल्या जाणाऱ्या माणसांच्या दफनावर त्यांना त्यांचं सौंदर्यशास्त्र, कलवादी मूल्य, अलौकिकत्व, संक्लिष्ट प्रतिमाशास्त्र रचायचं आहे. अशा आत्मतुष्ट वर्तुळात महाराष्ट्रातली सारी ब्राह्मण्यग्रस्त नियतकालिके ही आज चिखलात फसलेली आहेत. अतिशय खोटचा आणि तितक्याच खोटचा अनुभवाच्या डोहात त्यांच्या अस्तित्वाची म्हैस बसलेली आहे तेच ते लेखक, तेच ते सर्जन संपलेले विषय, त्याच त्या लेखकांचा तोच तो भोंगळ युक्तिवाद. हे वाचायला वाचकांना आज सवड आहेच कुठे ? त्यात नवी भर म्हणजे दूरदर्शनचं आक्रमण. आकाशवाणीचा तोच तो प्रचार, 'बालभारती'तील पुस्तकांतून होणारं बौद्धिक शिरकाण. अशा दुधावर पोसलेल्या तरुणांकडून वाङ्मयीन नियतकालिके वाचावीत हा आग्रह म्हणजे दुर्योधनी अहंकार आहे

तात्पर्य हे की आमच्या मराठी नियतकालिकांनी स्वतःचं अस्तित्व टिकविण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करावी.

१. केवळ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचं अनुदान मिळते म्हणून अंक न काढता आजच्या समाजाची गरज म्हणून हे अंक काढावेत.

२. अंकातील विषय, लेख, टिपणं, लोकोपयोगी, प्रबोधक, समीक्षापूर्ण आणि माहितीपूर्ण असावीत.

३. अंकाची किंमत सर्वसामान्यांना परवडण्यासारखी असावी. नियतकालिकं सर्वदूर पोचली जावीत.

४. नियतकालिकातील लेखांची मांडणी, भाषा, एका पंडिताने दुसऱ्या पंडिताला कळावी अशी लिहिलेली असू नये. तर ती सोपी, सुबोध, कुणालाही सहज आकलन होणारी असावी.

५. वर्तमानकालीन माणूस म्हणजेच त्याचं हे साहित्य या उद्दिष्टानं आजचा माणूस मग तो कुणीही असो तो या नियतकालिकांतून दिसावा.

६. नव्या दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रिया यांच्या जाणिवांना नियतकालिकांच्या विषयात अग्रक्रम द्यावा.

७. मराठी नियतकालिकांनी नव्या भारतीय समाजाच्या लोकशाही स्वातंत्र्याचं रक्त व्हावं. त्यांनी फॅसिस्ट, लोकद्रोही प्रवृतीचा त्याग करून माणूस हीच गुणवत्ता या मानवी मूल्यांवर काम करावं. त्यासाठी आणि त्या दिशेनं संपादक मंडळाचं प्रबोधन करावं. संपादक मंडळ म्हणजे ज्ञान लपवणारी टोळी न होता ज्ञानेश्वरासारखी ज्ञानाची लोकशाही निर्माण करणारी प्रबोधनशाळा व्हावी म. जोतिराव फुले यांचा क्रांतीशब्द व्हावा. डॉ. आंबेडकरांचा तळपता बुद्धिवाद व्हावा. मराठी नियतकालिकांनी आजच्या वर्तमानकालीन मराठी माणसांच्या गरजांना आणि प्रश्नांना स्वीकारणार साहित्य, समीक्षा आणि विचार मांडावा असं मला वाटते. ■

साहित्य संस्थांची मुखपत्रे : संघर्ष, समस्या व उपाय :

श्रीपाद भालचंद्र जोशी

युगवाणी / एमेजू – ८९ व जुऑस – ८९ च्या अंकातील 'संपादकीय – थोडे वेगळे' ही दोन विस्तृत संपादकीय हीच या सत्रातील निबंध म्हणून चर्चेला असल्याने ती पुन: येथे प्रकाशित केलेली नाहीत. जिज्ञासुंनी 'युगवाणीचे' संबंधित अंक त्याकरता कृपया बघावेत.

डॉ. वा. ना. देशपांडे स्मृति वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेने संमत केलेले ठराव / मागण्या / सूचना :

१. नियतकालिकांना दिल्या जाणाऱ्या अनुदानविषयक धोरणात आमुलाग्र बदल घडवून आणावा. प्रत्येक अनुदानित वाङ्मयीन नियतकालिकांचा वार्षिक उत्पादन खर्च संपूर्णपणे भरून निघेल एवढे व्याज देणाऱ्या रकमेचा स्थायी निधी शासनाने या नियतकालिकांकरता निर्माण करावा.
२. पाच वर्षे चाललेल्या नियतकालिकांना त्यांचा एक वर्षाचा व्यय भरून निघेल एवढ्या रकमेच्या जाहिराती शासनाने पुरवाव्या.
३. वाङ्मयीन नियतकालिकांना लागणारा कागद शासनाने अनुदानरूपाने द्यावा.
४. जनप्रतिनिधी, नगरसेवक, यांच्याकरता असणाऱ्या निधीतून त्या त्या विभागातील नियतकालिकांकरता काही अंश उपलब्ध असल्याची तरतूद करावी.
५. नियतकालिकांची खरेदी करणाऱ्या संस्थांना काही प्रमाणात वाङ्मयीन नियतकालिकांची खरेदी सक्तीची करावी.
६. विविध प्रतिष्ठानांनी वाङ्मयीन नियतकालिकांच्या उपजीविकेचा प्रश्न आपल्या कार्याचा भाग म्हणून स्वीकारावा.
७. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने वाङ्मयीन नियतकालिकांची मान्यताप्राप्त सूची तयार करावी. त्यातील नियतकालिके महाविद्यालयीन स्तरावरील संबंधित अभ्यासक्रमार्थ तसेच संदर्भ पत्रिका म्हणून विद्यापीठांनी अभ्यासक्रमात समाविष्ट करावीत.
८. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने ही परिषद पुढही भरत राहील या करता प्रयत्न करावे.
९. वाङ्मयाशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या जनप्रतिनिधींची एक समिती नेमून वाङ्मयीन नियतकालिकांबाबतचा आढावा घेण्यात यावा.
१०. वर्तमानपत्रांनी नियतकालिकांची समीक्षात्मक दखल प्रत्येक अंकानंतर घेत जावी
११. वाङ्मयीन नियतकालिकांच्या समस्या, संघर्ष, उपाययोजना व आवश्यकती कृती याकरता एका स्थायी वाङ्मयीन नियतकालिक परिषदेची स्थापना.
१२. प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली (युगवाणीचे संपादक) श्रीपाद भालचंद्र जोशी निमंत्रक असलेल्या व डॉ. गंगाधर पानतावणे, (अस्मितादर्श) डॉ. पद्माकर दादेगावकर (पंचधारा), प्रा. पुरुषोत्तम पाटील, (कवितारती) प्रा. प्रभाकर वागल (अनुष्टुभ) डॉ. सुभाष सावरकर (अक्षर वैदर्भी), डॉ. भास्कर गिरधारी (अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, मुंबई विद्यापीठ), अनिल वळेल (साहित्य सूची) यांचा समावेश असलेल्या अस्थायी समितीची नियुक्ती.

■

मराठीतील वाङ्मयीन नियतकालिकांविषयी

वाङ्मयीन नियतकालिकांच्या दुर्दशेसंबंधाने मराठीतील काही मान्यवर, विशेषतः मराठीत महत्त्वाच्या समजल्या गेलेल्या काही विशिष्ट वाङ्मयीन नियतकालिकातूनच लेखन प्रकाशित झालेल्या मान्यवरांची देखील मते जाणून घेण्याकरिता सोबतची प्रश्नावली १२ मान्यवर लेखकांना स्वतंत्रपणे पाठविलेली होती. श्री. रत्नाकर पटवर्धन वगळता इतरांकडून कोणताच प्रतिसाद प्राप्त होऊ न शकल्याने केवळ श्री. रत्नाकर पटवर्धन यांनी दिलेला प्रतिसाद प्रकाशित करीत आहोत. श्री. दिनकर बेडेकर यांनी सोबतची प्रश्नावली तयार केली असून त्यांनीच या प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या उपक्रमाचे संयोजन केलेले होते.

सोबतच्या प्रश्नावलीची उत्तरे 'युगवाणी'चे लेखक, वाचक व 'युगवाणी' परिवाराव्यतिरिक्त अन्य कुणीही पाठविल्यास प्रातिनिधिक महत्त्वाचा असा प्रतिसाद युगवाणीतून प्रकाशित केला जाईल.

[प्रश्नावली / उत्तरे]

(१) वाङ्मयीन नियतकालिकाची आपली संकल्पना काय आहे ?

(२) अशा नियतकालिकांची आवश्यकता नेमकी कुठे भासते ?

(३) मराठी साहित्याच्या संदर्भात अशा नियतकालिकांचे स्थान आणि आपल्या मते त्यांनी केलेले वैशिष्ट्यपूर्ण कार्य ?

(४) आपल्याला उल्लेखनीय वाटतात अशा काही नियतकालिकांची नावे, संपादनरीती आणि गुणदोष ?

(५) मराठी वाङ्मयीन नियतकालिकांची सध्याची स्थिती आणि तिचे आपले विश्लेषण ?

(६) वाङ्मयीन नियतकालिकांप्रमाणेच, साहित्य संस्थांची मुखपत्रे त्यांची वर्तमान अवस्था ?

(७) ह्या सर्व परिस्थितीची कारणे सांस्कृतिक, सामाजिक की आर्थिक असावीत ?

(८) ह्या सर्व परिस्थितीवर मात करणे शक्य आहे काय ? असल्यास कोणत्या उपायांनी ?

(९) वाङ्मयीन नियतकालिकांचे एकापाठोपाठ एक बंद होणे हे मराठी माणसाच्या वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक औदासिन्याचे आणि बधीरतेचे लक्षण आहे असे आपल्याला वाटते काय ?

(१०) एखाद्या नियतकालिकाकडे लेखन प्रसिद्धीसाठी पाठवताना आपण कोणत्या गोष्टींचा विचार करता ?

(११) वाङ्मयीन नियतकालिकांमधून प्रसिद्ध होणारे साहित्य, वाचकाकडून विशिष्ट अभिरूची स्तराची अपेक्षा करताना आढळते. त्यामुळे अर्थातच त्यांचा वाचकवर्गही विशिष्ट स्तरातील आणि मर्यादित असतो. तत्त्वत: हे अपरिहार्य असले तरी ह्यामुळे सर्वसामान्य वाचक अधिकच दुरावत जातो ही वस्तुस्थिती आहे. ही गोष्ट लेखक म्हणून आपल्याला कशी जाणवते ?

(१२) ह्याच कारणांमुळे वाङ्मयीन नियतकालिकांना अनेक व्यावहारिक संकटांनाही तोंड द्यावे लागते, जे सध्याच्या परिस्थितीत अशक्य होत चालले आहे. अनेक नियतकालिकांचे प्रकाशन

स्थगित होणे आणि इतरांच्या प्रकाशन काळातील वाढती अनियमितता आपल्याला लेखक म्हणून कशी अस्वस्थ करते?

(१३) मराठी माणूस आणि मराठी नियतकालिकांचे वाचक ह्यांचे प्रमाण काय असावे असे आपल्याला वाटते? ह्या बाबतीत आपले निरीक्षण काय आहे?

(१४) काही लेखक विशिष्ट नियतकालिकामधूनच लेखन करताना आढळतात. अशा लेखकांचे लेखन, त्या नियतकालिकांचे प्रकाशन स्थगित होताच वाचकांपर्यंत पोहचणेही थांबते. मराठी साहित्यांच्या दृष्टीने ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. ही कोंडी फोडण्यासाठी आपण काही मार्ग सुचवू इच्छिता का?

(१५) वरील मुद्यांव्यतिरिक्त आणखी काही महत्त्वाचे मुद्दे आपल्याला मांडावेसे वाटतात का? ■

नारायण सदन, गोळे कॉलनी,
नाशिक- ४२२००२.
दिनांक २-७-९०

महाशय,

आपले पत्र मिळाले. माझे मत याबाबत आपल्याला जाणून घ्यावे असे वाटले म्हणून कॉलर जरा ताठ झाली. आभारी आहे.

आपला रोख ललित लेखनाकडे असावा असे वाटते. वाङ्मयीन नियतकालिकांबाबत मी वाचक म्हणून फक्त एवढेच म्हणू शकतो की, मी ती वाचू शकत नाही. हिंदी / मराठी सिनेमा जसा सहन करणे अशक्य असते तसाच नेमका हा प्रकार आहे.

मी स्वतः छटाक आदपाव लेखक आहे किंवा होतो. आणि म्हणून एका अर्थी काचेच्या घरात रहात असलो तरी या विषयाबाबत मत मांडायचे झाल्यास मला उत्साहाने सर्व दिशांनी दगडफेक करणे प्राप्त आहे. आणि तरी अर्थात मला लोक नीट लिहीत आणि वाचत का नाहीत याचे बरोबर उत्तर देता येईल असे मुळीच नाही. तरीही पुढील मते मांडीत आहे.

मुळात लोक वाचतात किंवा लिहितात ते काय म्हणून या प्रश्नाचा शोध घेतल्यास कदाचित मराठी साहित्य आज इतके दीन दुबळे का झाले असावे याचे उत्तर मिळेल असे वाटते.

आपण कळत नकळत कायमच आपण कुठं आहोत याचा अंदाज घेत असतो आणि ते कळण्यासाठी अनुभवांची देवाणघेवाण होणे आणि करणे आवश्यक असते. याच कारणाने साहित्य वाचले जाते, त्यावर टीका होते वगैरे वगैरे.

एकंदरीत अनुभव घेणे ही क्रिया सुखद असते. असेही म्हणतात की कोणताच अनुभव किंवा संवेदना न मिळणे ही गोष्ट फारच भयानक आहे. त्यापेक्षा वेदनाकारक, दुःखद, असे अनुभव मिळणे सुद्धा एक वेळ परवडेल पण अनुभवशून्यता फारच वाईट. त्या कारणाने म्हणजे अनुभव मिळविण्याकरता आपण वाचत असतो.

वाचनाने मिळणारा अनुभव हा 'फर्स्टहँड' अनुभव नव्हे. लेखकास जाणवलेले, त्याने मांडलेले विश्व याचा अनुभव वाचकास घ्यायचा असतो. म्हणजे यामध्ये एक पायरी उद्‌भवते आणि ज्याला 'एंपथी' म्हणतात. त्याच्या योगाने अनुभव मिळवायचा असतो. (Empathy याला मराठी शब्द माहिती नाही.)

ही गोष्ट शक्य होण्याकरता लेखक आणि त्याने हाताळलेला विषय याच्याशी काही प्रमाणात तरी वाचकाचा संबंध असणे आवश्यक असते. मराठी वाङ्मयात मुख्य त्रुटी जर काही असेल तर ती

निरनिराळ्या प्रकारच्या विषयांची आहे. "बॉक्सिंग"सारख्या विषयाबद्दल गोष्ट असेल तर प्रथम लेखकाने आणि नंतर वाचकाने केव्हाना केव्हा 'बॉक्सिंग ग्लोव्हज्' हातात घातलेले असायला हवेत. तरच ठोसा बसल्यानंतर किंवा रक्तबंबाळ होऊन बॉक्सिंग मॅच जिंकल्या हरल्यानंतर काय होते ते एकमेकाला सांगणे शक्य आहे. अनुभूती नसताना लेखक गदा लागून कोणी भडाभडा रक्त ओकला आणि पुन: उठून युद्ध करू लागला असे लिहून जातो आणि अनुभव नसलेला वाचक खुशाल ते मान्य करतो अशी परिस्थिती उद्‌भवते. तीन फूट काठीला पाच किलोचा दगड बांधून ती वस्तू गदेसारखी कोणी नुसती फिरवून जरी बघितली तरी असली अचरट विधाने कोणी करणार नाही.

अर्थात मराठी लोकांच्या आयुष्यात अनुभव निर्माण करणाऱ्या घटना कमी येतात असे माझे म्हणणे नाही. पण अनुभवाला शब्दरूप देणे ही एक मेंदूची विशिष्ट क्रिया आहे अशी माझी खात्री आहे. आणि ही क्रिया घडण्यासाठी काही विशिष्ठ संस्कार योग्य वयात घडणे आवश्यक असते. मला असेही वाटते की असे वय बरेच कमी असून ते जन्माच्यापासून पाच वर्षेपर्यंत असावे. यानंतर होणाऱ्या शिक्षणाचा परिणाम विश्वाला शब्दात पकडण्याची क्रिया शिकण्यास निरुपयोगी वाटते. अशिक्षितपणा जेवढा जास्त तेवढी शब्दरूप जग निर्माण करण्याची क्रिया क्षीण होते. त्यामुळे कारागीर, शेतकरी, खेड्यात रहाणारे लोक, नावाडी, शिकारी इत्यादि शब्दसंपत्तीस पारखी झालेली माणसे लेखक होण्यात अत्यंत मूलभूत अडचण निर्माण होते. हा मुकेपणा आपल्या भोवेस भोवला आहे. जी माणसे बोलत नाहीत ती विचारही करू शकत नाहीत. विचार ही गोष्ट मुळात बव्हंशी शब्दांवर अवलंबून आहे. शब्दरूपात विश्व पकडण्याची क्रिया अर्थात नुसती बोलायला येऊन घडेल असे नाही. त्याही पेक्षा अधिक काही घडणे आवश्यक असते.

दलित लेखक हा नवीन प्रकार नुकताच जन्माला आला आहे. (मुळात लेखक हा दलितच असतो हे माझे विधान कितीही गंभीरपणे केले तरी लोकांना विनोदी का वाटते हे मला कळालेले नाही हा भाग वेगळा) या मंडळींना लेखक म्हटले जाते पण ते सर्वस्वी योग्य नव्हे. या विधानाने मला दोष कोणा एका व्यक्तीत दाखवायचा नसून असे म्हणायचे आहे की, स्वतःच्या जीवनासंबंधी चित्र काढू शकणे ही फक्त एक गोष्ट झाली. पण स्वतःची कीव वाटून जे तयार होते ते 'पहिल्या धारेचे' साहित्य नव्हे. परमन प्रवेशाची किमया लेखकास जमणे आवश्यक असते. याचा अर्थ कीव स्वतःची किंवा दुसऱ्याची वाटणे नव्हे तर तर दुसऱ्याच्या बाजूने पाहण्याची ती दिव्य दृष्टी होय. ही गोष्ट प्रत्येक लेखकास कमवावीच लागते.

आणखी एक गोष्ट मला नेहमी जाणवली आहे, ती अशी की, कविता उत्तम असण्याकरिता कवी आणि कविता आत्मकेंद्रित, स्वकेंद्रित असणे आवश्यक असते. तर गद्य साहित्याकरिता याच्या नेमका उलट दृष्टीकोण असणे आवश्यक असते. याला शब्द काय तो मला सापडलेला नाही.

पुढचा मुद्दा आहे तो लेखन कलेचा. ती कला कमवावी लागते आणि निरनिराळ्या कामाला तिला जुंपावी लागते. तेव्हाच विचार प्रदर्शनाचे सामर्थ्य तिच्यात येते. जर मुळात विषय कमी हाताळले तर ही पुरेशी तावून सुलाखून न निघाल्याने तिची परिणामकारकता कमी होते. इंग्रजी भाषेतील रीडर्स डायजेस्ट सारखे पुस्तक वाचताना सुद्धा जाणवते की, हे लेखन अत्यंत सुंदर आहे. ही गोष्ट मराठीच्या बाबतीत घडण्याकरता, खूप विषयांबद्दल खूप लिहिले जाणे आवश्यक आहे.

आपल्या भोवतालची माणसे कमी हालचाल करतात, कमी विचार करतात, कमी कमी गोष्टीत रस घेतात हे आपल्याला सारखे जाणवते आहे. आपण अन्यायाबद्दल ओरडून उठत नाही, वाटेल ते सहन करतो, जमेल तेव्हा दुसऱ्याला नाडायला मागेपुढे पहात नाही, जनावराला कडबा घालतात तसे पुढे येईल ते खातो, टिव्ही वर घाण पहातो, बाजारात विकत मिळेल ते घेतो. हा आळशीपणा आणि मिंधेपणा आपल्या साहित्यिक जीवनात आपल्याला प्रतिबिंबित झालेला दिसला तर त्यात नवल काय ?

जीवन आणि साहित्य यात अंतर नाही. "कादंबरी लिहायला तो काय प्रोफेसर आहे?" असे प्रश्न आपल्याला जोपर्यंत मुळातच चुकीचे कसे हे कळत नाही. तोवर आपले साहित्य याच पातळीवर राहणार आहे.

अर्थात आतापर्यंतच्या लिहिण्यात मी काहीही म्हटले असले तरी त्याचा अर्थ असा नव्हे की, मराठीत चांगले लिहिलेच जात नाही. प्रश्न मुख्यतः प्रमाणाचा आहे. आणि इथं लेखकांच्या बाजूने लिहिण्याची पाळी येते. कमी लिहिणे आणि कमी वाचणे हे दुष्टचक्र असे आहे की, चांगले, वेगळे, नवीन असे काही लिहिले गेल्यास ते छापणारा लवकर आढळत नाही. लेखकाला मानधन देताना 'धंदा' नाही असे म्हणणारे पुस्तकवाले छापल्या जाणाऱ्या मालाला गिऱ्हाईक आहे की नाही याचेच मोजमाप शेवटी लावतात. त्यांना तिखट, झणझणीत काही हवे असते पण ते जिभेच्या चवी पुरते. डोळ्यातले अंजन म्हणून ते नको असते. लेखन छापणे हे अजून लेखकावरचे उपकारच आहेत. तेव्हा याही बाजूने होणारी गळेदाबी कमी झाल्यास ती गोष्ट निश्चितच हवी आहे यात शंका नाही.

कळावे

आपला

रत्नाकर पटवर्धन

टिपण

सोपेपणा, समाजोन्नती व कला-जीवन वगैरे....

कुमार गुप्ते

"त्यांना थोडं सोपं लिहायला सांगता येणार नाही कां ?" किंवा "तुमच्या त्या वाङ्मयीन नियतकालिकातलं सारं काही आमच्या डोक्यावरून जातं हो, थोडं आम्हाला समजेल असं लिहीत चला म्हणा तुमच्या त्या लेखकांना" अशा प्रकारच्या अपेक्षा बोलून दाखवण्याची एक 'फॅशन' वाङ्मयीन समजल्या जाणाऱ्या विश्वात आजकाल मूळ धरू पहाते आहे.

आणि दुर्दैवाने तिला खतपाणी घातल्या जाते आहे ते देखील स्वतःला वाङ्मयीन विश्वाचे प्रतिनिधी समजणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि तत्सम 'अधिकारी' स्वरूपाच्या व्यक्तींकडून. हे जाणता घडत असो की अजाणता, घडते आहे हे मात्र खरे.

विशेषतः समाजोन्नतीच्या नावाखाली आपला वैयक्तिक अहंकार लादण्यामुळे तसेच साहित्य संस्थांचा कार्यप्रसार करण्याच्या नावाखाली भरमसाठ सभासद वाढविण्यामुळे अथवा आपआपल्या वाङ्मयीन क्षेत्रातील स्थान व सत्ता सुरक्षित राखण्यासाठी योजलेल्या अनेक युक्त्या-प्रयुक्त्या-उपायांमुळे जे वातावरण आज निर्माण झालेले आहे ते कोणत्याही साहित्य प्रवाहातील असो ते जवळजवळ अवाङ्मयीन, वाङ्मयबाह्य, गांभीर्यविहीन व प्रयोजनशून्य असे काहीसे झालेले आहे.

"सामाजिक उन्नती" व "समाजातील व्यक्तींचा व्यक्तिगत विकास" या दोन संकल्पनांमधील फरक जाणून न घेतल्यामुळे "साहित्य हे रसिकापर्यंत, सर्वसामान्यांपर्यंत पोहचले पाहिजे" या घोषणांचा अर्थ ते त्याला हवे तसेच, तेव्हा व तेवढेच दिले गेले पाहिजे असा लावला गेला आहे. साहित्य हे जणू एखादे इंजेक्शन, औषध किंवा गोळीच ! मात्र ज्या सर्वसामान्यांपर्यंत हे सारे पोहचण्याची धडपड, त्या सर्वसामान्याला 'रसिक' बनविण्यासाठी काही परिश्रम, तयारी स्वतः देखील करावी लागेल, त्याचेकडून ती करून घ्यावी लागेल याकडे संपूर्ण डोळेझाक करून त्याला हवे तसे, सोपे करण्याचा अनावश्यक पायंडा पाडला जात आहे.

ते 'सोपे' असले पाहिजे, 'कठीण' नको. म्हणजे वाचणारा, ऐकणारा, बघणारा जो कोणी असेल त्याच्या डोक्याला त्रास होणार नाही असे हवे. त्याला कष्ट पडणार नाहीत व विनासायास त्याला ते समजेल, ग्रहण करता येईल असे हवे. असे काहीसे सर्वत्रच समजल्या जाऊ लागले आहे.

जणू वाचक, प्रेक्षक, श्रोता हा कुणीतरी 'मतदार' आहे (अथवा वस्तूंचा ग्राहक) व लेखक, निर्माता, कलावंत, संपादक हा राजकीय पक्षाचा मते गोळा करणारा उमेदवार (अथवा वस्तुंचा उत्पादक व जाहिरातदार) की ज्याला मतदार (अथवा ग्राहक) नाराज झाल्यास मते मिळणार नाहीत (वा वस्तू विकल्या जाणार नाही) व सत्ता गमावून बसावी लागेल ! (अथवा धंदा) अगदी याच पद्धतीचा वाचक, श्रोते, प्रेक्षक यांचा अनुनय केला जावा अशा खुद्द त्यांच्याही अपेक्षा होत चाललेल्या आहेत.

वाचक, प्रेक्षक, श्रोता म्हणून एखादी कविता, चित्र, शिल्प, संगीत, कल्पना, कलाकृती, प्रतिमा, प्रतीके इ. जाणून घेण्यास त्याला कष्ट पडणार असल्यास ते आपल्याकरता 'नसणारे' व विनासायास पचनी पडेल असे असल्यास आपले असलेले, आपल्याकरता असलेले वाङ्मय-कला, अशी काहीशी 'आपल्या' व 'आपल्या नसलेल्या' वाङ्मयांची, कलेची 'लोकसापेक्ष' व्याख्या होऊ लागली आहे, व विविध कारणांमुळे 'लोकानुनय' करणे हो ज्यांची प्राथमिक गरज होऊन बसली आहे ते सर्वच प्रवाहांच्या वाङ्मयीन क्षेत्रातील तथाकथित अनुनयी अधिकारी महाभाग या व्याख्येला खतपाणी घालून या अपेक्षांचा फोफावणारा वृक्ष करू लागले आहेत.

हे विसरून की त्या योगे ते सामाजिक उन्नती व वाचक, प्रेक्षक, श्रोते यांच्या (मग ते कोणत्याही जात, धर्म, पंथ, प्रवाहांचे असोत) व्यक्तिगत उन्नयनाचा मार्ग अवरुद्ध करीत आहेत. काही हितसंबंधीयांच्या हिताच्या पोटी त्यांच्या हिताचे सामूहिकीकरण करून ते व्यक्तींवर विविध माध्यमातून लादल्या जात आहे. व्यक्तीच्या व्यक्तिगत उत्थानाची प्रक्रिया यात पूर्णपणे एकतर दुर्लक्षिल्या तरी जात आहे किंवा जाणीवपूर्वक दडपल्या तरी जात आहे. किंवा त्या प्रक्रियेच्या संपूर्ण अज्ञानापोटी तरी हे घडते आहे. कोणत्याही जात, धर्म, विभाग, पंथातील अविकसित, असंस्कृत, असुधारित, असुसंस्कृत अशा फार मोठ्या लोकसख्येला 'कष्टहीन', 'रेडिमेड' 'सोप्या' त्याच्यापर्यंत विनासायास 'पोहचणाऱ्या', 'तय्यार' अभिरुचीची सवय लावून स्वकष्टार्जित अभिरुचीतून निर्माण होणाऱ्या प्रज्ञेपासून बहुजन अशा वर्गास वंचित करण्याचा जणू हे कटच रचीत आहे असे वाटावे अशी ही परिस्थिती आहे सोपेपणाचा, गुळगुळीतपणाचा, मुलायम, 'कष्टहीन', तय्यार अभिरुची वाचक, श्रोते, प्रेक्षक यास 'पोहचती' करण्याचा आग्रह धरणे हा ज्या वर्गाच्या ज्या लोकांच्या उत्थानाचा आग्रह धरायचा त्यांच्या व्यक्तिगत उत्थानास पोषक नसून मारक ठरणारी बाब होय.

याचा दुसरा अर्थ असे 'पोहचवणारी' सारीच माध्यमे सारखीच, एकाच चेहेऱ्याची करून सोडणे होईल जीवनातील वैविध्य, वैचित्र्य व 'स्वाभाविक' असे जे जे, त्याचे 'वेगळेपण' जाणवण्याची, जाणून घेण्याची व्यक्तींची 'क्षमता' वाढविण्याऐवजी, ती वाढविणे कष्टाचे, त्रासाचे आहे म्हणून ते वैविध्य, वैचित्र्य, सौंदर्य त्यात तथाकथित सोपेपणाचे रसायन ओतून पातळ करून प्यायला देण्याचा आग्रह धरणे म्हणजे जीवनातील सौंदर्याचे, वैविध्याचे, वैचित्र्याचे पर्यायाने कलेचे घट्ट, मजबूत असणारे पोत विसविशीत करणे व हे वस्त्रचं हळूहळू नष्ट करून जीवन हे कलाविहीन करून सोडणे याकडे ती वाटचाल ठरेल.

तसे झाल्यास त्यात नुकसान कलेचे नसून जीवनाचे आहे व जीवन हे मूठभरांचे नसून प्रत्येकाचेच आहे हे लक्षात घेतले पाहिजे. ■



भाऊ समर्थ : कलंदर चित्रव्रती

श्रीपाद भालचंद्र जोशी

भाऊ समर्थ यांचे निधन हा कलाविश्वाला तसेच साहित्य-संस्कृती प्रांताला एक जबर धक्का आहे. मराठीतीलच नव्हे तर हिंदीतील देखील वाङ्मयीन नियतकालिके आणि भाऊ समर्थ, विशेषतः युगवाणी आणि भाऊ समर्थ यांचे एक अभिन्न असे नाते होते. भाऊंच्या चित्राशिवाय, रेखाटनाशिवाय वाङ्मयीन नियतकालिक, त्यांचे मुखपृष्ठ, ही कल्पनाच करता येऊ नये एवढे हे नाते पक्के झाले होते. सध्याचे भारताचे संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री ना. शरद पवार यांनी भाऊंच्या निधनाबद्दल महाराष्ट्र राज्याच्या वतीने शोक-संवेदना व्यक्त करून भाऊंची महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली पाळेमुळे किती खोलवर आहेत याची जाणीव करून दिली आहे.

भाऊ केवळ विदर्भ साहित्य संघाचे सन्माननीय सदस्यच नव्हते तर या संस्थेशी, युगवाणीशी त्यांचा गेली तीन दशके वेगवेगळ्या निमित्ताने संबंध होता.

युगवाणीचे संपादक व भाऊंचे एक स्नेही श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी वाहिलेली ही श्रद्धांजली !

[दै. तरुण भारतच्या सौजन्याने पुनर्मुद्रित करीत आहोत]

"पटकन एखाद दिवशी मरून गेलो तर हे बोललेलं तसंच राहून जाईल. तू टिपून ठेवत जा, आपलं हे बोलणंच लिहायला पाहिजे. टेपच करायला पाहिजे. भाऊ असं म्हणत होता हे तू सांगशील हे मला माहीत आहे. तूच सांगशील हेही माहीत आहे."

"भाऊ, पंधरा-वीस वर्ष अजून काही होत नाही. पंचाहत्तरी करू आपण तुमची."

"अरे सोड यार, ही तुझी सदिच्छा आहे. काही नेम नाही आजकाल. जे काय बोलायचं असेल ते आपण भेटतो तेव्हाच बोलून टाकत जाऊ. तू लिहायचं तेवढं लिहून ठेव वाटल्यास यार, तुझ्याजवळ. दुसरं काय आहे आपल्याजवळ या चर्चांशिवाय ? या विचारांशिवाय ? हे कसं वाटते तुला ?"

"भाऊ, एक सलग, आजवर न लिहिलेलं, उरलेलं लिहून टाका. आत्मचरित्रच लिहा. आपण करू प्रकाशित."

"तू मला दीड-दोन हजाराची सोय करून दे. एका खोलीत बंद करून ठेव पंधरा-वीस दिवस. लिहितो."

"ठरलं, एक रूम बुक करेंगे. दुसरीकडे नो कमिटमेंट."

"ठीक है !"

भाऊसोबत हे नुकतच परवा परवाच ठरलं. साहित्य संघाच्या फाटकावरच. नेहमीसारखंच उभ्या उभ्याच आणि 'ठीक है' म्हणून भाऊ गेला तो गेलाच. ही कमिटमेंट पूर्ण न करताच.

लूनावर फिरायला लागल्यापासून डोक्यात काही आल्या आल्याच लुना काढून, घरी येऊन किंवा पायी पायीच चालत, रस्त्यात, साहित्य संघात, कॉफी हाऊसमध्ये, चौकात, हॉटेलात, लोकमतच्या आत-बाहेर, कुठेही, उभ्या-उभ्याच किंवा बसून घेऊन, 'डोक्यातल रिकामं करायला आलो. ऐकून घे' म्हणत वयाच्या त्रेसष्ठाव्या वर्षी देखील सारं सांगून झाल्यावर 'हे कसं वाटते तुला ?' म्हणणारा भाऊ आता पुन: कधीच म्हणणार नाही- हे कसं वाटते तुला ?'

आपला मुद्दा मांडताना तो संपता संपता टाळीसाठी पटकन् हात पुढे करण्याच्या भाऊंच्या सवयीची जागा आजकाल 'हे कसं वाटते तुला ?' या वाक्यानं घेतली होती.

आपले म्हणणे संपता संपता स्वत:च खूष होऊन टाळीसाठी हात पुढे करायची भाऊची सवय वल्लूभय्या (आनंद) जोग गेल्यापासून कमी होत गेली होती.

टाळी मागायची भाऊची ही सवय ठाऊक झालेल्यांनी देखील थोडे जाणीवपूर्वकच हात पुढे करण्याचे केव्हाच सोडून दिले होते. त्याचीच जागा बहुतेक 'हे कसं वाटते तुला ?' या त्यांच्या वाक्यानं घेतली होती,

बल्लूभय्या जोग गेल्यापासूनच भाऊला आपल्या 'वयाची' जाणीवही अधिकच तीव्रतेने झालेली प्रथमच दिसत होती. एकतर आनंद जोग गेल्या-नंतर साहित्य संघाच्या फाटकासमोरची भाऊची रोज संध्याकाळची हजेरी देखील विस्कळीत होत होत विरत गेली ती मधेमधे 'काय भाऊ, बऱ्याच दिवसांनी' असे म्हणण्याइतकी. गेल्या वर्ष-दीड वर्षात मात्र ती पुन: वाढली होती.

आनंद जोगांच्या मृत्यूचा भाऊवर परिणाम झालाच होता. आनंद जोग भाऊला समवयस्क, समविचारी देखील. मृत्यू आपल्यापर्यंत आल्याचे भाऊ त्यानंतरच बोलू लागला होता. तोवर त्याला असं बोलताना कुणी ऐकलं नव्हतं. याचं अजून एक कारण म्हणजे भाऊचा फल-ज्योतिषाचा अभ्यास हे देखील असलं पाहिजे काय ?

आपला-भाऊचा गेल्या सतरा-अठरा वर्षांचा सहप्रवास त्याही अगोदरच्या भाऊंच्या स्मृती म्हणजे गोणपाटाचा पँट-शर्ट घालणारा, लिबर्टी-वरच्या आर्ट गॅलरीवाला, अमरप्रेममध्ये चित्र टांगून ठेवणारा, सृजन-सहकाराचा प्रयोग करणारा, बंडखोर, विद्रोही भाषेत जळजळीत निषेध केवळ बोलघेवड्या भाषेत तोंडी नव्हे तर प्रत्यक्षात लेखी व्यक्त करू पहाणारा, लिटिल मॅगझिनच्या पानावर तो कोरून ठेवणारा, आपल्या वर्तनातून तो जाणवून देणारा. उन्मुक्त जग इच्छिणारा भाऊ. कलावंत म्हणजे उन्मुक्त विद्रोही, बंडखोर, संघर्षग्रस्त व तसले जीवन प्रत्यक्षात जगणारा कलंदर आणि हे सारे असते तरी कसे हे प्रत्यक्षात जिथे आम्ही प्रथमच बघितले त्यांचे नाव होते, भाऊ समर्थ.

भाऊ म्हणजे कलावंत

या भागात आमच्या लहानपणीसुद्धा पेपर वा वर्तमानपत्र म्हणजे 'तरुण भारत' हे जसे समीकरण होते तसेच चित्रकार म्हणजे भाऊ समर्थ आणि भाऊ समर्थ म्हणजे कलावंत, असेही एक समीकरण असायचे.

पुढे कलंदर वृत्तीचे आकर्षण वाटण्याच्या ताज्या ताज्या वयात कलंदर म्हणजे देखील जे प्रथम ठाऊक झाले ते 'मॉडेल' देखील होते- ते भाऊ समर्थच. पुढे कलावंत, कलावंताचे जीवन प्रत्यक्ष काय असते ते बघायला मिळाले ते भाऊच्याच माध्यमातून आणि त्याहीपुढे विद्रोहमूल्य, कलेची, कलावंताची जपणूक, चित्रातील प्रत्येक रेषेचे गर्भार असणे, क्रांति, परिवर्तन, कलावंताची बांधिलकी या व अशा बाबी ज्या वयात प्रथमच आकर्षित करीत गेल्या, ठाऊक होत गेल्या आणि आपण या बाबींचे किंवा या बाबी आपल्या होत जाव्या असे वाटत गेले तेव्हा या बाबी देखील सर्वप्रथम ज्या खिडकीतून प्रत्यक्षात बघायला मिळाल्या त्याचेही नाव होते भाऊ समर्थच. या खिडकीतून हे सारे ठाऊक होणे माझ्यापुरते मर्यादित नाही. हे 'आम्हाला' होत होते. अनेकांना. त्यातल्या कितीकांना हे सारे आपण सर्वप्रथम

भाऊ नावाच्या या खिडकीतून बघितल्याचे आज कबूल करावेसे वाटेल, हे त्यांचे त्यांनाच ठाऊक, पण वाटत असावे असे वाटते.

१९५० च्या सुमारास जन्माला येऊन पुढे समजत्या उमलत्या वयात शब्द, रंग, रेषा, साहित्य, विचार, कला, सौंदर्य आदी प्रांतांत वावरण्याच्या प्रेरणा ज्यांना भुलवीत होत्या, मोहवीत होत्या अशा या भागातल्या माझ्यासारख्या अनेकांनी भाऊंच्या खिडकीतूनच या साऱ्या गोष्टी प्रथमच बघितलेल्या आहेत. पुढे बाबा आढाव, बाबा दळवी, सुधीर बेडेकर, नरहर कुरुंदकर, नारायण सुर्वे, गंगाधर पानतावणे इ. आमच्या प्रत्यक्ष वाट्याला आले. कक्षा विस्तारल्या. एवढ्या की भाऊंच्या विसंगती भाऊलाच आपण दाखवून द्याव्या आणि त्या त्याने आपली बाजू मांडून शक्य त्या मान्य कराव्यात. मात्र या साऱ्याचाच आपला पाया ज्यांनी घालून दिला त्यात भाऊचा सहवास हा सर्वाधिक महत्त्वाचा पाया ठरलेला आहे.

माझ्या पिढीतील ज्याला ज्याला हे विश्व खुणावत होते त्या विश्वाचे इथे उपलब्ध तेव्हाचे आदर्श कलंदर कलावंत, मॉडेल भाऊ आणि केवळ एकमेव भाऊच होता.

भाऊ आमच्याकरता तेव्हा पाब्लो पिकासो होता, साल्वादेर डॉली होता. कामू, काफ्का, सार्त्र होता. पुढे पुढे तर मार्क्स आणि पाब्लो नेरुदा देखील.

योद्धा, विचारवंत भाऊ

विशेषतः, एकीकडे 'एव्हरी लाईन इज प्रेग्नंट' म्हणत आपल्या प्रत्येक रेषेला गर्भार ठेवणारा भाऊ नवचित्रकार म्हणून दुमदुमत होता, घुमसत होता, पेटत होता, जळत-विझत होता. त्याचवेळी थोडे पुढे जाऊन फुले मार्केटमधल्या भाजीवाल्यांचे नेतृत्व करायला 'समाजवादी संग्राम समिती' सारख्या नावावर विलास मुत्तेमवार, रामनारायण दुबे यांच्यासारख्यांना सोबत घेऊन पुढे सरसावत होता, पोलिसांच्या लाठ्याकाठ्या खात, तेव्हा हा कलंदर कलावंत, योद्धा आणि विचारवंत देखील होऊ लागला होता.

असा हा माणूस तेव्हा आपला 'हीरो' होता. अशा या माणसाची आपली नाही घसट तरी किमान ओळख, परिचय तरी असावाच असे ज्यांना ज्यांना म्हणून वाटले असेल त्यात त्यावेळी आमच्यासारखे नुकतेच उगवू लागलेले गवतच तेवढे होते असे नाही, तर आजचे मोठाले वृक्ष झालेल्या व्यक्ती देखील होत्या. व्यवस्थाबदल, बंडखोरी, विद्रोह, परिवर्तन, सामाजिकता, सौंदर्यानुभव, निषेध, नकार, विस्थापितांचे प्रस्थापितांविरुद्धचे बंड असल्या कल्पनांनी झपाटून, भारावून जाण्याचा तो कालखंड होता. हे सारे शब्द आज त्यांचा भ्रष्ट वापर केलेल्यांनी व त्यांचे मूल्य व गाभाच न कळलेल्या शब्दशत्रूंनी जसे गुळगुळीत व तिरस्कारणीय करून टाकले आहेत तसे या शब्दांचे होणे तेव्हा एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरूच व्हायचे होते. त्या शब्दांचा अर्थच उमजायचा होता, वापर व्हायचा होता. त्या शब्दांचे निखळ अर्थ तेव्हा जगावेसेच वाटत होते. एवढा त्या कल्पनांचा पहिल्या-वहिल्या भराचा प्रभाव, त्यांचे कौमार्य शिल्लक होते.

या भागात तर भाऊ सारख्यांनी त्या शब्दांचे प्रत्यक्षात अर्थ जगायला नुकतीच कुठे सुरुवात करून दाखवली होती. त्या अर्थांशी, त्या अर्थाच्या जीवनाशी, त्याच्या वास्तव्याशी या भागाचा संबंध मोठ्या प्रमाणावर भाऊसारख्यांमुळे प्रथमच येऊ लागला होता.

चित्र हे बघायला नव्हे तर ते भोगायला तो शिकवीत होता. जीवनानुभवाचा चित्रानुभव, कालानुभव आणि कलानुभव, सौंदर्यानुभवाला जीवनानुभव करून वेगळे विश्वच उभारण्याच्या, आपल्या शक्य तेवढ समकालीन वास्तवच पुनर्रचित करण्याच्या व्रताबद्दल सांगत होता.

त्यामुळे भाऊ हा तसा तथाकथित उच्चभ्रू प्रतिष्ठित तत्कालीनांनी वाळीतच टाकलेला काडीकचरा. त्याच्या सोबतचे, मागे पुढे असणारे देखील त्यामुळे त्यांच्या लेखी तसेच.

काळ-उपेक्षेच्या रंगांचा

परंतु 'जगत'मध्ये बसून जनतेसमक्ष पाच कलावंत घेऊन सृजन-सहकाराचे पाच नागाचे' प्रयोग करणारा भाऊ, कर्नल ईस्माईलने कमिश्नरकडून रेंट कंट्रोलचे घर मिळवून दिलेला भाऊ,

निरनिराळचा आकार, रंग, पोताचे संतुलनपूर्ण कपडे घालून हिंडणारा भाऊ, विद्याचरण शुक्लांच्या मुलींना शिकविणारा भाऊ, लिवर्टी-तल्या स्लाईडस लिहिणारा, 'रूपम'मध्ये डिझाईनर, रंग सल्लागार झालेला, 'फ्रेंडस्' मधली पब्लिसिटी सांभाळणारा, एखाद्या वर्षी अनेक कंपन्यांच्या कारमधून सतत ये–जा करणारा, पुन: आपल्या आर्थिक विवंचना, दारिद्र्यात मौज मानणारा, डाग पडलेल्या कागदातही चित्र शोधणारा, रेखा, जल, तैल साऱ्याच माध्यमातून वाढता वाढतच चाललेला भाऊ मिल्ड्रेड जेनिंग्ज या अमेरिकन चित्रकर्ती सोबत कला सृजन–सहकाराचा प्रयोग करणारा, 'मिस्सीभाऊ' अनेकांनी अचूक हेरला देखील होता.

तो केवळ दखलपात्रच नव्हे तर त्याला बेदखल करणाऱ्यास परवडणार नाही असा, वेगाने होत गेला. तथाकथित 'मेनस्ट्रीम' किंवा 'मुख्यप्रवाह' म्हणून जे काही प्रकरण असते त्यातही भाऊ दखलबाध्य झालेला. परंतु तरीही 'अॅकेडेमिक चित्रकलेने' मात्र ज्याचा सतत दुस्वासच केलेला असा भाऊ कोणत्याच चित्रकला महाविद्यालयातून तयार न झालेला, स्वतःच चित्र-रंग–कलेचे एक स्वायत्त विद्यापीठच झालेला आणि आपल्याच मस्तीत ही स्वायत्तता पूर्णपणे भोगणारा भाऊ.

आपल्या लाखो रेखाटने, हजारो जलरंग व तैलरंग चित्रे व शब्दांमधून कित्येक स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून दर्शित, प्रदर्शित होत गेला. तसतसा त्याचा गौरवपूर्ण उल्लेख करणे गावाला इच्छा असो नसो पण अपरिहार्य आणि आवश्यक होत गेले होते.

अशा प्रवासात एक जणू ठरलेली नियतीच, जी साऱ्यांच्याच वाट्याला येते, तीच भाऊंच्याही वाट्याला आलेली होती. उपेक्षा, मानहानी, अपमान, उपहास आणि त्यानंतर मग मान्यता, स्तुती, गौरव, पारितोषिके, सन्मान या चक्राने भाऊलाही पुरेपूर मिळाले.

मात्र हिंदीने त्याला मराठीपेक्षा अधिक जास्त कवटाळले. ही खंत त्यालाही होतीच. त्याची एक-सष्टी खरी साजरी केली हिंदीनेच. 'श्रीवत्स'च्या पहिल्यावहिल्या, सारे सन्मान लाभलेल्या वार्षिक अंकाच्या संपादनाचे वेळी भाऊचे 'आत्म-वेदन' मी जाणीवपूर्वक, हे ध्यानात ठेवूनच मागून घेतले होते. भाऊच्या एकसष्टीची ती वेळ होती. भाऊची भरपूर छायाचित्रे आणि भाऊवरील प्रभाकर माचवेंची कविता या सोबतच मराठीने त्याला दिलेला त्याच्या आत्मवेदनाचा तो 'लेआऊट' बघून भाऊ भारावून गेला होता. माझ्याकडे 'युगवाणी' आली त्याचाही सर्वाधिक आनंद व्यक्त केला तो भाऊनेच.

वाङ्मयीन मराठी नियतकालिकांचे 'मिडि-ऑकर' असणे 'युगवाणी'ने दूर सारावे, ते सौंदर्य जीवन–कला–विचारांचे प्रागतिक मुखपत्र व्हावे व ते कसे व्हावे हे सांगणारा त्याचा विचार मांडायला भाऊच्या माझ्याकडच्या फेऱ्यांमध्ये त्याने भरपूर वाढही केली होती.

भाऊच्या सहकार्याने युगवाणीचे जे काही करायचे संयुक्तपणे आम्ही ठरवीत होतो तेही भाऊ अर्धवटच टाकून गेला आहे.

आपल्या नियतीचे रेखाटन स्वतःच करीत गेलेला विचारव्रती, चित्रवती भाऊ म्हणजे एक 'वन मॅन आर्मीच !'

आपणही अशीच 'आर्मी' असणे किंवा त्या आर्मीत असणे ज्यांना ज्यांना मोहित करीत होते तो हा माणूस एवढ्यातच आपल्या डोळ्यातले एवढे पाणी घेऊन जाईल आणि त्याच्याशी जे बोलायचे ते आता कुणाशी बोलायचे असा प्रश्न एकाएकी पाडेल असे वाटले नव्हते.

'मिशनरी' भाऊ

त्याची कला, कृती, विचार, वृत्ती या सकट हा माणूस जवळ आला की आपण यासकट त्याच्या-जवळ गेलो यापेक्षाही महत्त्वाचे आहे ते वेगळेच. त्या चर्चांच्या रात्री, त्यातले ते वाद, ते विषय, ते पेट, ते जाळं, ते लोळ-कल्लोळ ज्यांनी वाटून घेतले त्यातले पुढे काही विझले असतील, काहींनी विझवून घेतले असेल, काही धगधगत असतील. भाऊ विझला तरी काही धगधगतही राहतीलच.

अशा गोष्टीतील सौंदर्य जोखण्याचा, ते जपण्याचा व संचित म्हणून ते मिरवण्याचा हा

काळ नव्हे, असल्या काही गोष्टींना भावविवशता, रिकामटेकडेपणा, दुबळेपणा, वांझ वडबड अथवा 'स्युडोइंटलेक्चुअल' इ. म्हणून हिणवल्या जाण्याच्या काळात आपण पोहचलो आहोत.

अशा काळात प्रत्येकाचा दरवाजा ठोठावून चर्चा करीत फिरणाऱ्या अथेन्समधील साक्रेटिसा-सारखा तसल्याच मिशनने अखंड फिरतीवर राहिलेला कलेचा, सौंदर्य विचारांचा हा मिशनरी भाऊ! अशा काळात याला कोण जपणार? मात्र कला आणि कलावंत हा जपलाच पाहिजे असे आग्रही मत भाऊंचे होतेच होते. कलावंत, विचारवंत हा जपायचा असतो. घरातल्यांनी, बाहेरच्यांनी, मित्रांनी, समाजाने, राष्ट्राने त्यांच्या त्यांच्या पातळीवर जपायचा असतो. त्याच्या कलेचे, विचाराचे 'पोत' अशा जपणुकीमुळे अधिक दर्जेदार, अधिक उन्नत, अधिक परिपूर्ण व्हायला मदत होते. हे होणे, हे शेवटी त्या त्या कलावंताचे नसतेच ते शेवटी तो ज्या समाजाचा, भागाचा, ज्यांचा ज्यांचा त्यांचेच संचित व्हायचे असते. ही भाऊची ठाम भूमिका. कलेचा, कला-वंताचा दर्जा आणि आदर, मान, इमान आणि प्रतिष्ठा कलावंताला स्वतःलाच राखून घता आली पाहिजे. त्याच्या या मताशी भाऊने कधीच तडजोड केली नाही. कफल्लक राहूनही उच्चभ्रू संस्कृतीचे त्याने दंभमूलक चित्र कधीच रंगवले नाही. दारिद्र्यात राहून दारिद्र्याला 'नारा-यणाची' प्रतिष्ठा देण्याचा भागळपणा त्याला मान्य नव्हता.

'यार, विचाराचं एक तेज असते. त्याचे रंग चेहेऱ्यावर, डोळ्यात स्पष्ट दिसतातच', असे सांगणारा भाऊ रेखा आणि रंगाच्याच नव्हे तर विचारांच्या मागावर असायचा. विचाराचा सूक्ष्मति-सूक्ष्म धागा, तो स्वतःच्या डोक्यातील असो वा इतरांच्या, त्याचे नेमके 'पोत' जोखणे हे किती अवघड व नाजुक काम आहे हे ठाऊक असल्याने कुणाच्याही 'थाट डिझाईन'चा सन्मान भाऊ पूर्णपणे करीत असे

गेल्या सात आठ वर्षात संवादशास्त्र. भाषा-शास्त्र, शैलीशास्त्र इ. चा माझा संबंध वाढल्या-पासून भाऊने त्याच्या-माझ्या भेटींच्या, चर्चांच्या संख्येत लक्षणीय वाढ केलेली होती.

सेक्स, स्त्री-पुरुष संबंध, लग्नसंस्था, स्त्री-मुक्ती, समानता, संपत्ती, परिवर्तन, क्रांती, वाङमय, कला, समाज शोषण, आधुनिकता, नवता, परंपरा, इतिहास, संस्कृती, राष्ट्रीयता, मानवता, राष्ट्रीयत्व, विश्वनागरिकत्व, शैली, स्पेस, सौंदर्य या आणि आनुषंगिक अशा कितीतरी विषयांवरील स्पष्ट, ठाम, तार्किक आणि तरीही वेगळाच, प्रस्थापित मनांना छेद देणाऱ्या, प्रक्षोभक अशा कल्पनांची, विचारांची साखळीच तो बांधायचा. कधी एकटा. कधी समोरचा त्या पात्रतेचा असला तर त्याचे सोबत मिळून, आणि त्या साखळीत मग तो स्वतःला गुंतवून ठेवायचा. समोरच्याला देखील.

अशा माणसापासून स्वतःला नेहमी चार हात दूरच राखणारे अधिक. भाऊला जेव्हा दूर राखता येणे अशक्य झाले तेव्हा ते 'अधिक' भाऊपासून स्वत:च अधिक दूर दूर जात गेले.

गजानन माधव मुक्तिबोध, शरत्चंद्र मुक्ति-बोध, प्रभाकर माचवे, अनिलकुमार यांच्यातून आलेला भाऊतला वैचारिक भाऊ पुढे इतरांकरता त्यांच्या ठिकाणी लाभला.

भाऊने घेतले तसे काहीच नाही. दिले मात्र भरभरून. खोलवर चर्चा, अविस्मरणीय प्रभाव, स्मृती भरून रंग, रेषा एकत्र जोडल्या तर मैलो-गणती होतील एवढचा आणि त्यातले स्वतःचे वेगळेच पोत. तेही विचाराच्या पायावर बेतलेले. वास्तववाद, अतिवास्तववादापासून, फ्राईडियन मनोविश्लेषणापासून तो मार्क्सवादी बांधिलकी-पर्यंत आणि त्याच्याही पलीकडे राष्ट्रवाद म्हणजे जातीयवाद व म्हणून विश्वनागरिकत्व हेच जागतिक शांततेकरता व शोषणमुक्तीकरता उचललेले पाऊल इथवर भाऊच्या विचाराचा प्रवास गेला होता. युनोने नागरिकत्व घोषित करून सरळ व्यक्तीलाच युनोचे सदस्य बन-विण्याच्या जागतिक पुनर्रचनाच्या कल्पनेचा पुरस्कार करणारा परिसंवाद लवकरच त्याने व व मी आयोजित करावा आणि आपण म्हणजे

भाऊने त्यात हा विचार मांडावा असे आम्ही नुकतेच परवा परवाच ठरवीत होतो.

या प्रक्षोभक पुरोगामी, बंडखोर, अशा भाऊच्या ठिकाणी पुढे पुढे फलज्योतिषाचा अभ्यास, गुलाबबाबा भक्ती आणि पारंपरिक अशा त्याच्या काही मान्यता असल्यामुळे अनेक प्रागतिकांची नाराजी मोठ्याने नाही तरी हळूहळू व्यक्त होत सर्वदूर पसरत गेली होतीच.

भाऊ एक अपरिहार्यता

आम्हाला, विशेषत: मला भाऊ प्रथम 'ऐकू आला' धनवटे नॅशनलमध्ये मराठी शिकताना. श्रीधर शनवारेंच्या तोंडून वाङ्मय, भाषा, कला विषयक अनेक गोष्टी तेव्हा प्रथमच ऐकल्या. त्यात 'सत्यकथा', 'अभिरुची', 'आलोचना' होती, 'ग्रेस' होते तसेच 'भाऊ' देखील. भाऊने, आपल्या पुस्तकाचे 'कव्हर' करणे ही तेव्हा 'क्रेझ' होती, काहींची फॅशन, तर काहींची 'निष्ठा'.

भाऊचे कव्हर असल्याशिवाय ते पुस्तक हे या भागातील चांगल्या दर्जाच्या लेखकाचे जणू असूच शकत नव्हते भाऊचे रेखाटन नाही ते नियत-कालिक ती वृत्तपत्र पुरवणी वाङ्मयीन नाही, हे ठरून गेले होते. भाऊचा समावेश नाही, उल्लेख नाही वा भाऊ ठाऊक नाही ते ते सारेच–मग तो परिसंवाद असो वा नियतकालिक वा संस्था, आंदोलन, चळवळ असो वा व्यक्ती ते ते सारे 'मॉडर्न' नाही, 'नव' नाही, 'प्रागतिक' नाही असा एक काळ या प्रदेशाने, या गावाने अनुभवला आहे.

आधुनिकता, नवता, नव-वाङ्मयीन मूल्य, प्रागतिकता या विभागात ज्यांच्या ज्यांच्या द्वारा आली, ज्यांच्यामधून दिली घेतली गेली वा ज्यांनी ज्यांनी ही देवघेव हे आपले सामाजिक दायित्व समजून ती केली त्या मूठभर सच्च्या 'इसमां'मध्ये भाऊ त्याच्या पिढीतला आमच्या संपूर्ण वाट्याला आलेला एक महत्त्वपूर्ण इसम. या साऱ्या गोष्टी पुढे ग्रंथांमधून, शिकवण्यासमजण्या अगोदर प्रत्यक्षात मिळत गेल्या त्या भाऊ मार्फतच.

आपल्या रंग, हृदय, आकार, प्रतिमा, अवकाश सौंदर्य, या संवेदना, भाऊच्या पायावर उभ्या आहेत हे सांगताना अभिमान वाटावा एवढा तो पाया पक्का होता.

भाऊ म्हणजे आता आधुनिकता, नवता आणि परंपरा यांत्र एक अपूर्व रसायन झालेला होता.

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

त्याला प्रत्येक परिवर्तनाकडे नेणारी बाब आकर्षित करायची. त्यामुळेच मनोविश्लेषणात्मक साहित्य, मग दलित साहित्य, जन साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, मार्क्सवादी, स्त्री–मुक्तीवादी, जहाल–मवाळ जे जे म्हणून आधुनिक, नवपरिवर्तनाची चेतना घेऊन आलं त्या त्या प्रत्येकाची वकिली त्याने केली. या प्रयत्नात एकेक करून सारेच केवळ आपल्या बाजूने बोलत नाही म्हणून त्याच्यापासून दुरावतही गेले. त्याची तेवढी काळजीही त्याने कधीच केली नाही.

माणसांनी माणसांकरिता वेळ देण्याच्या, जीव टाकण्याच्या संपुष्टात येत असलेल्या संस्कृतीचा तो अवशेष होता. माणसावर, माणसाच्या विजया-वर, त्याच्या चेतनेवर त्याची श्रद्धा होती.

भाऊ हे प्रत्येकाला आपल्या मालकीचे, स्वायत्त मालकीचे वाटणारे बेट होते. प्रत्येकालाच त्याचेशी असणारे संबंध तेवढेच सखोल, जिव्हाळ्याचेच असल्यासारखे वाटत अजूनही असे वाटते की कोणत्याही शनिवारी अचानक दुपारी भाऊ येईल, अंगणात लुना ठेवीत कुलूप लावेल. दारावर बेल वाजेल.

'काय, आहेत का संऽपाऽदऽक ?' म्हणत आत येईल. 'माचीस आण आन् चहा-बिहा पाज मायबाई' म्हणत सिगारेट शिलगावेल.

आपणही शैलीवरची अर्धवट सुटलेली आपली चर्चा तावातावाने पुढे सुरू करू. सिगारेटचा झुरका घेत भाऊ स्वत:च्या आत एकटक बघत असल्यासारखा कुठेतरी डोळे रोखेल आणि मांडत असलेला विचार आपल्याशी बोलत असला तरी स्वत:शीच स्पष्ट केल्यासारखा, उफाळून उफाळून, बचितल्यासारखा बोलेल आणि म्हणेल हे कसं वाटते तुला ? लिहून टाक.

एखाद्या शनिवारी आपण घरी नसलोच तर

अनुक्रमणिका

'क्यो बच्चू, लगाते क्या एक गेम' म्हणत लगेच खाली बसून कणादशी 'चेस' खेळत राहील.


आपण आल्यावर सांगेल, 'तुझा पोरगा यार तू आक्रमण परतवणारा केला आहे, पण त्याला हल्लाही करायला शिकव.'

एखाद्या शनिवारी 'तू काढते तेच चित्र' म्हणत म्हणत चित्र पहायचं कसं याचं छोटसं तत्त्वज्ञानच बालीला पटकन सांगून जाईल.

'यार, जबलपूरहून आलो. काय लोक होते आणि मी असं म्हणालो' म्हणत आपणच मांडलेला विचार समोर धरून निरखून बघत असल्यासारखा तो काय म्हणाला ते संपूर्ण भाषण सांगून टाकेल आणि वर (विचारेल) 'हे कसं वाटते तुला ?' असं म्हणताना यातलं काहीच आता होणार नाही, हे आपल्याला ठाऊक आहे.

बाहेतो हॉस्पिटमध्ये परवा त्याला बघायला गेलो तेव्हा बंद डोळ्यांनी कॉटवर पडल्यापडल्याच तो विचारत होता, 'हे कसं वाटते तुला ?' आणि शेवटी त्या स्मशान चितेवर जळता जळता समोरची भाषणं ऐकताना सतत वाटत होत की तो सारे सांगतोच आहे. आणि विचारतो आहे 'हे कसं वाटते तुला ?' ■

'कृष्णकुंज' खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर.



कलाजाणिवेचा अधिक्षेप

हरीश अड्याळकर

बाबूराव सडवेलकरांनी विख्यात दिवंगत चित्रकार भाऊ समर्थ यांच्याबद्दल नुकत्याच लिहिलेल्या एका लेखातील काही विधानांमुळे भाऊ समर्थांच्या चाहत्यांच्या विश्वात तीव्र संतापाची लाट आली आहे. त्यांचा मूळ लेख महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रकाशित झाला होता. त्यावरील प्रातिनिधिक समजावी अशी एक प्रतिक्रिया प्रकाश कामतीकर यांनी त्यांच्या लेखाला महाराष्ट्र टाईम्समधूनच दिलेल्या सविस्तर लेखात्मक उत्तरातून व्यक्त झालेलीच आहे.

भाऊ समर्थांचे एक घनिष्ठ स्नेही येथील लोहिया अध्ययन केंद्राचे संचालक श्री. हरीश अड्याळकर यांची बाबूराव सडवेलकरांच्या लेखावरील प्रतिक्रिया युगवाणीकडे त्यांनी पाठविली आहे. ती सोबत प्रकाशित करीत आहोत.

प्रमाणपत्र, पदवी अथवा चित्रकलेचे शालेय, महाविद्यालयीन शिक्षण नसलेल्यांना चित्रकार म्हणून अमान्य करण्याची संस्कृती काही तथाकथित 'शिक्षित' व 'दीक्षित' चित्रकारांनी चित्रकलेच्या प्रांतात रुजवली आहे. आजवर अव्यक्त असा या संस्कृतीचा सर्वाधिक विकृत प्रातिनिधिक सूर 'भाऊ समर्थ : शोकांतिका एका कलावंताची' या बाबुराव सडवेलकरांच्या भाऊच्या मृत्युनंतर प्रकाशित महाराष्ट्र टाईम्समधील लेखात अधिक तीव्रतेने व्यक्त झालेला आहे. भाऊच्या हयातीत तो प्रकाशित झाला असता तर खुद्द भाऊलाच त्याचे उत्तर देण्याची संधी प्राप्त झाली असती. तसे न करता भाऊ गेल्यावर सडवेलकर हे लिहिताहेत हे अजबच.

भाऊ समर्थांसारखा चित्रकार जी. डी. आर्ट परीक्षा केव्हा उत्त र्ण झाला व त्यांच्या रेखाटनांची व चित्रांची संख्या पूर्णपणे दीड लाख भरते किंवा नाही या बद्दल सशय व्यक्त करून व आपल्याला हे ठाऊक नाही असे विधान सडवेलकरांनी आपल्या लेखात करून 'जे जे.' मधून निघालेल्या अथवा चित्रकलेचे केवळ रीतसर शिक्षण घेतले त्यांनाच तेवढी 'चित्रकार' म्हणून मान्यता देण्याच्या अवांछित संस्कृतीचाच तेवढा पुरस्कार केलेला आहे.

भाऊ समर्थांच्या चित्रकलेचे, त्यातील त्यांचे कार्य, त्यांचे दोष त्याचा दर्जा इ. चे मूल्यमापन करणे वेगळे व या व्यक्तीचे त्या प्रांतातले त्याचे 'अस्तित्वच' हे फसवे, · खोटे आहे असाच सिद्धांत गृहीत धरून तेवढेच प्रमेय सिद्ध करण्याकरता ज्या माणसावर ज्याने त्याच्या हयातीत एक अक्षर एवढ्या तीव्रतेने लिहिण्याचे टाळले त्यांनी त्याच्या मृत्युनंतर ते लिहिणे वेगळे.

मूल्यमापन – कलासमीक्षा यापेक्षा वेगळेच हेतू अशा लिखाणात दडलेले असतात. विशेषत: कलाक्षेत्रात उच्चपदस्थ, सुरक्षित, चिंताविहीन, अधिकारी राहिलेल्यांनी संपूर्ण आयुष्यभर आपल्या कलेची साधना सतत 'अभावग्रस्त' स्थितीत राहून संपूर्ण निष्ठेने करणाऱ्या कलावंताबाबत लिहितांना त्याच्या संपूर्ण व्यक्तीत्वाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे हे तर अधिकच अवांछनीय.

१९७६ साली 'संचालक' सडवेलकरांनी नागपुरातील चित्रकारांना विचारल्यानंतर भाऊबद्दल त्यांनी काहीच व्यक्त केले नाही म्हणून नागपूर – विदर्भातील सारे चित्रकार त्याच्या विरुद्ध असल्याची त्यांची 'धारणा' म्हणज देखील एक 'कलाबाह्य' अस्सल बालिशपणाच.

भाऊबद्दलचा अकारण द्वेष, घृणा, विशेषत: विदर्भाबद्दलचीच एक अशाच प्रकारची मानसिकता अशा लिखाणातून व्यक्त होत असते.

'डेस्टिनी पेंटिंग'बद्दलच्या आपल्या काही शंका, प्रश्न असलेच तर ते भाऊ समर्थ ह्यात असतांना त्याचेकडून स्पष्ट करून घेण्याची संधी न घेता वा त्यांना ती न देता त्याच्या मृत्युनंतरच तेवढ्या त्याच्या 'डेस्टिनी पेंटिंग'बद्दलच्या आपल्या 'शंका' व्यक्त करण्याकरता राखून ठेवणे हा हेतु अभ्यासकाचा वा कलासमीक्षकाचा असू शकत नाही.

मराठीच्या मर्यादित परिघातच तेवढे वावरणाऱ्यांना देशभर, विशेषत: हिंदी क्षेत्रात भाऊ समर्थ या मराठी माणसाचे असणारे स्थान व त्याची महत्ता एक तर ठाऊक नाही किंवा त्या बद्दल काही तथाकथितांना असूया तरी आहेच आहे. ज्या कारणामुळे भाऊचे ते स्थान व महत्ता आहे त्याच्या शोध प्रयत्नाच्या जवळपासही सडवेलकरांसारख्यांची 'प्रतिभा' पोहचू शकत नाही हे मराठी कलासमीक्षेचे दुर्दैव.

भाऊचे विशिष्ट प्रकारचे जगणे व त्यांचा कलाविचार, साहित्य व जीवनविषयक विचार व निष्ठा यापासून वेगळा करून बघता येऊ शकत नाही. निकषांविरुद्ध वावरणाऱ्या भाऊसारख्या चित्रकारांच्या कार्य, विचार व कलाकृतीचे मूल्यांकन कलाविषयक 'शासकीय' निकष अथवा पुरस्कार विषयक अथवा कोणतेच प्रस्थापित निकष लावून करू बघणाऱ्यांचे हेतू निश्चितच स्वच्छ व स्पष्ट असू शकत नाहीत.

सडवेलकरांसारख्यांना जे 'चित्र' वा जी 'रेखाटने' प्रभावित करू शकत नाहीत ती 'निकृष्ट' असा त्यांच्या लेखातला जो एकूण सूर लागतो, तो तर कला प्रांतांतील केवळ 'शासकीय' अधिकाऱ्याचा सूर दिसतो. केवळ मराठीच नव्हे तर या देशातील ९-१० प्रमुख वृत्तपत्रे, सुमारे ३०० पेक्षा अधिक नियतकालिके, कला साहित्य विषयक अनियतकालिके, लघुपत्रिका यातून कोणत्याही चित्रकारापेक्षा अधिक 'मान्यता प्राप्त' म्हणून विखुरलेल्या भाऊच्या कार्य, विचार, रेखाटने प्रकाशित करणाऱ्या साऱ्यांच्याच कलाजाणीवेचा अधिक्षेप करणारा अहंकारच तेवढा केवळ सडवेलकरांच्या लेखातून व्यक्त झालेला आहे.

प्रकाश कामतीकरांनी नुकतेच त्यांच्या लेखाला दिलेल्या प्रत्युत्तरात देखील त्यांनी सडवेलकरांचा चांगलाच समाचार घेऊन त्या लेखात विदर्भ – मराठवाड्याकडील कलावंताबाबत सर्व साधारणपणे असणारी सडवेलकरांची दुर्भावना कशी व्यक्त होते हे दाखवून दिलेले आहेच. ■

शनिचरा
कॉटन मार्केट जवळ, नागपूर.

साभार पोच

अवथर / रेणू पाचपोर / साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद / रु. २५/- [पृष्ठ ५६]

परिभाषा-ज्ञानोबांची : एक पुरातन हस्तलिखिताचा अभ्यास / मु. रा. कुलकर्णी / राजेश्वरी प्रकाशन, औरंगाबाद / रु. १०/- [पृ. २०]

न संपणाऱ्या गोष्टी / बाळ सामंत / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६० /- [पृ. २००]

काबूलनामा / फिरोज रानडे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६०/- [पृ. १९०]

नक्कलमामा / नाना रेटर / वसंत निगवेकर / जयश्री प्रकाशन, नागपूर / रु. ४५/- [पृ. १४०]

बालकवी / दमयंती पांढरीपांडे / साहित्य अकादमी, मुंबई / रु १०/- [पृ. ७१]

कार्मेलीन / दामोदर मावजी / अनुवाद-नरेश कवडी / साहित्य अकादमी, मुंबई / रु. ५०/- [पृ. २४६]

शिवांगी / नागनाथ हेगे / चेतश्री प्रकाशन, अंमळनेर / रु. ३० /- [पृ ६४]

दिंडी / नीलकृष्ण देशपांडे / नीलकृष्ण देशपांडे, पोहंडूळ / रु. ७ /- [पृ. ४०]

साहित्य देय आणि श्रेय / प्रा. केशव सद्रे / राजहंस वितरण, पणजी / रु. ७०/- [पृ. १७९]

रस्ते दुभंगत आहेत / भ. मा. परसावळे / सांगाती प्रकाशन, नांदेड / रु. २५ /- [पृ. ७२]

अरे सरकार ! सरकार ! /प्रा. रतनलाल सोनाग्रा सुशील प्रकाशन, मुलुंड, मुंबई / रु. १०/- [पृ. ७९]

वेध तळघातल्या सावल्यांचा / संपाहक-कैसाळ-सार्वेकर / प्रकाशन समिती धुळे/रु. ५५/ [पृ. १२९]

मो. गं. रांगणेकरांची नाट्यसिद्धी / मोहिनी वर्दे / लोक-वाङ्मय गृह. मुंबई / रु. ७५/- [पृ. २१०]

गोष्ट प्रेमाची / योगेश्वर गंधे / शब्दपर्व प्रकाशन, मुंबई / रु. १२/- [पृ. ३१]

भेदिले सूर्यमंडळा / रविंद्र भट / इंद्रायणी साहित्य, पुणे / रु. ९०/- [पृ. ३८४]

अधिक उणे / डॉ. एस. एस. भोसले / लेखन वाचन प्रकाशन, औरंगाबाद / रु ४०/- [पृ. १०९]

उरल्या कहाण्या / नीलम गोऱ्हे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६०/- [पृ. १७४]

सेतू / वसंत वापट / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रु. ३५/- [पृ. ९७]

भरली घागर / लक्ष्मीवाई टिळक / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रु. ४०/- [पृ. १९६]

स्वैर झाली समाधी / शं. श्री. वाशीकर / वाग्विलास प्रकाशन, औरंगाबाद / रु. ३०/- [पृ. ३६]

आंबेडकरी विचारांची दिशा / वामन निंबाळकर / प्रबोधन प्रकाशन, नागपूर / रु. ४८/- [पृ. १३८]

लोक साहित्य-शोध आणि समीक्षा / रा. चिं ढेरे / श्रीविद्या प्रकाशन. पुणे / रु. ७५/- [पृ. १९१]]

पूजा

सुलभा हेर्लेकर

'पूजा' हा दीर्घकथांचा, आशाबगे यांचा, पहिला कथासंग्रह. यापूर्वी 'मारवा' व 'अत्तर' या संग्रहातील सूक्ष्म आणि अभिव्यक्तीच्या सकस माध्यमातून लिहिलेल्या कथा, वाचकांच्या परिचयाच्या आहेत. या दोन संग्रहातील कथा, या स्त्रीच्या दु:खाच्या व्यथेचा परिमाणाभोवतीच्या, स्त्रीला केंद्रीत मानून तिचे अनेकांशी असलेल्या अनेकपदरी नात्याच्या कथा आहेत. सूराच्या, रंगाच्या माध्यमातून आलेल्या या कथा मानवी मनाच्या सूक्ष्म पातळीला स्पर्श करणाऱ्या तर आहेतच पण अभिव्यक्तीच्या एका अत्यंत हळूवार, तरल, तलम अशा भाषाशैलीचाही तो एक आविष्कार आहे.

'पूजा', या शीर्षकालाच एक ब्राह्मणी वृत्तीचा स्पर्श चिकटलेला आहे. पारंपरिक ब्राह्मण्याला सांभाळत, हळूवारपणे त्याचे एकेक पदर उलगडणाऱ्या या कथा वरपांगी ब्राह्मणी थाटाच्या वाटल्या तरी माणसाच्या वृत्ति प्रवृत्तीशी जे अनाकलनीय नाते या ब्राह्मण्याचे जडले आहे, ते आणि ही प्रवृत्ती सर्वकालीन, सर्वठायी आहे हे दर्शविणाऱ्या मानवी स्वभावाच्या एका निराळ्याच परिमाणाला छेदून जाणाऱ्या कथा आहेत.

जुन्या अवशेषांना हातात धरून नवीन जाणीवा निर्माण करण्याचे एक तंत्र, आशा बगेंच्या कथांचे वैशिष्ट्य ठरले आहे. स्त्रीमुक्ती वा स्त्रीस्वातंत्र्य याचा कुठलाही हुंकार न उमटवता त्यांच्या कथेतील स्त्रिया या पुरोगामी विचाराला स्पर्श करणाऱ्या आहेत. हे पटवून देण्याची ताकद आशा बगे यांच्या कथेला प्राप्त झाली आहे. 'पूजा' या संग्रहातील कथाही त्याला अपवाद नाहीत. तरीही 'प्रदीर्घ', 'चितार ओळ', 'पूजा', या कांही कथा पुरुषाच्या मनातली कातरवेळ दर्शविणाऱ्या आहेत. वरवर पहाता या कथेतल्या घटना व्यक्ती या माणसाच्या रोजच्या जीवनातल्याच आहेत. पण त्या माणसांचे मनोविश्व, त्यातील घटनांना दिलेले एक अर्थाचे परिमाण आणि त्यांचे एकमेकात मिसळलेले धागे, नाते, याला त्यांची लेखणी एका उंचीवर नेते. उदा. 'देठ' या कथेतील संवेदनक्षमता उत्कट असूनही जयाला परिस्थितीपुढे, कठोर वास्तवापुढे मान तुकवावी लागते. 'चितार ओळ' या कथेतही अवतीभवती चाललेल्या लौकिक जगातले व्यवहार अलौकिक असलेल्या जगाकडे पहावेसे वाटत असूनही सदाशिवला वंशपरंपरेने चालत आलेला मूर्ती बनविण्याचाच व्यवसाय पत्करावा लागतो. हे सत्य अचूकपणे टिपले गेले आहे. सदाशिवचे गरीब कुटुंब आणि श्रीपादचे धनवान कुटुंब, एकत्र आले, हळूहळू हा शेजार संपला. संबंधही तुटत गेले. पण जिव्हाळा दोन मित्रांचा कायम राहिला. सदाशिवला 'मूर्ती बनविणे हा तुमचा धंदा! तोच तू पुढे चालू कर' अशा सांगणाऱ्यातलाच त्याचा मित्रही निघतो तेंव्हा तो म्हणतो, 'पिढीजात म्हणजे काय रे! असं कुणी लिहून ठेवलं आहे कां? मूर्तीकारांच्या मुलानंही मूर्तीच घडविल्या पाहिजेत? सगळी म्हणतात, परंपरा संभाळ, पण मला वेगळं व्हायचं असलं तर? मला तो अधिकार नाही? जसे अण्णा डॉक्टर आहेत, रमेश, तू तुम्ही कुठे झालात. डॉक्टर?'

सदाशिवच्या या संतापजनक भाष्यावर श्रीपादला वाटतं की हा कलावंताचा वारसा आहे. पिढीजात, चालणारा, ह्यात खंड पडायला नको. गाणाऱ्याचा गळा घेऊन जशी पुढची पिढी येते तसा हा रक्तातच भिनलेला स्रोत आहे.' या अशा सूक्ष्म संस्कृतीच्या अवशेषांना कलात्मक रीतीने उलगडून दाखवणं, थोडं उदात्तीकरण करणं हे आशा बगे यांच्या कथांचं वैशिष्टयच म्हणावं लागेल.

'पूजा' आणि 'नवस' या कथाही याच अवशेषांना धरून लिहिल्या आहेत. 'पूजा' या कथेत पूजेसाठी ब्राह्मण ठेवणाऱ्या एका कुटुंबाची कथा आहे पण नुसते 'ब्राह्मण ठेवणे' एवढेच परिणाम या कथेला नाही कुठेतरी माणसामाणसातले, कुटुंबातील स्त्री–पुरुषातले सूक्ष्म स्पंदने, माणुसकीच्या धाग्याने जोडणे' हे, या कथेला असणारे आणखी एक वलय आहे, १०–१२ वर्षाचा पूजेला ठेवलेला पोरगेलासा बाळकृष्ण दादासाहेबांना पटत नसला तरी ललिता, त्यांची सून मात्र त्याला समजावून घेते. हळूहळू बाळकृष्णाच्या

बद्दल त्याच्या पाठांतराबद्दल दादासाहेब खूष होत जातात आणि त्यांच्या मनात ह्या गरीब अश्राप मुलाबद्दल त्यांना जिव्हाळा वाटू लागतो. 'पूजा, पुजारी, देव, देवघर हे शब्द वेगाच्या प्रवाहात वाहूनही जातील पण आतला जिव्हाळा ?' असा प्रश्न त्यानां पडतो. पण शेवटी बाळकृष्णावर चोरीचा आरोप, त्याची विव्हल स्थिती, त्याच्यावर केलेले आरोप – हे सारं त्यांना शरमिंदे करीत जातं. आणि शेवटी कळून चुकतं की आपण पाळत आलो तो फक्त पूजेचा उपचारच ! कथेच्या अंतरंगात माणसाच्या मनातली पारदर्शक नजर शोधावी असे तळ सापडतात.

'नवस' ही कथा लेखिकेच्या मनात तळ धरून बसलेली कधीचीच, परंतु पंढरपूरला प्रत्यक्ष पाहून आल्यावर लेखिकेच्या मनाचा तळ ढवळून निघतो. आणि मूळातल्या 'मौंज' या बीजाला तिथले पोषक वातावरण सापडते. वगे यांच्या कथेची जात अशी ऐतिहासिक आहे. घटनांपेक्षा त्या घटनेनी आंदोलित झालेली माणसांची मने त्या अधिक ताकदीने चित्रित करतात. या एकाच कथेत अनुभवाचे किती तरी प्रवाह येऊन मिसळले आहेत. 'आयुष्यात काही नाही तरी शेवटी पाणी पाजायला मुलगा हवा–आपल्या रक्ताचा...काही नाही तरी शेवटी उघडं शरीर झाकायला तो असला तरी पुरे"...रेवतीच्या आईचे हे शब्द रेवतीला अस्वस्थ करतात. कथेची नायिका रेवती नवस फेडायला पंढरपूरला जाते. तेथील दांभिकता मामा मामीची गरिबी, त्यांच्या आयुष्याशी बांधलेले वारकरी, नवस फेडणांऱ्याना कसेतरी, कुठल्या तरी सनईच्या सुरावर निभावून चंद्रभागेची पूजा करणे, हे सारं रेवतीनं उघड्या डोळयानी पाहिलं आहे. तरीही तिच्या डोळयासमोर आजी आजोबांनी उभं केलेलं पंढरपूर दिसतं, नवसासाठी निघालेल्या क्षणापासून या नवसफेडेपर्यंतच्या क्षणापर्यंतचा प्रवास हा तिला मनाकलनीय वाटतो. 'रूक्मिणी' या मारव्यातल्या कथेतील बाळकृष्ण जसा आजीला सोबत करतो तसेच कटीवर हात ठेवलेला हा विठ्ठल रेवतीला जिवाभावाचा सोबती वाटतो. पूर्ण प्रवासात त्यानेच नकळत तिला सोबत केली असते.

ग्रं थि की

रेवतीच्या मानसिकतेची पातळी उंचावत लेखिका शेवटावर येते तेव्हा तिला जाणवतं की मामाच्या आयुष्यात सूर्यास्त नसावाच. संधिप्रकाशातच त्यांचं आयुष्य एखाद्या सूक्ष्म विणी सारखं गोवलं गेलं आहे. शेवटी मौंज म्हणजे एक उपचारच, पण 'त्या त्या वेळेचं महत्त्व असतं. अन ते तितकंच खरं असतं' हे सांगणारी ही वैशिष्टयपूर्ण कथा या संग्रहातील महत्वाची कथा ठरावी.

'अपूर्ण' ही कथाही एका कलावंत स्त्रीच्या मनाची उलघाल, तडफड व्यक्त करणारी कथा आहे. अंगणात चाफ्याच्या झाडाला फुलं लागत नाहीत. पानंसुद्धा वर अगदी टोकाला अशा या ओक्याबोक्या झाडाकडे पाहून नायिकेला पूर्वीचा बहरलेला चाफा आठवतो. ते तिला तिच्या पेंटींगमधे आणता यायला हवं आहे. जे मनात आहे, ते या रंगातून, ब्रशाच्या रेषातून आपण दुसऱ्यापर्यंत पोचवू शकत नाही ही तिची खंत आहे. काही वेळा अपूर्णतेतच पूर्णता आहे, हे तिला शेवटी पटतं. ते तिच्या आईच्या आयुष्याकडे बघून. यातील या स्त्रिया स्वतःचा शोध घेत आहेत. स्वतःच्या माध्यमातून दुसऱ्यापर्यंत 'स्व'च्या जाणिवा पूर्णत्वाने पोचवू न शकल्याने झालेली मानसिक कुतरओढ हा या कथेचा आत्मा आहे. पण पाणी पडताच बीजाने फुलून सहज वर रोपटयात यावे तशी तितकी सहजता आशा वगेंच्या समंजस शैलीने या कथेला दिली आहे-सतत, स्वतःच्या अनुभवाला कसोटी लावून जगण्याची मूल्ये त्यांची कथा शोधत असते.

'पूर' आणि 'खडक' या कथाही वेगळयाच भावविश्वातल्या कथा आहेत. 'खडक' ही कथा तर सध्याच्या 'टयुशन क्लासेस' वरची. विद्यार्थ्यांच्या अहंकारामुळे गोखले सरांची जी मनाची होरपळ होते ती तो अहंकारांचा खडक पाझरल्यावरच शमते. सहज जगण्याच्या

प्राक्रियेतली ही कथा प्रत्येकाला आपलीच वाटत राहते. 'पूर' मध्येही दोन मनांची स्पंदनं चित्रित केली आहेत. 'पूर' येणं आणि 'आमचंही घर असंच पाण्यात बुडतं तर काय मजा आली असती?' असं म्हणणारा या कथेतील छोटा नायक चित्या याच मानसिक बालविश्व आणि गौरीच्या घरात शिरलेल्या पाण्यामुळे त्याच्या दृष्टीने असलेले तिचे महत्त्व-या घटनांवर आधारीत. पण भविष्यकाळाचा अंधार त्याच्या या मैत्रिणीकडे असताना तिचेच शब्द त्याला आठवतात. 'वेडचा गाव मरत नसतं कधी. गाव कसं मरेल?' लहानपणच्या बालविश्वातलं ते पुराचं गढूळ गहिरं पाणी संपून फक्त भेसूर राडेच तिच्या आयुष्यात उरतात. त्यावेळला चिंतामणीला 'पूर' असह्य होतो. एका बिंदूपासूनचा हा प्रवास दुसऱ्या अनुभवापर्यंत हळूवारपणे उलगडत नेलेला आहे.

या संग्रहातील 'सायकल' ही कथा तशी फसलेली वाटते. शेवटही अधुराच वाटतो. नेमकेपणानी न सांगता आलेली ही कथा सोडल्यास सर्वच कथांचा दर्जा हा वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी कथेच्या संदर्भात आशा बगे यांचे योगदान फार मोलाचे आहे. महत्त्वपूर्ण आहे. ■

पूजा (कथासंग्रह)
लेखिका : आशा बगे
प्रकाशक : मॅजेस्टिक प्रकाशन
मूल्य : ६० रु.

माध्यम

सुरेश वांदिले

गेले दशक हे माध्यमांचे (Media,) दशक राहिले. या कालावधीत भारतात इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांमध्ये मोठे स्थित्यंतर आले. दूरचित्रवाणी या इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा झपाट्याने विस्तार आणि त्याचसोबत मुद्रित माध्यमांच्या संख्येत झालेली मोठी वाढ या दोन महत्त्वपूर्ण बाबी या दशकात घडल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे मुद्रित माध्यमांचा प्रभाव कमी कमी होत जाऊन त्यांना अतिशय नगण्य स्वरूप प्राप्त होईल असे खळबळजनक मत माध्यमतज्ञ मार्शल मॅकल्युहानने मांडले होते. पाश्चिमात्य देशात हा सिद्धांत सपशेल खोटा ठरलेलाच आहे पण गेल्या दशकात भारतात एकाच वेळेस इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांची झालेली वाढ मॅकल्युहानच्या उपरोक्त सिद्धांताला थडग्यात पोहचविणारी ठरली आहे.

तिसऱ्या जगातील भारताव्यतिरिक्त दुसऱ्या कुठल्याही देशात दोन्ही माध्यमांमधील इतकी समांतर वाढ झालेली नाही, हे विशेष. त्यामुळेच या कालावधीत माहितीचा प्रवाह (Flow of Information) भारतात सर्वाधिक राहिला आहे या प्रवाहाला वेगवेगळ्या स्तरांवर प्रभावित कार्य इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांनी केलेला दिसतो, त्यामुळेच दूरचित्रवाणीचा मुद्रित माध्यमांवर, मुद्रित माध्यमांचा दूर चित्रवाणीवर, मुद्रित माध्यमांचा मुद्रित माध्यमांवरच प्रभाव पडल्याचे निदर्शनास येते माध्यमांचा हा परावर्तित प्रभाव (Reflex effect) माध्यम तज्ज्ञांसाठी एक नवीन विषयशाखा उघडता झाला आणि त्यातून या परस्पर प्रभावांची दखल घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. लोकसत्ता या दैनिकाचे जेष्ठ पत्रकार प्रकाश कुळकर्णी यांचे 'माध्यम' हा एक असाच प्रयत्न होय.

नवी दालने

माहितीचा ओघ जसजसा वाढत गेला आणि वाचक, दर्शकाला या दोन्ही माध्यमांचे अधिकाधिक एक्सपोजर मिळत गेले, तसतसे त्याला या माहिती देणाऱ्या माध्यमांविषयी अधिकाधिक उत्सुकता निर्माण झाली. आणि या उत्सुकतेची पूर्ती करण्यासाठी माध्यम, मिडिया वॉच, मिडिया, फ्रंट पेज या सारखे स्तंभ वृत्तपत्रे, नियतकालिकांमधून झळकू लागले इंग्रजीमध्ये एम. व्ही. कामथ हे बऱ्याच वर्षापासून सातत्याने या विषयावर लिहिताहेत. मात्र मराठीत असा प्रयत्न

पहिल्यांदा प्रकाश कुळकर्णी यांनी केला. गेले दोन अडीच वर्षे ते मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर रविवारच्या लोकसत्तेत लिहिताहेत. या कालावधीत समकालीन वृत्तपत्रीय माध्यमे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर त्यांनी लिखाण केले.

आजच्या वाचकांना वृत्तपत्रांमधील बातम्याशिवाय या बातमी देणाऱ्या बातमीदारांच्या संदर्भातही उत्सुकता निर्माण झालेली दिसते. बातमीचा शोध आणि वेध घेणाऱ्या वृत्तपत्रांना 'बातमी मूल्य' (News value) मिळताना दिसते. बातमी म्हटली की त्याची दखल घेणे आलेच या सूत्रानेच प्रकाश कुलकर्णी यांनी आपला 'माध्यम' स्तंभ सुरू केला. समकालीन वृत्तपत्रीय जगतात घडणाऱ्या घटनांचा सखोल (Indepth) वृत्तांत या स्तंभातून देण्यात आला. या कालावधीत प्रकाशित झालेल्या निवडक लेखांना एकत्रित करून त्याला पुस्तकाचे स्वरूप देण्यात आले आहे.

या पुस्तकाचे उपयुक्तता मूल्य (Utility Value) फार अधिक आहे. विशिष्ट कालावधीतच घडलेल्या घटनांवर या पुस्तकात ऊहापोह असला तरी घटनांच्या संदर्भात दिलेली पार्श्वभूमी ही कधीही आणि केव्हाही उपयोगी ठरणारी आहे. उदा. मल्याळम मनोरमा या दैनिकाने शतक महोत्सव १९८८ साली साजरा केला. त्या निमित्य दिलेल्या लेखात कुलकर्णी यांनी देशातील या सर्वाधिक खपाच्या दैनिकाची संपूर्ण माहिती उद्धृत केली आहे. अशी माहिती एकत्रित सापडणे विरळाच.

जवळपास प्रत्येक लेखातच कुलकर्णी यांनी अशी उपयुक्त माहिती देऊन लेख माहितीपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. वृत्तपत्रात काम करणारे कर्मचारी, वृत्तपत्र विद्या शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यासाठी हे पुस्तक अतिशय फायद्याचे ठरणारे आहे. पत्रकारितेचा इतिहास नावाचा एक पेपरच वृत्तपत्र विद्यांच्या विद्यार्थ्यांना द्यावा लागतो. त्याची तयारी या पुस्तकामुळे होऊ शकते.

पत्रकारितेच्या क्षेत्रात कोणकोणत्या घडामोडी घडलेल्या आहेत, किंवा घडताहेत याचे आकलन होऊन ग्रामीण आणि जिल्हा स्तरीय वृत्तपत्रांमध्ये काम करणाऱ्या पत्रकारांना स्वतःची गुणवत्ता वाढविण्याची प्रेरणा या पुस्तकामुळे मिळायला हरकत नसावी.

उणिवा

या पुस्तकात मराठी पत्रसृष्टीच्या संदर्भातही बऱ्यापैकी दखल घेतली असली तरी त्यात निश्चितपणे काही उणिवा जाणवत राहतात. मुंबई पुण्यातील मराठी पत्रसृष्टीची फारशी दखल घेतलेली दिसत नाही. गेल्या दोन वर्षात मुंबईतील मराठी पत्रसृष्टीतही वेगवेगळ्या प्रकारच्या मोठ्या घटना घडल्या आहेत. त्यांची दखल आवश्यक होती. कदाचित व्यावसायिक दृष्टिकोनातून कुलकर्णींचा नाईलाज असू शकतो.

वैदर्भीय पत्रसृष्टीच्या संदर्भातील लेखात 'लोकमत'च्या वाट्याला सर्वाधिक शब्द गेले आहेत. 'लोकमत' हे सर्वाधिक खपाचे दैनिक असल्याने तसे होणे स्वाभाविकही वाटते. पण वैदर्भीय पत्रसृष्टीत आपला अमीट ठसा उमटवणाऱ्या तरुण भारताची बोळवण, "ज्यांच्या राजकीय कादंबऱ्यांनी मराठी वाचकांना मोहविले ते प्रख्यात साहित्यिक कै. ग. त्र्यं. माडखोलकर हे संस्थापक संपादक लाभलले 'तरुण भारत' हे ५२ व्या वर्षाची वाटचाल जोमाने करीत आहे." या एकाच वाक्याने करण्यात आली. या वाक्यातही एक छोटीशी चूक झालीय. वैदर्भीय पत्रसृष्टीवरील लेख १०–१–१९८८ ला कुलकर्णी यांनी लिहिला त्यावेळेस तरुण भारताची ५१ वर्षाची वाटचाल सुरू होती.

विदर्भातीलच नव्हे तर देशातील हिंदी पत्रसृष्टीत अग्रगण्य स्थान प्राप्त केलेल्या 'नवभारत'च्या वाट्याला, "विदर्भात आणि मध्य प्रदेशातील सर्वाधिक हिंदी वाचकांवर प्रभाव पाडणारे 'नवभारत' हे हिंदी दैनिक पुढील महिन्यात ५४ व्या वर्षात पदार्पण करणार आहे." हे एकमेव वाक्य आलेले आहे. "१९७१ सालच्या मार्च महिन्यात सुरू झालेले श्री. श्रीकृष्ण चांडक यांचे महासागर हे दैनिक आता अकोला, अमरावती. चंद्रपूर या तीन जिल्ह्यातूनही निघत

आहे." हे वाक्य टाईम्स ऑफ इंडियाने तीन वेगवेगळया ठिकाणी आपल्या आवृत्या सुरू केल्यात, अशा थाटातले आहे. "नवप्रभात उद्घोष, रेखा, महाविदर्भ, नागपूर पोस्ट आदी हिंदी मराठी, इंग्रजी, सायं दैनिकेही नागपूरची वृत्तपत्रसृष्टी गजबजून सोडत आहेत," हे वाक्य सायंदैनिकांचा अपमान करणारी आहेत. गजबजून सोडणे तर दूर राहिले.

स्तंभ लेखकाला डेडलाईन पाळणे आवश्यक असल्याने त्याला वेळेवर विस्तृत माहिती मिळवणे नेहमीच शक्य होत नाही हे स्वानुभवावरून प्रस्तुत लेखक सांगू शकतो. त्यामुळे कुलकर्णी यांच्या या चुका क्षम्य ठरतात. पण एखाद्या स्तंभाचे पुस्तक निघत असेल तर काही तथ्यांची फेरतपासणी करून नवी विस्तृत माहिती देण्यास हरकत नसावी. मराठवाड्यातील 'अजिंठा' दैनिकाच्या संदर्भातही ही त्रुटी आढळते. मराठवाड्यात लोकमतचाच सर्वाधिक खप असला तरी मराठवाड्यातील पहिले दैनिक म्हणून 'अजिंठ्याचे' महत्त्व अनन्यसाधारण आहे.

या लेखसंग्रहातील दुसरी त्रुटी म्हणजे मराठी नियतकालिकांचा फारसा विचार झालेला दिसत नाही. 'चंदेरी', 'जी 'च्या पुढे मराठी नियतकालिकांना काही वाव दिसला नाही. तुलनेत इंग्रजी नियतकालिकांची अधिक चर्चा झालेली आहे. महाराष्ट्रात वाङमयीन नियतकालिके भरपूर निघतात. अत्यंत विकट स्थितीत ही नियतकालिके वर्षोनगणती निघत आहेत. यांची दखल कुलकर्णी यांना का घ्यावीशी वाटली नाही ? याचे थोडे आश्चर्य वाटले. या नियतकालिकांवरील लेखामुळे प्रस्तुत पुस्तकाचे संदर्भ मूल्य निश्चित वाढले असते.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांचाही कुलकर्णी यांनी 'समाचार' घेतला. पण मुद्रित माध्यमांपेक्षा त्यांना कमी स्थान दिले गेले आहे. त्यातही आकाशवाणीच्या वाटेला एकच लेख आलाय. पुढच्या संग्रहात कुलकर्णी ही त्रुटी दूर करतील अशी आशा आहे.

त्रुटी आणि दोष सापेक्षच असतात. समीक्षकांना दोष दाखविणे तसे सोपे असते. किंवहुना त्याच्याकडून ते अपेक्षित असते. मराठी समीक्षेची ही 'प्रवृत्ती' झालेली आहे. उपरोक्त दोष, त्रुटी दाखवताना प्रस्तुत लेखकाने या 'प्रवृत्ती'ला प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळेच दोष किंवा त्रुटी विसरायला काही हरकत नाही. या लेखसंग्रहाचे उपयुक्तता आणि संदर्भमूल्य निश्चित पणे वादातीत आहे. ■

माध्यम
लेखक : प्रकाश कुलकर्णी
मूल्य ६० रुपये
प्रकाशक : श्री विद्या प्रकाशन,
२५० शनिवार पेठ, पुणे ४११०३०

वऱ्हाडी जीवनाचे वैशिष्टचे टिपणाऱ्या कथा : हजारी बेलपान

मधुकर वाकोडे

'हजारी बेलपान' हा सौ. प्रतिमा इंगोले यांचा कथासंग्रह. पहिलेपणाच्या काही पाऊलखुणा जरी या कथा लेखनाच्या वाटचालीत दिसत असल्या तरी फार मोठा पल्ला लेखिकेने पहिल्या दमातच मारलेला आहे याचा प्रत्यय जागोजाग येतो. 'हजारी बेलपान' क्वचितच हाती पडावे त्याप्रमाणे हा कथासंग्रह वाचकांना निश्चितच समाधान देणारा आहे.

या कथासंग्रहातील बहुतांशी कथा ह्या "दै. तरुण भारत"तील वंडी उलार झाली या ग्रामीण कथेला वाहिलेल्या सदरातून प्रकाशित झालेल्या आहेत. या कथांनी वऱ्हाडी ग्रामीण जीवनाचे, स्त्री मनाचे असंख्य पदर हळूवारपणे आणि ते सुद्धा बावनकशी स्वरूपात सादर केलेले आहेत.

अस्सल लोकजीवन, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण जीवनातील संकेत, रीतीरिवाज, समूहाचे जीवन

त्यातील बारीक सारीक तपशील आणि स्त्रीमनाचे सूक्ष्म वास्तवदर्शन उद्धव शेळके, मनोहर तल्हार यांच्या पिढीनंतर सौ. प्रतिमा इंगोले यांनी घडविले आहे.

'मिया बिवी राजी', 'जोळन्हानी', 'भिकीचे कपळे,' 'ठानं बाई अवचित' अशा एकापेक्षा सरस कथातून त्यांनी अस्सल वास्तव जीवनदर्शन घडविले. या कथामधून ग्रामीण जीवनाचे संदर्भ आणि स्त्री जीवनातील बारकावे यांच्या घडणाऱ्या दर्शनावरून लेखिकेच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीची सहज कल्पना येते.

"ठानं बाई अवचित" या कथेतील अनेक प्रसंग जितके हृद्य तितकेच वास्तव. व्यक्तीच्या भावडेपणातून निर्माण होणाऱ्या विनोदाने जे हास्य फुलते ते क्वचित प्रसंगी शहाणेही करून सोडते. ग्रामीण स्त्री मन म्हणजे अंधश्रद्धांचे कोठार. ह्या कोठारातील कितीतरी चिजा सौ. इंगोल्यांनी हेरल्या आणि अंधश्रद्धांना सुरुंग लावला. तोही सहजपणे.

वऱ्हाडी बोलीची नजाकत व तिचे प्राकृतिक रंगरूप या कथांमधून सहजरित्या व्यक्त झाल्याने या कथांचा गोडावा वाचकाच्या अनुभवाला येतो. या देवीचा सव्वा मयना मोठा कळक करा लागते इरदी, सुतक इटायचंडायत पावाच लागते. पन कोनाच्या अठी सव्वा मयना जाता येत नाई. व त्याच्या अठुल्ल काई खाताई येत नाई! ह्या अशा "इरदी सुतक" "इटायचंडाया"च्या कल्पनांनी ही मने जशी भारलेली असतात तशी "करनी कवटाळा" नं भेदरलेली सुद्धा असतात. आदिम पातळीवरील मानवीजीवनाचे पापुद्रे सौ. प्रतिमा इंगोले सहजपणे उलगडून दाखवतात.

ग्रामीण जीवनानुभवातून कितीतरी सूक्ष्म पदर त्यांनी या कथांमधून आविष्कृत केलेले आहेत. दमनीच्या बैलांची "बेंळली तुटली तर माया गळचानं मंग त्या दमनीच्या जुवाले दुप्पटच बेळ्ली सारकं बांधलं?" अशा सूक्ष्मच्छटा हे जीवन प्रत्यक्ष जगल्याशिवाय टिपता येणे कठीण.

"करणी कवटाळं", "जादुटोणा", "भानामती वगैरे कल्पना विदर्भातील झाडीपट्टी व सातपुड्याच्या पायथ्याशी खोलवर रुजलेल्या आहेत. आदिम पातळीवरील मनाचा वेध त्या घेतात. व त्यातील फोलपणाही सूचित करून टाकतात. "दुसमानानं दावा साधेल हाय व जाई! कनकीची भुलाई करून त्या भुलाईले सुया रोवून तिले तुया डोक्शीचे केस लावेल हायत व जाई! आन ते भुलाई तुया नावराशी तुया दाटघात रोवेल हाय व जाई!" या सारख्या प्रसंगातून त्यांनी "यातुविधी" संबधीच्या एका गुदमरलेल्या भावविश्वावरच प्रकाश टाकलेला आहे. जी. ए. कुळकर्णी यांच्या कथांतून हे विश्व एका वेगळया संदर्भात येते तर सौ. प्रतिमा इंगोल्यांच्या कथांमधून हे भावविश्व केवळ स्त्री मनाच्या भोळसट वृत्तीतून आकाराला येते. घुमणारे "झाड" शेवटी देवी नसून भावड्या स्त्री-पुरुषांना फशी पाडणारी लुटारू ठरते. असे पदर उलगडतांना त्या वाचकांचे रंजनाबरोबरच उद्बोधनही साधतात.

ग्रामीण मन लोकतत्त्वांनी (Folk Elements) भारलेले असते. अवस पुनवेला अंगात सुया होणे, देवीला कौल लावताच करणी कवटाळाचा पत्ता लागणे, 'काजयनी' चा प्रयोग, आसरांचे (सात बहिणी असल्याने) सात हात करणे, अंगारे-धुपारे वगैरे लोकमानसाची स्पंदने लोकत्त्वावर पोसली गेलीत. "भिकीचे कपळे" "ठान बाई अवचित" ह्या कथातून लोकतत्त्वांचे मनोज्ञ दर्शन घडते. स्त्रीमनाचा ठाव त्या अंगभूत सामर्थ्याने अचूकपणे घेतात. स्त्रियांच्या तारुण्यसुलभ नवथर भावनांची पखरण सौ. प्रतिमा इंगोल्यांनी फार दिलखुलासपणे केलेली दिसते" गुरुप सेकुरटरी पोट्टं" "जोळन्हानी" व "मिया बिवी राजी" या कथांमधून नवथर भावनांचे अनोखे दर्शन घडते. "लग्न झाल्यावर मले नदिवर जावावं वाटे आन घंटोनशी नदीच्या पाण्यात पाय बुडून नदीचं झुयमुय वायनं पावावं वाटे." असे मिया बिवी मधल्या पुष्पाला वाटते. पुष्पाची ही नवथर भावना कितीतरी आकार धारण करते. 'माझ्या घरचा बुवा मले म्हणे, तू वायली आन मी त्याईले म्हनो, तुमी वायले?" विरहार्ततेतून उंचबळलेल्या ह्या भावना उत्कट तर आहेतच पण त्या चैत्रपालवी-इतक्या लुसलुशीत आहेत.

ग्रामोण जीवनातील जुन्या पिढीतील व्यक्तीं-च्या अंतरंगाचे कप्पे व नव्या पिढीतील भावनांचे कंगोरे त्यांनी अनेक कथातून अचूक हेरलेले आहेत. "मिया जिबी ..." मधील जुन्या पिढींचे दर्शन घडवितांना..." आमाले पाहून माया बुढा आन माहा चुलता काळचा आपटे. म्हणे या पोट्टीनं पऊन जावून आमच्या तोंडाले कायं फासलं. जस काई आमी तिचं दुसरं लगन करून देणारच नोतो." असे एकीकडे डोंगर आणि "माया सासरा म्हने, हे पोट्टं सालं वायलं निघालं. लेकानं वायको जशी पायलीच नाई. हिच्या आंगाले काय सोन लागलं हाय पन आज-कालच्या पोट्ट्याइले सबुरी म्हून नाईच?" दुसरीकडे असा हा सुळका.

..ही जुन्या पिढीची ताठरता आणि नव्या पिढीची संवेदनशीलता हा ग्रामीण पार्श्वभूमीवरील संघर्ष दोन पिढ्यातील अतराचा जिवंत नमुना ठरतो. ग्रामीण लोकभाषा जशी प्रकृतीला जवळ तशीच ही भाषा बोलणारी माणसंही अवघडच. त्यांच्या जीवनाचे काही पैलू असतात. नवरा हा कुंकवाचा घनी. त्याचे कौतुक अभिमान न्याराच पण खेड्यातील स्त्री ही अमक्या तमक्याची बायको या नात्यापेक्षा ती अमुकराव, तमुकरावची सुन म्हणूनच अधिकच परिचित असत. "ठानं बाई अवचित" मधील ग्रामीण स्त्री जेव्हा पाहता पाहता बचावतं तेव्हा, "आज मले उशीर झाला नसता तर? तुकाराम पाटलाची सून मी. मलं हे ठानं सोडून दुसरचं ठानं पा लागलं असत!" ही खरी उस्फूतं भावना. इथे कुठे वेगडीपणा नाही. आहे ते अस्मितेचे दर्शन. वऱ्हाडी जीवनातील खरी वैशिष्टचे सौ. इंगोल्याच्या कथातून दिसतात. ग्रामीण जीवनाचा पसारा त्यांच्या कथातून समर्थपण व्यक्त झाल्याने ह्या कथा ग्रामीण साहित्य विश्वात अलौकिक भर टाकणाऱ्या ठरतील यात संदेह नाही. ■

हजारी बेलपान :
लेखक प्रतिमा इंगोले,
समाज प्रबोधन संस्था–पुणे

‘ मी झक मारली ’

सुनंदा देशपांडे

‘ मी झक मारली ’ हा जालंदर सोनुने यांचा आणखी एक विनोदी कथासंग्रह यातील काही कथा विविध दैनिकांतून व नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या आहेत. क्राऊन आकाराच्या एकशे अकरा पानांमधून विविध विषयांवरील एकेवीस कथा त्यांनी या कथासंग्रहातून वाचकां-समोर ठेवल्या आहेत. जीवनातील हलक्याफुलक्या प्रसगातून विनोद कसा निर्माण होऊ शकतो याचे ढोबळ चित्रण या कथांमधून जाणवते. त्यामुळे कथेतील विनोद हुडकून काढावा लागतो. कथा वाचताना लेखकाने विनोदाची निर्मिती ओढून ताणून केल्यासारखी वाटते.

दैनंदिन जीवनात लहान-मोठ्या प्रसंगातून छोटे-छोटे विनोद नेहमीच घडत असतात. आपण त्याकडं फारसे लक्ष देत नाही. अशाच छोट्या-मोठ्या प्रसंगांच्या किस्स्यांचा संग्रह असे एकूण या कथासंग्रहाचे स्वरूप आहे.

या कथांवर सर्वप्रथम आपला रोचक आणि खोचकही अभिप्राय देणारी त्यांची पत्नी ही लेखकाच्या कथांची पहिली समीक्षक म्हणावी लागेल. संग्रहातील कथा जीवनाशी जवळीक साधणाऱ्या आहेत असा दावा करताना आपल्या मनोगतात लेखक म्हणतो 'यालाच वास्तववादी जीवन साहित्य म्हणतात. घरोघरी असं हे छोटं—मोठं रामायण महाभारत घडतच राहत. लोक गप्प बसतात; मी जाहीर बोंब केली एवढच.. अशी जाहीर बोंब करण्यासाठी व्यक्तीच्या ठिकाणी बंडखोरी असावी लागते. आणि ती आपल्याठिकाणी भरपूर आहे याची जाणीव 'वल्ली बंडखोर पक्षातली' या शब्दातून लेखकाने वाचकांना करून दिली आहे.

यातील 'तेढी मेख', 'शेकाटयाचा ऊरूस' 'अफवा', 'लेंढा ओढा' 'पहिली मुलाखत' इ. कथा ग्रामीण भागातील शाळांमधील पार्श्व-भूमीवर आधारलेल्या आहेत. वरून भोळसट दिसणाऱ्या ग्रामीणांच्या इरसालपणाचे खुसखुशीत

चित्रण करण्याला या कथात लेखकाला भरपूर वाव असूनही ते फारसे साधले नाही. त्यामानाने आपण स्कुटर घेतल्यावर ती शिकण्यापासून तर मित्र म्हणविणारे 'कामापुरते मामा' कसे असतात याचे चित्रण फारसे खुसखुशीत नसले तरी व्यवहारात येणाऱ्या कटू अनुभवाचे हलक्या फुलक्या शब्दातले चित्रण सुखावून जाते. 'एकजण स्कुटर घेऊन गेला, त्याने पूर्ण सीट उघडून आणली. मेलेले जनावर गिधाडांनी उधडाव तशी. 'चेतक असूनही ती एखाद्या पोट खोल गेलेल्या चित्त्याप्रमाणे दिसू लागली.' ('खटारा पान नं. ७८) अशासारख्या लेखकाने वापरलेल्या प्रतिमातून दुसऱ्यांची वस्तू लोक हलगर्जीपणाने कशी वापरतात व त्यातून त्या वस्तूची झालेली दुर्दशा याचे चित्रण बऱ्यापैकी झाले आहे.

'टी. व्ही. सेट', 'केवळ मिक्सीपायी' 'सौ. शोध लावते' इ. कथा बायकांवरील नित्याच्या विनोदातून सुचलेल्या वाटतात. 'केवळ मिक्सीपायी' ही कथा तर 'मिक्सी' आणि 'मॅक्सी' या शब्दांच्या गोंधळातून साकारली आहे त्यामुळे हवा भरलेल्या फुग्यासारखी तिची अवस्था झाली आहे. 'मी झक मारली' ही शीर्षक कथा तर या संग्रहातील हवाच काढून टाकते आणि लेखकाचा हा सारा खटाटोप खरेच झक मारल्यासारखा वाटू लागतो. लेखकाने म्हटल्याप्रमाणे लेखकाने मारलेली ही जाहीर बोंब त्याच्या बंडखोरीची पावतीच आहे. ■

मी झक मारली : ले. जालंदर सोनुने
पृष्ठे : १११, मूल्य ३५ रु.



वा | च | की | य

प्रिय श्री. श्रीपाद जोशी

स. न.

७-८ दिवसांपूर्वी आपला अंक हाती आला. चित्राची छपाई उत्तम झाली आहे. 'युगवाणी' ही अक्षरे लाल रंगात असती तर परिणाम अधिक आकर्षक झाला असता. असो खरं तर मी आपणास पुण्याहून परतल्यावर लिहिणार होतो. परंतु आपले संपादकीय वाचल्यावर राहवले नाही. ज्ञानाला त्यागाचे बळ नसेल तर सत्य मुखर होणे नाही ! किंवा ते धूसर, प्रच्छन्न होऊन परिणामशून्य व रंजक होण्याची शक्यता निर्माण होते. मुस्कटदाबी ही कितीतरी प्रमाणात लेखकाने स्वतःच स्वीकारलेली असते. सुरक्षा आणि सत्य एकत्रित नांदू लागले की असे होणे स्वाभाविक होऊन बसते. स्वातंत्र्याला नाभीकेंद्र गृहीत धरून मूल्यक्षयाचा आपला मुद्दा मला मान्य आहे. एरवी संवेदनक्षम, विश्वात्मक वृत्तीच्या निकोप मनाला हे धक्के सततच जाणवत आलेले आहेत ज्ञानेश्वर, कबीर, तुकाराम (तिरुवल्लुर) ते थेट या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत ही कळकळ व्यक्त होताना दिसते. आणि आधीच्या संस्कृत वाङ्मयात अशी कितीतरी स्थळं आणि उदाहरणं आढळतात. आपण या काळातच जगत असल्यामुळे त्याचे बारीकसारीक धक्के आपणाला जाणवू लागतात. आणि आपण म्हणता त्याप्रमाणे ते बुद्धिवंताला आवाहनच असतं. जिद्द हवी असते ती आपल्या अस्तित्वाला प्रस्थापित करण्याची. आणि अशांचे संख्यात्मक बल नेहमीच कमी राहिले आहे. आपण गोड शब्दात बुद्धिवंतांना उदासीन म्हटलं आहे. जोशीजी, खरं तर भीरू हे विशेषण त्यांना अधिक उचित ठरेल. लोकांची गृहीतं जमेस धरून आपण बुद्धिवंतांची परिभाषा का स्पष्ट करत बसता ? सत्याला प्रवादांचे भय असण्याचे कारण नाही. भावनात्मक आव्हानबाजीने जवळ जवळ सगळा भारत ग्रासल्या जात आहे यातून वैचारिक गती रुद्ध होऊन प्रगतीत व्यवधाने निर्माण होतात व नूतन कर्मकांडाला जन्म देतात. 'प्रज्ञावंताचे कुटुंबातून उच्चाटन' संकीर्ण पातळीवरील हे विधान गंमतीचे वाटले. खरंच जोशीजी, मेधावी, मूर्धन्य प्रज्ञावंताचे कुटुंब केवढे असते ? आणि असा प्रत्येक माणूस घरात मुल्ला नसरुद्दीन किंवा सॉक्रेटीस सारखाच उपेक्षित, उपहासविषय असतो. परंतु तो तिथे अडकतो का ? चिंतन हे गल्लीसापेक्ष असू नये हे आपले मत रास्त आहे. ते परखड व निरपेक्ष असावे. निकस व अपरिपक्व, स्वस्त व दांभिक साहित्यावर व्यक्त झालेली आपली नाराजी मी समजू शकतो. हा दोष काही प्रमाणात धर्मार्थ समीक्षा लिहिणाऱ्या गटग्रस्त, निस्तेज आलोचकांचाही आहे. अशा तकलादू साहित्यावर मुकुंदराज, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांनीही प्रतोद ओढले आहेत. गालिबला मुश्किलपसंत शायर म्हणतात तर मीरची अभिव्यक्ती अत्यंत सोपी सुलभ आहे. मीर सोपा आहे म्हणून कमी ठरत नाही तर गालिब अवघड आहे म्हणून त्याला प्रयत्नपूर्वक समजून घेऊ नये असेही नाही ! प्रश्न आहे तो निष्ठेचा. अभ्यासाचा व मनाच्या मोठेपणाचा !

असो, माझा संग्रह वाचला का ? वाचा. स्पष्ट कळवा. मला आवडेल. ओघाओघाने वाटले ते लिहिले. विचारांना चालना देणारे संपादकीय वाचायला मिळाले. आभारी आहे.

आपला

म. मा. परसावळे

हिंगोली

मित्रवर्य जोशी यांना
सप्रेम नमस्कार

आपल्या आतिथ्याने व स्वागताने भारावून गेलो. आपण अथक परिश्रमातून सर्वांच्या सहकार्याने परिषद यशस्वी केली. यातून ऐतिहासिक कार्य निर्माण झाले, वाङमय नियतकालिकांना दिलासा व उजाळा मिळाला. आपण मी दिलेले टिपण तसेच संपूर्ण ध्वनि-मुद्रित फितीवरून परिषद चर्चा, शक्यतो सविस्तर, 'युगवाणी'च्या पुढील अंकातून द्यावी. अनुपस्थितांनाही त्याचे बहुमोल मार्गदर्शन होईल. तो 'विशेषांक' होईल. नागपूरला मी प्रथमच आलो. आपण प्रथम नागपूरला मला सन्मान प्राप्त करून दिला हे ऋण मी मनात सतत वागवीन. आपल्या परिषदेचे नागपूर तरुण भारतातील वृत्त, काही फोटो पुढील भेटीत दाखवायला आणावे. सहज उत्सुकता म्हणूनच ! आता अस्थायी समितीलाही शक्य तेवढ्या लवकर एकत्र आणा म्हणजे पुढच्या कामाला चालना मिळेल. अन्य साहित्य संस्थांना यजमानपद, पुढील परिषदेचे स्वीकारण्याची विनंती पत्राने करा.

भा. व्यं. गिरिधारी
जव्हार, जि. ठाणे

प्रिय श्री. श्रीपाद जोशी
सस्नेह नमस्कार

पुढाकार घेऊन चर्चासत्र आयोजित करून यशस्वी केलं. मन:पूर्वक आभार, अभिनंदन. एवढे कष्ट घेतले म्हणून महत्त्वाच्या प्रश्नाला वाचा फुटू शकली. तुम्हाला शिणल्यासारखं झालं असेल पण वाङमयीन प्रवाहाच्या सातत्यासाठी येणारा शीण Inspirnig असतो. असो.

प्रभाकर वागले
संपादक, 'अनुष्टुभ' / मनमाड / जि. नाशिक

प्रिय श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी
स. न. वि. वि.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत, अनेक अडचणी आणि अडथळे असतानाही तुम्ही नियतकालिकां-वरील परिसंवाद आयोजित केला, ही परिषद यशस्वी केली त्याबद्दल तुमचे मन:पूर्वक अभिनंदन ! परिषदेसाठी अपार कष्ट घेतले याची कल्पना संयोजनावरून आली. आता ही मोहीम यश मिळेपर्यंत चालू ठेवली पाहिजे. इतर निवास–भोजनाची व्यवस्थाही उत्तम होती. तुम्हा सर्व मंडळींना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. गुरुजींचा लेख (तुमच्या काव्यसंग्रहाची प्रस्तावना) लवकरच पाठवीत आहे. कळावे.

पुरुषोत्तम पाटील
संपादक, 'कवितारती' / देवपूर, धुळे

प्रिय श्री. भा. जोशी
स. न. वि. वि.

वाङमयीन नियतकालिक परिषदेचे आयोजन आणि त्यानंतरही त्या दृष्टीने पुढच्या हालचाली हे मोठे काम तुम्ही रेटत आहात याचे कौतुक वाटते. परिषद किंवा कार्यक्रम झाला की त्या चर्चा तिथेच विसरल्या जातात असा एरव्हीचा अनुभव असतो.

'युगवाणी'च्या अंकातच परिषदेचा वृत्तान्त आणि अन्य लेखन प्रसिद्ध करीत आहात. ही उत्तम गोष्ट आहे. एकत्र सर्व साहित्य उपलब्ध होईल हा एक फायदाच आहे.

पुणे आकाशवाणीवर वाङ्मयीन नियतकालिकांच्या समस्यांवर एक परिसंवाद आहे त्यात श्री. पु. वगैरे आहेत.

शंकर सारडा
प्राकृती प्रिंटर्स, सातारा

सप्रेम नमस्कार

'युगवाणी'चा जा–फे–मा. ९० ' चा अंक मिळाला. (अर्थात नेहमीप्रमाणेच उशीरा) आपल्या संपादकीय कारकीर्दीस सुरुवात झाल्यापासून अंकाचे स्वरूप बरेच परिवर्तित झालेय. त्याला साजेसाच हा अंक आहे. परंतु अजूनही 'युगवाणी'चे एकंदरीत रूप मराठीचे अभ्यासक, संशोधक व विद्यार्थी यांनाच आवडेल असे आहे. समस्त मराठी भाषिक वाचक वर्ग अशामुळे 'युगवाणी'कडे आकृष्ट होईल का ? साशंकता वाटते. मराठीतील वाङ्मयीन नियतकालिकांचा खप वाढावा आणि दर्जाही टिकावा यासाठी संपादकांना फार कसरत करावी लागत असावी परंतु सामान्य वाचक वर्गाला जवळ करायचे असेल तर त्यासाठी कथा, ललित–गद्य, प्रवास वर्णन आणि आत्मकथने इ. प्रकारचे लेखन त्यात असायला हवे. या दृष्टीने 'युगवाणी'ने काही करावे असे वाटते. इतर प्रांतातील कित्येक मराठी प्रेमिकांना 'युगवाणी'चा अंक मिळावा वाटतो. पण 'युगवाणी' निघते की नाही हेच त्यांना माहीत नाही असे आढळले. या दृष्टीनेही 'युगवाणी'ने परप्रांतीय मराठी भाषिकांशी संपर्क साधायला हवा. तसेच ठराविक लेखक वर्ग आणि त्यांना साचेबंद कंपू यांचेच लेखन सातत्याने 'युगवाणी'त दिसले की वाचकवर्गाचे आकर्षण कमी होते. म्हणून 'युगवाणी' वाचकाभिमुख व्हावी. वाचक-लेखक–संपादक यांनी जवळ येण्याच्या दिशेने 'युगवाणी'ची वाटचाल व्हावी म्हणून 'युगवाणी'कडून वरील अपेक्षा व्यक्त केल्या. 'लहान तोंडी मोठा घास' तर झाला नाही ना ? पण 'युगवाणी'च्या प्रेमापोटीच लिहिले हे लक्षात घ्यावे.

विजयिनी जोशी
मेहकर

श्री. श्रीपाद जोशी

स. न वि. वि.

लोखंडाला परिस लागताच 'सोने' व्हावे तसे झाले. आपल्या संपादनाने ही किमया केली. अंक अतिशय सुबक, वाचनीय आणि नव्या नव्या कल्पनांना मूर्त रूप देणारे आहेत. आपले हार्दिक अभिनंदन !

ता. क.

आपण जा-फे–मा ९० च्या अंकात माझ्या कथांचे विश्लेषण करणारा डॉ. शोभणे यांचा लेख प्रसिद्ध करून आपण माझा व पर्यायाने माझ्या कथांचा गौरवच केला आहे. हार्दिक धन्यवाद ! कळावे.

मनोहर तल्हार
नागपूर

मा. संपादक 'युगवाणी'

स. न.

दि. ५ ऑगस्टला साहित्य महामंडळ व वि. सा. संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शुद्धलेखन नियमांबाबत विद्वज्जनांची चर्चा झाल्याचे वर्तमानपत्रात वाचले. परंतु ह्या चर्चेत 'मराठी भाषा कशी लिहावी' ह्या माझ्या जा-फे-मा. ९० चे 'युगवाणी'त प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखाचा मुळीच

विचार करण्यात आला नाही असे आढळून आले. माझ्या मते मी त्या लेखात चर्चिलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. कारण लेखन तर्खडकरी व्याकरणानुसार लिहावे की पुणेरी बोलभाषेत लिहावे हे ठरविल्याशिवाय शुद्धलेखनाचे नियम निश्चित करण्याला काय अर्थ आहे? आजकालच्या साहित्यात आणि पाठ्यपुस्तकात पुणेरी बोलभाषेचा सर्रास वापर करण्यात येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना तर्खडकरी व्याकरण (स, ला, ते, स, ला, ना. ते इ. इ.) शिकविणे व्यर्थच नाही का ?

बोलभाषेतील साहित्यातील दोषांचे दिग्दर्शन मी माझ्या लेखात सविस्तर केले आहे. पण त्यामुळे बोलभाषेत साहित्य निर्माण होणे बंद होईल ह्याचा सुतराम संबंध नाही. आणि बोलभाषेत साहित्य-निर्मिती करताना तर्खडकरी शुद्धलेखनाचे नियम धाब्यावर बसवावे लागतात. त्यामुळे मला प्रकर्षाने वाटते की ह्या विषयावर विद्वज्जनांनी सखोल चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा.

माझ्या लेखाचे कात्रण व माझे हे पत्र शुद्धलेखनाचे नियम सुधारू इच्छिणाऱ्या विद्वज्जनांकडे पाठविण्यात येतील व त्यावर सहानुभूतिपूर्वक विचार होईल अशी अपेक्षा आहे.

भास्कर निनावे
भंडारा

[चर्चासत्राचे आयोजन 'युगवाणी 'कडून नसून महामंडळाकडून झालेले होते. 'युगवाणी 'चे संपादक देखील निमंत्रितात नसल्याने चर्चासत्रात नव्हते. त्यामुळे ते चर्चासत्र व आपल्या लेखाची त्यातील चर्चा याबाबत 'युगवाणी 'स काही करता येणे शक्य नाही. मात्र आपले या महत्वाच्या विषयावरील उचित ते लेखन आपण पाठविल्यास 'युगवाणी 'तून प्रकाशनार्थ त्याचे स्वागतच होईल. –संपादक / युगवाणी]

स. न.

विदर्भ साहित्य संघाचा आजीव सभासद असल्याने माझ्याकडे 'युगवाणी' येते. ए–मे–जू. ८९ च्या अंकाचे संपादकीय काही प्रगट चिंतन, काही हितगुज, काही दुर्बोधता अशा स्वरूपाचं पण पठडीपेक्षा निश्चितच थोडं वेगळं आहे. नियतकालिकांची उपेक्षा किंवा ती बंद पडण्याविषयीची समाजाची उदासीनता आणि बधिरता त्याचप्रमाणे शासन व समाजधुरीणांची कर्तव्ये याचा उहापोह या संपादकीयात केलेला आहे.

परंतु हा प्रश्न निव्वळ वाङमयाचा दर्जा, लोकाची उपेक्षा किंवा कागदाची उपलब्धी एवढ्याच पुरता मर्यादित नाही. उदा.: 'माजघराची कविता' आम्ही पाठ्यपुस्तकात शिकतो. पण इंग्रजांची बांधकाम नियमावली जशीच्या तशी इथे स्वीकारल्यामुळे गेलं अर्धशतक जेवढं बांधकाम या देशात झालं त्यात कुठेही माजघर घेता आलेलं नाही हे आमच्या किती लेखकांना किंवा कवींना ठाऊक असेल याची शंकाच आहे. आमच्या संस्कृतीची उभारणी आणि जोपासना ज्या अशाच अनेक, दिसायला निरुपद्रवी घटकांशी निगडित असते ते घटकच असे देखताडोळा नाहीसे होत आहेत.

या संदर्भात पोस्टाच्या व्यवहाराचं उदाहरण देता येईल. पोस्टाच्या व्यवहाराचा वाङ्मयीन जाणिवांशी काय संबंध असा प्रश्न कोणालाही पडावा. आपण किती लहान लहान कप्प्यात विभाजित झालो आहोत आणि त्याबाहेरचा विचार करायला कसे असमर्थ झालो आहोत हेच या प्रश्नावरून दिसून येतं, असो.

१९२५ ते ३० च्या सुमारास इंग्लंडमध्ये वाहतुकीवरचा प्रवासी बोजा कमी करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून पोस्टाच्या व्यवहारात कमालीची सुधारणा करण्यात आली. एखाद्या निरोपा-करता सुद्धा स्वतः जाणं पसंत करणारे सुद्धा पोस्टाच्या व्यवहारातला 'भरवसेशीरपणा' पाहून पत्राने काम उरकू लागले. एक–दोन वर्षातच मुद्दाम वेगळी खटपट न करताही साक्षरतेचं प्रमाण वाढू लागलं. साधारण पाच किंवा सहा वर्षातच जवळ जवळ शंभर टक्के साक्षरता साध्य झाली. साक्षरतेच्या या वाढीमुळे लोकांची वाचनाची गरज आणि आवड वाढू लागली. परिणामी वर्तमानपत्रांची आणि नियतकालिकांची संख्या आणि खप यातही वाढ होऊ लागली. संख्यावाढीमुळे

स्पर्धा उत्पन्न होऊन दर्जात जशी सुधारणा होऊ लागली तशी खपामुळे येणाऱ्या आर्थिक स्थैर्यातून लेखकांच्या मानधनात वाढ होऊ लागली. पुस्तकांच्या आवृत्त्या लाख लाख प्रतींच्या निघू लागल्या. मुख्य म्हणजे लेखी व्यवहार वाढल्याबरोबर एक प्रकारची विश्वासार्हता आणि बांधिलकी समाजात वाढू लागली. लिखित शब्द हा केव्हाही पुरावा म्हणून पुढे येऊ शकतो. साहजिकच तो तोलून मापूनच वापरला जातो.

समाजातले जाणिवांचे आणि विधायक शक्तींचे प्रवाह असे मोकळे होत असतात पण समाज म्हणून आपण त्यांची अशी साकल्याने दखल घेतल्याचं कुठे आढळत नाही. नुसत्या पत्रव्यवहाराच्या सुधारणेतून आणखी एक चमत्कार इंग्लंडमध्ये घडला तो म्हणजे Correspondence chess, पत्रवुद्धिबळ, याच नावाचं एक मासिक गेली ५० वर्षे तिथं चालू आहे.

हे सगळं व्हायचं म्हणजे कागदाचा पुरेसा आणि स्वस्त पुरवठा हवाच. तेव्हा तोही किस्सा ऐका. आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा देशाच्या प्रगतीला कागद आवश्यक या भावनेतून कागद कारखानदारांशी शंभर शंभर वर्षाचे ६० पैसे टन या भावाने बांबू देण्याचे अवाढव्य कोटयाचे करार करण्यात आले. हावरटासारखे एवढे कोटे पदरात पाडून घेतले पण एवढा कागद खपण्यासारखी त्यावेळी परिस्थिती नव्हती. तेव्हा काहींनी बांबूचा लगदा निर्यात करायला सुरुवात केली तर काहींनी स्थानिक बाजारपेठेकडे लक्ष दिलं. कुणी कुणाला पटवलं हा प्रश्न इथे गौण आहे. पण परिणाम असा झाला की के. जी. पासूनच वह्या पुस्तकांचं प्रमाण वाढू लागलं.

कागदाचा खप आणि नाश हा असा प्रतिवर्ष आणि योजनापूर्वक होत आहे. पण या प्रश्नाचं गांभीर्य पुढेच. नुकतेच काही महिन्यांपूर्वी इथल्या डॉ. मारवा यांच्या दवाखान्यात एक अकरा-बारा वर्षाची मुलगी पाठीच्या आणि कण्याच्या दुखण्यावर उपचार करण्यासाठी दाखल झाली. चौकशीतून लक्षात आलं की सात किलो वजनाचं दप्तर हेच तिच्या दुखण्याचं कारण होतं.

म्हणजे कागदाच्या अशा भडिमाराने आमच्या उमलत्या पिढीचा कणा दुखावतो आणि कागदाच्या अभावामुळे आमच्या नियतकालिकांचा कणा कधी मजबूतच होत नाही !

आम्ही या सर्वांची समाज म्हणून दखल घ्यायला नको का ? याचा अर्थ आपण सर्व निष्काळजी आहोत असा नाही. ब्रिटिशांनी इथली शासनपद्धती बनवताना ती इतक्या खात्यात विभागून ठेवली की दुसऱ्या खात्याकडे बोट दाखवून कोणालाही गप्प बसवता यावं. तीच पद्धत स्वातंत्र्यानंतर आम्ही स्वीकारल्यामुळे निरनिराळ्या विभागात बंदिस्त असलेले बुद्धिवादी एकमेकांची कळत नकळत कोंडी करत आहेत. ही कोंडी फोडून समाजातल्या जाणिवांचे प्रवाह मोकळे होण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. नियतकालिकांचाही विकास त्यातूनच साधेल हे निश्चित.

अशोक जोशी
नागपूर

स. न. वि. वि.

आपले पत्र मिळाले. आपण 'युगवाणी'मधून माझी दखल घेताहात ही फार चांगली घटना आहे. यामुळे वि. सा. संघ × मी, हा वाद संपुष्टात येईल. मी आपला फार मवाळ होईल यात शंका नाही. माझ्या पाच-सहा कविता एकदमच 'युगवाणी'त छापाल काय ? असो.

या सोबत 'अनर्थ' हा कवितासंग्रह पाठवीत आहे. त्याची समीक्षा आपण त. भा. तून किंवा युगवाणीतून करावी / करवून घ्यावी. आपणास ते सहज शक्य आहे. असो. सारं आपल्यावर अवलंबून आहे.

सर्वांना नमस्कार,

भगवान ठग
वाशीम, जि. अकोला

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती

१५० केंद्र – २१००० विद्यार्थ्यांचा उच्चांक

मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार, विद्यार्थ्यांना मातृभाषेची गोडी लावणे, व लेखन, वाचनादीची आवड निर्माण करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाची परीक्षा समिती सातत्याने प्रयत्नशील आहे. परीक्षा समिती १९६३ पासून सातत्याने विविध परीक्षांचे आयोजन करीत आहे. यामध्ये विद्यालयीन–महाविद्यालयीन समकक्ष परीक्षांचा समावेश आहे. त्याचबरोबर अ–मराठी भाषिक, उर्दू माध्यमाचे विद्यार्थीही या परीक्षांचा लाभ घेतात. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये नागपूर आणि अमरावती विद्यापीठाचाही समावेश आहे.

मराठी भाषिक व अ-मराठी भाषिकांच्यासाठी इयत्ता ५ वी ते पीएच्. डी. समकक्ष परीक्षांपर्यंत परीक्षांचे आयोजन केले जाते. केवळ परीक्षा घेण्यापुरतेच संस्थेचे कार्य मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासाच्या दृष्टीने उन्हाळ्याच्या सुट्टीचा उपयोग करून घेऊन 'भाषा संस्कार' शिबिराचे आयोजन करण्यात येते. यात मातृभाषेच्या सर्वांगीण विकासाबरोबर समृद्ध भाषेच्या योगे व्यक्तिमत्व विकास कसा साधता येतो यासंबंधीही प्रशिक्षण दिले जाते. या शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळतो. विद्यार्थ्यांच्या लेखनशैलीच्या विकासासाठी शिबीरार्थीकडून हस्तलिखित सुधारणा करून घेण्यात येते. गेल्या वर्षीपासून विद्यालयीन व महाविद्यालयीन स्तरावर 'हस्तलिखित'स्पर्धेचे आयोजनदेखील केले जात आहे.

ज्यांना मराठी भाषा शिकण्याची आवड आहे अशा अन्य भाषिकांसाठी तीन महिन्यांच्या 'भाषा परिचय' वर्गाचे आयोजन करण्यात येते. या वर्गाचाही अन्यभाषिक फायदा करून घेतात. १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या दृष्टीने मराठी विषयाचे मार्गदर्शन केले जाते. विशेषत: लेखनविषयक, शुद्धलेखनविषयक मार्गदर्शनासाठी बाहेरगावच्या केंद्रांकडेही लक्ष पुरविले जाते.

सप्टेंबर व फेब्रुवारी या दोन सत्रात होणाऱ्या परीक्षांची १९८० साली विदर्भात ५० केंद्रे होती. या केंद्रातून ५,००० विद्यार्थी सहभागी होत असत. आज केंद्रांची संख्या १५० च्या घरात जाऊन पोहोचली असून विद्यार्थ्यांची संख्या २१,००० च्या वर गेलेली आहे. या उच्चांकावरून या परीक्षांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटत असल्याचे स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील शासकीय कार्यालयातून राज्यभाषा मराठीचा वापर करण्यासंबंधीचे शासनाचे धोरण लक्षात घेऊन कार्यालयीन भाषेचा बी. ए. पदवी परीक्षेत अंतर्भाव करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांची परीक्षेतील रुची वाढली आहे. त्याचा त्यांना नोकरीच्या दृष्टीने निश्चितच लाभ होतो. हा अभ्यासक्रम म्हणजे विदर्भ साहित्य संघाचे वैशिष्टयच म्हणावयास हवे.

विदर्भ साहित्य संघाच्या विविध परीक्षात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येतात. सर्वाधिक परीक्षार्थींचा सहभाग देणाऱ्या केंद्रांना विद्यालयीन व महाविद्यालयीन स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाची अनुक्रमे ३०१, २०१ व १०१ रुपयांची पारितोषिके देण्यात येतात. साहित्य पारंगत (एम्. ए. समकक्ष) परीक्षेत सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्याला विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार व कै. ना. कृ. दिवाणजींच्या स्मृतिप्रीत्यर्थ रु. ५००/– चा ग्रंथपुरस्कार देण्यात येतो. साहित्याचार्य व साहित्यवाचस्पती या सर्वोच्च परीक्षांसाठी अनुक्रमे रु. ३०१ व ५०१ रु. चा पुरस्कार विदर्भ साहित्य संघातर्फे प्रदान करण्यात येतो. त्याचबरोबर साहित्याचार्य, साहित्य पारंगत, साहित्य विनीत आदी परीक्षांतील सर्वप्रथम विद्यार्थ्यांसाठी कै. ना. कृ. दिवाणजी, कै. मामा वरेरकर व कै. वा. ग. शिंगणापूरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ठेवण्यात आलेले पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ नागपूर

केंद्रीय कार्यवृत्त दि. १ एप्रिल ९१ ते ३० जून १९९१

५-४-९१ : राष्ट्रीयवृत्तीचे प्रसिद्ध वैदर्भीय कवी कै. आनंदराव टेकाडे यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. या निमित्ताने धुळे येथील 'चेतश्री प्रकाशन'ने प्रसिद्ध केलेले 'आनंदकद–आनंदराव टेकाडे' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ वि. सा. संघात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पद्मश्री डॉ. वि. भि. कोलते यांनी भूषविलेले होते. कै. आनंदराव टेकाडे यांचे जीवन व साहित्य या विषयावर तसेच नवप्रकाशित पुस्तकावर डॉ. जगन्नाथ नाईकवाडे, डॉ. सुरेश डोळके, डॉ. सौ. आशा सावदेकर, श्री. मा. गो. वैद्य यांनी आपले विचार व्यक्त केले. या प्रसंगी कै टेकाडे यांच्या 'आनंदकंद ऐसा' या गाजलेल्या गीताचे गायन झाले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. प्रभाकर चांदेकर व घासकडबी कुटुंबीय यांनी बरेच परिश्रम घेतले.

८-४-९१ : सहा भाषा भगिनींची समरसता साधणारा एक उपक्रम विदर्भ साहित्य संघात संपन्न झाला.

विदर्भ साहित्य संघाच्या अन्य भाषा साहित्य विभागाच्या वतीने गडकरी सभागृहात आयोजिण्यात आलेले ते एक विदर्भस्तरीय बहुभाषिक संमेलन होते. अध्यक्षस्थानी हिन्दी कवी जगमोहन मिश्रा होते.

या संमेलनात हिन्दी, मराठी, इंग्रजी, उर्दू, सिंधी आणि तेलगूच्या कवींनी आपल्या रचना सादर केल्या. प्रारंभी अन्य भाषा साहित्य विभागाचे आमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी अन्य भाषाविषयक उपक्रमाबाबतची गरज व भूमिका विषद केली.

सर्वश्री हीरालाल शेंडे, विजय भेले, ओमप्रकाश चौरसिया, नारायण चेलानी, धीरेन्द्र सिंग, मोहन वढे, मिलिंद खेरकर, अमर रामटेके, गोविंद वाघमारे, तन्हा नागपुरी, प्रभाकर मोरकर, रघुवीर जोशी, जमील अफतर आणि अब्दूल गफ्फार शाकीर या विविध भाषामधील कवींनी यात भाग घेतला.

संचालन अमर रामटेके आणि आभार प्रदर्शन तन्हा नागपुरी यांनी केले. या कवीद्वयांनीच या कार्यक्रमाचे संयोजन केले होते.

२४-४-९१ : श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे 'नवे ग्रंथ नवे समीक्षक' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

१-५-९१ : वि. सा. संघाच्या धनवटे रंग मंदिराच्या उभारणीसाठी तन मन धनाने झिजलेले प्रसिद्ध नाट्य कलावंत कै. नाना जोग यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. नागपुरात नव्यानेच स्थापन झालेल्या 'रंगकर्मी' या संस्थेतर्फे श्री. रमेश अंभईकर व कार्यकारिणीचे स्थानिक सदस्य या प्रसंगी उपस्थित होते. रात्रौ ९ वाजता 'रंगकर्मी' संस्थेने विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने 'रातराणी' या नाटकाचा प्रथम प्रयोग धनवटे रंगमंदिरात सादर केला. या कार्यक्रमास रसिकांची बरीच गर्दी होती.

१५-५-९१ व १९-५-९१ : वि. सा. संघाच्या संगीत समितीतर्फे दोन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते.

२६-५-९१ : नागपूर प्रकाशक संघाचे अध्यक्ष व नागपुरातील प्रसिद्ध प्रकाशक कै. श्यामकांत बनहट्टी यांच्या स्मृतीस श्रद्धांजली वाहण्यास 'विजय प्रकाशन'च्या साह्याने एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी कै. बनहट्टी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

२०-६-९१ ते २५-६-९१ विदर्भ साहित्य संघ व स्व. मोहन कोठीवान स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. पद्माकर डावरे आणि स्व. मोहन कोठीवान स्मृती मराठी एकांकिका स्पर्धा दिनांक २० ते २५ जून पर्यंत पार पडल्या.

वि. सा. संघाध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन केले. या स्पर्धेत नागपूर व बाहेरून अशा २७ एकांकिका सादर करण्यात आल्या. स्पर्धेचे परीक्षक श्री. राजाभाऊ दर्भे, धनंजय भावे व सौ. प्रतिभा कुळकर्णी ह्यांनी सर्वच एकांकिकेचे मूल्यमापन केले. सुरुवातीला नाटय रंगकर्मी कै. योगेश गोसेवाडे ह्या कलावंताला श्रद्धांजली वाहून श्री. धनंजय भावे ह्यांनी परीक्षकांतर्फे आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे सांगितले की, मुंबई-पुण्याच्या नाटकांपेक्षा कितीतरी चांगली नाटक इथे सादर होतात. परंतु, नागपूरचा रसिक ह्यांच्या कलाकृतींना दाद देत नाही, ही बाब फार गंभीर आहे. नागपूरच्या रसिकांना आता सवयच झाली आहे की, २५-५० रु. खर्च करायचे आणि मुंबईचे नाटक मग ते कसेही असो, पाहायचेच. कलावंतांनी एकत्रित येऊन जर नाटक बसविले तर मुंबई-पुण्याच्या नाटकांपेक्षा सुंदर नाटक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून स्वतःची कोणतीही मदत लागल्यास मी ती करीन, वेळ पडल्यास अभिनयसुद्धा अशी ग्वाही दिली.

स्पर्धेत बक्षीस वितरणाचे वेळी श्रीमती कोठीवान उपस्थित होत्या. महापौर वल्लभदास डागा यांच्या गैरहजेरीत वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामनराव तेलंग ह्यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

आयोजक मुकुल खोत, किरण देशपांडे, प्रा. विनोद इंदूरकर, अशोक आग्रे, देवेन्द्र बोद्रे स्पर्धा सफल करण्यात यशस्वी झाले.

कै. पद्माकर डावरे व कै. मोहन कोठीवान स्मृति मराठी एकांकिका स्पर्धा १९९१ निकालपत्रक

निर्मिती : १. कै. पद्माकर डावरे स्मृति ढाल आणि श्री. व सौ. फरकाडे पुरस्कृत फिरते चिन्ह रु. १००१/- चेकमेट, मधुरेश थिएटर्स, नागपूर
२. कै. सुधीर आयलवार स्मृति फिरते चिन्ह रु. ७५१/-पिद्दी, नाटयश्री, नागपूर
३. कै. विमलबाई कर्नाटकी स्मृति फिरते चिन्ह रु. ५०१/- आंधळ्या खिडक्या, पैंजण रंगभूमी, नागपूर

अभिनय

प्रथम : पुरुष : रु. १५१/-जयंत पाठक पुरस्कृत संजय काशीकर वाडदेकर, आंधळ्या खिडक्या, पैंजण रंगभूमी, नागपूर
महिला : रु. १५१/- गीतांजली पुरस्कृत, सौ. वनिता राव, चेकमेट, मधुरेश थिएटर्स, नागपूर

द्वितीय : पुरुष : रु. ३७१ /-संजय भाकरे नं. १ पिट्टी, नाटचश्री, नागपूर
महिला रु. १०१ /-श्रीदेवी प्रकाश, वायनाक्यूलर, शारदा

तृतीय : पुरुष रु. ७५ /-मुकुंद वसुले, शिरगावकर, आंधळचा खिडक्या, पैंजण रंगभूमी, नागपूर
महिला रु. ७५ /-गौरी खेंडनवीस, लपंडाव स्वतःशीच, राधावाई

दिग्दर्शन / प्रा. विनोद इंदूरकर पुरस्कृत
प्रथम : रु. २०१ /- आंधळचा खिडक्या, पैंजण रंगभूमी, संजय काणीकर
द्वितीय : रु. १५१ /-पिट्टी, नाटचश्री, सतीश खेकाळे

लेखन / डॉ. रंजन दारव्हेकर पुरस्कृत
प्रथम : रु. २०१ /-संजय जीवने, जयस्तंभ, दलित रंगभूमी, नागपूर
द्वितीय : रु. १५१ /-प्रकाश देवा, वायनाक्यूलर, हौशी कलावंत,कोराडी

प्रकाश योजना / कै. मुरलीधर मालोदे स्मृति शिवांकर मालोदे पुरस्कृत
प्रथम : रु. १०१ /-हेमंत नायडू, व्रतु, नॅशनल अॅकेडमी ऑफ कल्चर
द्वितीय : रु. ७५ /-नीलकांत फुलसुंगे, मनपक्षी, स्वप्नपूर्ती कला केंद्र

सर्वोत्कृष्ट नेपथ्य / कै. जगन भापकर पुरस्कार बाळ मंग्रूळकर पुरस्कृत
रु. १०१/-प्रकाश पात्रीकर, आंधळचा खिडक्या, पैंजण रंगभूमी, नागपूर

सर्वोत्कृष्ठ पार्श्वसंगीत / मिलींद नांदेडकर पुरस्कृत
रु. १०१ /-विनोद काळे, अक्षरे पुसली तरी, जयस्तंभ, दलित रंगभूमी, नागपूर

सर्वोत्कृष्ट बालकलावंत / डॉ. नीलकांत फुलसुंगे पुरस्कृत
रु. ३१ /-भारत / मनोज गणवीर, जयस्तंभ, दलित रंगभूमी, नागपूर

उत्तेजनार्थ : प्रकाश देवा, वायनाकूलर " राघू ", विनोद राऊत, चेकमेट " अरविंद ", अजय घारे, लंपडाव स्वतःशीच " भाषाशास्त्री ", कु. दीप्ती खर्डेनवीस, पिट्टी, " जॅनी " सौ. शुभा साठे, वायनाक्यूलर " मिनू " कु. रोहिनी ठेंगडी, रमणई, " प्रेयसी ", कु. सुमेध नरांजे, जयस्तंभ, दलित रंगभूमी, नागपूर (बालकलाकार) प्रकाश पात्रीकर दिग्दर्शन, चेकमेट

दि. ३० जून ९१ : ब्रेललिपीतील ग्रंथ विभागामुळे अंधांना समाजात मिसळून आदर्श नागरिक बनण्याची संधी उपलब्ध झालेली आहे, असे मत बारावीच्या परीक्षेत कला विभागात गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकावणारी अंध विद्यार्थिनी कु. शुभांगी मिश्रीकोटकर हिने व्यक्त केले.

विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे अंध वाचकांसाठी ब्रेललिपीतील ग्रंथ विभागाचे उद्घाटन कु. शुभांगी मिश्रीकोटकर हिच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ती बोलत होती. वि. सा. संघाच्या टिळक सभागृहात हा उद्घाटनाचा भावपूर्ण समारंभ झाला.

सामाजिक कार्यकर्त्या डॉ. रूपा कुळकर्णी व श्री. रमेश खानझोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ झाला. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार याप्रसंगी अध्यक्षस्थानी होते.

एका वर्षात टंकलेखनाची संपूर्ण सामुग्री आणून याच ठिकाणी ब्रेललिपीतील पुस्तके तयार करण्याचा प्रकल्प आम्ही सुरू करू, असे आश्वासनही प्रा. द्वादशीवार यांनी आपल्या भाषणात दिले.

आजपासून या ग्रंथालयाशी आपला संबंध आला व यापुढे तो सतत वाढत राहील याकडे आपण लक्ष देऊ, असे श्री. रमेश खानझोडे यांनी आपल्या भाषणात सांगितले. एक चांगला वाचक या नात्याने येथे आलो आहे असे सांगून आपल्याकडून जेवढी मदत ग्रंथालयाला होईल तेवढी आपण करू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

वि. सा. संघाच्या विविध उपक्रमांमध्येकुठेही खंड पडणार नाही, अशी आशा डॉ. रूपा कुळकर्णी यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.

याप्रसंगी कु. शुभांगीचा भाऊ संजय मिश्रीकोटकर व राधा इखनकर या अंध विद्यार्थ्यांचीही भाषणे झालीत. ब्रेललिपीतील ग्रंथविभागाला सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन या दोघांनीही आपल्या भाषणात दिले. ब्रेललिपीत पुस्तक निर्माण करण्याची मनीषाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे संचालक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी या प्रकल्पासंबंधी माहिती दिली. नव्या पिढीचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व घडावे या उद्देशाने ग्रंथालयाने नवे ग्रंथ नवे समीक्षक, ग्रंथ सहवास यासारखे उपक्रम सुरू केले आहेत, असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी रमेश खानझोडे व कु. शुभांगी मिश्रीकोटकर यांचे स्वागत केले. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी कु. शुभांगीचे भेटवस्तू देऊन अभिनंदन केले. ब्रेललिपीतील एक ग्रंथ प्रा. सुरेश द्वादशीवार यांना देऊन कु. शुभांगी मिश्रीकोटकर हिने या नव्या ग्रंथ विभागाचे औपचारिक उद्घाटन केले. कार्यक्रमाचे संचालन वि. सा. संघाचे कार्यवाह श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

कार्यक्रमाला वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामनराव तेलंग, अनेक अंध विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रम विशेष

केंद्रीय मंत्री श्री. शांताराम पोटदुखे यांनी आपल्याला फोन करून या नव्या प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या आहेत, असे प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी आपल्या भाषणात सांगितले.

श्री. रमेश खानझोडे यांनी ब्रेललिपीतील ग्रंथ विभागाला १००१ रुपयाची देणगी दिली. आपल्या भाषणात त्यांनी या देणगीची घोषणा केली. चंद्रपूरचे माजी आमदार एकनाथराव साळवे यांनी १०१ रुपये, प्रा. किशोर महाबळ यांनी १५१ रुपये तर नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाइंड या संस्थेतर्फे संजय मिश्रीकोटकर यांनी १०१ रुपये देणगी या नव्या ग्रंथ विभागाला दिली.

■ शाखावृत्त पुढील अंकात देण्यात येईल.

[signature]

सरचिटणीस

पुरवणी

[साहित्य सूची]

निवेदन

युगवाणीच्या प्रकाशनाचे गेले वर्षभर विस्कटलेले गणित आपण बघितले आहेच ए-मे-जू-९० नंतरच्या म्हणजे जु-ऑ-स-९० च्या अंकात प्रसिद्ध करण्याकरता म्हणून पृ. ७७ ते ८४ पर्यंत छापून ठेवलेली १९८८-१९८९ वर्षात प्रकाशित साहित्याची सूची देखील त्यामुळे अप्रकाशितच राहिलेली होती. जु-ऑ-स-९० चा अंक वेगळा प्रकाशित झालेला नसून तो याच अंकात समाविष्ट आहे. त्या अंकाकरिता तेव्हाच छापून तयार ठेवलेली साहित्य सूची, पुरवणी म्हणून सोबत प्रकाशित करीत आहोत.

त्यावर छापलेल्या जु-ऑ-स-९० व पृ. क्र. ७७ ते ८४ या संख्यांमुळे वाचकांचा गोंधळ होऊ नये म्हणून हे स्पष्टीकरण.

युगवाणीत आजवर प्रसिद्ध लेखनाची एक समग्र सूची श्री. केशव जोशी यांनी संकलित केलेली असून विदर्भ साहित्य संघ ती पुस्तक रूपाने स्वतंत्ररित्या प्रकाशित करीत आहे. येत्या महिन्यातच हे प्रकाशन उपलब्ध होईल.

— संपादक

साहित्य सूची

युगवाणी जाने. १९८८ ते डिसेंबर १९८९

संकलक : केशव जोशी

संशोधन / प्रबंध / लेख

आवळीकर पंडीत	पुरंदरासंबंधी ऐतिहासिक आणि अनैतिहासिक	पृ. १०	जुलै-डिसेंबर ८८
आष्टीकर मधुकर डॉ.	कै. ग. त्र्यं. देशपांडे एक ज्ञानव्रती	पृ. ९	ऑक्टो-डिसेंबर ८९
उबगडे शोभा	साहित्य भांडार : अनुवाद मूळ लेखक : डॉ. रामप्रकाश सक्सेना	पृ. १०६	एप्रिल-जून ८९
काळे अक्षयकुमार डॉ.	बालकवी एक उद्ध्वस्त पारवा	पृ. १२	जुलै-सप्टेंबर ८९
कीर गिरिजा	धर्मानं नातं	पृ. ६१	एप्रिल-जून ८९
कुल्ली स. त्र्यं.	कोसला : काही प्रतिक्रिया	पृ. २७	एप्रिल-जून ८८
	मार्क्सवादी समीक्षा : एक निरीक्षण	पृ. ४३	ऑक्टो-डिसेंबर ८९
कुळकर्णी ज. बा.	जिव्हाळा जोपासणारे वा. रा. ढवळे : पत्ररूप दर्शन	पृ. ४८	जाने-मार्च ८९
कुळकर्णी सु. वा.	ज्ञानदेवांचा कालखंड । काही नवी समीकरणे	पृ. २४	ऑक्टो-डिसेंबर ८९
कोलते वि. भि. डॉ.	श्रीमुख दृष्टांत आणि लीळाचरित्र	पृ. ६	एप्रिल-जून ८८
	साहित्य वाचस्पती डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांची साहित्यसाधना	पृ. ३	ऑक्टो-डिसेंबर ८९
गिरिधारी भास्कर डॉ.	नवी समीक्षा-नवे प्रश्न एक चिंतन	पृ. ५१	ऑक्टो-डिसेंबर ८९
गोंधळेकर श्रीकांत	हायकूला खरोखरच मराठीत फुलू देणार को...	पृ. २७	जाने-मार्च ८८
चितळे श्रीपाद केशव	विदर्भातील दोन मध्ययुगीन शिलालेख	पृ. ६२	जुलै-सप्टेंबर ८९
चोरघडे वा. कृ. / बगे आशा	दोन कथाकार : एक भेट	पृ. ३१	एप्रिल-जून ८९
	एक रात्र किरणमयी	पृ. ३६	एप्रिल-जून ८९
जोग धनंजय प्रा.	कथावस्तूचे मनोभाषावैज्ञानिक परीक्षण	पृ. ५६	जुलै-सप्टेंबर ८९
जोशी श्रीपाद भालचंद्र	संपादकीय थोडेसे वेगळे-१	पृ. २	एप्रिल-जून ८९
	संपादकीय थोडेसे वेगळे-२	पृ. ३	जुलै-सप्टेंबर ८९
जोशी म. रा.	मराठी वाङ्मयेतिहासाची तत्वमीमांसा लेख ३ रा	पृ. १८	जुलै-डिसेंबर ८८
जामकर मधू	तीन केशवसुत	पृ. ९१	जाने-मार्च ८९
टोंगो शरदचंद्र	संचालक वामनराव	पृ. ६०	एप्रिल-जून ८९
ढहाके वासुदेव	करंदीकरांच्या कवितेतील साम्यवादी जाणीव	पृ. १९	जाने-मार्च ८८

हेर्लेकर सुलभा	दोन कवडसे; सघन सूर	पृ. २३	जुलै–डिसेंबर ८८
	आधार, सूर्योदय, पान घरण. देणे	पृ. ५१, ५२, ५३, ५३	जानेवारी–मार्च ८९
	नाते, झुला, संवाद	पृ. ५२	जुलै–सप्टेंबर

टिपणे

काळे अक्षयकुमार डॉ.	वि. भि. कोलते	पृ. ६६	जानेवारी–मार्च ८८
कुळकर्णी द. भि. डॉ.	आजची मराठी कथा : शोधाच्या दिशा	पृ. ८८	एप्रील–जून ८९
बखले सु. वा.	तार्किक प्रत्यक्षार्थवादाचे उद्गाते ए. जी. एयर : एक टिपण	पृ. ३२	ऑक्टो–डिसेंबर ८९
सावळापूरकर पां. कृ.	कविभूषण बळवंत गणेश खापर्डे : एक नोंद	पृ. ११	ऑक्टो–डिसेंबर ८९
सिरास श्रीनिवास रामचंद्र	आशा बगे : एक नवे अस्तित्व	पृ. ६४	ऑक्टो–डिसेंबर ८९

एकांकिका

कठाळे संजय	द वेब	पृ. ५४	जानेवारी–मार्च ८९
बेडेकर दिनकर	गोष्ट राजाची, भिकाऱ्याची किंवा मेलेल्या कुत्र्याची	पृ. ६८	ऑक्टो–डिसेंबर ८९

मुलाखत

पांढरीपांडे दमयंती	वामन कृष्ण चोरघडे	पृ. १२	एप्रिल–जून ८९
हेर्लेकर सुलभा	आशा बगे	पृ. ३०	जुलै–सप्टेंबर ८९

दृक श्राव्य

कानेड माणिक	वाडा चिरेबंदी–एक पुनरावलोकन	पृ. ७०	जानेवारी–मार्च ८८
सावदेकर आशा डॉ.	संगीत कान्होपात्रा	पृ. ४८	एप्रिल–जुन ८९

ग्रांथिकी

समीक्षण, परीक्षण पुस्तक परिचय इ.

अमदाबादकर अनंत	भारतीय स्त्री जीवन : गीता साने	पृ. ३७	एप्रिल–जून ८८
कोलटकर शीला	स्त्री सूक्त : आश्विनी धोंगडे	पृ. ३२	जुलै–डिसेंबर ८८
	प्रवासवर्णन, एक वाङ्मय प्रकार : डॉ. वसंत सामंत	पृ. १०३	जानेवारी–मार्च ८९
कोलारकर रजनी	परिक्रमा, लता राजे	पृ. १३३	एप्रिल–जून ८९
जामकर मधु	हाकुनी : सुरेश द्वादशीवार	पृ. ७७	ऑक्टो–डिसेंबर ८९
जुमडे माधवी	हॅलो चार्लस्, माधव गडकरी ती एक रानफूल, शांता वैद्य महापूर : जयवंत काकडे आवजो : पद्मजा फाटक	पृ. २७	जुलै–डिसेंबर ८८

साहित्य सूची माहिती

चर्चा

पत्रव्यवहार

पुनर्मुद्रण

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत. या व्यतिरिक्तही इतर विषयांवर देखील.

१. अलौकिकतावाद, लौकिकता आणि रसव्यवस्था
२. वाङ्मयीन अनास्थेची सामाजिक-राजकीय मीमांसा
३. शासन, साहित्यिक आणि बांधिलकी
४. सफदर हाश्मी
५. पथनाट्याचे माध्यम स्वरूप
६. मराठी नियतकालिकांची अस्तंगतता
७. निखळ वाङ्मयीन नियतकालिके
८. लिटिल मॅगझीन : भूमिका, कार्य आणि भविष्य
९. विजय तेंडुलकर
१०. साहित्यातील प्रचार आणि प्रचार साहित्यातील साहित्य
११. महेश एलकुंचवार
१२. सौ. जयश्री यत्ते–भट
१३. सत्यदेव दुबे
१४. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रातील संवाद-संकल्पना
१५. साहित्यातील संवादाचे संवादशास्त्रीय स्वरूप
१६. कलाप्रकारांचे परस्परसंबंध
१७. हुसेन
१८. हेब्बर
१९. रझा
२०. अमृता शेरगिल
२१. स्ट्रक्चरॅलिझम
२२. विहेविअर स्कूल
२३. मराठी साहित्याचे जागतिक संदर्भातील थिटेपण आणि मोठेपण
२४. अनुवादित मराठी साहित्य
२५. मराठी कवितेची संख्यात्मक आणि गुणवत्ता

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत.

२६. लोकशाहीचा वाङ्मयीन–कलाविषमक अभिरुचीवरील परिणाम
२७. गजल : मराठी आणि मराठी व्यतिरिक्तची
२८. सुरेश भटांची गजल
२९. ग्रंथालय चळवळीचा वाङ्मयीन–कला-विषय अभिरुची वृद्धीवरील परिणाम : शक्यता आणि वस्तुस्थिती
३०. ग्रंथाली, ग्रंथलालसा ग्रंथव्यवहार
३१. अॅन रॅंड
३२. गो. रा. दोडके यांचे लेखन
३३. भारती लेखक संघटना
३४. वाङ्मयीन पारितोषिके : नकार की स्वीकार
३५. प्रस्तावना : प्रयोजन आणि आन्हिक
३६. मराठी नियतकालिकां धोरणहीनत्व
३७. शांताराम
३८. उत्तरकर्तव्योन्मुखतेतील कलाव्यवहार्यता
३९. कविता : स्त्रियाची
४०. क्रांतिकाव्याची भाषा
४१. कलावंताच्या सांस्कृतिक नात्याचे निर्मितीवरील परिणामाचे स्वरूप
४२. पोस्टरी पोएट्री आणि मराठी
४३. कथेतील कथा
४४. आनंद जातेगावकरांची कथा
४५. उद्धव शेळक्यांची कादंबरी
४६. शाहीर अमरशेख
४७. अण्णाभाऊ साठे
४८. बाबूराव बागूल
४९. डॉ. आनंद यादव
५०. प्रभाकर उर्ध्वरेषे
५१. ना. के. बेहेरे
५२. अस्मितादर्श
५३. अक्षर वैदर्भी
५४. समुचित
५५. उगवाई
५६. निकाय आणि दलित साहित्याला वाहिलेल्या इतर नियतकालिकांची वस्तुस्थिती
५७. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर सामाजिक आंदोलनाचे मराठी साहित्यावरील परिणाम
५८. साहित्य संमेलनांचे राजकीय लागेबांधे
५९. दलित साहित्य संमेलने
६०. जिल्हा साहित्य नाटच–संमेलने : भूमिका व काय
६१. आदिवासींची अस्मिता आणि वाङ्मय कलाभिव्यक्ती
६२. शैलीशास्त्रीय समीक्षा आत्मनिष्ठे-कडून वस्तुनिष्ठ तपासणीकडे
६३. वि. वा. शिरवाडकर : मराठीचे ताजे ज्ञानपीठ
६४. भाषाशास्त्र : एक अपरिहार्य अध्ययन
६५. भाषाशास्त्र : अध्यापन–अध्यापनाची दशा आणि दिशा
६६. संवादशास्त्राचे अध्ययन आणि अध्यापन
६७. भाषेतील अर्थमीमांसा
६८. सौंदर्यशास्त्राचे अध्यापन
६९. कलावंत आणि सौंदर्यशास्त्र
७०. अनुवादित वाङ्मय
७१. अनुवाद आणि निर्मितीक्षमता
७२. परदेशस्त मराठी भाषिकांचे मराठी लेखन
७३. बृहन्–महाराष्ट्रातील मराठी लेखन
७४. अमराठी लेखकांचे मराठी लेखन

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० (अ) प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दि. २८-७-९१ दुपारी २ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरेल.

सभेपुढील विषय -

१. मागील वार्षिक साधारण सभेचा व विशेष साधारण सभेचा अहवाल.
२. गत वर्षाचे कार्यवृत्त.
३. १९९०-९१ सालचे हिशेब तपासनीसाकून तपासून घेतलेले हिशेब व अहवाल.
४. पुढील (१९९१-९२) वर्षाचे अंदाजपत्रक
५. १९९१-९२ करिता अधिकृत (चार्टर्ड) हिशेब तपासनीसाची नेमणूक.
६. पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीबाबतच्या तक्रारींचा विचार करून निकाल देण्यासाठी लवादाची निवड करणे.
७. सभाद्सांनी रीतसर पाठविलेले ठराव/सूचना.
८. अध्यक्षांच्या अनुमतीने येणारे अन्य विषय.

गणपूर्ती अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व तिला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

संघाच्या साधारण सभेत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी पूर्वसूचना सभासदाने सभेपूर्वी चार दिवस अगोदर कार्यालयाकडे दिली पाहिजे.

ह्या सभेला सर्व सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

विशेष सूचना - घटना कलम ९ (इ) अन्वये सभासद होऊन बारा महिने न झालेल्या नव्या सभासदास मताधिकार राहणार नाही.

नागपूर
दिनांक २५-७-९१

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस

अनुक्रमणिका

प्रकाशक मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२
मुद्रक मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर-१२
मुखपृष्ठ मुद्रण मधुकर वैद्य, मधुकर आर्टस्, धनतोली, नागपूर-१२

अनुक्रमणिका